
# बिल्वदल

शंकरराव करंबेळकर : व्यक्ति आणि विचार



# बिल्वदल

## शंकरराव करंबेळकर : व्यक्ती आणि विचार

# बिल्वदल

## शंकरराव करंबेळकर : व्यक्ती आणि विचार

संपादक :
म. वि. खंडकर
शा. द. घळसासी
वि. पु. गोखले

किंमत पांच रुपये.

प्रकाशन :
केंद्रीय अर्थमंत्री
ना. य श वं त रा व  च व्हा ण
यांच्या शुभहस्ते.
११.४.१९७१.

सजावट :
आनंद करंबेळकर
व्हिज्युअल युनिट
मुंबई २८

प्रकाशक :
कार्यवाह,
' बिल्वदल ' ग्रंथ समिती
कऱ्हाड.

मुद्रक :
वि. रा. नावडीकर
श्रीदत्त प्रेस,
कऱ्हाड.

‘ बिल्वदल ’ प्रकाशनप्रसंगी

## ना. यशवंतराव चव्हाण :

“ प्रसंग असा आहे : एक संस्था आहे, तिला पंचवीस वर्षं पूर्ण झाली आहेत. थोडंफार काम आहे. एक ध्येयवादी दृष्टी आहे. ज्यांनी हे काम केलं, त्यांना शाबासकी नाही तरी निदान त्यांच्या कार्याचं कौतुक करावं हा ( या रौप्यमहोत्सवाचा ) हेतू. या संस्थेशी आमची नावं जोडली आहेत. तशी ती जोडावी लागतात. पण या संस्थेचा खरा प्राण शंकरराव करंबेळकर आहेत. त्यांचेच सारे काम आहे.

हे ‘ बिल्वदल ’ मी पाहिलं. यात अनेक लेख आहेत. या ‘ बिल्वदला’त माझा लेख नाही याचे मला दुःख आहे, लिहीन पुन्हा केव्हा तरी. फार उशिरा कळवलं मला या लोकांनी !

शंकररावांना आम्ही ओळखत होतो ते इंदोलीचे शंकरराव म्हणून; काँग्रेसप्रेमी इंदोली गावच्या दिनकरराव निकमांचे शेजारी म्हणून. पण पुढे ते कऱ्हाडात आले आणि त्यांची खरी ओळख झाली. त्यावेळी राजकारणानं वेडी झालेली माणसं होतो आम्ही. राजकारणात आमच्यासारख्या वेडचा झालेल्यांची प्रवृत्ती लक्षात घेऊन काम करणाऱ्या शहाण्या माणसाची आम्हाला गरज होती. शंकरराव, ज्याचे वर्णन ‘ व्हर्सटाइल ’ असं करता येईल असे आहेत. हा माणूस असा आहे की हातात बाजाची पेटी घेतली तर सुंदर गाणं गाऊन दाखवील, साहित्यिकांच्या संगतीत बसला, कवींच्या बैठकीत बसला तर स्वतःचं एखादं पद म्हणून दाखवील. राजकारणी

लोकांच्या पठडीत बसला तर एखादी चमक दाखवील अशी नवीन ध्येयवादी दृष्टी देऊन जाईल. अत्यंत व्यवहारदक्ष, अचूक सल्लागार असा हा माणूस आहे.

शंकरराव एका बँकेचे डायरेक्टर आहेत; अनेक वर्षं ते म्युनिसिपालिटीत आहेत आणि ( एकदा ) प्रेसिडेंटही होते हे आज सांगितलं तर खरं वाटेल ? परस्परविरोधी अशा या क्षेत्रात ते मोठ्या सहजतेनं आपले काम करतात.

एक प्रसंग निर्माण झाला आणि ही संस्था निघाली. समस्या अशी निर्माण झाली होती की शिक्षणसंस्थांचा गाभा शिक्षक आहे, त्याला काही मान आहे, त्याला काही स्वत्व आहे ही गोष्ट सोईस्करपणे विसरली. अशा एका संस्थेतून काही शिक्षक बाहेर पडले. त्यात शंकरराव होते. आम्ही नुकताच एक लढा लढून आलो होतो. मला वाटतं, शंकरराव त्यावेळी माझ्याकडं आले ते लढायला ही माणसं चांगली उपयोगी पडतील अशा हिशोबानं. मी त्यांना म्हटलं तुम्ही निर्धारानं काम करणार असलात तर मी तुमच्याबरोबर काम करीन. ते निर्धाराने उभे राहिले. आज पंचवीस वर्षांनंतर पाहतो ते केवढं मोठं काम झालेलं दिसतंय !

मला सर्वच क्षेत्रात चांगले मित्र मिळाले. मित्राच्या नि विरोधकांच्या बाबतीतही मी मोठा भाग्यवान आहे. शंकररावांना मी माझे महत्त्वाचे मित्र मानतो. त्यांच्या संगतीत एकाकाळी काढलेले दिवस– मंतरलेले दिवस होते ते ! केरोसिनच्या दिव्याच्या प्रकाशात, अंधाऱ्या गल्लीतल्या चिमुकल्या खोलीत आम्ही खूप बोललो, शक्याशक्यतेचा विचार न करता योजना आखल्या. जे मनात योजलं ते आज घडलंय. या संस्थेची अशीच भरभराट होवो, जोपर्यंत आपल्या प्रेरणांशी ती प्रामाणिक आहे, सुसंगत आहे तोपर्यंत ती वाढती राहील.

मध्यंतरी शंकरराव हृद्रोगानं आजारी पडल्याचं ऐकून चिंता वाटली. शंकरराव, तुमचा हसरा चेहरा, प्रेमळ बोलणं ही एक आनंद देणारी गोष्ट आहे. हे बिल्वदल मी परमेश्वराला वाहतो. हा आमचा एक चांगला मित्र, आनंदी प्राणी, कर्तबगार माणूस कार्य करीत राहो. शंकररावांना परमेश्वर दीर्घायुरारोग्य देवो.

( ना. चव्हाणांच्या व्याख्यानाचा हा वृत्तान्त असून श्री. शंकरराव करंबेळकर यांच्याविषयीचा भाग तेवढाच येथे उद्धृत केला आहे.

– संपादक. )

★

## संपादकीय निवेदन

आमचे मित्र श्री. प्र. ल. ऊर्फ शंकरराव करंबेळकर यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे आणि त्यांच्या साक्षेपी विचारांचे दर्शन घडविणारा 'बिल्वदल' हा ग्रंथ वाचकांच्या हाती देताना आम्हाला कर्तव्यपूर्तीचा आगळा आनंद लाभत आहे.

कऱ्हाडच्या परिसरात गेले पाव शतक ज्यांच्या कर्तृत्वाने अभिमानास्पद आकार घेतला त्या श्री. शंकरराव करंबेळकर यांच्या शैक्षणिक कार्याबरोबरच त्यांच्या सामाजिक कार्याचा, साहित्यसेवेचा आणि साक्षेपी रसिकत्वाचा परिचय या 'बिल्वदला'त वाचकांना झाल्याविना राहणार नाही. 'प्रभाकरा'च्या सहस्र किरणात विश्वाला चैतन्य, प्रकाश आणि जोष देण्याचे सामर्थ्य असते. श्री. शंकररावांचे व्यक्तिमत्त्व या सर्व अभिजात सामर्थ्यांनी परिपूर्ण आहे.

श्री. शंकरराव करंबेळकरांच्या सर्वस्पर्शी जीवन-प्रवाहात श्री शिवाजी शिक्षण संस्थेची वर्धिष्णू गती सामावलेली आहे. त्यामुळे श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या रौप्यमहोत्सवप्रसंगीच श्री. करंबेळकरांच्या व्यक्ति-विचारांचा परिचय करून देणारा ग्रंथ सिद्ध केला पाहिजे अशी कल्पना श्री. करंबेळकरांच्या स्नेह्यांत निघाली आणि या ग्रंथ - संपादनाची जबाबदारी सर्वांनी आमच्यावर सोपविली. लेख देण्यासंबंधी आमची विनंती श्री. शंकरराव करंबेळकरांविषयीच्या आपुलकीने सर्वांनी मानली, याबद्दल आम्हांस आनंद वाटतो. श्री. करंबेळकरांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंचे दर्शन घडावे या हेतूने संपादन करताना पुनरुक्ती टाळण्यासाठी क्वचित काही लेखांचा संक्षेप करावा लागला आहे. या सर्व लेखांची मांडणी करण्याची काही योजना केली असूनही ते अनेक कारणांनी शक्य झाले नाही. तथापि श्री. शंकरराव करंबेळकर यांच्याविषयीचा आदर आणि जिव्हाळा हे सूत्र मात्र या सर्व लेखांतून निश्चित आहे.

या ग्रंथात ज्यांचे लेख समाविष्ट झाले आहेत, त्याखेरीजही इतरांचे लेख मिळविण्याची इच्छा आणि शक्यता असूनही वेळेचे बंधन आणि पृष्ठसंख्येची मर्यादा यामुळे ते घेऊ शकलो नाही, या उणीवेची आम्हांस जाणीव आहे.

श्री. शंकरराव करंबेळकरांनी अनेक प्रसंगी आपले विचार व्याख्यानांतून प्रकट केलेले आहेत; पण ते संकलितरूपाने उपलब्ध नाहीत. म्हणून याच ग्रंथात श्री. करंबेळकरांची काही महत्वाची भाषणे समाविष्ट केली आहेत. त्यांनी केलेली काही समयस्फूर्त भाषणेही सरस वठली असली तरी ती लिखित स्वरूपात उपलब्ध नाहीत,त्यामुळे त्यांचा समावेश करता आला नाही,याबद्दल रुखरुख वाटते.

या ग्रंथासाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक पद्मभूषण श्री. वि. स. ऊर्फ भाऊसाहेब खांडेकर यांनी स्वतःची प्रकृती बरी नसताही श्री. शंकररावांवरील प्रेमाने 'शुभेच्छा' पाठविल्या, याबद्दल वाटणारी कृतज्ञता शब्दातीत आहे.

श्री. शंकररावांचा आणि ना. यशवंतराव चव्हाण यांचा अकृत्रिम स्नेह ध्यानी घेता त्यांच्याच हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन होण्यात औचित्य आहे म्हणून आम्ही ना. चव्हाणांना विनंती करताच त्यांनी ती तत्काळ मान्य केली. याबद्दल आम्ही ना. चव्हाण यांचे कृतज्ञ आहोत.

या ग्रंथाच्या खर्चासाठी श्री. शंकररावांवर निरतिशय प्रेम करणाऱ्या त्यांच्या काही स्नेह्यांनी आर्थिक सहाय्य केले, याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहो.

श्री. श्रीनिवास कुलकर्णी, श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या रौप्यमहोत्सवी 'स्मृतिकलश'– समितीचे सदस्य, आणि श्री. आनंद करंबेळकर यांच्या हार्दिक सहकार्यानेच हा ग्रंथ सजला आहे. त्यांच्या सहाय्याचे मोल आभाराने करता येण्यासारखे नाही.

श्री दत्त प्रेसचे श्री. नावडीकर बंधू आणि कामगार यांना श्री. शंकररावांविषयी वाटणाऱ्या आदरभावामुळेच अवघ्या पंधरा दिवसांत या ग्रंथाचे मुद्रण शक्य झाले. त्यांच्या परिश्रमांचा निर्देश करणे अगत्याचे आहे.

श्री. शंकरराव करंबेळकर यांना परमेश्वर उदंड आयुरारोग्य देवो अशी प्रार्थना करून हा ग्रंथ वाचकांच्या स्वाधीन करतो.

कऱ्हाड
दि. ११–४–१९७१

**म. वि. खंडकर**
संपादक

पद्मभूषण श्री. वि. स. तथा भाऊसाहेब खांडेकर

यांच्या

## शु भे च्छा

कऱ्हाडच्या श्री शिवाजी शिक्षणसंस्थेचे प्रमुख कार्यवाह आणि माझे मित्र श्रीयुत शंकरराव करंबेळकर यांचें व्यक्तित्व आणि कर्तृत्व दर्शविणारा ' बिल्वदल ' नांवाचा गौरवग्रंथ प्रसिद्ध होत आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. त्यांचा जीव कीं प्राण असलेल्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा रौप्यमहोत्सव साजरा होत असून तिच्या पंचप्राणांपैकीं एक असलेले शंकरराव यांच्या कर्तृत्वाची पावती त्यांचे विद्यार्थी, चाहते व सहकारी त्यांना देत आहेत ही तर दुधांत पडलेली साखर होय.

शंकररावांचा व माझा स्नेह गेल्या तपादीडतपांतला आहे. मी मूळचा दक्षिण महाराष्ट्रांतला. पण जीवनाच्या ओघाबरोबर वहात कोंकणांत गेलों. आयुष्याच्या उत्तरार्धाबरोबर वहात पुन्हां दक्षिण महाराष्ट्रांत आलों. पण प्रकृतीच्या प्रतिकूलतेमुळें माझं हिंडणं फिरणं फार मर्यादित झालेलं. अशा स्थितींत कऱ्हाडला असलेल्या शंकररावांच्याशीं माझा स्नेहसंबंध जडणं कठीणं होतं. शिवाय आयुष्याच्या उत्तरार्धात ओळखी पुष्कळ होत असल्या तरी स्नेह जडायला व तो वृद्धिंगत व्हायला माणसाची मनोभूमि पूर्ववयाइतकी अनुकूल राहिलेली नसते. असं असूनहि शंकरराव मला अगदीं जवळचे मित्र वाटतात याचं सर्व श्रेय त्यांना आहे. शिक्षण, साहित्य आणि सामाजिक कार्य या तीन गोष्टींची त्यांना विलक्षण गोडी आहे. एका संस्कृत सुभाषितकारानं सर्व व्यसनांत दोनच व्यसनं चांगलीं मानलीं आहेत. पहिलं विद्या-व्यसन आणि दुसरं ईश्वरसेवा. शिक्षण, साहित्य आणि समाजकार्य हीं शंकररावांचीं अशींच तीन व्यसनं आहेत. मीहि आयुष्यभर या क्षेत्रांतच रमत राहिलों असल्या-मुळं एकदां त्यांची माझी गांठभेट झाल्यानंतर, आपणां दोघांच्या मनाच्या तारा-जुळत आहेत याची जाणीव दोघांनाहि झाली. त्यानंतर आम्हां दोघांत परकेपणा असा उरला नाहीं. हा स्नेहाचा धागा त्यांनी कसा जोडला हें मी आठवूं लागतों तेव्हां माझ्या मनांत येतं, ' हाउ टु विन् फ्रेंडस् ' हें पुस्तक लिहिणाऱ्या डेल कार्नेजीनं शंकररावांचा सल्ला आधीं घेतला असता तर मित्र मिळण्याचे अधिक चांगले उपाय त्याला त्यांच्याकडून सहज शिकतां आले असते. कार्नेजीच्या पुस्त-कांत मुख्यतः व्यवहारवाद आहे. शंकररावजी मित्र जोडतात ते स्वतःच्या स्वभा-वांतल्या गोडव्यामुळं. मोकळेपणामुळं. स्वच्छ आरशांत माणसाचं प्रतिबिंब पडावं त्याप्रमाणं समाजकार्याविषयींची त्यांची तळमळ त्यांच्या स्वाभाविक आणि सहजसुंदर बोलण्यांत पदोपदीं प्रचीत होत असल्यामुळं.

शिक्षक, लेखक, समाजसेवक आणि संस्थाचालक या सर्वांमध्यें एक समान सूत्र आहे असं मला वाटतं. माणसाविषयीं– मग तो लहान असो वा थोर असो, गुणी असो वा नसो – त्यांना वाटणारं प्रेम हें तें सूत्र. या सूत्रामुळं त्यांचं संतांशींहि थोडं दूरचं कां होईना पण नातं लागतं. 'बुडती हे जन पहावे ना डोळां' या भावनेनं, हीं सगळी मंडळीं आपआपल्या क्षेत्रात वावरतात. कामांचे डोंगर उचलतात. हीं कामं करत रहाणं हा त्यांचा धर्म होतो. अगदीं अलिकडच्या भाषेंत सांगायचं म्हणजे ही त्यांची कमिटमेंट असते. आपल्या भोंवतालचं जगांतलं दुःख, अज्ञान आणि अमंगलत्व पाहून हीं मंडळीं मनांत बेचैन होतात. यथाशक्ति तें नाहींसं करण्यासाठीं धडपडूं लागतात. हातीं घेतलेल्या कामांत स्वतःला झोंकून देतात. वेगानं वहात येणाऱ्या नदीनं खूप खूप उंचावरून बेगुमानपणानं खालीं उडी टाकावी तशी हीं मंडळीं आपल्या कार्याला वाहून घेतात. त्या नदीमुळं धबधबा निर्माण होतो. तो धबधबा आपल्याला वीज देऊं शकतो. ती दूरदूरच्या गांवीं पोचते. घरं घरं उजळवून सोडते. या मंडळींचं कार्य थोडंफार अशाच पद्धतीनं होतं. काळाचं आव्हान स्वीकारीत हीं माणसं पुढं जातात. यशापयशाची किंवा वैयक्तिक सुखदुःखांची पर्वा न करतां हातांतला झेंडा खालीं पडूं देत नाहीत. आणि मग एके दिवशीं त्यांच्या तपश्चर्येवर नियति प्रसन्न होते. त्यांना हवं असलेलं वरदान देते.

शिक्षक, समाजसेवक आणि संस्थाचालक म्हणून गेल्या दोन तपांत शंकररावांनीं कऱ्हाड आणि कऱ्हाडचा परिसर यांच्यांत जें शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्य केलं त्याचा इतिहास थोडाफार असाच आहे. अशा कार्यकर्त्यांचा क्रूस त्यांचा त्यांनींच खांद्यावर घेतलेला असतो. तो खांद्यावर घेण्याची त्यांच्यावर कोणी सक्ति करत नाहीं. त्या क्रूसाचे खिळे वाटचाल करतांना त्यांना टोंचल्याशिवाय, जखमा केल्याशिवाय रहात नाहीत. पण जखमांची अथवा वेदनांची या विशिष्ट जातीच्या मंडळींना दाद असते कुठें ? त्यांचं कार्य फुलत जातं. त्यांचा सुगंध चोहींकडं दरवळूं लागतो. त्या सुगंधानं त्यांची तहानभूक हरपते. त्यांच्या वेदना, जखमा सारं, सारं कांहीं कुठल्याकुठं नाहींसं होतं.

शंकरराव आज या आनंदाच्या क्षणाचा उपयोग घ्यायला थोडे मोकळे झाले आहेत. सतत दोन तपांच्या वाटचालीनंतर ज्या ज्या कल्पना त्यांनीं मनांत आणल्या त्या त्या सर्व साकार झाल्यानंतर. सामाजिक कार्यकर्त्याच्या जीवनांत असा क्षण थोडा उशीरां येतो. पण तो केव्हांतरी येतोच येतो. मंगल अमंगलाच्या सनातन संघर्षांत मंगल यशस्वी होऊं शकतं हा दिलासा जेव्हां सर्वांना मिळतो तेव्हां, समाजाचा तोल सांभाळण्याच्या कामीं या मंडळींनीं केवढं मोठं कार्य केलेलं असतं याची कल्पना येते, आणि मन त्यांच्या विषयींच्या आदरानं भरून जातं.

शंकरराव गेल्या शतकाच्या शेवटच्या चरणांत महाराष्ट्रांत शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची जी परंपरा सुरू झाली तिचे खरेखुरे वारसदार आहेत. गोरगरीबांविषयींच्या कळवळ्यानं, ज्ञानगंगा खेडचापाडचांतल्या झोपडचांपर्यंत

जाऊन पोंचली पाहिजे या श्रद्धेनं, देशाचा चेहरामोहरा बदलून टाकण्याचं सामर्थ्य ज्या उच्च शिक्षणांत आहे तें मूठभर लोकांची मिरास न रहातां सर्वांना सुलभ व्हावं या जिद्दीनं ते सतत काम करीत आले आहेत. त्यांच्या-सारखे, समाजावर प्रेम करणारे आणि त्याच्या गुणदोषांची कल्पना असूनही, एक पायरी का होईना त्यानं वर चढलं पाहिजे म्हणून धडपडणारे कार्यकर्ते विरळ असतात. समाजाचं आपण कांहीं ऋण लागतों ही कल्पना आपल्यांतल्या भल्याभल्यांच्या, पढिक पंडितांच्या आणि गाद्यागिरद्यांवर लोळणाऱ्या श्रीमंतांच्या गांवींहि नसते. शतकानुशतकें आम्ही धर्म ही वैयक्तिक बाब मानली. त्या धर्माच्याद्वारें ज्याला संतुष्ट करायचं तो देव कुठंतरी दूर आकाशाच्या पलीकडं आहे अशी आपली समजूत करून घेतली. त्यामुळं समाजरूपानं तो देव आपल्याभोंवतीं वावरत आहे आणि त्याचीच निरपेक्षपणानं सेवा करणं हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे, या गोष्टीची जाण आपल्याला फार उशीरां–दीडशतकापूर्वी झाली. पण अजूनही ही जाण समाजाच्या रक्तांत भिनलेली नाही. एक व्रत म्हणून पाश्चात्य देशांत माणसं जशी निरनिराळ्या कार्यक्षेत्रांना स्वतःला वाहून घेतात. तसं आपल्याकडं मोठ्या प्रमाणांत घडत नाहीं, पोटतिडीक हा शब्द ज्यांच्या बाबतींत यथार्थतेनं वापरतां येईल असे सामाजिक कार्यकर्ते अद्यापि आपल्याकडे विपुलतेनं निर्माण झालेले नाहीत. या देशाची जी नवी जडणघडण व्हायची आहे तिला अशा प्रकारच्या कार्यकर्त्यांची फार आवश्यकता आहे. ' बिल्वदलांत ' शंकररावांच्या पिढींतले थोर समाजसेवक बाबूरावजी गोखले आणि तरुण पिढींतले श्रीनिवास कुलकर्णी या दोघांनीं त्यांच्या ज्या व्यक्तिमत्वाचा सविस्तर परिचय करून दिला आहे तें तरुण पिढीला निश्चितपणें प्रेरणा देऊं शकेल. शैक्षणिक किंवा सामाजिक असं विधायक कार्य करणाराला आपल्या ठिकाणीं किती विविध गुणांचा समन्वय साधावा लागतो हेंहि शंकररावांच्या व्यक्तिचित्रावरून दिसून येईल.


या ग्रंथांत शैक्षणिक परिषदांच्या अनुषंगानं शंकररावांनीं केलेलीं भाषणं समाविष्ट केलीं आहेत. या भाषणांत त्यांच्या अनुभवाचे अनेक खडे बोल आहेत. त्यांचा विचार शिक्षणक्षेत्राशीं संबंध असलेल्या सर्वांनीं करणं जरूर आहे. शिक्षण हें समाज परिवर्तनाचें एक साधन आहे हें तर खरंच. पण त्यापेक्षांहि नवा माणूस घडविण्याचं तें सर्वोत्कृष्ट साधन आहे. हें साधन आपण कुशलतेनं वापरत आहों काय हा प्रश्न प्रत्येक शिक्षकानं आणि शिक्षणसंस्थेनं स्वतःला केला पाहिजे. परीक्षार्थी विद्यार्थी हें आपलं केव्हांहि साध्य असतां कामा नये. परीक्षा पदरांत पडणं आणि तिच्या अनुषंगानं नोकरी किंवा रोजगार मिळणं या गोष्टी व्यवहारदृष्टचा ठीक आहेत. परंतु जोंपर्यंत आपल्या विद्यार्थ्यांचीं मनं नव्या संस्कारांनीं भारलीं जात नाहींत, प्रवाहाविरुद्ध पोहण्याची प्रबळ इच्छा त्यांच्या ठिकाणीं निर्माण करीत नाहींत तोंपर्यंत आपलं शिक्षण थोडंतरी लुळंपांगळं रहाणार हें उघड आहे हें शिक्षण केवळ पुस्तकी राहूं नये. केवळ परीक्षार्थी किंवा चाकरमानी होऊं नये. तर

आपल्या भोंवतालच्या विशाल समाजाशीं आपलं आंतरिक नातं आहे हें न विसरणारा, आपल्या ताटांतल्या भाकरींतला चतकोर नितकोर का होईना आपल्याइतके जे सुदैवी नाहींत त्यांना देण्यासाठीं सज्ज असलेला आणि यंत्रयुगाचीं सारीं आव्हानं घेऊन भारतीय संस्कृतींतल्या भावनागर्भतेला अंतर न देणारा विद्यार्थी आपल्याला निर्माण करावयाचा आहे. शंकररावांनीं आपल्या या पुस्तकांतल्या भाषणांत शिक्षण-क्षेत्रांतल्या अनेक व्यावहारिक गोष्टींचा मार्मिकपणें विचार केला आहे. झाडावर फळ पिकावं तसे ते गेल्या दोन अडीच तपांतल्या अनुभवांनीं या बाबतींत अधिकार-वाणीनं बोलायला विचारसमृद्ध झाले आहेत. या प्रसंगानं माझी त्यांना अशी विनंति आहे कीं, त्यांनीं त्या बाबतींत आतां मनमोकळेपणानं खूप बोलावं–खूप लिहावं. आपल्या कार्यामधें त्यांना आलेले विविध अनुभव त्यांनीं अवश्य शब्दबद्ध करावेत. ते पुढल्या कार्यकर्त्यांना फार उद्बोधक होतील.

लिहिण्याचा विषय आला म्हणून सांगतों : संस्थाचालनासारख्या, सर्व गुणांची सत्वपरीक्षा पहाणाऱ्या मोठ्या उद्योगाला ते जुंपले गेले नसते तर शिक्षकी पेशाच्या अनुषंगानं ते थोडंफार लिहीतहि राहिले असते. साहित्यिक गुणांचा स्पर्श त्यांच्या वाणी–लेखणीला स्वभावतःच झालेला आहे. त्यांच्याशीं चार घटका गप्पा मारतांना हें जसं प्रत्ययाला येतं तसं या ग्रंथांतलीं त्यांचीं भाषणं वाचतांनाहि हें जाणवतं. कऱ्हाडचं साध वर्णन करतांना ते बोलून जातात. " एकाचं दोन करून सांगण्याचा या नगरीचा स्वभाव नाहीं. मात्र दोहोंतील एकतेचा आविष्कार करण्याची तिची प्रवृत्ति आहे. म्हणूनच येथें नद्या दोन असल्यातरी संगम एकच. " विद्यार्थ्यांचीं मनं कशीं संस्कारित करावींत हें सांगतांना ते म्हणतात, " गेल्या शंभर वर्षांत जगांत भौतिक, वैज्ञानिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत अनेक परिवर्तनं झालीं. हीं परिवर्तनं घडवून आणणाऱ्या वीरांचीं चरित्रं मुलांच्या वाचनांत येणं आवश्यक आहे. रणांगणावर शत्रूंशीं लढतांना जवानांची जी उन्मनी अवस्था असते तशीच अवस्था ध्येयानं धुंद झालेल्यांचीहि असते. हे ध्येयवादीहि वीरच असतात. या वीरांच्या पराक्रमांचा परिचय मुलांना होण्याची नितांत गरज आहे.... "

या ध्येयाच्या धुंदींतच शंकरराव पंचविशीकडून साठीकडं आले आहेत. तरी त्यांची ही धुंदी अजून तिळमात्र कमी झालेली नाहीं. सामाजिकदृष्ट्या यांतच त्यांचं मोठेंपण आहे. शिक्षणक्षेत्र विस्तारण्याची, अधिक गुणसंपन्न करण्याची, त्यांच्या द्वारानं अज्ञान आणि दारिद्र्य यांच्याशीं यशस्वी लढाई करणारी तरुण पिढी निर्माण करण्याची त्यांची ही धुंदी दीर्घकाळ टिको. आणि तिचा संजीवक स्पर्श केवळ त्यांच्या सहकाऱ्यांनाच नव्हे तर शिक्षणक्षेत्रांत काम करणाऱ्या सर्व महा-राष्ट्रीयांना होवो असें या शुभप्रसंगीं मी मनःपूर्वक इच्छितों.

को ल्हा पू र
४.४.१९७१



पुरुषोत्तम पांडुरंग गोखले

## शंकरकाका करंबेळकर : सार्वजनिक दर्शन

" राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येते तदनंतरें ।। " असे एक समर्थवचन आहे. ज्यास्तीत ज्यास्त लोकांची मने सांभाळावीत व ते जमले म्हणजे भाग्य येते. असा त्या वचनाचा चटकन लक्षात येणारा अर्थ जसा खरा आहे, तसाच दुसराही एक सूचक अर्थ आहे, तोही खरा आहे. संपर्कात येणाऱ्या, आणाव्या लागणाऱ्या माणसामाणसांची मनोरचना लक्षात आणून त्यांच्या त्यांच्यातील समानता, विषमता, समन्वयक्षमता यांचे सूक्ष्म दृढभाजक काढावेत आणि ज्याच्या त्याच्या पात्रतेप्रमाणे ज्याला त्याला कामास लावून संघटना साधीत रहावे आणि या अशा पद्धतीने " सर्वेषामविरोध " सांभाळून ' अचूक यत्न ' केला असता, भाग्य सिद्ध होतेच होते. या दोनही अर्थांचा गोड गोपाळकाला ज्याला करता आला तो " सर्वां वाटे हवा-हवासा " नेता होऊ शकतो. असा नेताच कोणत्याही संस्थेची धुरा वाहू लागला म्हणजे ती संस्था तग धरते, नावारूपास येते आणि ' चढत्या वाढत्या पदवी ' ला चढते.

कऱ्हाडची शिवाजी शिक्षण संस्था आपल्या नजरेपुढे ठेवणाऱ्या निरीक्षकांचा हाच अनुभव संस्थेचे ' सार्वजनिक काका ' म्हणून सर्व तऱ्हानी खस्ता खाणाऱ्या श्री. शंकरकाका करंबेळकरांच्या जीवनिकेतून आला आहे, " भाग्यासी काय उणे रे । यत्नावाचूनि राहिले ।। " हे शंकरकाकांनी खरे करून दाखविले आहे. नट-नटयापासून नामदार नामवंतांपर्यंत आणि साध्यासुध्या माणसापासून सत्वनिष्ठापर्यंत सगळयाशी सलोखा साधून अगर त्यांची सहानुभूती सांभाळून, शंकरकाकांनी " मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासोनि जाते । " अशी प्रगती शिवाजी शिक्षण संस्थेच्या पूर्व प्राथमिक वर्गापासून कॉलेज विस्तारापर्यंत घडवून आणली आहे. आणि यातील गुरुकिल्ली शंकरकाकांच्या उपयुक्ततादृष्टीत आहे. बारीकसारीक माणसाच्या बारीकसारीक टिपणी-भाषणांच्या तयारीपासून आपल्या कलाकुवतीचा उपयोग

शंकरकाकांनी इतका सेवेला लावला आहे की अडल्यानडल्या आणि एरवी शैक्षणिक प्रतिष्ठा नसलेल्या पण " सार्वजनिक " होण्याची ईर्षा असणाऱ्या तरुण व होतकरूंचे शंकरकाका हे ' कुलगुरू ' च समजले जातात. आणि या आपल्या प्राप्तस्थानाला ते आपल्या संस्थेच्या सेवेसाठी व उत्कर्षासाठी लावताना त्या तरुण होतकरू आणि कलावंत व प्रतिष्ठित यांचा शंकरकाका उपयोग करून घेतात.

जीवन वैयक्तिक, सामुदायिक आणि सार्वजनिक, शक्य तेवढे सुसह्य होऊन ' जनांचा प्रवाहो चालला म्हणजे बरे । ' हे पाहण्यावर काकांचा कटाक्ष असल्या कारणाने ' फड नासोचि ना देवा । ' या गोष्टीवर त्यांचे लक्ष असते. आपली विनोदोर्मी, रसिकता, मार्मिकता आणि सहकारप्रवृत्ती या व अशा ईश्वरदत्त व अभ्यस्त गुणांचा सदुपयोग केव्हा केव्हा आपली विद्वत्ताही खर्ची घालून, शंकरकाका करीत असल्याचे आढळते, त्यातील मर्म ' विद्या विनयेन शोभते ' या तत्त्वास अनुसरून ते आपले जीवन साधे व विचार उच्च राखीत राखीत, " अलौकिक होऊ नये लोकाप्रति । " ही जी दक्षता ते बाळगतात त्या दक्षतेत आहे. म्हणूनच लोकनाट्यापासून माध्यमिक शिक्षक परिषदेच्या संचालनापर्यंत शंकरकाकांना सुशिक्षित-अशिक्षित जनता जिव्हाळ्याने मानीत असते. आणि असे असले तरी

" असे जगावे सकळाकरिता ।
की जीवन हे चंदन व्हावे ।।
दिशादिशातुनि गंध पसरुनि ।
कालालाही चकित करावे ।। "

असे व्रती, सेवायोगी, तपस्वी शंकरकाका आहेत असेही जनता समजत नाही. तर मग शंकरकाकांच्या जीवनयशोलोचनेत जनता पाहते तरी काय ? " हास्यविनोदरम्याणां सज्जनानां परिवृतौ । ज्ञानविज्ञानसंयुक्ता जीवनस्य गतिर्भवेत् ।। " हा शंकरकाकांचा स्थायी भाव आहे, हे जनता स्पष्ट पहात असते.

शंकरकाका लोकमित्र आहेत याचे रहस्य त्यांच्या " आहे तरी सर्वा ठायी । पाहो जाता शिक्षकीत राही ।। " या त्यांच्या धारणेत आहे. ते कवी आहेत " वृषभध्वज ! "; ते नट आहेत " कामण्णा "; ते सहकारी अर्थशास्त्रज्ञ आहेत अर्बन बँकेचे डायरेक्टर; ते वक्ते आहेत " प्रसंगपुंगव; " ते रसिक आहेत नवनवोन्मेषशालिनी वाग्देवतेचे आणि तानमान सांभाळणाऱ्या गानकलेचे ! ते प्रयत्नपुरुषार्थी आहेत नियोजित कार्यप्रणालीचे; ते चाहते आहेत कलाकुशलतेचे आणि तेजस्वी प्रगतिकारांचे; ते पूजक आहेत साधुत्वाचे आणि विद्वत्तेचे; ते श्रद्धावान आहेत मानव्याचे व सहजीवनाचे. त्या त्या क्षेत्रातील जाणकारांनीच शंकरकाकांच्या तत्संबंधी वैशिष्ट्यांचे रसभरित दर्शन देणे योग्य. माझा तो अधिकारच नाही. तथापि शंकरकाकांच्या या व अशाच दुसऱ्या सामर्थ्यांचे केंद्र असते " लोकशिक्षण. " आपुलकीने जोडलेला स्नेहीगण असो, आपणच हाताशी

धरलेला कोणी आप्त असो अगर जनसामान्यातील कोणी गरजू असो अथवा त्यापेक्षाही सहज अंगावरून जाणारा कोणी गावबा असो, त्याला शंकरकाकांच्या शब्दकोटचापासून, निरीक्षित कथापासून, त्यानी घेतलेल्या कैवार–कैपक्षापायी मांडलेल्या कैफियतीतून नेहमी काहीतरी शिकण्यासारखे सापडतेच. शंकरकाका नगरपालिकेचे अध्यक्ष झाले, शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यवाह झाले, एखाद्या कुस्तीगीरांच्या परिषदेचे नेते बनविले गेले तरी त्यांच्या कारभारकुशलतेपेक्षा, अधिकारअंमलबजावणीतील कर्तव्य कठोरतेपेक्षा, सामाजिक न्यायनिष्ठुरतेपेक्षा, त्यांच्या चतुरस्र समयसूचकतेतून मिळणाऱ्या शहाणपणालाच अधिक मोजण्याकडे लोकांचा कल असतो. शंकरकाकांचे हे गुरुचरित्र विलोभनीय तसेच लोकसंग्रही आहे, यात शंकाच नाही; पण पारायणानीही प्रभावीपणे ते अनुकरणक्षम करण्याची हिंमत येरागबाळांना साधणारी नाही.

श्री. शंकरकाका करंबेळकरांना कधी कधी " सार्वजनिक काका " म्हणूनही कोणी विनोदाने तर कोणी गुणग्राहकतेने संबोधित असतात. " भर्जनं जातिभेदानां, अर्जनं ऐक्यसंपदाम् । तर्जनं द्वेषमूलानां, स्वाभिमानस्य गोपनम् ।। " अशा त्यांच्या विविधतेतील एकताल समाजसन्मुख सद्बुद्धिमुळेच शंकरकाका वरील तऱ्हेच्या लोकपदवीला पात्रतासिद्ध ठरले आहेत. शिक्षणसंस्थेतील शिक्षक म्हणून त्यांची योग्यता त्यांच्या सहकाऱ्याना, शिक्षणतज्ञाना, शिक्षणाधिकाऱ्याना आणि शिष्य प्रशिष्यांना जी पटली असेल तीपेक्षा आगळेपणाने लोकमानसात पटली आहे, हे स्पष्ट आहे. " परदुःखदुःखितं चित्तं " शंकरकाकांचे असल्यामुळे तेव्हाच " प्रेरकं व्यवहारस्य " होते, ही त्यातील " जादुगिरी " लोकांची आकर्षक शिक्षिका ठरते.

वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय अशा समस्याच समस्यांनी भेडसावणाऱ्या आजकालच्या जीवनात सुसंस्कृत मनाने " स्वजन-मन सुखावे । हा असा काळ फावे ।। " या धोरणाने चालणाऱ्या शंकरकाकांचे जीवन परमेश्वर मानते कर्तव्याला आणि पूजन मानते यथाकालोचित प्रयत्नाला. " परिवर्तिनि संसारे, सजातो यस्य यत्नेन याति लोकः समुन्नतिम् ।। " असा नागरीकत्वाचा कस लावला तर गेल्या पंचवीस वर्षांच्या जडणघडणीतील कऱ्हाडच्या विकासात शंकरकाकाच्या हातगुणाला मानाचे पान कोणाही विचारवंताला द्यावेच लागेल. ऐहिक जीवनात काळाची गरज ओळखून डोळसपणे रहावे – वागावे लागते हे शंकरकाकांच्या जीवनाचे प्रबोधन आहे.

' असो नित कृपा प्रभो तुमचिया सुबालावरी ।
जशी जनक–जन्मदा धरित छत्र तान्ह्यावरी ।।
स्मरोनि दिधले धडे कृति घडोत तेजस्विनी ।
यशोध्वज तयी स्थिरो जनमनात शालाग्रणी ।। '

अशी कृतज्ञतेची प्रार्थना विद्यार्थ्यांनी करीत रहावे, असा पवित्र शिक्षकीचा जीवनक्रम पतकरणाऱ्या शंकरकाका करंबेळकरांचा व माझा स्नेहसंबंध वडिलार्जित आहे, स्नेहार्जित आहे, गुणग्रहणार्जित आहे तो त्याच्या बालपणापासून. व्यक्तिशः मी काँग्रेसच्या प्रचारासाठी वगैरे खेड्यांची पदयात्रा करीत असल्यापासून त्यांचा माझा संपर्क निकटचा असा दृढावत गेला. ते महाराष्ट्र हायस्कूलमध्ये शिक्षक झाले तेव्हा, महाराष्ट्र हायस्कूलमधून बाहेर पडण्याचा प्रसंग येऊन शिवाजी हायस्कूल निघाले तेव्हा, शिवाजी हायस्कूल आणि शिवाजी शिक्षण संस्था यांच्या संचालनेत परिस्थितीप्रक्षोभक वा स्वभावस्फोटक प्रसंग गुदरले तेव्हा, अर्बन बँकेचा संचालक म्हणून मी काम करीत असता उद्भवलेल्या आणीबाणीच्या प्रसंगी, फार काय, १९७० साली माझ्यावर संसारविन्मुख होण्याचा काळ गुदरला तेव्हा शंकरकाकांनी माझेशी बन्धुत्वाचे जिव्हाळयानेच व्यवहार केले आहेत. त्याबद्दल अंतःकरण भरुन येते व जीभ जायबंदी नि लेखणी स्थगित होते. म्हणूनच निरीक्षकाच्या नजरेतून ' शंकर हरि ' चे ' प्रभाकर लक्ष्मण ' होऊन आपली प्रभा लक्ष्मण रेषेने समाजावर सातत्याने पाडित राहणाऱ्या सार्थनामा शंकरकाकांचे जीवनयश कोणत्या धारेचे, धारणेचे व धोरणाचे आहे हे ऐतिहासिक मूल्यमापनाचे संदर्भात रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून एक गोष्ट आर्जवून सांगितलीच पाहिजे की माझ्याशीच काय, इतर पुष्कळांशीही तीव्र मतभेद केव्हाही झाले तरी मतभेदाने माणुसकी बुरसण्याइतक्या हीन पातळीवर शंकरकाका कधीच येणारे नाहीत अशी त्यांच्या मनाची कांब कणखर आहे.

श्री नि वा स वि ना य क कु ल क र्णी

# किति सुखकर दिन हा पातला

कृष्णा पुलाजवळच्या प्रचंड आवारांत जनसागर पसरला होता. मधूनच उठून उभें राहिलें कीं, माणसांच्याशिवाय कांहींच दिसत नव्हतें. पंडितजींना पहाण्यासाठीं मी माझ्या वडिलांच्याबरोबर आलों होतों. अतिशय उत्कंठेनं वाट पहात असतांना, पंडिजींचं आगमन सूचित करणारी, ती वातावरण भारून टाकणाऱ्या आवाजाची पायलट कार सायरन वाजवत आली. देवदूतासारखे दिसणारे पंडितजी उघड्या गाडींत उभे. पाठोपाठ मोटारींचा तांडा...

सुशोभित केलेल्या उंच व्यासपीठावर क्षणार्धांत पंडितजी येऊन उभे राहिले. एक विलक्षण लाट जनसागरावरून हेलावत गेली. पंडितजींनीं चहूंकडं बघितलं आणि दाही दिशांनीं वेढून राहिलेल्या निळ्या डोंगरांचा उल्लेख करून ते म्हणाले, डोंगरांच्या निळ्या कोंदणांत एखाद्या रत्नासारखं कऱ्हाड सुंदर दिसत आहे...

या सभेंतच पंडितजींना कऱ्हाड शहराच्यावतीनं मानपत्र देत असतांना मी काकांना पहिल्यांदा पाहिलं. तेव्हां ते कऱ्हाड नगरपालिकेचे अध्यक्ष होते. माझे वडील म्हणाले, " हे शंकरराव करंबेळकर. केवढा मोठा माणूस झाला हा ! "

त्या आधीं दोन वर्ष, मी सांगलीला शिकायला गेल्यावर, शंकरराव करंबेळकर हायस्कूलच्या शिक्षणासाठीं जिथं रहात असत ती जागा मला वडिलांनीं दाखवली होती. ते आणि माझे वडील एकाच वेळीं सांगलीला सिटी हायस्कूलला शिकायला होते. आणि एकाच ठिकाणीं रहात होते.

त्या सभेनंतर चार वर्षांनीं शंकररावांना या ना त्या कारणांनीं सतत पहायचा, भेटायचा मला योग आला. म्हणजे जवळजवळ पंधरा वर्षें मी त्यांना जवळून नि दुरून कऱ्हाडांत वावरतांना अनुभवत आहें.

कऱ्हाडला माझ्या आजोळीं, नोकरीच्या निमित्तानं मी रहायला आलों. नोकरीच्या ठिकाणीं, तशा परक्या वाटणाऱ्या अनेक माणसांमधून मला एक वेगळा, मनस्वी माणूस भेटला. आणि माझ्या लक्षांत आलं कीं, याचीं नि माझीं कितीतरी सुखदुःखं सारखीं आहेत. याच्या नि आपल्या तारा जुळूं शकतील. आणि त्या तशा जुळल्याहि. तो नि मी ऑफिसांत एका रूममध्यें समोरासमोर बसत असूं. आंकडेमोड चालली असतांना, पत्रांची आवकजावक नोंदली जात असतांना, शक्य असेल तसं, तेव्हां आम्ही वाङ्मयाविषयीं बोलत असूं. इतर लोक आमच्याकडं चमत्कारिक चेहऱ्यानं पहात. पण आम्ही, वाचलेल्या एखाद्या नव्या कवितेनं झपाटून निघालेले असूं. मग आमचे कलीग्ज आम्हांला कवि म्हणताहेत कीं कपि याचाहि पत्ता लागत नसे. या एकाकी वाटणाऱ्या, कविता लिहिणाऱ्या मनस्वी माणसाचं नांव होतं नागेश करंबेळकर.

पुन्हां हें शंकररावांचंच आडनांव.

नागेश करंबेळकरला मी त्याचं गांव विचारलं. तो म्हणाला ' इंदोली. ' आणखी खूप प्रश्न विचारले. शेवटीं " शंकरराव कोण ? " हाहि. शंकरराव नागेशचे सख्खे काका हें जेव्हां मला समजलं तेव्हां हा सहजासहजीं आलेला योगायोग आहे असं वाटलं नाहीं. कोणीतरी योजून पाठवल्यासारखीं माणसं भेटत असतात...

नागेशला मी त्याच्या काकांचे आणि आमचे जुने संबंध सांगितले. तो क्वचितच काकांच्याकडे जाई. नोकरी अशी पांखरासारखी होती कीं, कऱ्हाडांतला सूर्योदय बघत निघायचं तें तिथला सूर्यास्त दिसत असतांना कोटच्याकडं परत फिरायचं. दुसरं म्हणजे काका त्यांच्या घरीं सांपडणं दुरापास्तच असे. ते कोठेंतरी फिरतीवर गेलेले असत. गांवांत असत तेव्हां बाहेर कुठल्यातरी कार्यक्रमांत गुंतलेले. किंवा गप्पांच्या मैफिलींत पुरते बुडालेले. यांतून ते घरांत राहिलेच तर त्यांच्या भोंवतींच्या खुर्च्या कोणी ना कोणी तरी येऊन अडवलेल्या असत.

शंकररावांचं मनोऱ्याखालचं तिमजली घर माझ्या वाटेवरच होतं. दररोज अनेकदां त्यांच्या घरावरून जावं यावं लागे. मी त्यांना गॅलरींत उभं असतांना खूपदां पाहिलं होतं. पण माझी त्यांची कांहीं ओळख नव्हती. त्यांचा नि आपला फार दूरचा का होईना, एखादा धागा आहे हें त्यांच्याकडं बघतांना वाटे. ते घरीं असत तेव्हां जिन्याखालीं मोटारी, स्कूटरी, सायकली हटकून थांबलेल्या दिसत. तऱ्हेतऱ्हेच्या लोकांची त्यांच्याकडे वर्दळ दिसे. कधीं कोणी झब्बेवाले, कोचीच्या टोप्या घातलेले खादीधारी पुढारी जिना उतरतांना दिसत. कोणी बंद काळा कोट सांवरत चढणारे वकील, डॉक्टर, शिक्षक, एखादी विदुषी...एक ना दोन. वरतीं सारख्या कसल्यातरी मीटिंगा चालल्यात असें वाटे. वरतीं चाललेल्या बोलण्यांची

मंद गाज रस्त्यावर जातांना जाणवून जाई. एखादी ठांशीव दाद, शब्दांची पकड, मनमोकळा खळखळाट शंकररावांचाच असावा असें वाटे.

अशा घरावरून येत जात असतां, अचानक, नागेशनं काकांच्याकडं आपण एकदां जायचंय असं सांगितलं. शंकररावांनीं मला घेऊन यायला त्याच्याजवळ सांगितलं होतं.

अवघड वाटलं.

शंकरराव मोठे होते. त्यांच्याविषयीं मी खूप ऐकत होतों.

मी जाऊन काय करायचं ?

काय बोलायचं ?

पण एका संध्याकाळीं नागेशच्या पाठोपाठ जिना चढून मी शंकररावांच्याकडं गेलोंच. कॉटवर ते बसले होते.

अंगांत गंजीफ्रॉक, धोतराचा सोगा खांद्यावर. त्यांनीं मोठ्या प्रेमानं आम्हांला आंत घेतल्याचे स्वर, त्यांच्या त्या वेळच्या आज नेमकेपणानं न आठवणाऱ्या शब्दांना होते इतकं आठवतं. शेजारीं खुर्च्या ठेवलेल्या. बाजूला इकडंतिकडं पुस्तकं, मासिकं, वर्तमानपत्रं, ओआय्‌जीएस्‌चे निरनिराळ्या आकारांतले खाकी लखोटे.असा अक्षरांशीं सोयरीक असलेला माणूस मी बघत होतों. आणि माझ्या वडिलांबरोबर शिकलेला. बरं वाटलं.

शंकरराव " पांच मिनिटं " असं सांगून, कोणीतरी बसलेलं होतं त्याला कांही मजकूर डिक्टेट करूं लागले. तक्क्याला रेलून, अंग मोकळं करीत भरभर सांगूं लागले. समोर जुनं, जर्मन घड्याळ भिंतीवर लटकवलेलं होतं. त्याची धिमी टिकटिक ऐकूं येत होती. लंबकाची पिवळी जुनाट जड चकती कांचेतून इकडून तिकडं झुकतांना दिसत होती.

डिक्टेशन थांबलं. ते एकदम त्यांतून निघून आल्यासारखे म्हणाले " हं बोला, काय म्हणतांय् ! " त्यांची ही खास लकब होती. माणसांना आपल्या संवादाच्या पातळीवर आणण्याची...

नागेशनं माझी ओळख करून दिली.

शंकररावांना स्वतःच्या सांगलींत गेलेल्या काळाची आठवण झाली. त्या वेळच्या त्यांच्याबरोबरीच्या मित्रांच्या आयुष्यांना कशीं निरनिराळीं वळणं लागलीं तें त्यांच्या डोळ्यापुढं आलं. माझ्या वडिलांचं आणि त्यांचं चांगलं होतं. पण सांगलीनंतर त्यांची भेट नाहीं असं त्यांनीं मला सांगितलं.

कवितालेखनाचा विषय निघाला. ते म्हणाले, " तुमच्या नवकविता वगैरे असतील तर त्या कांहीं मला कळत नाहींत. पण मी वाचतों. हें पहा " असं म्हणून त्यांनीं टेबलावरचं मर्ढेकरांचं पुस्तक दाखवलं. मला खूपच आधार आल्यासारखं झालं. ते म्हणाले, " आम्ही तरुणपणीं कविता लिहायचा प्रयत्न केला. पण

त्यांत कांहीं अर्थ नव्हता. कॉलेजांत गेल्यावर सगळेच कविता करतात त्यांतल्याच त्या कविता. पण अजून कविता वाचायला आवडतं. "

आम्ही तसे खूपच वेळ बसलों त्यांच्याकडं. त्यांच्या मुलीनं चहा आणला. आमची भूमिका होती ती बहुतांशीं ऐकण्याचीच. शंकरराव बोलत होते ते अतिशय मोकळेपणानं. जणु फार पूर्वीपासून मी त्यांच्याकडं येत होतों. त्यांनीं वेळ मिळेल तेव्हां मला येत जायला सांगितलं. कांहीं अडचणी आल्या तर सांगायला सांगितलं.

पुन्हां दोनतीनदां मी गेलों, शंकररावांनीं वरून मला बघितलं आणि बोलावलं म्हणून. त्यांच्या पहिल्या भेटींत दिसलेलं त्यांचं अगत्य हा कदाचित् सुसंस्कृत उपचाराचा पाठ असेल अशी सूक्ष्म शंका माझ्या मनांत आली होती. पण पुढें ती मुळींच उरली नाहीं. शंकररावांना माणसांचा सोसच होता. कोण कोण आणि किती किती माणसें त्यांच्याकडे येत. विविध स्वभावांचीं. विविध उद्योगांचीं. त्यांना जोडणें, शक्य तें त्यांच्यासाठीं करणें, परस्परांना पूरक प्रेरणांच्या माणसांच्या एकमेकांना भेटी घालून देणें. हें त्यांचें एक प्रकारचें मोठें मिशनच चाललेलें होतें.

शंकरराव बरोबरीच्या नात्यानं इतकं बोलत कीं, त्यामुळं संकोचल्यासारखं होई. खरं तर ते तसे बोलले नसते तर आणखीनच संकोचल्यासारखं झालं असतं. ते बहुतेक परगांवीं गेलेले असत तेव्हां मी त्यांच्याकडं जाऊन येई. पुन्हां त्यानीं विचारलं कीं येऊन गेल्याचं सांगतां येत असे.

कऱ्हाडांतल्या वाङ्मयमंडळाचे शंकरराव प्रमुख होते. त्यावेळीं चांगलं ललित लेखन करणारे कऱ्हाडांत एकदम खूपजण जमा झाले होते. शांताराम शिंदे, भास्कर आळतेकर, सिंधू अराणके, वासंती वळवडे, सुरेश गजेंद्रगडकर, मोहन वेल्हाळ अशीं नवीं माणसं. पंडित सप्रे, कवि विहंग अशीं स्थानिक जुनीं माणसं. या साऱ्यांनीं एकत्र येऊन वाङ्मयमंडळाचं पुनरुज्जीवन व्हावं असं शंकररावांच्या मनांत होतं. त्या साठीं त्यांनीं मीटिंग बोलावली होती. पण अशा मीटिंगांना कांहीं अर्थ रहात नाहीं. त्यापेक्षां अनौपचारिकपणानं ज्यांच्या वृत्ति जमतील ते आपोआप एकत्र येतात. तसंच झालं. मीटिंग्ज बंद झाल्या. शंकररावांना वाईट वाटलं. ते म्हणाले, " वाङ्मयीन चळवळ चालू ठेवण्यासाठीं असं एकत्र येणं आवश्यक वाटतं... पूर्वीसारखीं मंडळं स्थापून ती चालवण्याची निष्ठा नव्यांमधें नाहीं. " पण पुढं एकदां ते म्हणाले, " या शाळकरी निष्ठेचा मलाहि आता कंटाळा आलाय्. "

नंतर एक स्थानिक कवींचं संमेलन शंकररावांच्या अध्यक्षतेखालीं झालं. त्या वेळीं ते म्हणाले, " मला कविता वाचायला, ऐकायला आवडतात हाच आजचा माझा अधिकार. "

शंकररावांच्याविषयीं पहिली दर्शनी जाणीव होई ती, एक वेगळ्या तऱ्हेचं पुढारीपण त्यांच्यांत असावं अशी. राजकीय पुढाऱ्यांच्याबरोबर ते वावरतच.

ना. यशवंतराव चव्हाणांचे ते निकटचेच स्नेही. पण यशवंतरावांशीं त्यांचं जें रहस्य जुळलं तें साहित्याच्याच वाटेनं. तेव्हां कऱ्हाडांतून यशवंतराव 'लोकक्रांति' साप्ताहिक काढीत. साहित्य, कला या सारख्या समान आवडीनिवडीमुळें, राष्ट्र-प्रेमानें भारलेल्या वृत्तीमुळें यशवंतरावांचे नि त्यांचे स्नेहसंबंध पुढें अधिक जवळचे झाले.

शंकररावांचं साहित्यप्रेम स्वभावांतूनच आलेलं. पुण्यानं तें वाढवलं असेल. एक वर्ष ते सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजांत होते. नंतर पुण्याला एक वर्ष वाडिया नि शेवटचीं दोन एस्पीमधें. एस्पीला ते आले माटे सरांच्यासाठीं. त्यांचं शिष्यत्व ते अभिमानान बोलून दाखवतात.

कॉलेजमधें त्यांचं कलामंडळ नांवाचं, कविता लिहिणारं, साहित्यचर्चा करणारं मंडळ होतं. त्यांचे आजचे सहकारी 'अर्धचंद्र'कार पंडित सप्रे याच मंडळांतले. 'पुष्कर' या नांवानं शंकरराव कविता लिहीत. 'स्नेहप्रभा' या कलामंडळाच्या १९३४ मधें प्रसिद्ध झालेल्या कवितासंग्रहांत त्यांच्या कविता समाविष्ट झाल्या आहेत.

'अंजन' साप्ताहिकांत साजणी या सदरांत ते बरेच दिवस लिहीत होते. प्रचलित विषयावरचं चुरचुरीत, विनोदाची छाया असलेलं, दत्तू बांदेकरांच्या धर्तीचं असं तें लेखन असे. त्यांनीं असं स्फुट लेखन अनेक नियतकालिकांतून केलं आहे. 'मराठी असे आमुची मायबोली' हें त्यांनीं संपादित केलेलं पुस्तक पुरवणीवाचन म्हणून अजूनहि महाराष्ट्रांतल्या शाळांतून वाचलं जातं.

शंकररावांनीं कोल्हापूरच्या प्रभा पिक्चर्सच्या एका चित्रपटांत गाणीं लिहिल्याची गोष्ट आतां बहुतेक विस्मृत होत चालली आहे. लहान मुलांसाठीं 'मायाबाजार' (१९३९) या चित्रपटाची निर्मिति राजा पंडित यांनीं केली होती. म्युझिकची जबाबदारी होती पंडित नगरकर यांजकडे. चाल ऐकून तिच्यावर बांधलेल्या द्वंद्वगीतातल्या

... 'तूं राणी'
'तूं माझा राया'
"उपवनीं गीत गाउंया"
'भृंगराज तूं गोड गुंजनीं'
'फुलराणी तूं गोजिरवाणी'
'फुलां फुलविती या जलधारा'
'त्यांपरि उधळूं प्रीतफवारा'...

अशा ओळी वाचल्या कीं, शंकररावांच्या शब्दकळेची कल्पना येईल.

१९४१ सालीं कऱ्हाडला भरलेल्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें कार्य-वाहपद शंकररावांनीं समर्थपणें उचललें होतें तें साहित्याच्या नादापोटींच. दरवर्षी

शारदोत्सवाच्या निमित्तानं नवींनवीं, साहित्यिक, कलावंत, मातबर माणसं कऱ्हाडांत यावींत म्हणून धडपडणं हा त्यांच्या स्वाभाविकतेचाच भाग. पुणें विद्यापीठाचीं बहि:शाल ज्ञानसत्रें कऱ्हाडांत त्यांनींच आणलीं. कोणी मोठा माणूस जवळपास आला कीं त्याला आणून त्याचा लाभ गांवाला करून द्यायचा. स्वत:च्या शाळेंतहि त्याला न्यायचं. मुलांनीं, जीवनांतल्या विविध पातळीवरचा अस्सल मोठेपणा म्हणजे काय तो किमान पहावा तरी असं त्यांना फार वाटतं.

म. म. दत्तो वामन पोतदार, वि. स. खांडेकर, यशवंत, अनंत काणेकर, श्री. के. क्षीरसागर, ग. दि. माडगूळकर, गो. नी. दांडेकर, पु. ल. देशपांडे, मंगेश पाडगांवकर, ग. प्र. प्रधान अशीं कितीतरी वाङ्मयीन माणसं शंकररावांच्याकडं येऊन गेलेलीं. कोणी साहित्यिक आला कीं, त्याला बोलवावं, त्याचं आतिथ्य करावं हा आजहि असलेला उत्साह साहित्यप्रीतीशिवाय कुठून येणार ? विविध क्षेत्रांतल्या सन्मान्य व्यक्ति त्यांच्याकडं येत असतातच. पण साहित्याशीं संबंधित असलेल्या माणसांतलं शंकररावांचें रमणें निराळें असतें. ते म्हणतात, " या माणसांत वावरतांना पुन्हां कॉलेजच्या काळांत गेल्यासारखे वाटतें. हुरहुरल्यासारखें होतें. "

शंकररावांच्याकडं नुकताच मी जाऊं लागलों होतों. तेव्हांचं त्यांच्यावर आलेल्या एका कौटुंबिक आपत्तीचं दृश्य मला आठवतं :

एका संध्याकाळीं त्यांच्या दारांत अतोनात गर्दी झालेली. शोककळेचा काळिमा आसपास पसरलेला. पहिल्यांदा त्यांच्याकडं गेलों असतांना, आम्हांला आंतून चहा आणून देणारी, मोठ्या डोळ्यांची त्यांची मुलगी, त्यांच्याच शाळेच्या ट्रीपमधून कमळभैरीला गेली असतांना, वाऱ्याच्या झपाट्यांनं डोंगरावरून कडेलोट होऊन गेली होती. घरांत इतकी गर्दी कीं, शंकरराव खालीं येऊन उभे राहिलेले. तिथं रस्त्यावर त्यांच्याशीं कोणीतरी सांत्वनपर बोलतांना मी ऐकलं होतं. वस्तुस्थिति स्वीकारणारे त्यांचे उद्गारहि मी दुरून ऐकले होते. स्वत:च्या मुलीविषयींचं दु:ख गिळून, ज्या शिक्षिका तिच्याबरोबर ट्रीपला होत्या त्यांना बसलेल्या धक्क्यांतून मानसिक आधार देण्याची अवघड गोष्टहि त्यांनीं केली होती.

ती घटना नंतर अलिप्तपणानं त्यांनीं पाहिली होती हें माझ्या पुढं लक्षांत आलं. शंकरराव या संदर्भांत म्हणाले, " मुलगी आमची गेली हें खरंच. पण ताकारीच्या डॉक्टरांनीं ज्या पद्धतीनं ती सगळी परिस्थिति हाताळली त्यामुळं तो आम्हांला फार शहाणा माणूस वाटला. त्यानं आम्हांला तिथं खूपच धैर्य दिलं होतं. "

तें सारं इथं सांगणं इष्ट नाहीं.

शंकररावांनीं डॉक्टरांच्या विषयींची कृतज्ञता पत्रानं व्यक्त केली होती.

आपल्या शक्तीपलीकडच्या गोष्टींना साकल्यानं समजावून घेण्याचा यत्न करणं, त्यांना सर्व शक्तीनिशीं सामोरं जाणं, जीवन नाट्याचे विभ्रम अनुभवत त्यांतून वाट शोधणं क्वचितच साधतं. शंकररावांना तें शक्य झालं आहे.

नाट्याची शंकररावांना आवडच आहे. कॉलेजांत असतांना आणि नंतरहि त्यांनीं नाटकांत चांगलीं कामं केलीं होतीं. कऱ्हाडच्या भडकमकर धर्मार्थ हॉस्पिटलच्या मदतीसाठीं केलेल्या 'भावबंधन' नाटकांतल्या, शंकररावांनीं केलेल्या कामण्णाच्या भूमिकेची कऱ्हाडांत अजुनी आठवण निघते.

पु. ल. देशपांडे यांच्याकडून आलेला एक निरोप सांगण्यासाठीं शंकररावांनीं मला बोलावलं होतं. बोलतां बोलतां त्या दिवशीं त्यांच्याकडं इतका वेळ झाला कीं तिथंच जेवायला थांबलों. मला वाटतं, त्यांच्या वारंवार भेटी होत गेल्या त्या या नंतरच. फार दिवस त्यांची भेट झाली नाहीं कीं, चुकल्याचुकल्यासारखें होई. शंकररावांच्या ऊबदार बोलण्यामुळं, सगळ्यांच्याप्रमाणं मीहि कधींतरी नकळत त्यांना काका म्हणायला लागलों.

शंकरराव सतत भटकणारे.
जीवनांतले अनेक चढउतार त्यांनीं पाहिलेले.
बोलण्याला अनुभव उभं करणारं बळ लाभलेलं.
सोबतीला स्वयंभू निर्मळ विनोद.

कामाचे डोंगर उपसण्यासाठीं आवश्यक असणारा उरक त्यांच्याकडं गेल्यावर नेहमीं पहायला मिळे. त्यांच्याकडं, माणसं सतत येत असतच. एकीकडे त्यांचीं कामं चालत, चाललेल्या मूळ विषयाचा ओघ अखंड असे. बोलणाराचा अनावश्यक पाल्हाळ, नवीन पाहणाराला क्वचित् आश्चर्य वाटावं इतक्या चट्‌दिशीं ते थांबवत. असं वाटे कीं, हा माणूस आपल्यालासुद्धां कधींतरी, " बरं, आणखी काय ? झालं ? " असं समारोपाचं विचारून उठवील.

शंकररावांच्याकडं कोण कधीं भेटेल सांगतां येत नसे. माझ्या अनेक महत्वाच्या माणसांच्या ओळखी शंकररावांच्याकडं झाल्या आहेत.

अशा माणसांत एखादा वेगळाहि माणूस भेटे:

अतिशय दरिद्री पण गुन्हेगारासारखा दिसणारा, एक काळा माणूस एकदां शंकररावांच्याकडं आला. जवळ येऊन त्यांचे पाय धरूं लागला. शंकररावांनीं त्याला कोण, काय म्हणून विचारलं. तसं त्यानं आपला इतिहास सांगायला सुरुवात केली. तो नाशिकहून इथं आला होता. आणि कऱ्हाडांत कुणीतरी त्याला 'काकासाहेबांना' भेटायला सांगितलं होतं. त्याचं काम होतं ते थोडं विचित्रच. त्याचा एक मेहुणा इथं पोलिसांनीं कसल्यातरी गुन्ह्याबद्दल धरून आणला होता

आणि पोलिसांच्या मारानं बेजार झाला होता. त्याच्या लाथा कमी करायला पोलीसांना सांगा असं तो शंकररावांना विनवीत होता. पोलीस पैसा काढण्यासाठीं त्याला मारीत होते असं त्याचं म्हणणं. शंकररावांनीं त्याला चहा दिला. थोडं शांत केलं. त्याची आणखी चौकशी केली. मग ते त्याला म्हणाले, " गुन्ह्याबद्दल कायद्यानं जे व्हायचं तें होईल. बाकीचं मी साहेबांना विचारून बघीन. "

कोणावर कांहीं अन्याय होत असेल आणि एखाद्या शब्दानं तो दूर होणार असेल तर शंकरराव तसा शब्द अवश्य टाकतील. आपल्या हातून काम होणार नसेल तर त्याला टांगतं न ठेवतां स्पष्ट शब्दांत तसं सांगतील. ऐकणारा माणूस हळवा असेल तर तेंच गोडव्यानं ध्वनित करतील आणि त्यानं कुठं जाणं इष्ट तें अचूकपणें सुचवतील. कधीं कधीं शंकरराव म्हणजे एखाद्या मोठ्या एक्स्चेंज ऑफिसमधें बसून हवा त्याला नेमका संपर्क साधून देणारे कोणीतरी आहेत असं वाटतं.

शंकररावांनीं एकदां एका अपरिचितास अचानकच माझ्याकडं पाठवलं. त्याची आणि शंकररावांचीहि विशेष ओळख होती असं नाहीं. त्याला माझ्याकडं कां पाठवलं आहे, त्याचं मी काय करायचं कांहींच कळेना. तो येऊं लागला. बोलूं लागला. साहित्याची चांगली जाण त्याला होती. तो इतका चांगला निघाला कीं, आमच्या एका घरगुती समस्येसहि त्याचा मोठा हातभार लागला...

शंकररावांच्या एका पुतणीच्या लग्नाच्या वेळीं कांहीं लेखक मंडळी त्यांच्याकडं उतरलीं होतीं. त्या निमित्तानं मीहि दोन दिवस त्यांच्याकडं राहिलों होतों. त्यांच्या घराच्या तिसऱ्या मजल्यावरची ही जागा होती. चांगल्या अभिरुचीनं तिथली मांडामांड केलेली. शंकररावांचीं खूप जुनीं पुस्तकं मला तिथं पहायला मिळालीं. एका विशिष्ट काळापर्यंतचं कवितासंग्रहांचं चांगलं संकलन त्यांत होतं. शंकरराव विषादपूर्वक म्हणाले, " खरी हीच माझी आवड. इतर उद्योगामुळं मागं पडली. " शंकरराव साहित्याबद्दल बोलायला लागले कीं, त्या विशिष्ट काळापर्यंतचे, चांगल्या वाचनाचे पडसाद त्यांत अजूनहि ऐकूं येतात.

बाहेर छान गच्ची होती. समोर उंच दोन मनोरे. अवतींभवतींचा परिसर. कऱ्हाड गांवाच्या घरांचं वरून होणारं दर्शन निराळं वाटे. शंकरराव वेळ मिळेल तसे वरतीं येऊन बसत. होय नको विचारीत. चर्चेत भाग घेत. शैक्षणिक क्षेत्रांतले ऐकलेले, पाहिलेले अनुभव नाट्यमयतेनें ऐकवत :

वडिलांनीं कुऱ्हाड हातांत असलेल्या वाशिंग्टनला पाहिलं. " झाड कुणी तोडलीं ? " असं विचारलें. वाशिंग्टननं दिलेलं उत्तर ऐकून त्यांना आनंद वाटला. खरं बोलल्याबद्दल त्यांनीं त्याला शिक्षा केली नाहीं. वर्गांत ही गोष्ट तपशीलवार

सांगून ती मुलांना कितपत समजली आहे हें अजमावण्यासाठीं शिक्षकांनीं प्रश्न विचारावयास सुरुवात केली.

" झाडं कुणी तोडलीं ? "

" वॉशिंग्टननं "

" त्याच्या वडिलांनीं त्याला शिक्षा केली का ? "

" नाहीं. "

" कां नाहीं ? "

एक विद्यार्थी उठून म्हणाला;

" मी सांगतों सर, वॉशिंग्टनच्या हातांत कुऱ्हाड होती म्हणून. "

अशी एखादी गोष्ट.

तर कधीं शाळेच्या संदर्भातल्या घटनेवर बाहेरून विनोदी वाटणारं पण आंतून अतिशय बोलकं भाष्य...

शाळेच्या सुरुवातीच्या काळांत शंकरराव नेहमीं गांवांतून गडबडीनं टांग्यानं जातांना दिसायचे. त्यांना या गडबडीविषयीं विचारल्यावर ते म्हणाले, " आम्ही सारखे टांग्यांतून फिरतों आहोंत त्यामुळं शेजारपाजारच्या लोकांना आमच्या संस्थेची सांपत्तिक परिस्थिति बरी आहे असं वाटे. होतं उलटंच. गांवांत कुठं चालत जावं तर शाळेचे गवंडी, सुतार, कॉन्ट्रॅक्टर असे अनेकजण रस्त्यावर अडवत. पैशांचा तगादा लावत. टांग्यांतून गेल्यामुळं मी गांवाला निघालोंय असं त्यांना वाटे. "

शंकरराव खरोखरी त्या वेळीं अशा उद्योगांत पडले होते कीं, ज्या वयांत प्रेमपत्रं येणं साजून दिसलं असतं त्या वयांत त्यांना संस्थेच्या सावकारांच्या देण्याच्या नोटीसा येत होत्या.

शंकररावांनीं कविता लिहिल्या. खूप स्फुट लेखनहि केलं आणि थांबवलं. कदाचित् त्यांना आपल्या त्यांतल्या मर्यादा कळल्या असतील. त्यांतली वैय्यर्थता जाणवली असेल. किंवा असं म्हणण्यापेक्षां, त्यांच्या व्यक्तिमत्वांतल्या अनेक प्रेरणांना साहित्याच्या रूपांतरित शक्तींतून मार्ग मिळाला असेल. साहित्याचा आणि संकल्पनांचा, आणि संकल्पनांचा आणि जीवनविषयक नवनव्या जाणिवांचा जो अन्योन्य संबंध आहे त्यामुळंच साहित्य ही जीवनव्यवहारांतील मूलभूत शक्ति आहे असं म्हटलं जातं.

१९३४ मधें शंकरावांच्या प्रसिद्ध झालेल्या ' दीपावलि ' कवितेंत

परदास्याचा दाहिं दिशीं जो दाटे अंधार
त्या दिपवाया चैतन्याचा उसळे अंगार

स्वातंत्र्यस्वागतार्थ सजुनी ही भारतमाय
पंचारति घेउनी निजकरीं आली कीं काय...

अशा देशाच्या स्वातंत्र्याच्या उत्कट इच्छेनं प्रेरित झालेल्या ओळी आल्या आहेत. हें देशप्रेम १९४२ च्या स्वातंत्र्यचळवळींत यथाशक्ति भाग घेत राहिलें होतें.

शंकररावांना समाजकार्याची ओढ लहानपणापासूनची. सातारा जिल्ह्यांतली इंदोली ही त्यांची मातृभूमि. समाजकार्यांत दिनकरराव निकम तिथं आघाडीवर असत. त्यांत आपल्यापरीनं भाग घ्यायला शंकररावांना आनंद वाटे. १९४२ मधें शांताराम गरुड प्रभृती तरुण मंडळींबरोबर चळवळीचीं गुप्त बुलेटिन्स काढावयाच्या कार्यांत शंकरराव होते. कासेगांवकर, किसनवीर अशा अनेक धडाडीच्या देशभक्तांना हा माणूस आपला आहे इतपत शंकररावांच्याविषयीं भावना असे. या भावनेचा शंकररावांना आपल्या आयुष्यांत पुढें अतिशय उपयोग होत राहिला. यशवंतराव चव्हाणांची स्नेहभावना याच कालांत दृढ झाली. शंकरराव आज ज्या राजकीय वर्तुळांत वावरतांना दिसतात तें पहातां, ते कर्तृत्वासाठीं राजकीय क्षेत्र निवडू शकले असते असें वाटतें. पण तो मोह त्यांनीं धरला नाहीं. त्या डावपेचांत पडण्यापेक्षां त्यांनीं आपल्या कलाला अनुकूल अशा शिक्षणक्षेत्राचा रस्ता धरला.

शंकररावांचं प्राथमिक शिक्षण त्यांच्या इंदोली या चिमुकल्या गांवींच झालं. १९३६ सालीं ते एस्. पी. कॉलेजमधून बी. ए. झाले. १९३७ मधें त्यांनीं तासगांव येथील हायस्कुलांत शिकवण्याचें काम केलें. १९३८–१९३९ सालीं बेकार स्थितींत 'मायाबाजार' चित्रपटाचीं गाणीं लिहिलीं. आवडीचं वाचन केलं. या कालांत त्यांना अन्य चांगली नोकरी नक्कीच मिळाली असती. पण राष्ट्रीय विचारापोटीं त्यांनीं सरकारी नोकरीकडे पाठ फिरविली. १९४० मधें बेळगांवच्या कॉलेजांतून ते बी. टी. झाले. या कॉलेजच्या पहिल्या वर्षाचे शंकरराव विद्यार्थी.

१९४० ते १९४५ या वर्षांत शंकरराव कऱ्हाड येथील महाराष्ट्र हायस्कूलमधें शिक्षक होते. या वेळीं, या नोकरीला सरकारचें कसलेंहि संरक्षण नव्हतें. स्थैर्य नव्हतें. घाटे, परुळेकर स्कीमसुद्धां नंतर आलेली. प्रत्येक एज्युकेशन सोसायटी म्हणजे एक एक स्वतंत्र संस्थान. सगळा कारभार सोसायटीच्या मॅनेजमेंटच्या मनावरचा. महाराष्ट्र हायस्कूलच्या सोसायटीचे देव हे सेक्रेटरी होते. शंकररावांचे आणि त्यांचे व्यक्तिगत संबंध अतिशय चांगले. परंतु सोसायटीच्या लहरीसाठीं त्यावेळीं सहा वर्षांत शाळेचे सात हेड्मास्तर झाले. अशा एका बदलीबाबतच १९४४ साली महाराष्ट्र हायस्कूलमधल्या शिक्षकांच्या, सोसायटीबरोबरीच्या मतभेदाला प्रारंभ झाला. अन्यायाविरुद्ध झगडावयाचें म्हणून शंकररावांच्या पुढाकाराखालीं श्री. वैशंपायन, श्री. पंडितराव सप्रे अशा समृद्ध, अनुभवी शिक्षकांचा मोठा

वर्ग शाळेंतून बाहेर पडला. शिक्षकांच्यावतीनें सोसायटीबरोबर समन्वय साधण्याचा पु. पां. गोखले, यशवंतराव चव्हाण यांनीं प्रयत्न केला. तो निष्फळ ठरला. आणि या क्षणींच आजच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या भव्य वृक्षाचें बीज रुजावयास पडले.

ज्या संस्थेंतून श्री शिवाजी शिक्षण संस्था निर्माण झाली ती महाराष्ट्र हायस्कूलची संस्थाहि आज श्री शिवाजी शिक्षण संस्थेंत विलीन झाली आहे.

कऱ्हाडांत आल्यानंतर, समाजकार्याची ओढ असलेले शंकरराव पु. पां. गोखले यांच्या त्यागी, निष्कलंक, प्रखर शब्दाविष्कार असलेल्या व्यक्तिमत्वानें भारून गेले होते. समाजाचें आपण कांहीं देणें लागतों, त्या साठीं आपण कांहीं केलें पाहिजे या उत्कट भावनेनें शंकररावांनीं या शाळेच्या घडामोडीकडे पाहिलें. अनुभवी शिक्षक गांवांतून बाहेर जाऊं नयेत– त्यांच्या ज्ञानाचा लाभ विद्यार्थ्यांना सदैव व्हावा या हेतूनें, पु. पां. गोखले, यशवंतराव चव्हाण, रामविलास लाहोटी या मोठ्यांच्या आशीर्वादानें व सहकार्यानें शंकरराव यांनीं एप्रिल १९४५ मध्यें श्री शिवाजी शिक्षण संस्था स्थापन केली.

शिक्षकांच्या पाठोपाठ विद्यार्थी व पालक आले. आणि सर्वांच्या साहाय्यामुळें आज पंचवीस वर्षांनीं, रौप्य महोत्सवाचे वेळीं ही संस्था म्हणजे महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासांतलें एक प्रचंड अस्तित्व झालें आहे.

आज नवी शाळा काढणें हा कित्येकांचा अर्थोत्पादनाचा फारच सोपा व्यवसाय झाल्याचें आपण पहातों. पण तो अतिशय अवघड असा काल होता. शिक्षण हें राजकारणाचें प्रभावी अस्त्र झालेलें नव्हतें अशा काळांत समाजवादी हेतूनेंच शंकररावांनीं संस्थेचें हें कार्य अंगिकारिलें.

आज या संस्थेच्या कऱ्हाडांत अनेक आणि अद्यावत् वास्तु उभ्या आहेत. तिच्या शाखांचा पसारा कऱ्हाडबाहेरहि विस्तारत गेला आहे. पांच हजारहून अधिक विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि जवळजवळ तीनशें सेवक संस्थेंत आहेत.

शिक्षणाच्या प्रसाराच्या मानानें गुणवत्ता न आली तर इतकें अस्वस्थ होण्याचें कारण असू नये. शिक्षणप्रसारानंतर शैक्षणिक गुणवत्तेचा विचार काळाबरोबर जरूर येईल असें सुरुवातीस शंकररावांचें सूत्र होतें. या सूत्रास अनुसरूनच शिक्षणाच्या प्रसारासाठीं संस्थेनें बहुजनसमाजाकडे अधिक लक्ष दिलें.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे पहिले चेअरमन यशवंतराव चव्हाण. १९४५ सालीं यशवंतरावांची समाजमानसांतील प्रतिमा, राष्ट्रीय आंदोलनांत उडी घेतलेला आणि त्यासाठीं नुकताच तुरुंगांतून आलेला एक तेजस्वी कार्यकर्ता अशी होती. आज बहरलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या खुणा तेव्हां नुकत्या उमटूं लागलेल्या. यशवंतरावांना पहिलें चेअरमनपद देण्यांत संस्थेनें त्यांच्या सुप्त शक्ति आधींच ओळखल्या होत्या असें म्हटलें तर अनुचित ठरणार नाहीं.

शंकररावांच्या आणि यशवंतरावांच्या निकट स्नेहांतील श्री शिवाजी शिक्षण संस्था हा आणखी एक घट्ट दुवा आहे. यशवंतरावांच्या समृद्ध व्यक्तिमत्वाबद्दल शंकरराव उत्कटतेनें बोलत रहातात. " यशवंतरावांच्या वाढत्या व्यापामुळें आतां संस्थेविषयीं क्वचितच मीटिंग्ज होतात. पण मीटिंगमध्यें ते खूप देऊन जातात. त्यांच्या दूरदर्शीपणाचा अतिशय फायदा होतो. संपूर्ण विश्वास टाकणें हा यशवंतरावांचा अंगभूत गुण. " आणि तसा त्यांचा विश्वास शंकररावांच्यावर आहे.

शंकररावांना येणाऱ्या त्यांच्या पत्रांत कधीं संस्थेसंबंधींची एखादीच पण महत्वाची ओळ असेल. तर कधीं त्यांच्या प्रकृतीविषयीं विचारणा करणारें एखादें हृदयस्पर्शी वाक्य. लॅसेक्सच्या गोळ्यांचा ओव्हरडोस झाल्यामुळें शंकररावांविषयीं चिंता व्यक्त करून प्रत्यक्ष लक्ष घालण्याचा भाग हाहि दोघांमधल्या स्नेहभावाचाच निदर्शक. मग हा स्नेहभाव कधीं थेट दिल्लीहून ग्रँटच्या दवाखान्यांत फोन येऊन, किंवा जातीनें शंकररावांना पहायला येऊन व्यक्त होईल आणि संबंधितांची थोडी फार धांवपळहि उडवून देईल.

हा स्नेह शंकरराव हळुवार जपतात. संस्थेच्या साहाय्यासाठीं वणवण करत असतांना त्यांचा मुंबईला यशवंतरावांकडे तळ पडे. त्यांच्याकडला पत्ता देतांना— ते मंत्री असल्यामुळें— शंकरराव संकोचत.

यशवंतरावांचा प्रत्यक्ष उपयोग संस्थेच्या साहाय्यासाठीं शंकररावांनीं केला नाहीं. पण ते नेहमींच म्हणतात कीं, " पाठीशीं असलेल्या यशवंतरावांच्या प्रभावामुळेंच संस्था मोठी होत गेली. " संस्थेच्या साहाय्यासाठीं शंकररावांनीं अनेक कलावंतांचे कार्यक्रम मुंबईंत घडवून आणले. लता मंगेशकर, पाकिस्तानांतून मुद्दाम आणवलेले विख्यात कवालीवाले फत्तेअल्ली मुबारकखान ही कांहीं, संस्थेसाठीं कार्यक्रम देणारीं अव्वल कलावंतांचीं नांवें. या कलावंतांविषयींची कृतज्ञता शंकररावांच्या शब्दांतून येत असते.

या कार्यक्रमांतून इतकें साहाय्य झालें कीं, श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या कऱ्हाडांतल्या ' सायन्स कॉलेज 'ची अद्यावत वास्तु त्यामुळें आकारूं शकली. नुसतें सायन्स कॉलेज चालवणें हा तसा आर्थिक तोट्याचा अव्यवहारच. पण संस्थेनें तो हेतूपूर्वक स्वीकारला. क्वचितच दिसणारें केवळ सायन्स कॉलेज आतां भरभराटत आहे. त्याच्या कला व वाणिज्य शाखा पूर्णपणें विस्तारल्या असून आतां त्या पुन्हां एका नव्या कॉलेजच्या रूपानें पुढें येत आहेत.

धार्मिक, शैक्षणिक, वाङ्मयीन, सामाजिक, सांस्कृतिक कार्यांचा संपन्न वारसा कऱ्हाड शहराला पुरातन कालापासून आजपावेतों लाभलेला. संत सखू, विठोबा आण्णा दप्तरदार, दादासाहेब आळतेकर, पु. पां. गोखले, यशवंतराव चव्हाण अशीं माणसें आपल्या मोठेपणानें काळावर खुणा केल्यासारखीं इथं उभीं असलेलीं. अशा

ठिकाणीं आपलं कार्यक्षेत्र निवडून तिथल्या जीवनावर त्याचा वेगळा ठसा उमटवणं हें सोप्या माणसाचं काम नव्हे. शंकररावांना तें साधलं. अनेक झटपट यश देणारीं कार्यक्षेत्रं दृष्टिक्षेपांत असतांना, तसे कोणतेहि मनसुबे रचून हिशेबी हालचाली न करतां शंकररावांनीं आपलं तीसहून अधिक वर्षांचं आयुष्य, कऱ्हाडांत राहून शिक्षणक्षेत्रांत गुंतवलं.

शंकरराव स्वतः उत्तम शिक्षक आहेत. वि. द. घाटे यांच्यासारख्यांनीं शंकररावांच्या, मराठीच्या तासाचा उल्लेख ' It was a treat ' असा केला आहे इतकें सांगितलें कीं त्यांत सगळें आलें. भुरळ घालणाऱ्या बोलीमुळें, जागोजागीं झुळझुळणाऱ्या विनोदामुळें, त्यांतल्या सखोलतेमुळें शंकररावांचे मराठीचे तास विद्यार्थ्यांना हवेसे वाटत. स्वतःविषयींचा अधिक बोध विद्यार्थ्याला त्यांच्या तासाला होई. आतां असे तास, त्यांच्या वाढत्या उद्योगांमुळें क्वचितच होत असतील हें वेगळें.

शंकरराव श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे पहिल्यापासून जनरल सेक्रेटरी आहेत.

गेलीं पंधरा वर्षें ते श्री शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक आहेत.

कऱ्हाडांतली शिशु शिक्षण संस्था त्यांनींच स्थापन केलेली. आणि यशवंतरावांच्या प्रेरणेनें केलेली नाईटस्कूलची उभारणीहि त्यांचीच. दिवसभर राबून पुन्हां नव्या हुरूपानें शिकण्यांत रमणारे, लहानपणीं नियतीनें जे हिरावलें तें ओढून आणण्याचा यत्न करणारे, समाजाच्या निरनिराळ्या पण बहुतेक विपन्न थरांतून आलेले अनेक विद्यार्थी पाहिले कीं मन भरून आल्याशिवाय रहात नाहीं.

शैक्षणिक क्षेत्रांतले बहुतेक मानसन्मान शंकररावांना मिळाले.

साताऱ्याच्या सैनिक शाळेचे ते प्रारंभापासून स्थानिक व्यवस्थापकीय समितीचे सभासद आहेत. सातारा जिल्हा स्कूल बिल्डिंग कमिटीचेहि. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणें विभागाचे, महाराष्ट्र राज्य यूथ वेलफेअर समितीचे ते सभासद आहेत. १९६१ सालीं कऱ्हाड येथें भरलेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा मुख्याध्यापक परिषदेचे ते प्रमुख कार्यवाह होते. सातारा जिल्हा माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे ते सात वर्षें अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्य म. गांधी जन्मशताब्दि समितीच्या शालेय विभागावर ते होते. हीं पदें आलीं तीं त्यांच्या त्या विषयींच्या सिद्ध गुणवत्तेसाठीं. खुर्ची अडवण्यासाठीं त्यांनीं तीं कधींच धरून ठेवलीं नाहींत. वेळोवेळीं स्वतःचे विचार प्रभावीपणें ते तेथून व्यक्त करीत राहिले आहेत.

कोठारी अहवालाचें पान न् पान अभ्यासून, त्यांतलीं टिपणें काढून, त्यावरतीं ते जेव्हां, मुद्दाम आयोजिलेल्या व्याख्यानांतून आपल्या स्वतंत्र प्रतिक्रिया व्यक्त करतात, किंवा डिपार्टमेंट ऑफ एक्स्टेन्शन सर्व्हिसेसच्यावतीनें शासनानें बोलाविलेल्या

परिषदांत उपस्थित राहून महत्वाचें सुचवतात, तेव्हां त्यांच्या शिक्षणविषयक जागरूकतेची, अभ्यासाची कल्पना येते.

ज्या क्षेत्रांत उभें आयुष्य त्यांनीं वेंचलें त्याविषयींचा त्यांचा संपन्न अनुभव समर्थपणें व्यक्त झाला तो ते जेव्हां, १९६२ सालीं मुंबई राज्य माध्यमिक शिक्षक संघाची परिषद अहमदनगरला भरली होती तिच्या अध्यक्षपदावरून बोलतांना— आणि पुन्हां १९६५ सालीं— महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा मुख्याध्यापक परिषदेच्या नाशिक येथें भरलेल्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष झाले तेव्हां— या दोन्ही संघटनांच्या अधिवेशनांचें अध्यक्षपद मिळवणारे महाराष्ट्रांत बहुधा ते एकटेच असतील.

या दोन्ही परिषदांचीं त्यांचीं भाषणें वेगळीं, व्यासंगपूर्ण, पारदर्शी, कुठल्याहि हितसंबंधांसाठीं कसलीहि टाळाटाळ न करणारीं आहेत. कधीं गंभीर तर कधीं चावऱ्या, कधीं अलंकारिक तर कधीं सहज, कधीं प्रतिमायुक्त तर कधीं सरळ अशा शैलींत त्यांचें शिक्षण क्षेत्रांत व्यक्त होणारें व्यक्तिमत्व त्यांतून वरतीं आलें आहे :

> ..." गुणवत्तामापक यंत्र जोंपर्यंत उपलब्ध नाहीं तोंपर्यंत त्याबाबत मतभेद रहाणारच. पूर्वीं इंग्रजीला महत्व होतें. आतां तें हिंदीला आलें आहे... अभ्यासेतर उपक्रम इतके वाढले आहेत कीं, ' येथें शिक्षणहि मिळेल ' असा फलक शाळेवर लावण्याची वेळ आली आहे... शिक्षणानें स्वातंत्र्याचें सार्थक होतें परंतु शिक्षणक्षेत्रच स्वतः बंधनांत जखडलेलें असतांना हें कसें होणार ?... आपण पत्करलेल्या लोकशाही ध्येयवादाच्या परिपूर्तीसाठीं शिक्षकानें आपल्या दैनंदिन जीवनांतून लोकाभिमुख वृत्तीचा आदर्श विद्यार्थ्यांपुढें ठेवला पाहिजे... "

असा त्यांच्या नगरच्या भाषणांतला एखादा छेद डोळ्यांखालून नेला, किंवा

> ..." परंपरेच्या पाणंदींतून अज्ञानानें फरफटत जाणारा बहुजन समाज...गुणवत्तेचा प्रकाश जादूच्या दिव्यासारखा चट्कन पडत नाहीं... हातांच्या बोटांची लांबी कापून सगळीं बोटें सारख्या लांबीचीं करणें ही समता नव्हे. बोटांना सारखा रक्तपुरवठा ही खरी समता. शिक्षणांतील समतेच्या कल्पनेचा हाच अर्थ अभिप्रेत आहे... शिक्षणाचा पाया बळकट नसेल तर सारे भौतिक बडिवार व्यर्थ आहेत... समाजांतील अंध रूढी, भाबड्या भावना, दुबळा दैववाद यांच्यावर आघात करण्याचें सामर्थ्य विज्ञानांत आहे... अनुभवाला अवतार घेण्यासाठीं मराठी शब्दांइतकें यथार्थ साधन नाहीं... राष्ट्रीयीकरण हा एक आर्थिक सिद्धांत आहे... कोणत्या गोष्टींचें राष्ट्रीयीकरण करावें याचे कांहीं संकेत असतात. या संकेतांत सांस्कृतिक साधनांचा समावेश करणें मुळींच सयुक्तिक नाहीं ... सरकारी नोकरांच्या वेतनश्रेणीच्या

वळचणीखालीं शिक्षकांची वेतनश्रेणी ठेवणाऱ्या सरकारला शिक्षकां-
विषयीं किती सहानुभूति आहे याची कल्पना येईल. आपल्या मुलाला उत्तम शिक्षक मिळावा पण आपला मुलगा शिक्षक होऊं नये असें पुष्कळांना वाटतें. ही आजच्या शिक्षकाची शोकांतिका आहे... शिक्षकांच्या नेमणुका गुणवत्तेच्या निकषावरच व्हाव्यात. सामाजिक, राजकीय वा अन्य उद्दिष्टांच्या पूर्तीसाठीं या नेमणुका झाल्या तर शैक्षणिक मूल्यांच्या दृष्टीने ही गोष्ट अनिष्ट होईल.. सवंग लोकप्रियतेसाठीं शिक्षण संस्थांचा वापर करण्याचा मोह राजकारणी लोकांनीं टाळला पाहिजे... समाजांतून मूल्यें निर्माण करणें नि असलेलीं अबाधित राखणें हें कार्य समाजसेवक, राजकीय पुढारी यांनीं आवर्जून केलें तर, भावनात्मक ऐक्याच्या संदर्भांत शाळांना जबाबदार धरण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. पण हें जोंवर होत नाहीं तोंवर या जबाबदारीसाठीं केवळ शाळांचा निर्देश करणें म्हणजे कात्रजचा घाट दाखवण्यासारखें होणार आहे." ...

असा एखादा नाशिकच्या व्याख्यानांतला छेद पाहिला कीं या दोन व्याख्यानांच्या गाभ्यांतल्या जिवंतपणाची, त्यांतल्या तळमळीची आणि मनःपूर्वकतेची जाणीव होईल.

या व्याख्यानांत कुठें, डॉ. राधाकृष्णन् कमिशनचा... "इंग्रजीतून शिक्षण घेतल्यामुळें आम्ही विचारशक्तीऐवजीं स्मरणशक्तीवर भर दिला. मातृभाषेंत साहित्य निर्माण करण्यास आम्ही पारखे झालों...." असा उल्लेख येतो. आणि हिंदीचीसुद्धां सक्ती नको—आम्हांला आमची मातृभाषा चांगली शिकवा असें आवाहन केले जाते.

अमेरिकन शिक्षणतज्ज्ञ जे. बी. कोनंट यांचें 'Education is not an exportable commodity' हें वचन उद्धृत होऊन, शिक्षणावरील खर्च अनुत्पादक असतो ही ऱ्हस्व दृष्टीची व्यवहारवादी भूमिका बाजूला ठेवली पाहिजे असें प्रतिपादिलें जातें.

क्रमिक पुस्तकांच्या राष्ट्रीयीकरणाची अनिष्टता ध्वनित करतांना रशियन शिक्षणतज्ज्ञ एम्. आय्. कॉलिनिन यांच्या मताचा निर्वाळा दिला जातो. तर जॉन डब्ल्यू. गार्डिनर यांच्या तत्वज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या संदर्भांतल्या एका तौलनिक विधानाचें विश्लेषण केलें जातें.

प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण यांत एकात्मता आणली पाहिजे. फक्त प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी आमच्यावर आहे असें सांगून सोयीच्या अभावीं विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडणें सरकारला कधींहि भूषणास्पद ठरणार नाहीं असा समयोचित इशारा दिला जातो. शाळांसाठीं ग्रंथालय आणि स्वतंत्र ग्रंथपाल यांच्या खर्चाची तरतूद शासनानें केली नाहीं याचा खेद व्यक्त करून त्याची निकड शासनाला सांगितली जाते. आणि आजच्या शाळांनीं केवळ बौद्धिक शिक्षणच दिलें नि इतर विषयांच्या शिक्षणाची सोय गांवांतील तद्विषयक संस्थांकडे केली तर अनेक शैक्षणिक अडचणींचा परिहार होण्याची शक्यता नव्याने सुचविली जातें.

या दोन परिषदांतून शंकररावांनीं शिक्षकांच्या अनेक समस्यांना तोंड फोडलें. माध्यमिक शिक्षणासंबंधींचे आक्षेप व अपेक्षा या विषयींचें स्पष्ट विवेचन केलें.

या व्याख्यानांचे विस्तृत वृत्तांत, महाराष्ट्रांतल्या मराठी आणि इंग्रजी सर्व प्रतिष्ठित वृत्तपत्रांनीं दिले. अग्रलेखांतून त्यांचे परामर्श घेतले गेले. महाराष्ट्राच्या शिक्षण मंत्रालयांतहि त्याचे निनाद गेले. शंकररावांनीं व्याख्यानांतून केलेल्या, शाळांच्या इमारती बांधण्याविषयीं स्वतंत्र मंडळ नेमावें या सूचनेची शक्यता शासनाच्यावतीनें पडताळून पहाण्यांत आली होती.

महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक, नव्या अनुदान संहितेविषयीं १९६७ सालीं, संस्थाचालकांची मुंबई येथें एक मोठी परिषद झाली होती. बी. आर्. कोल्हटकर अध्यक्ष होते. परिसंवादाचें उद्घाटन शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांनीं केलेलें. या परिसंवादांत शंकरराव जवळजवळ तासभर अतिशय परखड बोलले होते. विचारवंतांनीं त्या व्याख्यानाचें चांगलें स्वागत केलें होतें.

..." शिक्षण संस्थांत भ्रष्टाचार चालतात असें ज्या अर्थीं शासन म्हणतें त्या अर्थी त्याला तें कोठें आणि कसे चालतात हें ठाऊक असलें पाहिजे. आणि असें असेल तर शासन ते थांबवत कां नाहीं ?अन्यथा तें दुबळें तरी असलें पाहिजे. कांहीं थोडया भ्रष्ट लोकांसाठीं शिक्षणसंस्थांच्या सर्वच चालकांना दोषी धरणें बरें नाहीं. गांवांत चोर सुटले तर बँका बंद करणें हा त्यावरचा उपाय खास नाहीं. "... संस्थाचालक कांहीं करत नाहींत या शासनाच्या भूमिकेविषयीं ते म्हणाले, " आज अनेक शिक्षणसंस्थांच्या भव्य इमारती उभ्या आहेत. त्या पावसांत झाडें उगवावीं तशा उगवल्या काय ? संस्थाचालकांनीं कांहीं केल्याशिवाय हा पैसा आला काय ? "...

शिक्षणविचाराबरोबर शिक्षणक्षेत्रांतला व्यवहारहि अनुभवामुळें शंकररावांना इतका ज्ञात आहे कीं दोहोंचा मेळ त्यांच्याइतका क्वचितच कुणाला साधत असेल. त्यांच्याकडे कधीं बोलणें निघालें कीं तें अनेकदां, खोलां धांवणाऱ्या पाण्यासारखें शिक्षणविषयाकडे वळणें घेत येतें. तळमळीनें ते बोलत रहातात :

शैक्षणिक गुणवत्तेची व्याख्या बदलली पाहिजे असें त्यांना वाटतें. विषयानुरूप गुणवत्तेचा विचार व्हावयास हवा. ज्या विषयाची ज्याला गति आहे त्याचें त्याला शिक्षण द्यावें. अभ्यासक्रम व्यक्तिविकासासाठीं हवा. पण हा विकास समाजाच्या संदर्भांत होणें अगत्याचें. तरच अपेक्षित आदर्श समाजवाद प्रत्यक्षांत येईल. आज हा तर उद्यां तो सक्तीचा विषय विद्यार्थ्यांच्या माथ्यावर मारून आपण अन्याय करीत आहों. मातृभाषेशिवाय कोणतीही सक्ति असूं नये. हरिभाऊ, गडकरी

गणितामुळें विश्वविद्यालयीन शिक्षणापासून वंचित राहिले. आपण अशामुळें पुन्हां शिक्षणक्षेत्रांतला नवा वर्णाश्रम आणीत आहोंत असें त्यांना वाटतें.

हिंदीचीसुद्धां सरसकट सक्ति शंकररावांना मान्य नाहीं. ते म्हणतात, " ही अराष्ट्रीय भावना अर्थातच नाहीं. हिंदीची सोय मात्र अवश्य हवी. रेडिओ, चित्रपट आदि आधुनिक माध्यमांतून ती यावी. आणि आज तशी, हिंदी कुणाला येत नाहीं? हिंदीचा ठराविक अभ्यासक्रम पुरा झाला नाहीं तर शासनानें नोकराची नेहमींची पगारवाढ थांबवूं नये. उलट त्यानें अभ्यासक्रम पुरा केला तर त्याला दोन अधिक वाढी द्याव्यात. सक्तीची प्रतिक्रिया अप्रीतींत होत असते..."

शिक्षणक्षेत्रांत इलेक्शन त्यांना ठीक वाटत नाहीं. लहान क्षेत्रांतल्या लोकशाहीमधें होणारे दुष्परिणाम मोठे असतात. निवडणूक, तिचें राजकारण, त्याची कटुता त्यांना शाळेंत नको वाटते. संस्थेच्या संचालक मंडळांत शिक्षकांना प्रतिनिधित्व देणें ही गोष्ट लोकशाही युगांत ऐकायला बरी वाटते एवढीच त्यावरची शंकररावांची प्रतिक्रिया. एकाच वेळीं शिक्षकानें नोकरी आणि संचालकत्व करणें त्यांना इष्ट वाटत नाहीं. आजच्यासारखी राजकीय लोकशाही शिक्षणक्षेत्रांत नको. घरासारखी, आदर्श, गुणवत्तेची लोकशाही [ Informal Democracy ] त्यांना शिक्षणक्षेत्रांत आवश्यक वाटते. शाळा एखाद्या कुटुंबासारखी चालावी.

आणि शंकररावांच्या संस्थेंत तसें आहेहि. शिक्षकांच्या व्यक्तिगत अडचणी, सोयी एखाद्या कुटुंबांत पाहिल्या जाव्यात इतक्या अगत्यानें त्यांच्या शाळेंत पाहिल्या जातात. संस्थेच्या प्रेमामुळें शिक्षकांना तसा हक्कहि वाटतो. शंकररावांच्या शाळेंत असा एकहि शिक्षक नाहीं कीं ज्याची कोणत्याहि तांत्रिक कारणासाठीं अडवणूक झाली.

अशी कुटुंबासारखी असलेली संस्था जेव्हां आपल्या कुटुंबकल्पनेच्या मर्यादा वाढवते त्या वेळीं तिच्या वास्तूंतून अभागी अंधळयांसाठीं नेत्रशिबिर भरवलें जातें. तर भूकंपासारख्या परिस्थितींत तिला युद्धाच्या छायेंतल्या मदत देणाऱ्या छावणीसारखें स्वरूप येतें.

कोयनेचा भूकंप हें या संस्थेच्या आणि स्वतः शंकररावांच्या आयुष्यांतलें एक हृदयस्पर्शी प्रकरण आहे :

त्या पहांटे सगळें दक्षिण पठार हादरलें आणि कोयना उद्ध्वस्त झाली. कोयनेचें कऱ्हाडशीं असलेलें कम्युनिकेशन तुटलें. सकाळीं अश्रूंनीं, आक्रोशांनीं, रक्तांनीं माखलेलीं वहानें कऱ्हाडांत भरभरून येऊं लागलीं. भेदरलेले, मुका मार मिळालेले, अवयव गमावलेले, शुद्ध गेलेले, वहानांतच निमालेले अनेक चेहरे... दवाखाने, हास्पिटलें, मोठया इमारती त्यांनीं तुडुंबलेल्या. शंकररावांच्या हायस्कूलचीहि तशीच मोठी छावणी झालेली. शाळेंत येणाऱ्या प्रत्येक आपद्ग्रस्ताची विचारपूस, व्य स्था

करण्यासाठीं शाळेनें स्वतंत्र दालन उघडलें. शाळेंतले शिक्षक, विद्यार्थी, सेवक स्वयंस्फूर्तीनें आलेले. त्या वेळीं त्या सर्वांनीं जी समाजाभिमुख वृत्ति दाखवली तिला तोड नाहीं. संस्थेनें केलेल्या संस्कारांचें जणु तें प्रात्यक्षिक होतें.

भूकंपाच्या बातमीबरोबर शंकरराव धांवले ते कोयनेला. त्यांच्या तिथल्या श्री शिवाजी विद्यालयाची भूकंपामुळें विल्हेवाट लागली. मुलांच्या परीक्षा हाता-तोंडाशीं आलेल्या. त्यांतल्या श्रीमंत मुलांच्या पालकांनीं आपआपल्या व्यवस्था पाहिल्या. पण दऱ्याखोऱ्यांतल्या दरिद्री पोरांनीं काय करावयाचें ? शंकररावांनीं अशीं एकशेंतीस मुलें कऱ्हाडला आणलीं. जुलैपर्यंत चाललेल्या शाळेंत, त्यांची सात महिने रहायची, जेवायची सोय केली. हा खर्च बावीस तेवीस हजार रुपयांच्या घरांतला. शासनानें या खर्चांत पैचाहि वांटा उचलला नाहीं. तो खर्च झाला स्वतःच्या, संस्थेच्या पुण्याईवर साहाय्य गोळा करून. तांत्रिक कारणांमुळें शासन या खर्चांत सहभागी होऊं शकत नव्हतें याचा त्या वेळचे कलेक्टर श्री. पद्मनाभन् यांना विषाद वाटला. हें कार्य त्यांनीं स्वतः डोळयांनीं पाहिलें होतें. पुढें नाशिकच्या सिक्युरिटी प्रेसच्यावतीनें वीस हजार रुपयांचा निधि गोळा होऊन तो भूकंप-पीडितांना कोठेंहि मदत म्हणून द्यावा या साठीं त्यांच्या हातीं आला. निधीची ही रक्कम श्री. पद्मनाभन् यांनीं शंकररावांच्या संस्थेसाठीं जाणीवपूर्वक देऊं केली.

कऱ्हाड इथें चाललेल्या कोयनेच्या हायस्कूलचें शैक्षणिक वर्ष संपलें आणि कोयनेच्या हायस्कूलचें अस्तित्वहि. मागें उरला तो शिक्षकवर्ग. त्याचें काय ? एखाद्या कोरडया, व्यवहारी संस्थाचालकानें त्यांचा विचारच केला नसता. शाळा नष्ट झाली तिथें शिक्षकांचें काय ? पण त्यांच्यावर भूकंपानंतर आणखी ही आपत्ति ओढवावी हें शंकररावांना पटेना. त्यांनीं कोणताहि अन्य विचार मनांत न आणतां त्या सर्वांना आपल्या संस्थेच्या प्रचंड परिवारांत सामावून घेतलें. आपण होऊन कोणालाहि दूर केलें नाहीं. वेळीं अधिक खर्च सोसले.

दैवप्राप्त अधिकारामुळें चांगल्या, गुणी माणसांनाहि अवमानित अवस्थेंत ठेवण्यांत आनंद शोधणारांना शंकररावांच्यामधल्या या अभिजात माणुसकीचा अन्वय कळणें कठीण आहे.

कोयनेचा रस्ता सुरू झाला कीं शंकरराव हळहळत. कोयना हें कऱ्हाडचें नंदनवन. कऱ्हाडचा आणि कोयनेचा अतूट संबंध होता. तिच्या प्रवाहामुळें हें एक झालेंच. दुसरें म्हणजे कोयनानगरीवर होता तो खूपसा कऱ्हाडच्या संस्कृतीचाच असर. कोयनेचीं कित्येक सूत्रें कऱ्हाडांतून हलत होतीं. कोयना आणि कऱ्हाडमधला बत्तीस मैल अंतरावर असलेला फोन स्थानिकच समजला जात होता. कऱ्हाडहून कोयनेपर्यंतचा अस्फाल्टचा कोरा रस्ता झाडीझाडींतून, प्रतिबिंबित प्रवाहाशेजारून रंगीत डोंगरांच्या परिवारांतून धांवत होता. इथूनच पंडितजी कोयनेला गेले होते. आणि इथला विमानतळ, कोयनेचा, टूरिस्ट सेंटर म्हणून विकास झाला कीं आणखी विमानांनीं गजबजून जाणार होता. हें सगळेंच दूर गेलें.

एकदां कोयनेकडे गेलों तें ना. ग. गोरे यांना आणण्यासाठीं. मी, प्रकाश संत दोघांना शंकररावांनीं बोलावलें होतें. लिहिणारांनीं त्या उत्पाताचें चित्र पहावें अशी त्यांची इच्छा होती.

वाटेंत त्यांनीं एका खेडयाच्या बाहेर एकाकी उभ्या असलेल्या, अवकळा आलेल्या हॉटेलपाशीं गाडी उभी केली. हॉटेलचं नांव ' लक्ष्मीभुवन. ' लक्ष्मीभुवनांतून लक्ष्मी पसार झालेली. पण त्या लोकांनीं चहा चांगला दिला. सचिवालयांत ज्यांनीं चहा घेतलेला शोभून दिसेल ते शंकरराव तसल्या खोपटींत चहा घेत असतांना बघायला गंमत वाटली. ते म्हणाले, " खोटचा प्रतिष्ठेपायीं आम्हांला अनेक ठिकाणीं जायची चोरी. जरा बदल बरा वाटतो. "

एराडजवळच्या डोंगराच्या पायथ्याशीं आम्हीं गेलों. तिथल्या वाडीचे अत्यंत दरिद्री लोक. बापयांनीं लंगोटचा चढवलेल्या. बायांनीं भरडचा लुगडयांचे गच्च कासोटे कसलेले. मधें कडमडणारीं उघडीं नागडीं पोरें. शेजारीं गाईगुरं बांधलेलीं. भूकंपविरोधी घरं बांधण्यासाठीं मिळालेल्या सामुग्रींतून, पाउसकाळ ठेपायच्या आधीं कांम पुरं होण्याची त्यांना घाई झालेली. प्रत्येक कुटुंबांतले धडधाकट लोक आपआपल्या आंखून दिलेल्या जागेंत झाडून उद्योग करीत होते. सगळयांच्या चेहऱ्यावर भाव भूकंपाच्या भीतीचे. तिथल्या एका मोठचा झाडाच्या सावलीखालीं त्यांना गोळा करण्यांत आलें. आणि ना. ग. गोरे यांनीं तिथल्या लोकांना कांहीं सांगावं असं शंकररावांनीं सुचवलं.

अगदीं थोडचा शब्दांत ना. ग. गोरे, आपद्ग्रस्तांना आधार देणारं असं अतिशय चांगलं बोलले. त्यांना उद्देशून ते म्हणाले, " तुम्ही हें तुमच्या पलिकडं असलेलं धरण सोडून द्यावं म्हणतां. पण असं बघा, आपण बाजारांत जाऊन चांगली म्हणून गाय विकत घेऊन येतों. आधीं आपण तिचीं शिंगं बघतों, तिचे भोवरे बघतों. तिची कास बघतों, सुलक्षणी म्हणून तिला घरीं आणतों. आणि घरीं आल्यावर ती खोडील निघते. लाथा झाडूं लागते. पण म्हणून आपण तिला सोडून देतों का ? तिच्या कलानं घ्यावं लागतं. वेळीं भाले लावूनसुद्धां धार काढावी लागते. कोयनेचं धरण हीसुद्धां आपण कामधेनु म्हणून आणली. तिनं पहिल्यांदा चांगलं काम दिलं. हे विजेचे दिवे आणले. शेतीला पाणी आणलं. आतां ती थोडचा खोडचा करायला लागली. पण तिला सोडून देऊन कसं चालेल ? थोडं सबुरीनं घ्यायला हवं. " ...

शंकररावांनी गोरे यांना त्या लोकांच्यापुढं बोलायला सुचवावं हें अतिशय समयोचित असंच होतं. शंकररावांच्या समयसूचकतेविषयी कितीतरी सांगतां येईल...

आपल्या संस्थेच्या आवारांत त्यांनीं आयोजिलेलं, वाईच्या विश्वकोशाच्या भूगर्भशास्त्र शाखेचे प्रमुख प्रा. केळकर यांचं व्याख्यान हें त्याचं सुंदर उदाहरण–नुकताच कऱ्हाडला भूकंप येऊन कायमचा रहिवासी म्हणून राहूं लागल्यावर, त्याविषयींच्या शास्त्रीय आणि वास्तव कल्पना सर्वांना असाव्यात या हेतूनें ठेवलेल्या या व्याख्यानाला कधीं नव्हेत इतके लोक लोटले होते...

... एराडजवळच्या एका मोकळ्या, गांवाहून उंच असलेल्या माळावर नंतर आम्ही शंकररावांच्याबरोबर गेलों. कोयनेची शाळा नाहींशी झाल्यावर इथं, विद्यार्थ्यांची आणि शिक्षकांची रहाण्याची सोय असलेली अशी शाळा उभारण्याची त्यांची कल्पना त्यांनीं गोरे यांना ऐकवली. भोंवतालच्या दाही दिशांना असलेल्या लहान लहान वस्त्यांतून मुलं कशीं येतील, पाणी कसं जवळून खेंचून आणतां येईल, थोडं फार एकाकी, खेडवळ वाटेल. पण अशा वातावरणाची आवड असलेला आपल्या संस्थेतला कोण माणूस इथं आणतां येईल, ते सगळे तपशील शंकररावांनीं बोलून दाखवले. एखाद्या भव्य शिल्पाच्या उभारणीची प्रतिकृति बनवून बघावी तशीच ही त्यांच्या मनांतली प्रक्रिया. जें करायचं तें डोळ्यापुढं स्पष्ट आलेलं. मग त्यानं झपाटून जायचं. असं झपाटून जातांना मी त्यांना अनेकदा पाहिलं आहें.

भूकंपाच्या आधीं आणि नंतर शंकररावांच्याबरोबर मला कोयनेचा भूकंपानं विसकटलेला, फाटलेला परिसर पुष्कळदां पहायला मिळाला. झुंबरं खळकन् फुटावींत तशीं कोयनेचीं घरं फुटलेलीं. खेडयाचं चित्रहि बदलून गेलेलं.

भूकंपामुळं ओढवलेल्या मृत्यूच्या बातम्यासुद्धा बाहेर यायला जिथं चार दिवस लागले अशा दुर्गम, पायांनीं जाणंहि अवघड अशा ठिकाणीं आम्ही जाऊन आलों. आम्ही जीप थांबवली आणि दाट झाडींतून, फुफाटयांतून चालत एका उंच डोंगरावर आलों —संध्याकाळ होत आलेली. दहा बारा झोपडयांची एक वस्ती. कुठली तरी वाडी होती. इथं वस्ती असेल असं कल्पनेंतसुद्धां आलं नसतं... या दाट झाडींत अवघडपणानं माणसं कां राहिलीं असतील असं मनांत आलं... माणसांच्या हालचाली... कोंबडयांची दिवसाची शेवटची गडबड सुरू झालेली... पांखरांचे परवचे उच्चावलेले... दावणींतल्या जनावरांच्या गळ्यांतल्या घंटा वाजत होत्या. अशा तिन्हीसांजेला एका झोपडींत बायांनीं दळण घातलं होतं. जोरजोरांत जोरजोरांत जात्याची घरघर. किनऱ्या आवाजांत दोघींनीं ओव्यांची झोड उठवलेली. आणि या साऱ्यावर भूकंपाचं सांवट आलेलं. विलक्षण वाटलं. त्या वातावरणांत मी बुडत गेलों. शंकरराव म्हणाले, " हें फार निराळं वाटतंय. शब्दांत सांगतां येत नाहीं. " त्यांच्या अंगावर कांटा आला होता. ते थरारून गेले होते. महिना दोन महिने हिंडून मी, भूकंपामुळं खेडोपाडीं उलगडलेली घडी बघावी. आणि नव्यानं प्रस्थापित झालेल्या भूकंपाच्या आपत्तीवर एखादं पुस्तक लिहावं असं शंकररावांनीं मला तिथं सुचवलं. त्यासाठीं जीपची आणि सगळी सोय ते करणार होते. अनेक कारणांसाठीं मला तें शक्य नव्हतं. त्यांतलं महत्वाचं म्हणजे असं बघितलं तें हुकमीपणानं मला लिहितां येईलच असं नव्हतं. मग तें राहून गेलं...

भूकंप होऊन गेल्यावर अवेळीं ढग येऊं लागले. या ढगांमागून पावसाळी ढग आले. काळी हवा आली. आभाळ भरूं लागलें. अनेकांनीं धरण फुटणार म्हणून कऱ्हाड सोडलं. कृष्णाकांठसुद्धां सोडला. आज हा गेला उद्यां तो गेला असं

कानावर येऊं लागलं. चांगलीं चांगलीं माणसंहि हललीं. शंकररावांच्या घरालाहि एक दिवस कुलूप. जवळजवळ पंधरा दिवस त्यांचं घर बंद. पण पावसाळ्याची ऐन झड सुरूं झाली आणि शंकररावांचं घर उघडलेलं. मी वर गेलों. शंकरराव वाचीत बसलेले. म्हणाले, " लोक म्हणाले, हासुद्धा पळाला वाटतं भिऊन. पण एवढीं एवढीं कामं याच वेळीं मुंबईला निघालीं. आणि रहावं लागलं. " शंकरराव पावसाळाभर कऱ्हाडांत राहिले. म्हणाले, " दुर्दैवानं कांहीं घडलंच तर सर्व कऱ्हाडबरोबर त्यांतलाच मीहि एक... "

शंकररावांच्या समाजसेवेची आणखी एक हकीगत:

पूना इंग्लिश स्कूलची ट्रीप ओगलेवाडीला मुक्कामाला आली होती. दुसऱ्या दिवशीं तीं साठ मुलं खोडशी धरण पहायला गेलीं. परततांना पलीकडच्या बाजूला संगमाजवळ त्यांतल्या दोन मुलांनीं गटांगळ्या खाल्ल्या. आणि एक मुलगा बुडाला. दुसरा वर निघाला.

शंकररावांच्याकडं या घटनेचे तपशील आले एका परटाच्या मुलाकडून. आणि अवास्तव स्वरूपांत. पांच सहा मुलं आणि बायका बुडून मेल्या अशी आणि एवढीच ती बातमी–तीं कोण, कुठलीं, कांहीं नाहीं. याच दिवशीं श्री शिवाजी विद्यालयांत घोडनदीची ट्रीप उतरून बघायला बाहेर पडलेली. नक्की काय झालें तें कळेना.

शंकरराव, दोघाजणांना बरोबर घेऊन नावेनें पलीकडे–सैदापूरला गेले. सगळीं मुलें तिथं हताश बसलेलीं: भयभीत. झाडाखालीं एक लहान मुलगा मेल्यासारखा निजवलेला. शेजारीं दोन शिक्षिका.

त्यांतल्या मुख्य बाई त्यांच्या अंगावर येऊन वैतागून म्हणाल्या, " काय विचारूं नका. " मग शंकररावांनीं आपण इथल्या एका शाळेचे मुख्याध्यापक असल्याचं, कांहीं मदत देऊं शकूं, असं सांगितल्यावर बाई खालीं आल्या.

त्या सगळ्यांना शंकररावांनीं नावेनं अलिकडं, जवळच्या महाराष्ट्र हायस्कूलमधें आणलं. त्यांच्याबरोबरीच्या बुडालेल्या मुलाला शोधण्यासाठीं माणसं जमवलीं. होडया, कोळ्यांचीं जाळीं, बांबू अशा साधनांनीं, शंभरएक माणसांनीं संगमापासून थेट टेंभूच्या वळणापर्यंतचा मैलभर लांबीचा नदीचा भरलेला तळ चाळून काढला. मुलगा मिळाला नाहीं पुढें दोन दिवसांनीं त्याचा छिन्नविच्छिन्न देह हातीं लागला.

आपल्या संस्थेंतले चार शिक्षक बरोबर घेऊन शंकररावांनीं ट्रीपचीं मुलं पुण्याला पोंचतीं केलीं. ट्रीपमधल्या एका मुलाला आणि त्या बाईंना आपल्या घरीं ठेवून घेतलं.

पोलीसजबाब झाला. नंतर बुडून मरण पावलेल्या मुलाचे वडील पुण्याहून आल्याचा निरोप आला. ते रामबिलास लाहोटी यांच्याकडे थांबले होते. बाई

घाबरलेल्या. शंकरराव त्यांना घेऊन टांग्यानें लाहोटींच्याकडे आले. ते उतरल्याबरोबर त्यांना पाहून मुलाचा बाप इतका बेभान झाला कीं, तो शंकररावांच्या अंगावर शिव्या देत, मारण्यासाठीं धांवला. त्याची समजूत कीं, ते पुण्याच्या शिक्षकांपैकीं असावेत. त्याला कोणीतरी सांवरलं.

समाजकार्यांतल्या अशा अनेक झळा शंकररावांनीं स्वत:पर्यंत पोंचवून घेतल्या आहेत. जिथें सामाजिक कार्य करण्याची शक्यता आहे तिथें ते प्रभावित होऊन आपोआपच पोंचले आहेत. अशीं कार्यं करणाऱ्या किती संस्थांशीं ते संबंधित आहेत हें सांगणें कठीण आहे.

गेलीं दहा वर्षें ते कऱ्हाडच्या म्युनिसिपल कौन्सिलचे सभासद आहेत. १९४३ सालापासून सतत अठ्ठावीस वर्षें, कऱ्हाड अर्बन को–ऑप. बँकेचे डायरेक्टर, कऱ्हाड जनता आरोग्य मंडळाचे संस्थापक सभासद, रोटरी क्लबचे सभासद, सोशल क्लबचे अध्यक्ष, कॉटेज हॉस्पिटल, सरकारी कुष्टरोग केंद्र या संस्थांच्या सल्लागार समितीचे सभासद, कृष्णाबाई उत्सव समितीच्या कार्यकारी मंडळापैकीं एक, महाराष्ट्र स्टेट को–ऑप. बँकस् असोसिएशनचे पुणें विभागातर्फे तीनदां निवडून आलेले सदस्य, भारत सेवक समाजाचे जिल्हा संघटक. अशीं अनेक आवडीचीं कामें. कांहीं अंगावरहि आलेलीं.

सर्वत्र स्वत:ला गुंतवून घेणारा, अतिशय उल्लसित आणि जीवनोत्सुक असा हा माणूस. त्यांना मी एकदांच त्रासलेलें पाहिलें. तें म्हणजे डॉक्टरांनीं मध्यंतरीं त्यांच्या प्रकृतीकरतां कांहीं दिवस त्यांना कुणी भेटण्याची, बोलण्याची बंदी केली तेव्हां. घरांतच ,कोंडले गेल्यामुळें ते चिडचिड करूं लागले. त्यांच्याकडं जायला माणसं अधिकच दबकायला लागलीं. अशा अवस्थेंत त्यांना मी भेटायला गेलों. त्यांना इतका आनंद झाला... ते एकदम उठून बसले, म्हणाले, " बरं का, हें बोलूं नका, भेटूं नका हें सगळं मला डॉक्टरांचं थोतांड वाटतं. मी बोललों नाहीं, कुणाला भेटलों नाहीं, तर मुळींच बरा होणार नाहीं " आणि ते कुणाचें न ऐकतां भडाभडा बोलत राहिले.

असं वाटलं, होय खरंच ! या माणसानं सतत बोलतं राहिलं पाहिजे. माणसांत वावरत असलं पाहिजे. आतां इथं कुमारांचं गाणं असावं आणि त्यांच्या गाण्यासंबंधीं प्रास्ताविक करण्याकरतां या माणसाला स्टेजवर यायला सांगावं. हा शरीरक्लेशांमुळं वाळत चाललेला माणूस लगेच जीवनरसानं रसरसून येईल...

शंकरराव पुढें बरे झाले ते हें बोलण्याभेटण्याचं थोडं थोडं अपथ्य वाढवीतच.

कऱ्हाडला कुमार गंधर्वांचं जें गाणं झालं त्याचं मोजकं पण प्रत्ययकारी प्रास्ताविक त्यांनीं केलं होतं. कुमारांचं गाणं ऐकणं ही त्यांची एक आनंदाची जागा. " मला गाण्याचं शास्त्र कळत नाहीं. पण गाण्याचा कान मात्र आहे. " असं त्यांचं म्हणणं.

त्यांना हार्मोनियम चांगली वाजवतां येते हें थोड्यांनाच ठाऊक असेल. शब्दांचा सोस हा आणखी एक त्यांचा विशेष. म्हणून शब्दांशीं अधिक संबंध असलेल्या सभासंमेलनांना ते नक्कीच, नुकतेच कुठूनतरी येऊन उपस्थित राहिलेले दिसतील. भूमिका श्रोत्याची असो किंवा वक्त्याची. प्रमुख सार्वजनिक सभेला गांवांत असून ते उपस्थित नाहींत असें क्वचितच झालें असेल.

अनेक अधिकार प्राप्त झालेला हा माणूस मनानें मोठा आहे. आत्मप्रदर्शनाची, मोठेपणाच्या तथाकथित कल्पनांची त्यांना घृणा आहे. म्हणूनच वरवर विनोदी वाटणारे, आत्मपरीक्षणात्मक उल्लेख त्यांच्या तोंडून खूपदां ऐकायला मिळतात. समोरून कोणी आपल्याला पाहून संकोचून चालला आहे– त्याच्याकडे पाहून, त्याला बोलवून, अधिकच लाजविण्याची पुढारीवृत्ति त्यांच्या ठायीं नाहीं ती त्यामुळेंच. उलट शंकररावच त्याच्या संकोचवृत्तीला संकोचतील.

जिथं थ्रिल् आहे तिथं शंकरराव आहेत असं सर्वसाधारण समीकरण मांडायला हरकत नाहीं. म्हणूनच कृष्णाबाईच्या उत्सवाच्या जल्लोषांत गुलाल कपाळाला माखून, कृष्णाबाईची पालखी खांद्यावर मिरवतांना ते दिसतील, तर कुस्त्यांच्या किंवा झुंजांच्या दृश्यांत स्वतःला हरवून जातील.

शंकररावांचा आधार वाटतो तो ज्याचें त्याचें व्यक्तिगत महत्व ते मानतात यासाठीं. मग ती व्यक्ति लहान मोठी केवढीहि असो.

असें हें त्यांचें मन किती कोवळिका जपणारें आहे !

काकांनीं एकदां एक स्वतःच्या आयुष्यांतली गोष्ट बोलतां बोलतां सांगितली होती :

१९५२ मधें कऱ्हाडचे नगराध्यक्ष कोणी व्हावयाचें याचा अटीतटीचा खल तेव्हां झाला. यशवंतरावांनीं मध्यस्थी करावयाचें नाकारलें. ते म्हणाले, " हें तुमचं तुम्ही ठरवा. " गुप्तता राखण्याच्या दृष्टीनें निर्णय पुण्याच्या काँग्रेसभवनांत घ्यायचं ठरलं. आणि तो दुसऱ्या दिवशीं कऱ्हाडला दुपारीं पांचला जाहीर करावयाचा. पांचला पांच मिनिटं कमी असतांना गाड्या पुण्याहून येऊन नगरपालिकेजवळ लागल्या.

पांच वाजतां शंकरराव नगराध्यक्ष झाल्याचं जाहीर करण्यांत आलं. मग वातावरणाला उत्सवी स्वरूप आलं. अंगावर गुलाल उधळलेला, अंवतींभंवतीं गर्दी.

अशा अवस्थेंत दारांतून सभास्थानाकडं जात असतांना, काका म्हणाले, " दाराच्या एका कोपऱ्यांत, संकोचानं अंग चोरून, अतिशय सरळ मनाचे माझे थोरले बंधु दामूआण्णा माझ्याकडं बघत उभे—आनंदानं डोळ्यांत पाणी भरून आलेलं. तशा गर्दींत माझं त्यांच्या मुद्रेकडं लक्ष गेलं. आणि हृदयांत क्षणभर लक्क झालं. भावाबरोबर मिरवण्याचा, पुढं पुढं करण्याचा कसलाहि स्वार्थ मनांत न आणतां, भावाच्या गौरवानं विलक्षण आनंदून जाणाऱ्या त्यांच्या मूर्तीकडं मी पाहिलं आणि मला भडभडून आलं. इतकं निर्लेप, निरपेक्ष प्रेम असू शकतं याच्या साक्षात्कारानं माझा गळा दाटून आला. जेव्हां जेव्हां त्यांचं प्रेम मला आठवतं तेव्हां अजूनहि मी गद्गदून जातों " काकांनीं हें सांगितलं आणि ते गलबलून गेले. पुन्हा त्यांच्या डोळ्यांना पाणी आलं.

असा हा चैतन्यमय क्षण मनांत ताजे ठेवणारा... करुणेनं पाझरणारा पण तितकाच टणक वाटणारा माणूस. त्यांनीं जें मिळवलं, विशेषत: शिक्षणक्षेत्रांत जें आपलं वेगळेंपण उमटवलं तें कऱ्हाडच्या इतिहासांत नक्कीच नमूद होईल.

नुकतंच, जानेवारीच्या वीस तारखेला काकांना साठावं वर्ष लागलं. व्यवहार-दृष्ट्या निवृत्तिकालाचा वारा सुरूं झाला. पण काकांच्या दुर्दम्य जीवनोत्सुकतेशीं निवृत्ति हा शब्दच किती विसंगत वाटतो !

आणि कुटुंबजीवनांत माणूस कधीं निवृत्त होत असतो का ? त्याच्या पक्वपणाच्या फायद्याला इथें तर प्रारंभ होत असतो...

सदैव वाढत असलेल्या त्यांच्या शिक्षणसंस्थेला, सहकाऱ्यांच्या साहाय्यानें अधिकाधिक सुस्थिरता आणावी– तिचा विस्तार होत असतांना तिच्या गुणवत्तेकडे अधिकाधिक लक्ष द्यावें– जें मिळवलें त्याला अंतर्गत व्यवस्था आणावी असें आतां शंकरराव पहात रहाणारच !

त्यांच्या वयाला साठावें वर्ष लागलें.

त्यांची संस्थाहि या वर्षीं आपलीं पंचवीस वर्षें पूर्ण करीत आहे.

आणि हें घडत आहे आंतरराष्ट्रीय शैक्षणिक वर्ष सुरूं होत असतांना.

' मायाबाजार ' चित्रपटांतल्या काकांनीं लिहिलेल्या एका गाण्याची सुरुवात होती :

' किति सुखकर दिन हा पातला '

तें गाणें जणुं आज अर्थासह पुरें होत आहे ...

मु. म. कोटस्थाने

# शंकरराव करंबेळकर : एक प्रसन्न व्यक्तिमत्व

स्वातंत्र्यप्राप्तीच्या पूर्वी फक्त दोन वर्षे निघालेल्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेने गेल्या पंचवीस वर्षांत प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणक्षेत्रात फार मोलाची कामगिरी केली आहे यात संशय नाही. ग्रामीण भागातही शिक्षणाचे लोण पोहोचवावे व दर्जेदार शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळावे म्हणून संस्थेने उल्लेखनीय कार्य केलेले आहे.

कोणत्याही संस्थेच्या भरभराटीला व स्थैर्याला त्या संस्थेचे संस्थापक, कार्यकारी मंडळाचे सदस्य, विद्यालयांचे प्रमुख व शिक्षक आणि त्या संस्थेत शिक्षण घेणारे विद्यार्थी कारणीभूत असतात. एकोपा, सामंजस्य, अखंड तळमळ, त्याग करण्याची प्रवृत्ती व आपण ज्ञानदानाच्या महान कार्यात गुंतलेलो आहोत याची सतत जाणीव ठेवून अडचणींना हसतमुखाने सामोरे जाण्याची तत्परता, या सर्व गुणांचा सर्व घटकामध्ये प्रादुर्भाव असेल तरच संस्थांचे कार्य उल्लेखनीय ठरते. अन्यथा संस्था मोडकळीस आलेल्या आपण पाहतो. वर उल्लेखिलेल्या सर्व घटकांना स्नेहाच्या आणि ध्येयवादाच्या रज्जूनी एकत्र गुंफून ठेवण्याचे कार्य म्हणजे तारेवरची कसरत असते.

माझे परममित्र श्री. शंकरराव करंबेळकर यांचा या कसरतीतला वाटा फार मोठा आहे व ती कसरत ते अत्यंत प्रसन्न चित्ताने व उल्हसित वृत्तीने करीत आहेत यात संशय नाही. आपल्या वैयक्तिक मैत्रीचा, ओळखीपाळखींचा व सामाजिक राजकीय नि आर्थिक क्षेत्रातील आपल्या स्नेह्यासोबत्यांचा फायदा संस्थेच्या भरभराटीसाठी व आर्थिक स्थैर्यासाठी त्यांनी संस्थेला करून दिला हे सर्वश्रुत आहे.

श्री. शंकररावांचा विनोदी स्वभाव, अत्री गोत्राप्रमाणे सर्वांशी मैत्री जोडण्याची " How to win friends and influence people " हे पुस्तक न वाचताही त्यांच्या ठिकाणी असलेली उपजत कला, त्यांचा परखडपणा, विरोधकांना नामोहरम करूनही मैत्री अबाधित ठेवण्याची हातोटी, शिक्षणातील सर्व अडचणींचा सखोल व व्यावहारिक अभ्यास, वादपटुत्व, निगर्वी व प्रेमळ स्वभाव आणि इतरांसाठी झटण्याची तत्परता या सर्व गुणांचा लाभ श्री शिवाजी शिक्षण संस्थेला झाल्याशिवाय ही भरभराट झालीच नसती. त्यांनी जमविलेले मित्रमंडळ सर्व थरातील व सर्व पेशातील असल्याने खुमासदार गप्पाष्टकांना त्यांच्या सहवासात अखंड पूर येतो. शिक्षणविषयक एखाद्या परिषदेत किंवा संमेलनात शंकरराव नसले तर त्यांची अनुपस्थिती सर्वांनाच जाणविल्याशिवाय रहात नाही शंकरराव हे काही जडजंबाल शिक्षणतज्ञ नाहीत. शिक्षणाच्या तत्वज्ञानाचे व तपशीलाचे अनाकलनीय व विद्वत्ताप्रचुर भाषेत सिद्धांत मांडून श्रोत्यांवर आपल्या वाक्पटुत्वाची छाप पाडणारे ते विद्वज्जड पंडित नाहीत. शिक्षणक्षेत्रातल्या कोणत्याही ' फॅड 'पासून ते अलिप्त आहेत. अनुभवांच्या मुशीतून काढलेल्या व व्यवहाराच्या ऐरणीवर घणाघाती शब्दांच्या हातोड्यानी समस्याना योग्य तो आकार देऊन सुबक बनविलेल्या कलाकृतीचे ते एक कुशल कारागीर (Master Craftsman). आहेत. शाळांतून आजकाल चाललेल्या विविध शालेयेतर कार्यक्रमांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे वर्णन करताना एका अध्यक्षीय भाषणात " येथे शिक्षणही मिळेल " अशा पाट्या शाळांवर लावण्याची वेळ आली आहे असे त्यांनी सांगितलेले मला आठवते. अनुदान पद्धतीची पुनर्रचना करताना सरकारने संस्था चालकांना विचारले देखील नाही ही तक्रार आपल्या भाषणात करताना त्यांनी अनुदानसंहिता नावाची काळी कुरूप मुलगी गळयात मारताना नवरदेवाची संमतीसुद्धा घेतली नाही तेव्हा तिला परत कायमचीच माहेरी पाठवावयाची किंवा काय याचा विचार करावा लागेल अशा अत्यंत चपखल शब्दांत त्यांनी आपले विचार मांडलेले सर्वांना ठाऊक आहेत.

कोयना भूकंपात उध्वस्त झालेली कोयनानगरची त्यांची शाळा, त्यानंतरचे त्यांचे आजारपण इत्यादी सर्व संकटातून तावून सुलाखून निघाले तरी शंकरराव आपले पूर्वीचेच शंकरराव राहिले आहेत. शिक्षणक्षेत्रातले एक अत्यंत निस्पृह व कार्यदक्ष ' कारभारी ' या नात्याने त्यांची योग्यता असामान्य आहे.

त्यांनी अंगीकारलेल्या कार्यांत त्याना उत्तरोत्तर उज्ज्वळ यश लाभो व ते कार्य करण्यासाठी त्याना उत्तम प्रकृतीस्वास्थ्य लाभो असे चिंतन करून त्यांच्या संस्थेच्या या रौप्य महोत्सवप्रसंगी त्यांना ही गौरवांजली अर्पण करतो.

द. धों. नगरकर

# शिवाजी शिक्षण संस्थेचे शिल्पकार : श्री. शंकरराव करंबेळकर

शिवाजी शिक्षण संस्थेच्या रौप्यमहोत्सवप्रसंगी गौरवग्रंथ रसिकांना आणि शिक्षणप्रेमी नागरिकांना सादर करण्याची कल्पनाच मधुर आहे. संस्थेच्या आणि व्यक्तिच्या जीवनात संस्मरणीय प्रसंग येताच ते समारंभाने साजरे करण्याने आत्मपरीक्षणाची त्याचप्रमाणे संकल्पाची संधी मिळते आणि कार्याला जोमदार उठाव येतो. शिवाजी शिक्षण संस्थेच्या बाबतीत तर ही संधी अभूतपूर्व म्हटली पाहिजे. कारण शिवाजी शिक्षण संस्था ही एक संस्था म्हणून व तिचे शिल्पकार श्री. करंबेळकर ही एक व्यक्ती म्हणून दोघांच्याही जीवनात निर्माण झालेली ही एक संलग्न संधी आहे.

ग्रामीण विभागात शिक्षण संस्था प्रस्थापित करून ती कार्यक्षम रीतीने चालविण्यासाठी एखाद्या व्यक्तीस आपल्या आयुष्याचा अगदी यज्ञ करावा लागतो तसा २५ वर्षांपूर्वीचा कराड विभाग म्हणजे एक अतिशय ग्रामीण विभाग. शिक्षणाची सोय निर्माण करून तिचा यशस्वी प्रचार करणे एखाद्या वैद्याने नादुरूस्त प्रकृतीच्या माणसास त्याच्याच हिताकरिता सुरवातीस कडू पण परिणामी गोड असे औषध देऊन थोडीशी अप्रियता आणि बरेचसे धाडस करण्यासारखे होते. ती किमया मोठ्या कौशल्याने करण्याची थोर कामगिरी श्री. शंकरराव करंबेळकर यांनी केली त्यात त्यांचे द्रष्टेपण स्पष्ट होते.

आपल्या मनांतील कल्पना दुसऱ्याच्या गळी उतरविण्याची श्री. शंकररावांची हातोटी तशी विलक्षणच. एवढेच करून ते थांबले तर ते शंकरराव कसले ? एखादी सुगरण कोंडयाचा मांडा करून रसिकांच्याकडून वाहवा मिळवते अगदी त्याचप्रमाणे आपल्या तरल कल्पना लोकप्रिय करून योग्य माणसाकडून राबवून घेण्याचे कौशल्य श्री. शंकरराव यांच्याजवळ अगदी जन्मजात आहे. आणि म्हणूनच असामान्य कार्य करून श्री. शंकररावांनी शिवाजी शिक्षण संस्थेचा पसारा खूपच वाढविला असून आज त्याला बाळसेदार स्वरूप प्राप्त करुन दिले आहे.

शंकररावांचा आणि आमचा पहिला परिचय झाला तो कराड येथे मुख्याध्यापक परिषदेचे अधिवेशन भरले त्यावेळी. या अधिवेशनात सर्वत्रांची आस्थेवाईकपणे चौकशी करणारी ती खादीधारी व्यक्ती कोण अशी चौकशी करताच आम्हाला कळले की कराडची कल्पवृक्ष किमयामूर्ती श्री. शंकरराव करंबेळकर. सदर परिषद यशस्वी रीतीने पार पडलीच पण शेवटी समारोपाच्या भाषणाने श्री. शंकररावांनी सर्व मुख्याध्यापकांची मने काबीज केली. इतके त्यांचे भाषणही वक्तृत्वपूर्ण झाले. तो ठसा सर्व मुख्याध्यापकांच्या मनावर आजही आहे. कराड म्हणताच अतिशय आदरातिथ्यशील, आस्थेवाईक आणि विनोदमूर्ती श्री. शंकरराव करंबेळकर यांची मूर्ति आमच्यासमोर उभी राहते.

आम्ही त्यांच्या सर्व गुणांचा फायदा घेण्याचे ठरविले आणि १९६२ साली महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महासंघाच्या कार्याला चालना देण्यासाठी सर्व महाराष्ट्रातील माध्यमिक शिक्षकांची परिषद अहमदनगर येथे घेण्याचे ठरले. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी श्री. शंकरराव करंबेळकर यांची आम्ही नियुक्ती केली. कराडसारख्या एखाद्या गावीच श्री. शंकररावांची प्रतिभा अडकून पडावी हे आम्हास रूचेना. त्यांच्या विद्वत्तेचा, कर्तबगारीचा आणि संघटना कौशल्याचा उभ्या महाराष्ट्रातील शिक्षकांना फायदा होण्यासारखा आहे असे आमचे प्रामाणिक मत होते. आणि आमचा होरा अगदी खरा ठरला हे नमूद करण्यास आनंद वाटतो. या परिषदेत श्री. शंकररावांचे भाषण सर्व दृष्टीनी परिपूर्ण होते. त्यांत खुमासदार आणि चुरचुरीत विनोद तर होताच पण त्यातील चिमटे आणि चमत्कार असे काही रसभरीत होते की यंव. सर्व महाराष्ट्राला त्यानी खडबडून जागे केले. हल्लीच्या शिक्षणातील शिक्षकांच्या परावलंबित्वाचे उदाहरण देताना त्यानी ‘ येथे शिक्षकहि भाड्याने मिळतील ’ असे उद्‌गार काढले. त्याचप्रमाणे शिक्षणाव्यतिरिक्त इतर गोष्टींचे जे स्तोम माजले होते त्याचाही त्यानी आपल्या वक्रोक्तिपूर्ण भाषणांत ‘ येथे शिक्षणहि दिले जाते ’ अशा पाट्या आमच्या शाळांच्यावर लावण्याची वेळ आली आहे असा उल्लेख करून शिक्षणपद्धतीवर विदारक प्रकाश टाकला होता.

आपल्या गुणांनी श्री. करंबेळकर यानी यशाच्या अनेक पायऱ्या ओलांडल्या. नासिक येथे मुख्याध्यापक परिषदेचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाच्या कार्यकारिणीचे सदस्य आणि महाराष्ट्र शालांत परीक्षा मंडळाचे सदस्य इत्यादि अनेक जबाबदारीच्या जागी त्यानी केलेली भाषणे आणि कार्य संस्मरणीय आहे. इतक्या साध्या वृत्तीच्या माणसात असे अजब सामर्थ्य असावे याचा अंचबा वाटल्याशिवाय रहात नाही.

श्री. शंकरराव यांच्या अभूतपूर्व कामगिरीमुळे त्यांच्या संस्थेच्या यशाची कमान वाढत असल्यास नवल नाही. त्यामुळेच त्यांच्या सहकार्यांच्या मदतीने आज शिवाजी शिक्षण संस्थेने अनेक शिक्षण संस्था चालविल्या आहेत. कोयना भूकंपाच्या

वेळी शिक्षण संस्थांना अक्षरशः तडे गेले आणि एक भयानक प्रश्नचिन्ह या संस्थेपुढे उभे असतानाही कोणत्याही प्रकारे हिंमत न हारता संकटात सापडलेल्या अध्यापकांना आणि छात्रांना धीर देऊन त्यांच्यात नवा आत्मविश्वास निर्माण करण्याची अभूतपूर्व कामगिरी शिवाजी शिक्षण संस्थेने केली.

स्वातंत्र्याच्या संक्रमणाच्यावेळी लोकांना आनंदाची एक बेहोषीच आली होती. पण केवळ आनंदाच्या उर्मींनी राष्ट्राचे प्रश्न सुटत नसतात. त्याला काहीतरी रचनात्मक कार्य करावे लागते याची जाणीव श्री शिवाजी शिक्षण संस्थेने ठेवून आपल्या भावी कार्याचा आराखडा आखून विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन राष्ट्रीय सेवा करण्याची सद्बुद्धी आणि सेवावृत्ती संस्थेच्या चालकानी ठेवली याबद्दल जनता त्यांची ऋणी राहीलच परंतु कोणत्याही संस्थेची प्रगती तिच्या कल्पक नेतृत्वावर असते. असे नेतृत्व देण्याची कामगिरी श्री. शंकरराव व त्यांचे सहकारी यानी केली याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तितके थोडेच आहेत.

श्री. शंकरराव करंबेळकर यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आहेत. त्यात त्यांच्या विनोदी स्वभावाची आणि रसिक वृत्तीची नोंद केली नाही तर चुकल्या-सारखेच होईल. कोणत्याही परिषदेला उपस्थित असलेल्या व्यक्ती प्रथम कोणाची चौकशी करीत असतील तर ती श्री. शंकररावांची. परिषदेला श्री. शंकरराव उपस्थित असले की त्यांच्याभोवती मित्रमंडळींचा घोळका जमलाच म्हणून समजा. किंबहुना जेथे खूप गर्दी जमा झाली असेल तेथेच हरवलेले हे शंकरराव सापडायचे. शंकरराव उपस्थित असले की परिषदेचे निदान ५० टक्के यश निश्चित समजावे. जेथे श्री. शंकरराव तेथे आनंद, उत्साह आणि हास्य यांचे विलसित्व सापडायचे. विनोद करून दुसऱ्याला हसवायला लावण्याइतके दुसरे सौख्य श्री. शंकररावांच्या जीवनात असेल असे मला तरी वाटत नाही. त्यामुळेच आम्ही मुख्याध्यापक मंडळी कोणाचे ऐकत असू तर श्री. शंकररावांचे. दुसऱ्यांच्याकडून इतके प्रेम, इतका आदर मिळण्याचे श्री. शंकररावांचे सामर्थ्य हे अलौलिक स्वरूपाचे आहे. त्यांच्या दिलखुलास मनोवृत्तीने जीवनातील अवघड लढाया त्यानी जिंकल्या आहेत. मध्यंतरी श्री. शंकरराव आजारी होते. त्यामुळें उभा महाराष्ट्र काळजीत होता असे म्हणण्यात अतिशयोक्ती मुळीच नाही. पण जीवनातील या खेळकर वृत्तीमुळेच त्यानी आजारावर मात केली आणि सर्वांना हायसे वाटले.

श्री. शंकररावांचा लोकसंग्रह म्हणजेच मित्रमंडळी भरपूर आहेत. त्यामुळेच त्यांच्याबद्दल म्हणजेच त्यांच्या शिक्षणसंस्थेबद्दल अगदी गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत आदर आहे. असे प्रसन्न, कर्तबगार आणि संपन्न व्यक्तिमत्व ज्या संस्थेजवळ आहे तिची दिवसानुदिवस भरभराट झाल्याशिवाय कशी राहील ?

आम्ही श्री. शंकरराव व त्यांची श्री शिवाजी शिक्षण संस्था याना भरभराट चिंतितो. त्यांच्याकडून भरीव राष्ट्रीय कार्य यापेक्षाही अधिक सामर्थ्याने पार पडो ही सदिच्छा व्यक्त करतो.

गो. वि. कुलकर्णी

## कऱ्हाडचे ' सार्वजनिक काका '

कराडच्या आजूबाजूच्या खेड्यापाड्यात ज्ञानाची गंगा नेऊन पोहोचविण्याचे थोर कार्य करणाऱ्या समाजसेवकाला अभिवादन करण्याचा हा माझ्या जीवनातील मंगल क्षण आहे. श्री. शंकरराव ऊर्फ काका हे कराडच्या सार्वजनिक व सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य घटक आहेत. कराडचे प्रेरणा स्थान आहे. काकांचा उत्साह आणि कराडचा विश्वास म्हणजे तीर्थरुप काकांच्या व्यक्तित्वाचा बंदा रुपाया ! खरोखरच काका चिरतरूण आहेत. बहुजन समाजासाठी सदैव चांगले करीत राहण्याची त्यांची तळमळ नि धडपड अतुलनीय आहे. कराडमध्ये आज जे फुललेले व बहरलेले शैक्षणिक नि सामाजिक वातावरण दिसते ते काकांच्या अविश्रांत धडपडीमुळेच.

काकांचा मनमोकळा स्वभाव, सदासुखी व हसतमुखी असे चेहऱ्यावरील भाव एखाद्या अबोल माणसाला देखील बोलके बनवितात. लहानात लहान व मोठ्यात मोठे अशा सर्वांना काका हवे हवेसे आणि उपयुक्त अशा मार्ग दीपिकेप्रमाणे वाटतात. स्वकर्तृत्वामुळे लोकप्रियता ज्यांच्या पाठीशी लागते अशा दुर्लभ व्यक्तींत काकांचा समावेश करावा लागतो. काकांच्या अखंड कर्तृत्वामुळे लोकप्रियता आपणहून त्यांच्या पाठीमागे आहे. माणसाने आपले वय वर्षांत मोजण्यापेक्षा कामाने वा शहाणपणाने वा अनुभवाने मोजावे. जेवढे कामात वय भरेल तेवढेच मनुष्य जगला आणि इतर आयुष्य केवळ घोरला. असे एक वचन आहे. काकांनी सर्व जीवन लोकोपकारार्थ खर्ची घातले आहे. त्यात ते रमले आहेत. ह्याचाच अर्थ जीवनाचा खरा अर्थ त्यांना समजला आहे व अजूनही काही समजून घेण्याचे काही राहिले तर ते समजून घेण्यासाठी धडपडण्याची धमक व हिम्मत त्यांच्यात आहे व ती कायम राहीलही.

१९४५ पासून आजवर काकांनी निस्वार्थीपणे व अविरतपणे सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये बहुमोलाचे कार्य केले आहे. नुसते कार्य सुरू

करून ते थांबले नाहीत तर स्वतःच त्या लावलेल्या वृक्षाला यशाची फळे येईपर्यंत अखंड धडपड करायची हीच त्यांची धारणा आहे. १९४५ साली स्थापन झालेल्या "श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे" ते प्रथमपासून जनरल सेक्रेटरी म्हणून काम पहात आहेत. निर्जीव ठिकाणी चैतन्य निर्माण करणे हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव व म्हणूनच त्या निर्जीव खुर्चीला देखील सजीवतेच्या जाणीवेने काकांशी कृतज्ञ बनावे लागते. प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयापर्यंत प्रत्येक ठिकाणी स्वतः लक्ष पुरवून ती ती ठिकाणे अधिक प्रगत कशी होतील ह्याचाच सतत विचार करण्यात काका गुंतले आहेत. तोच त्यांचा ध्यास आहे व तोच त्यांचा हव्यास आहे.

शैक्षणिक क्षेत्रामध्ये आजवर खूप कार्य करूनही अजूनही काका ताजेतवाने आहेत. अजूनही तीच तळमळ आहे. तोच जोष व आवेश आहे आणि म्हणूनच एवढा अनुभव पाठीशी असल्यावर "शैक्षणिक कार्याला वाहून घेतलेला एक शिक्षणतज्ज्ञ" असा त्यांचा उल्लेख केल्यास अतिशयोक्ती न ठरता सत्य निवेदनाचाच आनंद मिळेल यात शंका नाही.

शिक्षणकार्य आणि समाजकार्य काकांच्या हिशेबी भिन्न नाही. शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक क्षेत्रात देखील काकांनी चांगलेच नाव कमावले आहे. किंबहुना 'समाजसेवा' हाच काकांचा पिंड आहे. काकांचा सल्ला सर्वच क्षेत्रातील कार्यकर्त्यांना प्रेरक नि उत्साहवर्धक वाटतो. कुठलीही सभा असो वा समारंभ असो काकांच्या उपस्थितीविना पार पडू शकत नाही. त्यांचे प्रेरक व्यक्तिमत्व हे स्वतः पेक्षाही समाजाशी एकरूप झालेले आहे.

भारतीय जीवनाचा तोल शिक्षण, समाज नि संस्कृती यावर सावरला जाईल ह्या श्रद्धेने या समाजोपासकाने सांस्कृतिक क्षेत्रामध्ये देखील मोलाची कामगिरी केली. नगरपालिकेच्या वतीने दरवर्षी शारदीय व्याख्यान सत्र ( ९ व्याख्यानांचे ) आयोजित करण्यात काकांचा पाठिंबा व सहकार्य फारच मोलाचे ठरते. मोठ्या व्याख्यात्यांच्या व्याख्यानाचा लाभ जनतेला करून द्यावयाचा व सांस्कृतिक वातावरण निर्माण करायचे हा उद्देश असल्यानेच आज कराडमध्ये व्याख्यानांना तोबा गर्दी होते. गणेशोत्सवात देखील व्याख्यानांना ऊत आलेला असतो. नाटक व सिनेमा ह्यांना त्यावेळी गर्दी होत नसते पण त्या संबंधीचे परिसंवाद ऐकण्यात कराडकर मशगूल असतात. चांगली अभिरुची निर्माण करणे हे देखील संस्कृतीचे एक अंग नव्हे काय ? काकांनीच हरप्रयत्नाने अभिरुची निर्माण केली आहे हे नाकारून चालणार नाही.

मोठमोठे लेखक कराडवर खूष होऊन परततात. कुठलाही लेखक काकांच्यात उतरतो. दिलखुलास गप्पागोष्टी रंगत असतात. काका हे एक चांगले आदरातिथ्य

करणारे व जे जे चांगले त्यांचे आतिथ्य काकांनीच करावे हा कराड शहराच्या परंपरेचा गाभा आहे !

मोठमोठ्या लेखकांना देखील काकांशी गप्पा गोष्टी करीत असताना स्वतः श्रोत्याचेच काम करणे भाग पडते. काकांचा विनोद सर्वांनाच सुखावणारा असतो. त्यांच्या गप्पात राजकारण असते, साहित्य असते, समाज असतो. काय नसते ? हाच प्रश्न मनाशी उरतो.

व्याकरणाच्या दृष्टिकोनातून लिहायचे झाल्यास असंच लिहावं लागेल की श्री. शंकरराव हे कराडचा कर्ता राहिलेला नसून कराडचे विशेषण बनले आहेत. तरुणांना ते कार्यप्रवृत्त करतीलच पण वृद्धांना देखील कार्यतत्पर बनविण्यात त्यांचा हातखंडा आहे. काकांचे सतेज जीवन त्यांच्या नावाप्रमाणेच प्रभाकरासारखे प्रकाशदायी नि विलोभनीय झाले आहे. कराडचे सुपुत्र माननीय यशवंतरावजी चव्हाण काकांना आपले परमस्नेही मानत आले आहेत, ते त्यांच्या कार्यकर्तृत्वाची प्रचिती आल्यानेच !

" Be slow to promise,
But quick to perform "

ह्या ओळींचा अर्थ काकांनी आचरणांत आणला आहे. काही गोष्टी केवळ बोलून सोडून देण्यापेक्षां प्रत्यक्ष कृतीत आणूत स्वतःच्या कर्तृत्वाची जाणीव करून देण्यांत ते मोठेपणा मानतात !

संगीतात जे महत्व स्वरांना तेच समाजात समाजसेवकांना. वादीसंवादी स्वरांच्या प्रमाणशीर मेळामुळे गायक एकाद्या रागाची सजावट करतो व श्रोत्यांची मने आपल्याकडे ओढून घेतो तसेच समाजाशी एकरुप होऊन त्यांच्यासाठीच त्याच्या कलानेच कार्य करणे ह्यासाठी देखील सुमधुर कार्याच्या संगीताने बेभान करायचे असते. काका ते कार्य करत आहेत. त्यांचे हे कार्य अविरतपणे चालूच राहील. काका व कार्य ह्यांच्यातील ही शर्यत चालूच राहणार व त्यात " काकाच " यशस्वी होणार. काकांच्या सान्निध्यात मला जे जे जाणवले ते शब्दांकित करण्याची अपूर्वाई मला लाभलेली नाही याची खंत जन्मभर बाळगण्यात मी स्वतःला धन्यता मानतो ! त्यांच्या व्यक्तिमत्वाला शतशः प्रणाम !

वा म न मो रे श्व र को ळे क र

# शून्यातून ब्रह्म निर्मिणारे शंकरराव

शंकररावांचा तसा माझा परिचय फार जुना म्हणजे १९२५–२६ साला-पासूनचा. आम्ही दोघं टिळक हायस्कूलचे विद्यार्थी. गप्पागोष्टी, खेळणं, फिरणं यात आम्ही काही वेळा बरोबर असू. पण परिचय वाढला तो, ते आणि मी शिक्षकव्यवसायात पडल्यानंतर. माझं गावच कऱ्हाड असल्यानें मी सुट्टीनिमित्त जेव्हा जेव्हा कऱ्हाडास जाई तेव्हा तेव्हा शंकररावांकडे गेलो नाही असं आजपर्यंत घडलं नाही. शिक्षक पेशाची पहिली पावलं त्यानी कऱ्हाडच्या महाराष्ट्र हायस्कूलमध्ये टाकली असली तरी अंगात मोठी धमक असल्याने ते व त्यांचे निकटवर्ती व्यवसायी तिथल्या साध्या शिक्षकी जीवनात कधीच रमलेले आढळले नाहीत. स्वतंत्र संस्था चालविण्याची त्यांची उर्मी होती.

संस्थेचे पहिले पहिले दिवस मला चांगले आठवतात. महिन्याच्या २८–२९ तारखेला काही वेळा मला त्यांच्या घरी जाण्याचा योग यायचा. त्यांच्या पत्नी चि. सौ. सुशीलाबाई ( त्यांचं सासरचं नाव माहिती करून घेण्याचा मी कधी प्रयत्न केला नाही. ) माझ्या फलटणच्या विद्यार्थिनी आहेत. थोडं हसत खिदळत गप्पा रंगात आल्या म्हणजे ( वर्दी न देता ) सुशीलाबाईंचा ट्रे येऊन टीपॉयवर टेकतो, चहा पिण्याची मजा आम्ही लुटत असतो. इतक्यात, सहज शंकरराव सांगून जातील गप्पांच्या ओघात " एक तारखेला पगाराला सध्या एक पैसासुद्धा नाही " मी आश्चर्याशिवाय काय प्रगट करणार ! पण एक तारखेला पगार होत असे हेही त्याचबरोबर खरं ! आणि " असं त्यावेळी बहुतेक दर महिन्याला होई " असं अगदी सहज शंकरराव सांगून जात.

सर्वच पण विशेषतः शिवाजी विद्यालयाच्या इमारतीच्या वेळीतर असं कितीकदा होई. इमारत म्हणजे लाखाच्या गोष्टी. केव्हाही पैशाची विवंचना ही शंकररावाना असायचीच, पण पैसा ते कसा उभा करीत याच मला कोडं नेहमीच रहात असे आणि अजूनही हे कोडं मला सुटलेलं नाही. त्यांच्या विवंचनेची छटा

मात्र त्यांच्या चेहेऱ्यावर मला कधी चुकूनसुद्धा दिसली नाही. असं त्यांनी शून्यातून ब्रह्म निर्माण केलं आणि आज...

मूल माँटेसरीच्या गोष्टी सांगायला त्यांच्या शाळेत घालावं आणि त्यानं एम्. ए. होऊन बाहेर यावं ! एवढा त्यांच्या संस्थेचा व्याप वाढला आहे.

या कार्याला त्याना माननीय ना. यशवंतराव चव्हाण या त्यांच्या बालमित्राचा प्रमुख आधार आहे हे विसरून चालायचं नाही. त्यांचं शंभरटक्के प्रेम आणि विश्वास शंकररावांनी संपादन केला आहे. पण मोठ्यांची कास हेच काही त्यांच्या भरघोस यशाचं निव्वळ गमक नव्हे. त्यांच्या सहवासात आलेल्या सर्वांची मनं त्यानी आपल्या खेळकर, विनोदी मनमोकळ्या स्वभावानं आपलीशी केली आहेत.

त्यांचं सभा चालविण्याचं चातुर्य अनेक विरोधी मतप्रवाहानासुद्धा एकत्र आणून खेळीमेळीत विधायक कामानं सभा संपवायची हातोटी मुख्याध्यापकांच्या सभेत मी प्रत्यक्ष पाहिलेली आहे.

शिक्षणसंस्थांच्या कारभारात शिक्षकांनी प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी अकांडतांडव करण्यासारखं, झगडण्यासारखं त्यात काही नाही, शिक्षणकार्य आणि कारभार कोणतंच चांगलं होत नाही हे सहज गप्पांच्या ओघात ते विरोधकांनाही पटवितात. त्याचबरोबर शिक्षकपेशात चांगली हुषार, बुद्धिमान माणसं आकर्षित होण्यासाठी शिक्षकांची एक तारीख आकर्षक हवी हे शासनाला, वेळ येईल तेव्हा ठणकावून ते सांगूनच राहिले आहेत असं नव्हे, त्यांनी त्यासाठी वरच्या वर्तुळातही प्रयत्न केलेले मला ठाऊक आहेत.

कोयना भूकंपाच्या वेळचे शंकरराव शिवाजी शिक्षण संस्थेच्या इतिहासात झळकत राहतील. त्या परिसरातलं शिक्षण अध्यमुध्यात उध्वस्त झालं, जमीनदोस्त झालं. त्याला घर मिळालं शिवाजी विद्यालयात, त्यासाठी त्यांनी सरकारी, खाजगी सर्व प्रकारची दारं ठोठावली आणि आधार उभा केला.

त्यांची मतं जशी ठाम आणि मांडणं जसं ठसठशीत तसं व्यक्तिमत्वही ! कृश नाही, बेढब नाही असं शरीर, ठेंगू नाही उंच नाही अशी यष्टी आणि गप्पांच्या ओघात स्वतःला आणि दुसऱ्यांनाही विसरावयाला लावणारी त्यांची संगत ही सारी त्यांना ईश्वरदत्त देणगी म्हणावी हवी तर. टोपी, धोतर, कोट यातून ते सुटाबुटात असलेले कधी दिसले नाहीत. साधेच आणि प्रसन्न राहिले आहेत, आणि कार्यशीलही.

आता शंकरराव ६० च्या जवळजवळ चालले आहेत. सौ. सुशीलाबाई सुगरण असून त्याना संसारात सौख्य आहे. मुले, मुली सुस्थित आहेत. " आता शंकरराव ! आरामखुर्चीत पडून संस्थेच्या वाढीचे प्लॅन्स काढा. ते प्रत्यक्षात आणवा ! पण प्रकृतिला जपा. "

दि. रा. घोरपडे

# अप्रिय पण सत्य बोलणारे प्र. ल. करंबेळकर

स्वातंत्र्यपूर्वकालात ध्येयवादाने, त्यागाने, सर्मपित वृत्तीने लोकसेवेचे एखादे अंग निवडून त्यासाठी जीवनसर्वस्व अर्पिण्याची प्रेरणा होती. म. गांधीजींसारख्या द्रष्टयांनी स्वराज्यानंतर सुराज्य निर्माण करण्यासाठी जनतेपुढे विधायक कार्यक्रम ठेवला. त्या वातावरणातून अनेकांनी आपापल्या प्रवृत्तीनुसार सेवेची क्षेत्रे निवडली. त्याचप्रमाणे कराडच्या श्री. प्र. ल. करंबेळकरांनी ज्ञानप्रसाराच्या क्षेत्रास वाहून घेतले.

कऱ्हाडसारख्या तालुक्याच्या गावी आजच्याप्रमाणे त्या काळात शासनाने कसल्याही ज्ञानप्रसाराच्या सोयी उपलब्ध करून दिल्या नव्हत्या. इ. बी. सी., बी. सी. नादाऱ्या नसल्याने जनसामान्यांचा शिक्षणाकडे ओढा नव्हता. सरकारकडून माध्यमिक शाळांना कसेबसे मान्य खर्चाच्या तेहतीस टक्के अनुदान मिळे. अशा प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत, तरुणपणी अन्यत्र मानाचा नि लाभदायक जीवनोद्योग लाभणे अवघड नसताही हे सेवा व्रत श्री. करंबेळकरांनी पत्करले. प्रस्थापितांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष विरोध सहन केला. ठराविक चाकोरी सोडून ध्येय व अंमलबजावणीचे तंत्र पत्करल्याने विविध प्रकारे जाचही सोसावा लागला. पण विमल चारित्र्य, चिकाटी, लोकसंग्राहक विशाल दृष्टी अंगी असल्याने, अंगिकृत कार्यात त्यांनी नेत्रदीपक यश संपादिले.

नितांत ध्येयवाद, बहुतांची अंतरे राखण्याचे चातुर्य, आत्मार्पणवृत्ती, अंग मोडून, मानापमान गिळून, कार्यसिद्धीसाठी स्वाभिमानाची भलती प्रतिष्ठा न करण्याची तयारी या गुणामुळे, त्यांनी समाजातील विविध थरांतील व्यक्तींचे सहकार्य मिळविले. ना. यशवंतराव चव्हाण यांचे सहकार्य त्यांनीं मिळविले ते राज्यनेते व राष्ट्रनेते होण्यापूर्वी ! ना. यशवंतराव आकाशात भरारी मारत असले तरी त्यांचा

पाय धरेवर असतो, व धरेवरील लहान-मोठ्या सर्वांकडे त्यांचे लक्ष असते. ' आपल्या ' मानलेल्या संस्थांचे व व्यक्तींचे भले करण्याची जबाबदारी आपणावर आहे याची ते जाणीव ठेवतात. श्री. करंबेळकरांनी श्री. यशवंतरावांचे नेतृत्व मिळविले व टिकविले म्हणूनच तेही ' यशवंत ' झाले !

श्री. करंबेळकरांना आपल्या संस्थेचा हा व्याप यशस्वीपणे उभा करणे जमले याचे कारण ते केवळ ' मास्तर ' नाहीत. नेतृत्वाचे गुण त्यांनी जोडले आहेत. म्हणूनच त्याना हा व्याप पद्धतशीर वाढवून त्यास दर्जा प्राप्त करून देता आला.

पण स्वतःची शिक्षणसंस्था सुस्थिर करूनच ते स्वस्थ राहिले नाहीत, तर महाराष्ट्रातील शिक्षक आणि शिक्षण संस्था यांच्या आर्थिक सुस्थिरतेसाठीही त्यांनी हरप्रकारे कष्ट केले. १९६७ साली सरकारने माध्यमिक शाळांसाठी नवीन अनुदानसूत्र मांडले. हे अनुदानसूत्र जन्मावे म्हणून व ते जन्मल्यानंतर बाळसेदार व्हावे म्हणून, श्री. करंबेळकरांनी धाडसाने परिषदा घेतल्या, शिष्टमंडळे नेली, व शेवटी आपले मुद्दे शासनाला पटवून दिले.

मागण्यांबरोबर मुख्याध्यापक व शिक्षकांनी क्रियात्मक कार्यक्रम हाती घेण्याचा आग्रह श्री. करंबेळकरांनी नित्य धरला. कोणतेही सांस्कृतिक, शैक्षणिक, विधायक कार्य निघो, श्री. करंबेळकर अशा कार्याच्या पाठीशी राहिले आहेत.

शिक्षणसंस्थांचा वाढता व्याप, त्यांचे हितरक्षण करण्याची नित्य चिंता, त्यांच्या वाढीसाठी काढलेल्या कर्जाचा बोजा या सर्वांच्यासाठी त्यांना कराव्या लागलेल्या शारीरिक व मानसिक धडपडीमुळे त्यांच्या प्रकृतीवर अलिकडे परिणाम झाला आहे. ' सजीवं दहते चिन्ता ' या सूत्राप्रमाणे हे घडले आहे. पण तरीही विश्रांती न घेता संस्थेचा हा व्याप सुस्थिर व्हावा, गतिमान रहावा नि उत्कर्षाप्रत जावा यावा यासाठी त्यांचे योजना आखण्याचे काम चालूच आहे.

कवि हृदयाचे करंबेळकर, मित्रासाठी जिवापाड श्रम करणारे, दिलेला शब्द पाळणारे, एवढे कर्तृत्व सिद्ध होऊनही निरंहकारी वृत्तीचे. या त्यांच्या गुणांमुळे ते सर्वांना हवेहवेसे वाटतात हे स्वाभाविक आहे.

महाराष्ट्र सरकार माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना करीत आहे, अभ्यासक्रम नव्याने आखला जात आहे, श्वेतपत्रिका कायद्यात रूपांतरित व्हावयाची आहे, अशा या महत्वाच्या वेळीं ' स्वकीय ' सरकारला प्रसंगी स्पष्टपणे योग्य तो सल्ला देण्याचे काम श्री. ' प्र. ल. ' ना करावयाचे आहे. हवेत तरंगत न राहता, वास्तव भूमिका जाणून, सत्य व रास्त सल्ला तेच देतील व त्यांच्या आवाजाचा शासनावर परिणाम होईल अशी अपेक्षा आहे.

नारायण वासुदेव जोशी

# मुख्याध्यापकांचे आदरणीय नेते

शंकरराव करबेळकर यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आहेत. या सर्व पैलूंची ओळख एका व्यक्तीला होणेही सुलभ नाही. प्रत्येक व्यक्ती या कामी अपुरी पडेल व यातच शंकररावांच्या व्यक्तिमत्वातील महनीयता आहे.

मला त्यांचा प्रथम परिचय झाला तो १९३५ च्या सुमारास मी विद्यार्थी असतानाच. त्यावेळी धाक, जरब, शिक्षा यांच्या जोरावर शिक्षक अध्यापन करीत व बहुतेक वेळा चाललेल्या तासापेक्षा सुद्धा तास संपण्याच्या वेळेकडे आमचे लक्ष असे. पण शंकरराव जेव्हा आमच्या वर्गावर मराठीचा तास घेऊ लागले त्यावेळी मात्र तासात काही मौज वाटावी, आकर्षण वाटावे, तास संपूच नये असा नवा अनुभव प्रत्यक्ष येऊ लागला. हास्य, विनोद, मार्मिकपणा यांचा प्रत्यय आम्हा मुलांच्या वाट्याला येऊ लागला. ते काही दिवसच आमच्या शाळेत होते. पण त्यांच्या परिणामकारक अध्यापन कौशल्याची त्यांच्या ऐन तारुण्यातील झलक पाहण्याचे भाग्य मात्र आमच्या वाट्यास आले.

१९६४ मध्ये सातारा जिल्हा माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांच्या संघटनेचे अध्यक्ष म्हणून त्यांची व कार्यवाह म्हणून माझी एकमताने निवड झाली. त्यामुळे त्यांची कार्यपद्धती जवळून पाहण्याची मला संधी मिळाली. पंचवीस–तीस सभासद असलेल्या या संघटनेची सभासद–संख्या शंकररावांच्या व्यक्तिमत्वामुळे थोड्याच दिवसांत ७०–७५ पर्यंत गेली. त्यांच्या चैतन्यामुळे व भिन्न भिन्न क्षेत्रांतील त्यांच्या संबंधामुळे आमच्या जिल्हा संघटनेला एक प्रकारे चांगला हुरूप आला.

कऱ्हाड येथे १९६२ मध्ये झालेल्या मुख्याध्यापक परिषदेची धुरा शंकररावांनी अत्यंत आपुलकीने, मोठ्या मातबरपणाने वाहिली. त्यावेळच्या त्यांच्या भाषणातून विचारांचा सडेतोडपणा, आग्रहीपणा पण भाषेतील लालित्य हे जसे सर्वांच्या परिचयाचे झाले तसेच त्यांचे संघटनाकौशल्य व अचूक कार्यवाही यांचेही दर्शन

सर्वांना झाले; तेव्हापासून महाराष्ट्र राज्य संघटनेतच त्यांना मोठ्या आदराचे स्थान प्राप्त झाले. असे शंकरराव आमच्या जिल्हा संघटनेच्या अध्यक्षस्थानी असल्याने राज्यसंघटनेतील आमच्या जिल्हा घटकाला एक प्रकारे वजन आले.

ते जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष असताना काही अत्यंत महत्त्वाचे व जिव्हाळ्याचे प्रश्न विचारार्थ पुढे आले. पगार सुधारण्याच्या प्रश्नाबाबत शिक्षक संघटनेकडून उपोषण, लक्षवेधी रजा इ. निदर्शनांचा अवलंब सार्वत्रिक स्वरुपात होऊ लागला. माध्यमिक शाळांच्या कारभार यंत्रणेत मुख्याध्यापक हा व्यवस्थापक मंडळ व शिक्षक या दोघांचेही प्रतिनिधीत्व करतो. शंकररावांच्या सारख्या मुरब्बी व कुशल कर्णधाराकडून अशा वेळी काय भूमिका घेतली जाते हे सर्व जण मोठ्या आतुरतेने पहात होते. जिल्हा संघाचे अध्यक्ष म्हणून खुलासेवार व प्रत्यक्ष उपयोगी अशी विधायक सूचना त्यांनी शिक्षणखात्याकडे केली. त्या संबंधीच्या सर्व चर्चा मंथनातून अनुदानाचे नवीन सूत्र पुढे आले. सूत्र नवीन असले तरी मागील वर्षीच्या खर्चावर चालू वर्षी अनुदान देण्याची पद्धती जुनीच होती. मुख्याध्यापक संघाच्या सभेत शंकररावांनी या प्रश्नाची सर्वांगीण चर्चा करून अनुदानाची गणना करताना पगारासारखा खर्च ज्या त्या वर्षाचाच गृहीत धरला पाहिजे व तोही सारख्या हप्त्यांनी शाळांना मिळाला पाहिजे हा विचार आग्रहीपणाने मांडला व पुढे सरकारने तो मान्यही केला. शिक्षकांबद्दल योग्य ती आस्था ठेवूनही संस्थाचालक अडचणीत येऊ नयेत यावद्दल शंकररावांनी घेतलेली भूमिका त्यांच्या वास्तववादी व चिंतनशील विचारसरणीचेच दर्शन घडवीत आहे. अशा निमित्ताने झालेला चर्चेचेवेळी येणारे गंभीरपणाचे आवरण शंकरराव आपल्या खेळकर व विनोदी स्वभावाने हलकेच दूर करीत व त्यामुळे चर्चा कडक होऊनही मजेत संपे.

त्यांच्या प्रेरणेमुळे मुख्याध्यापक संघाच्या वतीने ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठी संयुक्त पूर्वपरीक्षा घेण्याचा उपक्रम सुरू झाला, विद्यार्थ्यांसाठी आंतरशालेय निबंध-स्पर्धा सुरू करण्यात आली. काम मोजकेच व्हावे पण त्यामधील शैक्षणिक मूल्य मोठे असावे असे त्यांचे नेहमी सांगणे असते. मुख्याध्यापकांनी केवळ कामकाजासाठी एकत्र न येता अनौपचारिकपणे एकत्र यावे व सहजी घडेल तसा विचार विनिमय घडू द्यावा अशा विचाराने मुख्याध्यापकांचे स्नेहसंमेलन भरविण्याचा उपक्रम त्यांनीच आग्रहाने सुरू केला. मुक्त चर्चा, मुक्त वातावरण यासाठी त्यांचा आग्रह असे. पण रूढिप्रिय मंडळींसाठी काही औपचारिक कार्यक्रमांना शंकरराव आळेबळे मान्यता देत. विषय, अभ्यास, परीक्षा अशा अनेक बाबतीत नवे अध्यापन शास्त्र स्वातंत्र्याला, मुक्ततेला प्राधान्य देत आहे. अशा वेळी निदान मुख्याध्यापकांनी मुक्त शिक्षणाचा अल्पानुभव तरी घ्यावा हा शंकररावांचा विचार दूरगामी खास आहे.

शंकरराव अध्यक्ष असतानाच ग्रामीण परिसरातील शिक्षकांसाठी शिवाजी विद्यापीठाने काही योजना सुचविल्या होत्या. त्यापैकी पदवीधर नसूनही वरच्या

वर्गांना इंग्रजी शिकवणे भाग पडणाऱ्या शिक्षकांसाठी कसा अभ्यासक्रम आखावा याची तपशीलवार योजना आखण्याचे काम आमच्या संघाकडे सोपविण्यात आले. या विषयातील दर्दी शिक्षकांना एकत्र आणून हे काम वेळेत पूर्ण करून घेण्याची जबाबदारी शंकररावांनी उचलली होती. यावरून त्यांना या कामी किती कळकळीने काही व्हावे असे वाटते हेच दिसून येते.

सातारा जिल्हा मुख्याध्यापक संघाला शंकररावांच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचा फार मोठा लाभ झाला, त्याचप्रमाणे त्यांच्या मार्गदर्शनाखाली काही काम करण्याची मला लाभलेली ती फार मोठी संधी होती असे मी समजतो.

चं द्र कु मा र डां गे

# शिक्षणाच्या क्षेत्रातील आगळा आविष्कार

शंकरराव,

दुसरं प्रलयंकर महायुद्ध संपायला आलं त्याच वेळी तुम्ही कऱ्हाडला श्री शिवाजी विद्यालय सुरू केलंत. आणि यंदा संस्थेचा रौप्यमहोत्सव साजरा होतो आहे ही फार अर्थपूर्ण घटना आहे. कारण यंदाचं वर्ष सर्व भारतात आंतरराष्ट्रीय शैक्षणिक वर्ष म्हणून साजरं होत आहे, हा अपूर्व योगायोग आहे.

फार वर्षं झाली. तुम्ही, मी आणि भारतातील अग्रगण्य नेते श्री. यशवंतराव चव्हाण, असेच मनमोकळ्या गप्पा मारीत, त्यांच्याच घरी बसलो होतो. श्री. यशवंतराव ओघात म्हणून गेले, कऱ्हाडला एक अगदी वेगळी of different catagory ( हे त्यांचेच शब्द ) शाळा हवी ! आणि गंमत अशी की तुम्ही शिवाजी विद्यालयाला तसंच वेगळेपण देत आलात.

शंकरराव, मुख्याध्यापक म्हणून तुम्ही आपल्या सहकाऱ्यांना जे स्वातंत्र्य दिलंत, जी आपुलकी दिलीत जे प्रोत्साहन दिलेत, त्याचा मी नेहमीच हेवा करीत आलो आहे. ही वृत्तीच शालेय शासनाची नस आहे. तुम्हाला कोणताही मानसन्मान मिळो, शंकरराव, तुम्ही राहिलात ते एक निर्मळ सद्गृहस्थ. राजकारणानं तुम्हाला कधीच घेराव घातला नाही. या यशातच तुमची निर्लेप वृत्ती दिसते. आणि म्हणूनच तुमचे सहकारी वैफल्याला बळी पडले नाहीत कोणावर टीका करायची म्हणून मी म्हणत नाही, पण खरंच सांगतो, मुख्याध्यापक सहकाऱ्यांना असे करकचून बांधून टाकतात की सारे अध्ययन आणि प्रशासन चैतन्यहीन बनते. मी अनेक वेळा तुमच्या शाळेत, तुम्ही नसताना देखील येऊन गेलो आहे. हा मोकळेपणा शिक्षकाच्या व्यक्तिमत्वाला नुसता उपकारक नव्हे तर अपरिहार्य असतो. पण याची डोळस जाणीव किती जणांना असते ? सहकाऱ्यांबरोबर खऱ्या अर्थानं मनमोकळी चर्चा

करताना मी तुम्हाला पाहिलंय. या व्यापांत तुम्ही मौलिक संपादनही केलेत आणि अगदी बारीक तपशीलदेखील कसा कीस काढून तुम्ही स्वीकारीत होतात याचा तर मी अनुभवच घेतला आहे. मग दुसऱ्या कोणाची साक्ष कोणाला ? आणखी एक फार मोठा संयम तुम्ही पाळलात. मनात आणलं असतंत तर अनेक संस्थांचं जाळं तुम्ही सहज विणू शकला असतात. पण ते केलं नाहीत आणि निवडक संस्थांचा गुणवत्तापूर्ण विकास करवून घेतलात हे नोंदलंच पाहिजे. त्यामुळेच जाळ्याबरोबर येणारी जळमटं निर्माण झाली नाहीत. कऱ्हाडमध्ये प्रवेश करताना दोन उंच मनोरे कोणाचंही लक्ष वेधून घेतात. त्याच्याजवळच तुमचं घर. पण शिक्षणाच्या क्षेत्रातील मनोऱ्याच्या पहिल्या पायरीला देखील तुम्ही चुकून शिवला नाहीत ! जमिनीवर पाय रोवून चाललात म्हणूनच शिवाजी विद्यालयाला हे दिवस आले.

शंकरराव, तुमच्यासारख्यांनी कऱ्हाडचं सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्यात फार मोठा वाटा उचलला आहे. इतका लोकाभिमुख मुख्याध्यापक विरळा ! याही गडबडीत एस्. एस्. सी. चे मराठीचे गठ्ठे तुम्ही कधीच उशिराने धाडले नाहीत हे मी कधीच विसरणार नाही. अनेक अवधाने संभाळण्याची तुमची युक्ती तरी या निमित्ताने सांगा.

तुम्हाला दीर्घायुष्य, स्वास्थ्य लाभावे आणि तुमच्या साऱ्या संस्था शैक्षणिक क्रांतीच्या अग्रदूत ठराव्यात ही मनीषा.

(श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या रौप्यमहोत्सवानिमित्त प्राचार्य चंद्रकुमार डांगे यांनी मा. शंकररावजींना लिहिलेल्या अनावृत्त पत्रातील काही भाग येथे उद्धृत केला आहे.)

रा जा रा म मो ती रा म रा वे र क र

# स्वच्छ शैक्षणिक दृष्टीचे शंकरराव....

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या रौप्यमहोत्सवाबद्दल शंकरराव माझ्याशी बोलत होते. संस्थेच्या इतिहासातील काही प्रसंग सांगण्यात ते अगदी रंगून गेले होते. माझ्या मनात आलं की आपल्या धडपडीनं, श्रमानं आपली स्वप्न साकार करणाऱ्या माणसाला केवढे आगळे मानसिक समाधान लाभत असते. आणि अशा समाधानी वृत्तीनं सांगितल्या जाणाऱ्या हकिगती केवळ ऐकण्यातही केवढे सुख असते !

१९५८ साली बेळगावहून पुण्याला परतताना सायन्स कॉलेजची जाहिरात पाहण्यात आली आणि मी कऱ्हाडात उतरलो. त्यावेळी ' जागा नाही ' हेच ऐकून मी परत फिरलो असलो तरी शंकररावांनी ज्या आपुलकीने आणि अगत्याने माझी विचारपूस केली नि कॉलेजच्या स्वरुपासंबंधी त्यांनी जी माहिती मोठ्या आत्मीयतेने सांगितली होती. त्यामुळेच या कॉलेजविषयी नि काकांच्या विषयी एकप्रकारची जवळीक माझ्या मनात निर्माण झाली. आणि पुढल्याच वर्षी म्हणजे १९५९ मध्ये माझ्या गावाजवळ अमळनेर कॉलेजची नोकरी मिळाली असतानाही मी एवढ्या लांब कऱ्हाडला यायचे ठरविले.

त्यांच्याकडे ज्या ज्या वेळेस जाण्याचा योग आला, त्या त्या वेळी दोन चार माणसे आजूबाजूस निश्चित असायचीच. समाजाच्या सर्व थरांशी समरस होऊ शकणारी काकांच्यासारखी माणसे थोडीच. त्यामुळेच कोणी कोणतेही काम घेऊन आला तरी विन्मुख होऊन परतण्याची पाळी सहसा येत नाही. निदान माझा तरी अनुभव तसाच आहे.

एवढ्या कामाच्या व्यापातूनही काकांची विनोदबुद्धी कायम राहिली आहे. मनावर कामाचे दडपण घेऊन काकांच्याकडे जावे आणि आपले काम तर व्हावेच

पण मनाचे सर्व बाजूचे तणावे त्यांच्या विनोदरूपी सुरीने कापले जावेत. त्यामुळेच काकांकडे सतत जावेसे वाटते.

कॉलेजचा प्राचार्य म्हणून अनेक कटकटी, अनेक प्रश्न घेऊन त्रस्त मन:स्थितीत मी काकांकडे गेलो आहे. परंतु अगदी चुटकीसरशी त्याची सोडवणूक त्यांनी केली आहे. स्नेहसंमेलनासाठी पाहुणा मिळत नाही आणि आठवड्यात तर स्नेहसंमेलन पार पाडायचे आहे, आणि तेहि मोठा पाहुणा हवा असे काकांना सांगायचा अवकाश की एका दिवसात मा. वि. स. खांडेकरासारख्या मोठ्या माणसाचा आणि तेही अत्यंत आजारी असताना– होकार आणून देण्यात काकांची जबरदस्त सार्वजनिक प्रतिमाच कारण आहे.

आज शिक्षणसंस्था सगळीकडेच वाढलेल्या दिसतात. पण संख्येने संस्थेला येणारी सूज निराळी आणि केवळ शैक्षणिक मूल्ये डोळयांसमोर ठेवून आलेले बाळसे निराळे! हा फरक समजून घ्यायचा असेल तर श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या मर्यादित पसाऱ्याकडे पहावे लागेल. शिक्षणाबाबत स्वच्छ दृष्टी ठेऊन, संस्थेची गुणात्मक वाढ झाली पाहिजे हा अट्टाहास घेणारे ' काका ' आजच्या शिक्षणक्षेत्रात फार थोडे आहेत.

कृष्णाजी गोपाळ सरडे

# ‘सहकार विद्यापीठा’ चे स्वप्न पहाणारे करंबेळकर

केवळ श्री शिवाजी विद्यालयच काय, पण कराड शहरातील अनेक शैक्षणिक, सामाजिक, राजकीय नि आर्थिक क्षेत्रातील संस्थेशी श्री. शंकररावजी यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. जिथे जिथे सहभाव आहे, समता आहे, सहकार्य आहे, सत्काम आहे नि समाजहित आहे, तिथं तिथं त्यांच्या सद्‌गुणाचा परिस लागला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांची कामगिरी मोठी की आर्थिक क्षेत्रातील त्यांचे कर्तृत्व थोर यांचं मूल्यमापन करणं अवघड आहे. लोकांचा पैसा नि दुसऱ्याची मने यांचे जिथे संगोपन होते– नव्हे तर ज्या आर्थिक संस्थेची ध्येये, विचार नि आचार तत्त्वनिष्ठ असतो अशा सहकारी बँकेशी त्यांचा आत्मीयतेचा संबंध आला नि त्यांच्या सत्कार्यांला नि चैतन्याला एक नवे क्षेत्र लाभले.

कराडच्या अर्बन बँकेत ते डायरेक्टर म्हणून निवडून आले ते १९४४ साली. शिक्षण क्षेत्रातील अनुभव, ज्ञानलालसा, चिकित्सक बुद्धी, जिज्ञासूपणा नि कार्यनिष्ठा या पंचप्राणावर त्यांनी बँकिंगचे ज्ञानही संपादन केले. बँकेचा भागधारक, ठेवीदार, कर्जदार नि छोटामोठा ग्राहक यांच्या हितसंरक्षणासाठी नि त्यांच्या सर्वांगीण प्रगतीकरिता आपण अधिकाधिक काम करू शकू हे त्यांनी प्रथम पाहिले. बँकेकडे कर्जमागणीसाठी येणाऱ्या प्रत्येक अर्जाची चिकित्सक छाननी करून पण संपूर्ण सहानुभूतिपूर्वक विचार करून अडल्यानडल्याची आर्थिक गरज बँकेमार्फत कशी भागविली जाईल, नि ती भागविली जाताना बँकेच्या कायदेकानूची जपणूक कशी होईल अशी जागरुकता ठेवून त्या कर्जदाराचा अधिकाधिक उत्कर्ष साधण्याकडे त्यांचे बारकाईने लक्ष जात असे. बँकेच्या ठेवी कशा वाढतील नि बँकेच्या पैशाची गुंतवणूक योग्य नि किफायतशीर कशी होईल याकडे त्यांचे जातीने लक्ष असे. नव्यानव्या उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देणे, शेतीच्या उत्पादनास सहाय्य करणे नि सामान्य नागरिकांना पण जिद्दीनं नि हिरीरीनं कष्ट करणाऱ्यांना आर्थिक सहाय्य करून जीवनमान उंचावण्याबाबत श्री. शंकररावजी प्रथमपासूनच तळमळीने प्रयत्न करीत आले

आहेत. ज्यांच्याजवळ स्थावर नाही पण इर्षा आहे, कष्ट आहेत, प्रामाणिकपणा आहे अशा कर्तबगार तरुणांच्या शिक्षणासाठी नि नवनव्या व्यवसायांसाठी कर्ज देण्याबाबत बँकेत ते प्रसंगी हट्टही धरतील, पण त्या माणसाच्या प्रगतीला संपूर्ण वाव करून देतील. या नि अशाच त्यांच्या लोककल्याणकारी कार्यांमुळेच गेली २५ वर्षे ते सतत बँकेत निवडून येत आहेत. या काळात त्यांनी डायरेक्टर, व्हा. चेअरमन व महत्वाच्या निरनिराळ्या कमिटयांवर उत्साहाने काम केले आहे. या त्यांच्या थोर विचारसरणीने नि अभ्यासूवृत्तीने या आर्थिक क्षेत्रातही त्यांनी मानाचे स्थान प्राप्त केले आहे.

अल्पावधीतच त्यांच्या बँकिंग क्षेत्रांतील कामगिरीचा सुगंध आजूबाजूस दरवळू लागला. सहकारी क्षेत्रातील थोरामोठ्यांच्या गाठीभेटी, विचारविनिमय, नव्या कल्पनांची देवाणघेवाण, अडीअडचणींचा विचार वगैरे चर्चासत्रांत ते प्रामुख्याने पुढाकार घेवू लागले. सहकारी बँक अधिक उपयुक्त नि अधिक स्थैर्यशील कशी होईल यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. सातारा जिल्ह्यांतील सहकारी संस्थांचे अधिवेशन, मुंबईची फर्स्ट इंडियन को–ऑपरेटिव्ह काँग्रेस कॉन्फरन्स, पन्हाळ्याची महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी परिषद, सांगलीची अर्बन बँक परिषद, कोपरगावची महाराष्ट्र परिषद, मुंबई राज्य अर्बन बँकस् कॉन्फरन्स, औरंगाबादची सहकारी परिषद, महाराष्ट्र स्टेट बँकेचा रौप्यमहोत्सव वगैरे ठिकाणच्या संमेलनास हजर राहून त्यांनी आपल्या अनुभवाची व ज्ञानाची चमकही दाखवली आहे. बॉम्बे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक असोसिएशनच्या बोर्डावर पुणे विभागातर्फे श्री. शंकररावजी हे निवडून आले नि बँकाचे प्रतिनिधत्व योग्य तऱ्हेने केले.हा सहकारी आर्थिक क्षेत्रांतील त्यांच्या लोकप्रियतेचा कळसच नव्हे काय?

निरनिराळ्या सभासंमेलनातून सहकारी बँकासंबंधी त्यांनी नवी दृष्टी नि नव्या योजना पुढे हिरीरीने मांडून त्या कार्यक्षम करण्याबाबत सरकारी यंत्रणेलाही हलविण्याचा प्रयत्न केला आहे. सहकारी हौसिंग सोसायटीप्रमाणे सरकारने अर्बन बँकांना घर बांधणीसाठी पैसा पुरविला पाहिजे मग आम्ही तो पैसा बँकेच्या सभासदांच्या सुखसोईसाठी दीर्घ मुदतीने नि अल्प व्याजाने पुरवून घरटंचाई दूर करू शकू असा दावा त्यांनी मांडला होता. अर्बन बँकासाठी एक स्वतंत्र ' अपेक्स बँक ' काढावी ही योजनाही बँक चालकांच्यापुढे नि कार्यकर्त्यांपुढे त्यांनी सुपूर्त केली होती. सहकारी बँकांना सरकारचे आर्थिक सहाय्य एक कपरदिकाही नसताना केवळ बंधनांची चौकटच आमच्यावर लादली जाते– ही अन्यायी घटना आहे, अशी स्पष्टपणे सरकारवर टीका करतानाही त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. अर्बन बँका व इतर बँका यांच्या कायदेकानूत फरक असू नये नि अर्बन बँकाचा सवतासुभा ठेवून त्यांच्या प्रगतीला खीळ बसेल अशी नियमावली असू नये यासाठी शंकररावजी यांनी आपली सडेतोड मते अनेकदा प्रतिपादून सहकारी बँकांचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला आहे, करीत आहेत. खरे पाहता, आमच्या सहकारी बँका सर्व गुणसंपन्न

झाल्या आहेत, आर्थिक उलाढालीत त्या अग्रेसर ठरल्या आहेत, ठेवीदारांचा संपूर्ण विश्वास त्यांनी संपादन केला आहे, साऱ्या सभासदांमध्ये मानाचे पान पैदा केले आहे अन् ग्राहकांमध्ये लोकप्रियही झाल्या आहेत... तरीही त्या सहकारी दरबारात मोठ्या लाडक्या झाल्या आहेत असे मानण्यास फारशी जागा नाही अन् याचेच दु:ख अन् चुटपुट आजही श्री. शंकररावजी यांना लागून राहिली आहे.

याच, ' उद्याचा युगधर्म असणाऱ्या ' सहकारी तत्वाचा अधिकाधिक प्रसार नि प्रचार व्हावा, यासाठी त्याचे ज्वलंत वाङ्मय प्रकाशित व्हावे अन सभा-संमेलनद्वारा ध्येयवादी माणसं निर्माण व्हावीत असे त्यांना वाटते. याचसाठी सरकारने एखादे ' सहकार विद्यापीठ ' स्थापावे नि आजच्या विद्यापीठांतून सहकार शिक्षणाला अग्रहक्क दिला तरच भविष्यकाळात सारा देश सहकारमय होईल असाच त्यांचा बोलका आत्मविश्वास आहे.

आज बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले आहे. गोरगरीब, मजूर, कलावंत नि गुणवंत लोकांना बँकेच्यामार्फत आर्थिक सहाय्य करून त्यांचे दारिद्र्य नष्ट करण्याचे सरकारने घोषित केले आहे. अशावेळी आपल्या अर्बन बँकाही मागे पडता कामा नयेत म्हणून कराडच्या अर्बन बँकेनेही ठराविक ठशाच्या कर्जाहून अन्य तऱ्हेची नवी कर्जे देवून त्यांत यश संपादन केले आहे. छोटेछोटे धंदे, शेतीची साधने, भूकंपाचेवेळी घरदुरुस्तीसाठी दिलेली कर्जे, सभासदांच्या दैनंदिन जीवनाच्या सुकरतेसाठी पुरवलेली साधने, शिक्षण संस्थांसाठी केलेले आर्थिक सहाय्य, रुग्णांसाठी ॲम्ब्युलन्सकार वगैरे गोष्टी अर्बन बँकेकडून घडवून आणण्यात श्री. शंकररावजींचा पुढाकार होता यात शंका नाही !

हाच सहकारी प्रपंच सांभाळता सांभाळता श्री. शंकररावजी हे " सार्वजनिक काका " होतात अन् निरनिराळ्या क्षेत्रांतील, निरनिराळ्या आचारविचारांचे नाना लोक त्यांचेभोवती जमतात, आपली सुखदु:खे त्यांना सांगतात नि ती दूर होईपर्यंत काका दु:खी होतात ! " सुख सांगावे जनाला नि दु:ख सांगावे मनाला ", हा एक मनुष्याचा स्वभाव खरा, परंतु ' काकांसारख्या ' जवळच्या माणसाजवळ प्रत्येक माणूस आपलं मन मोकळ करतो, हृदय उलगडतो त्यातील सुखदु:खाचे कानेकोपरे काका कोणत्याही कानाकोपऱ्यांत गेले असले तरी तिथं जावून दाखवतो. आर्थिक, मानसिक, शारीरिक नि घरगुती अडचणी सांगतो. अशा वेळी काकांचे हृदयही भरून येतं नि काका त्याला स्वत:कडून बँकेकडून नि परिचित सामाजिक संस्थांकडून योग्य ती नि शक्य होईल ती आर्थिक मदत देतात... त्या बापुड्याचे अश्रू अश्रूने पुसले जातात ! म्हणूनच आमच्या कराड अर्बन बँकेच्या नियामकांच्या नवरत्नहारातील ते मेरुमणी बनले नि लोकमानसात लोकमान्य झाले !!

आ प्पा सा हे ब दे श पां डे

# कऱ्हाड नगरीच्या विकास वैभवाचे शिल्पकार

कऱ्हाड शहरातील सर्वच सार्वजनिक संस्थांशी व चवळवळींशी शंकरराव करंबेळकर यांचा घनिष्ठ संबंध आहे. कऱ्हाड नगरपालिकेचे सभासद म्हणून त्यांनी केलेल्या कामगिरीकडे ओझरता दृष्टिक्षेप केला तर काका हे नगरपालिकेच्या क्षेत्रात नव्या विकसनशील मनूचे वारकरी म्हणून नगरपालिकेच्या दप्तरी नमूद आहेत.

सन १९४८ साली कै. गणपतराव चव्हाण हे जेव्हा कराड नगरपालिकेच्या अध्यक्षपदी निवडून आले. तेव्हापासून कराड नगरपालिकेत अधिकृत जरी पक्ष नसला तरी अनधिकृतपणे काँग्रेस पक्षाचे वर्चस्व आहे. जुन्या पद्धती, जुना जमाना बदलून लोकशाही पद्धतीनं विकास कार्याचा पाठपुरावा साधारणपणे १९४९–५० सालापासून या नगरपालिकेत चालू आहे. श्री. शंकरकाका हे काँग्रेस पक्षाचे एक मान्यवर नेते. अधिकृतपणे ते सभासद म्हणून जरी १९५२ नोव्हेंबर ते १९५७ अखेर नगरपालिकेत निवडून आले. तरी नगरपालिकेच्या कारभाराशी व प्रश्नांशी त्यांचा सन १९४८ पासूनच घनिष्ठ संबंध होता. निवडून आल्यानंतर त्याच वर्षी त्यांची कराड नगरपालिकेच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत अनेक तोलामोलाच्या गोष्टी झाल्या. त्यापैकी प्रमुख म्हणजे त्यावेळचे भारताचे पंतप्रधान स्वर्गीय पं. जवाहरलाल नेहरू यांना ता. ३०–४–१९५३ रोजी कराड नगरपालिकेतर्फे दिलेले मानपत्र हे होय.

नगरपालिकेची आर्थिक बाजू सुधारणेचे दृष्टीने जुन्या मुंबई राज्य सरकारने घरपट्टी, सार्व. पाणीपट्टी, प्रकाशपट्टी या ऐवजी ' संकलित कर ' बसविले व त्यांच्या दरांच्या मर्यादा आखून देणे, जकातीच्या रिवाजपटात सुधारणा घडवून आणणे;

पाणी पुरवठा मीटर सिस्टिममध्ये सुरू करणे; अन्यायकारक असा टर्मिनल टॅक्स् कमी करणे वगैरे अनेक गोष्टीवर धोरण आखून दिले होते.

४८ चा सरकारी ठराव म्हणजे नगरपालिकांच्या आर्थिक स्थितीबाबत ' मॅग्नाचार्ट ' समजला जातो. या सर्व गोष्टीची शासकीय पूर्ती करणेचे भाग्य श्री. शंकरकाका यांना अध्यक्ष या नात्याने लाभले.

संकलित कराच्या सुरुवातीबरोबरच शहरातील मिळकतीच्या वार्षिक भाड्याचे मूल्यमापन सरकारी अधिकाऱ्यांमार्फत ठरविले गेले तेही याचवेळी. मालाचे किंमतीवर जकातीची आकारणी या पद्धतीवर जकातीचा आकारपट कार्यवाहीत आणला. या सर्व गोष्टीमुळे नगरपालिकेच्या आर्थिक स्थितीत फारच मोलाचा फरक झाला व कराड नगरपालिका ही ' विकसनशील नगरपालिका ' म्हणून झाली.

या सर्व गोष्टी होत असताना काही प्रमाणात नागरिकांचा विरोध होणे हे क्रमप्राप्तच होते, पाणी पुरवठ्याबाबत ज्या प्रमाणात पाण्याचा वापर त्याच प्रमाणात पाणी मोजून आकारणी हे सिद्धांतिक होते. पण या न्यायपद्धतीला काही थरातून विरोध होता. श्री. शंकरकाकांच्या सामंजस्यामुळे व सर्वांना सामावून घेऊन कार्य करण्याच्या पद्धतीमुळे ते ही योजना कार्यवाहीत आणू शकले. या पद्धतीमुळे गोरगरीब, शेतकरी, व कामकरी लोकांचा खराखुरा फायदा झाला.

काकांना शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याची प्रथमपासूनच आवड होती. महाराष्ट्रातील इतर संस्थाप्रमाणेच कराड येथील नगरवाचनालय अत्यंत डबघाईस आले होते. हे वाचनालय आज कराडचे, नगरपालिकेचे भूषण म्हणून मानले जाते. ते वाचनालय नगरपालिकेने स्वतःकडे चालविण्यास घेण्याचा जो करार झाला. तो करार काकांच्या कारकीर्दीतच झाला. तसेच ज्या कुप्रसिद्ध हौदडीची जागा मिळविणेसाठीही प्रयत्न काकांच्या कारकीर्दीतच झाला व त्याच जागेवर आजची शोभिवंत इमारत ते सभासद असतानाच उभी राहिली आहे.

आझाद चौक ते चावडीचौक व चावडीचौक ते कन्या शाळेपर्यंत रस्त्याचे डांबरीकरण ५४ साली झाले त्याची पूर्व कार्यवाही काकांचे कारकीर्दीतच झाली. नगरपालिकेच्या शारदोत्सवाशी व त्यातील व्याख्यानाशी काका प्रथमपासूनच निगडीत आहेत. मग ते सभासद असोत अगर नसोत. शारदोत्सव हा आमचा संपन्न वारसा आहे. नगरवाचनालयाचा शताब्दी महोत्सव समारंभ झाला तो ते सभासद असतानाच.

नगरपालिकेचा कारभार करताना कायदा व व्यवहार पाहून न्याय व अन्याय पहावा लागतो. शासन आणि नगरपालिका यांचे संबंध अन्योन्य आहेत. व या बाबत

काकांची दृष्टी समतोलपणाची सहकार्याची होती. कराड नगरपालिकेच्या इतिहासात जो काही थोडासा दांडगाईचा कल्लोळ झाला होता तोही काकांच्या कारकीर्दीतच. पण त्याही वेळेस असीम शांतपणे काम करून यथावकाश ते काम चुकीचे आहे असा हुकूम शासनाकडून मिळवून आपल्या न्याय्य वागणुकीची परंपरा कायम ठेवली.

श्री. शंकरकाका सभासद असतानाच या नगरपालिकेची १९५५ मध्ये शत संवत्सरी साजरी झाली व त्यावेळी अनेकविध सांस्कृतिक कार्यक्रम झाले. ते कार्यक्रम यशस्वी करण्यात काकांचा मोठा हिस्सा होता.

त्यानंतर १९६५ च्या नगरपालिकेच्या कायद्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कारभाराचा व प्रश्नांचा विशेष अभ्यास असणाऱ्या नागरिकांचेसाठी निवडून आलेल्या सभासद संस्थेच्या १०% मानाने 'स्वीकृत सभासद' घेणेची तरतूद करणेत आली आणि अशा पहिल्याच बोर्डात श्री. शंकरराव करंबेळकर यांना सन्मानाने स्वीकृत करून घेणेत आले. त्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा फायदा कराड नगरपालिकेला मिळत आहे.

आमच्या रोटरी क्लबचे काका हे गेली ४।५ वर्षे सन्माननीय सभासद आहेत. त्याचा लोकसंग्रह फार मोठा आहे. सेवेसाठी मैत्री व मैत्रीतून सेवा ही दोन्ही रोटरीची तत्त्वे त्यांच्या बाबतीत सार्थ आहेत असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. डॉ. भय्यासाहेब परांजपे यांच्या नेतृत्वाखाली रोटरी क्लबतर्फे कराड येथे नुकतेच जे नेत्र शिबिर झाले त्यापाठीमागे प्रेरणा आणि सक्रीय सहकार्य काकांचे होते.

क्रीडा क्षेत्रात सोशल क्लबचे ते सन्माननीय अध्यक्ष आहेत. सोशल क्लब निष्क्रीय व कुचंबित अवस्थेत असता, त्याचे पुनरुज्जीवन करून व कम्युनिटी हॉलची वास्तू बांधण्याचे श्रेय, काका सोशल क्लबचे अध्यक्ष असतानाच त्याना आहे. कोयना सिमेंट वस्तु निर्मिती सहकारी कारखाना व कराडच्या इतर औद्योगिक संस्था व त्यांच्या विकासासंबंधी काकांचा अगदी जवळचा संबंध आहे.

श्री. शंकरकाका हे कऱ्हाडच्या विकास वैभवाचे शिल्पकार आहेत. कराडच्या सर्वांगीण विकासासाठी, संपन्नतेसाठी त्यांनी असंच झटत रहावं अशी आमची मनोमन इच्छा आहे.

विष्णुपंत निगडीकर

# राष्ट्रभक्तांचा आधार

शंकरराव माझे मित्र झाले त्याला झाली ४०-४५ वर्षे ! तो पहिल्या भेटीचा प्रसंग अजूनही जसाच्या तसा डोळ्यापुढे उभा रहातो ! मी त्यावेळी इंग्रजी तिसरीत किंवा चौथीत असेन. माझे मेहुणे श्री. विष्णुपंत भिताडे त्यावेळी इंदोलीला प्राथमिक शिक्षक होते. उन्हाळ्याची सुट्टी सुरू झाली. चार दिवस मजेत घालवावेत म्हणून मी मेहुण्यांचेकडे इंदोलीला गेलो. तेथेच श्री. शंकररावांचा व माझा परिचय झाला. शंकररावांनी मला पाहिलं, शंकरराव हसले, शंकरराव बोलले आणि त्यांनी मला जिंकले ! कायमचं आपलं केलं ! आम्ही खूप खेळलो, खूप हसलो. खूप हिंडलो, विहीरीत डुंबलो, शिवार तुडवले, कैऱ्या पाडल्या, विनोद केले, अनेक विषयावर चर्चा केल्या. त्या अल्लडपणात आमचे मैत्रीचे बंध इतके घट्ट होतील हे आम्हाला त्यावेळी कळलंही नाहीं. एक गोष्ट मला इथे आवर्जून सांगाविशी वाटते की, शंकररावांची कार्यकर्त्यांचा संग्रह करण्याची वृत्ती त्यावेळीही प्रकर्षाने दिसून आली. दुसऱ्यावर छाप पाडणारी विनोदगर्भ वाणी ही शंकररावांना लाभलेली दैवी देणगी आहे. मी शंकररावांच्या सहवासाने मंत्रमुग्ध झालो. त्यांच्या वाग्गंगेच्या प्रवाहात अखंड डुंबलो.

माझा जन्म गरीब कुटुंबात झालेला. मी कसाबसा मॅट्रिकपर्यंत शिकलो. गरिबीमुळे शिकणं अशक्य होत म्हणून शाळा सोडली आणि मसूर येथे इंग्रजी शिकविण्याचा एक वर्ग सुरू केला. एका वर्षात तीन इयत्ता आणि पुढील वर्षी चौथी असा वर्ग मी घेत असे. त्यामुळे माझी चरितार्थाची सोय झाली आणि अनिर्बंधपणे स्वराज्याच्या चळवळीत भाग घेता येऊ लागला. त्याच काळात श्री. शंकररावजी बी. ए. होऊन कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये नोकरीला लागलेले होते. मी माझ्या क्लासमधील विद्यार्थी टिळक हायस्कूलला परीक्षेला बसवित असे. अशाच एका परीक्षेच्यावेळी, माझी आणि श्री. शंकररावजींची गाठ पडली. तब्बल १०-१२ वर्षांनी आम्ही भेटत होतो. परंतु त्या बालवयातही जुळलेले ते धागे तसेच पीळदार

होते, अतूट होते. मला पाहताच शंकररावांनी पाठीवर थाप टाकली आणि म्हणाले ' अहो विष्णुपंत, तुमची घरची अत्यंत गरिबी. शिक्षण अपुरं. अजून लग्न नाही. अशाही स्थितीत तुम्ही केलेला त्याग आणि धडाडी पाहून मी अवाक् झालोय ! तुमचं सारं कार्यच कौतुकास्पद आहे ! " शंकररावांनी दिलेली ही शाबासकी, दिलेला धीर, केलेला गौरव मला माझ्या आयुष्यभर उपयोगी पडलेला आहे. पांथस्थाच्या शिदोरीप्रमाणे शंकररावांचे ते शब्द मला सर्व जीवनभर प्रेरणेचा पुरवठा करीत असतात.

यानंतर पुढे श्री. शंकररावजींनी मा. ना. यशवंतरावजींच्या पुढाकाराने स्वतंत्र शिक्षणसस्था काढली. मी माझ्या क्लासचे विद्यार्थी आता शंकररावांच्या शिवाजी विद्यालयात बसवू लागलो. आता आम्ही अधिक जवळ आलो. शंकर-रावांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू मला त्यामुळे जवळून न्याहाळता आले. शंकर-रावांच्या इतकं प्रसन्न आणि विविध पैलू असलेल व्यक्तिमत्व क्वचितच पहायला मिळेल. मनमिळावू स्वभाव, सार्वजनिक कामाची आत्यंतिक तळमळ, उफाळणारे राष्ट्रप्रेम, बिकट प्रसंगी अतुल धैर्य या सर्व गुणांनी शंकररावांचे जीवन समृद्ध आहे. माझ्या सारख्याला एकाचवेळी देशभक्ती आणि पोट भरणे हे दोन्ही करता येणे शक्य नव्हते. चिडलेले इंग्रज सरकार आम्हांला केव्हा पकडील आणि किती काळ तुरुंगात डांबून चिरडून टाकील याचा काहीच भरवंसा नव्हता. अशा अस्थिर काळी शंकररावांनी मला धीर दिला. माझ्या क्लासकडे आस्थेने लक्ष पुरविले. माझ्या विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यालयात घेऊन त्याना कसल्याही अपुरेपणाची, उणेपणाची जाणीव होऊ दिली नाही. शंकरराव बुद्धीने चलाख, वाणीने मिठ्ठास, माणसाची गरज अचूक जाणणारे त्यामुळे माणूस त्यांच्या सहवासात गेला की, त्यांच्या मना-तील निराशेची जळमटे पार उडून तो नव्या उमेदीने, जिद्दीने, धडाडीने कामाला लागतो. शंकररावांची मूर्ती लहान पण कर्तबगारी प्रचंड– हिमालयाएवढी !

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर माझे राजकीय उद्दिष्ट पूर्ण झाले. १९५० साली मला माझ्या क्लासचे शाळेत रुपांतर करावेसे वाटू लागले. मी, श्री. राघूआण्णा लिमये, श्री. भिकोबा साळुंखे, श्री. बापूसाहेब चव्हाण कोणेगावकर असे मिळून शंकररावांच्याकडे गेलो. मसूरला शिवाजी संस्थेशी शाळा सुरू झाली. या सर्व प्रकरणात माझे मन मात्र साशंक होते. मनात धागधुगी होती. मी कोणी मोठा शिकलेला नव्हतो, ट्रेण्ड नव्हतो त्यामुळे मला एक दोन वर्षात काढून टाकतील की काय याची भीती होती. आता मी संसारी होतो. घरी बायको तीन मुले होती. मुले शिकत होती. त्यातून मजजवळ दुसरी काही कला नाही. दुसरे उत्पन्न नाही भीती वाटणे सहाजिक होते. नशिबावर हवाला ठेवून होतो. परंतु माझ्या पाठीमागे शंकररावांच्या रुपाने प्रत्यक्ष शंकरच रक्षणाला उभा होता. एका राष्ट्रभक्ताने एका राष्ट्रसेवकाला अखेरपर्यंत मदत केली.

शां ता रा म  आ ठ व ले

# काव्यात्म भावजीवन जगणारे शंकरराव ...

१९६६ च्या नवरात्रात मी कऱ्हाड येथे 'शारदोत्सवा'त व्याख्यान देण्यासाठी आलो होतो. व्याख्यानाला येण्यापूर्वी कऱ्हाडबद्दल जी काही माहिती कानी आली तिच्यात श्री. करंबेळकर यांचा उल्लेख प्रामुख्याने होता.

व्याख्यानासाठी मी आलो त्या दिवशी सकाळी गावात काही राजकीय घडामोडींचा परिणाम म्हणून दुकाने बंद इ. कार्यक्रम होता. सकाळचे कार्यक्रम उरकून–भेटीगाठीसाठी व गाव पाहण्यासाठी निघालो. प्रत्येक ठिकाणी एकच विचारणा केली जात होती, " शंकरराव भेटले की नाही ? " गावात शंकरराव करंबेळकर यांना केवढी प्रतिष्ठा व लोकप्रियता आहे याची प्रचिती मला येत होती.

बऱ्याच ठिकाणी हिंडून आल्यावर एका दुकानात श्री. शंकरराव करंबेळकर यांची माझी भेट झाली. हवापाण्याच्या व इतर गप्पा चालू होत्या. शंकरराव करंबेळकर या कऱ्हाड येथील शिक्षणक्षेत्रातील एका कर्तबगार, व्यवहारी व चतुर पण तितक्याच भावनाशील गृहस्थाशी मी बोलत होतो. पण त्यांच्याशी बोलताना–वर्तमानाबरोबरच मी भूतकाळात वावरत होतो. ४० वर्षापूर्वीचा चित्रपट पुन्हा स्मृतीच्या पडद्यावर पहात होतो.

अंगात नेहरु सदरा–जाकीट घातलेले–प्रौढत्वाकडे झुकलेले शंकरराव मनमोकळेपणाने हसत–माझ्याशी गप्पागोष्टी, हास्यविनोद करीत होते. चहापाणी चालू होते. येणारा जाणारा प्रत्येक माणूस शंकररावांशी मोठ्या आदबीने वागत होता. नानाप्रकारच्या राजकारण व शिक्षणक्षेत्रातील गोष्टीवर चर्चा चालू होती. पण मी मात्र सध्याचे शंकरराव आणि ४० वर्षापूर्वी मी पाहिलेले शंकरराव यांची मनातल्या मनात तुलना करीत होतो. काळाच्या कर्तबगारीचे मनाशी नवल करीत होतो.

४० वर्षांपूर्वी माझी आणि शंकरराव यांची सहज भेट झाली ती पुण्यात माझे एक मित्र गोपाळ रंगनाथ ऊर्फ बंडू आंबेकर यांच्या घरी. श्री. आंबेकर आणि मी दोघे जिव्हाळयाचे मित्र. आंबेकर त्यावेळी सध्याच्या लक्ष्मी रोडवर जिथे गजाननाचे देऊळ आहे त्याच गल्लीत ४७ बुधवार येथे राहात असत. त्या भागाला गोंदणीचा बोळ म्हणत. घर आंबेकर यांचे स्वतःचेच होते व एकत्र कुटुंबामुळे आंबेकर यांचे घरी त्यांचे बंधू, चुलते इ. पुष्कळच मंडळी असत. श्री. शंकरराव करंबेळकर यांची माझी भेट बहुधा १९२६ साली झाली. त्या वेळी मी कवि म्हणून थोडाफार प्रसिद्धीस येत होतो. कविता लिहिण्याची व वाचण्या अभ्यासण्याची मला आवड होती. श्री.करंबेळकर हे त्या वेळी एक कोवळे भावनाप्रधान हळूवार स्वभावाचे तरुण होते. त्यांच्या वागण्या बोलण्यात विलक्षण मार्दव होते. मुद्रेवरचे मोहक स्मित, कोणालाही सहज आकर्षित करून घेईल असे निर्मळ व प्रसन्न असे. माझा मित्र आंबेकर व मी दोघेही भावनाप्रधान-कवितेचे भक्त. यावेळी सायंकाळी मी आंबेकर व आणखी एक दोघे मित्र मिळून – फिरावयास लांबवर जात असू – बहुधा – त्यावेळी एकांत व रम्य असणाऱ्या फर्ग्युसनच्या टेकडीवर. करंबेळकर यांची ओळख झाल्यावर – तेही आमच्या बरोबर फिरावयास येऊ लागले. असा क्रम मला वाटते पुष्कळ दिवस चालू होता. कविता म्हणण्यात, नकला करण्यात आणि रंगवून गोष्टी सांगण्यात करंबेळकर पटाईत असत. पण एकूण वृत्ती स्वप्नाळू–भावनाशील–आणि त्या दृष्टीने बालकवि–गडकरी–यांच्या कवितांवर चर्चा चाले. माधव जूलियन यांच्या कित्येक कविता मला पाठ असत व ते त्यावेळी आम्हाला शिक्षक होते. 'विरह तरंग' हे त्यांचे खंडकाव्य नुकतेच प्रसिद्ध झाले होते. एकूण आम्ही सारे – कवितेच्या कोमल वातावरणाने रंगलेलो होतो. आणि या उपक्रमात आंबेकर आणि मी जितके एकमेकांशी समरस होतो तितकेच श्री. करंबेळकर आमच्याशी एकरूप झाले होते. स्नेहसहवासाचा व काव्यशास्त्र विनोदाचा–निरामय सुखाचा आनंद आम्ही लुटीत होतो.

आमच्या त्या स्नेहसहवासाला कशाची दृष्ट लागली व आमची ताटातूट झाली याचे नीट स्मरण नाही. –पण कसल्यातरी अनिवार्य आपत्तीमुळेच-- आमची ताटातूट झाली– आणि त्यानंतर पुढे आंबेकर आणि मी एकत्र राहिलो-- तरी करंबेळकर यांची मात्र पुन्हा कधी गाठभेट झाली नाही. त्यांची स्नेहस्मृती मात्र कायम मनात राहिली.

काळाने केवढी करामत केली होती ! काव्यात रंगणारे त्यावेळचे कोवळे-भाबडे शंकरराव चाळीस वर्षांच्या दीर्घावधीनंतर मी पहात होतो. व्यवहाराच्या अनेक परीक्षा देऊन – जगाचे टक्के टोणपे खाऊन ते कणखर – कर्तबगार– कार्यकुशल झाले होते. पण त्यांच्या पूर्वीच्या मुद्रेतला तो गोडवा व ती भावनिर्भरता

आज कोठे होती ! अंतर्यामी त्या साऱ्या वृत्ती जिवंत असतील, कदाचित– पण मला माझ्यासमोर दिसत होते ते एक व्यवहारचतुर काहीसे रूक्ष, निबर शंकरराव करंबेळकर.

त्यांनी मला आपल्या संस्था दाखविल्या. त्यांचा व्याप विस्तार समजावून दिला. गावाबाहेर विकसित होत असलेले ते विद्यानगर व तेथील प्रसन्नता पाहून मला धन्यता वाटली. एके काळच्या भावड्या कवीने व्यवहाराची सारी बंधने व राजकारणे सांभाळून आपल्या कर्तबगारीची चमक दाखवून निर्माण केलेल्या कार्याचा तो यशस्वी विस्तार पाहून मी प्रसन्न झालो. ठिकठिकाणी पदोपदी या माणसाला त्या गावात व त्या क्षेत्रात केवढा मान आहे, मोठेपणा आहे याचे प्रत्यंतर मला येत होते, आणि त्या साऱ्याचा मला अभिमान पण वाटत होता. रात्री शंकररावांच्या घरीच माझ्या भोजनाची उतरण्याची व्यवस्था होती. पण हे सारे पाहात अनुभवत असताना कऱ्हाड येथे व तेथून परत आल्यानंतरही मला सारखे आठवत होते ते–४० वर्षापूर्वीचे काव्यात्म भावजीवन जगणारे कोवळे व मंजुळ– शंकरराव करंबेळकर.

बा ळ कृ ष्ण वा सु दे व घाटे

# ' अंतरीच्या नाना कळा '....

" वेश असावा बावळा अंतरी असाव्या नाना कळा " या समर्थोक्तीचा साकल्याने विचार केला तर घाण्याच्या बैलासारखे किंवा नाकासमोर पाहून चालत जाणाराचे जीवन ते जीवनच नव्हे असाच त्याचा अर्थ होतो. तसे म्हटले तर प्रत्येक मनुष्य आपल्या मुख्य व्यवसायाव्यतिरिक्त अन्य काही छंदोपछंदात स्वतःला गुंतवून घेऊन स्वतःची व साधले तर सभोवतालच्या लोकांची क्षणभर का होईना करमणूक करू शकतो. स्वतःबरोबर दुसऱ्याला थोडावेळ हसवू खेळवू शकतो. आणि हेच जर का त्याला बऱ्यापैकी साधू लागले तर तो ती कला आत्मसात करण्याच्या प्रयत्नाला लागतो व तीत तो प्रसिद्ध कलावंत म्हणून नावही मिळवू शकतो.

लोकमान्य टिळक राजकारणात पडले नसते तर ते उत्तम गणिती किंवा तत्वज्ञानी झाले असते असे म्हणतात. याचे कारण त्यांच्या ठिकाणी असणारी त्या त्या विषयाची तयारी, जी त्यांनी राजकारणातून सापडलेल्या थोड्या वेळात दाखविली हेच होय.

श्री. प्र. ल. ऊर्फ शंकररावजी करंबेळकर यांनी आपल्या जीवनाचा पेशा म्हणून शिक्षकी पत्करली हे जरी खरे असले तरी त्यांच्या अंगी अन्य गुणांचा साठाही काही कमी नाही. श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून लोकशिक्षणाच्या कार्यास त्यांनी दिलेली चालना ही त्यांच्या अंगी असलेल्या व्यवस्थापनचातुर्याचे ( Managing Capacity ) निदर्शनच होय. तसेच ज्या ज्या संस्थातून त्यांनी आजवर कामे केली अगर आजही ते करीत आहेत तीत ते होस हो ही भूमिका घेऊन न बसता आपले वेगळे असे काही तरी वैशिष्टच दाखवीत असतात.

शिक्षकाच्या पेशाला अनुरूप किंवा पूरक अशी वाङ्मयाची आवड श्री. शंकररावजी यांना मोठीच आहे; हे त्यांच्याशी थोडावेळ गप्पा मारीत बसलेल्या

व्यक्तीसही कळून येण्यासारखे आहे. वाङ्मयातही विशेषतः विनोदी वाङ्मय हे त्यांच्या विशेष आवडीचे. आचार्य अत्रे यांच्या लेखनावर श्री. शंकररावजी बेहद्द खूष असतात. आचार्य अत्र्यांच्या विनोदी कोटया श्री. शंकररावजीच्या संभाषणातून ऐकताना श्रोत्यांतून हास्याचे लोट वाहू लागतात. श्री. पु. ल. देशपांडे हे तर श्री. शंकररावजींचे आवडते लेखक होत. श्री. वि. स. खांडेकर यांच्या वाङ्मयाची मोहिनी त्यांच्यावर कमालीची आहे.

गद्य वाङ्मयापेक्षां श्री. शंकररावजींची ओढ काव्याकडे विशेष दिसून येते. आपल्या विद्यार्थीदशेत ते 'पुष्कर' व 'वृषभध्वज' या टोपण नावाने काव्य लिहीत असत.

जुने काव्य काय आणि नवे काव्य काय सहृदयतेने ते समजून घेऊन त्याशी समरस होणारा रसिक हा कवीच म्हणावा लागेल. श्री. शंकररावजींची प्रतिभा अलीकडे फारशी काव्यप्रसू राहिली नसली तरी काव्याचे रसग्रहण करण्याची त्यांची वृत्ती खरीच मर्मग्राही रसिकाची आहे.

श्री. शंकररावजींच्या अंगी असलेल्या नाना कळांपैकी दुसऱ्या एका कळेचा उल्लेख या ठिकाणीं मला अवश्य करावयाचा आहे. कराडच्या हौशी नटांच्या 'भावबंधन' नाटकातील महेश्वर तथा कामण्णाची त्यांनी वठविलेली भूमिका माझ्या पूर्ण परिचयाची आहे. भूमिकेशी समरस होऊन रंगभूमीवर काम करीत असताना श्री. शंकररावजीनी कामण्णा असा काही रंगविला होता की तो अद्यापही माझ्या डोळयापुढे सशब्द उभा राहतो.

नाटककाराचे हृद्‌गत नट प्रेक्षकाच्या अंतःकरणापर्यंत पोचवितो एवढयावरच नटाच्या अभिनय कौशल्याचें साफल्य असे मला वाटत नाही. नाटककाराचें ते हृद्‌गत नटाने स्वयंप्रेरणेनें स्वप्रतिभेनें खुलवून फुलवून रसिक प्रेक्षकापर्यंत पोचविले तरच तो नाटककार व त्याजबरोबर तो नट नावलौकिकास चढतो.

भावबंधनातील इंदू बिंदूच्या कुरूप जोडगोळीत सापडलेला किंबहुना आपण-हून जाऊन पडलेला कामण्णा आपणावर प्राणाहून प्यार करतो असा विश्वास इंदूच्या मनात उत्पन्न करण्यासाठी कामण्णाच्या अंधवेशात श्री. शंकररावजींनी इंदाऽऽ अशी काही प्रेमळ आणि लडिवाळ हाक फोडली की ती ऐकून प्रेक्षकांतून टाळयांचा कडकडाट झाला. गडकऱ्यांच्या कल्पनेत इंदू! ऐवजी इंदा! हे संबोधन नाटयलेखनकाली आले असेल की काय याबद्दल संशय वाटतो.

श्री. शंकररावजी सुशिक्षित आणि सुसंस्कृत आहेत म्हणूनच ते लोकाभिरुचीचे मार्मिक निरीक्षण करू शकतात. एका प्रसंगी लोकनाटयाच्या स्पर्धा त्यांच्या

अध्यक्षतेखाली भरविण्यात आल्या होत्या. लोकनाटचासंबंधी हायस्कूलच्या एका शिक्षकाला काय कल्पना असणार अशा भ्रमात लोकनाटचवाल्यानी आपले विचार मांडावयास सुरवात केली. उत्तरे प्रत्युत्तरे इत्यादींनी चर्चा बरीच रंगली होती. शेवटी श्री. शंकररावजींचा अध्यक्षीय समारोप व्हावयाचा होता. अध्यक्षांनी चर्चेतील विषयांचा यथायोग्य समाचार घेऊन आपले विचार मांडावयास सुरवात केली. त्यांचे साभिनय वक्तृत्व ऐकून केवळ श्रोत्यानीच नव्हे तर लोकनाटचाचार्यांनीही आश्चर्याने थक्क होऊन तोंडात बोटे घातली;

संस्थेच्या अवाढव्य व्यापात गुंतल्यामुळे श्री. शंकररावजींना आपल्या आवडीच्या काव्य लेखनाकडे व नाटचसेवेकडे वळणे अशक्य होऊन बसले आहे नाहीतर लोकमान्यांच्या संबंधी मी जे वर म्हटले आहे त्याप्रमाणे ते एक प्रथितयश कवी आणि लोकप्रिय नट झाले असते यात सुतराम संशय नाही.

आप्पासाहेब इनामदार

# रसिक चिरतरूण

मी शाळा नं. एक मधे शिकत होतो तेव्हाची गोष्ट. एका समारंभात एक मुलगा जादूचे प्रयोग करून दाखवीत होता. मधून मधून छान बोलतही होता. काही पत्त्यांच्या जादू त्याने केल्या आणि शेवटी मनगटावर ' वंदे मातरम् ' ही अक्षरे कागदाच्या राखेतून त्याने दाखविली. आता त्यात फारसे काही वाटत नसले तरी त्यावेळचे त्याचे वय, सभाधीटपणा, व जादूगिरीसाठी लागणारी चपळाई या गोष्टींमुळे या मुलाची व आपली ओळख अवश्य झाली पाहिजे असे माझ्या मनात फार येत होते. हा मुलगा म्हणचेच शंकरराव करंबेळकर होत.

त्यानंतर बरेच दिवस मी गाण्याच्या शिक्षणासाठी कऱ्हाड सोडले आणि पुन्हा आम्ही कऱ्हाडला भेटलो त्यावेळी ते देव मास्तरांच्या शाळेत शिक्षक असल्याचे मला समजले. मी कऱ्हाडला त्यावेळी गांधर्व महाविद्यालय सुरू केले होते.

त्यावेळच्या जमान्यात शालेय शिक्षक आणि गायन शिक्षक यांच्या सामाजिक प्रतिष्ठेत जमीनअस्मानाचा फरक होता. विशेषतः आमच्या त्या ब्राह्मणपुरीत तर गायन शिक्षक म्हणजे एक चर्चेचा किंचित उपहासाचा विषय होता. तरीदेखील कऱ्हाडसारख्या ठिकाणी त्यावेळी मी केलेल्या धाडसाचे कौतुक करणारी जी काही मोजकी मंडळी होती— विशेषतः तरूण पिढीतली- त्यांत शंकररावांचे नाव अगदी प्रथम क्रमांकाने होते.

शंकरराव कधी कधी गात असत, विशेषतः स्वतः हार्मोनियम वाजवून गात असत. त्यांचे त्यावेळचे विशेष आवडीचे गाणे म्हणजे त्यावेळची कृष्णा मास्तराची लोकप्रिय रेकॉर्ड : ' चलत चलत मथुरा. ' पुढे पुढे या मथुरेची फर्माइश म्हणजे पौराणिक ठरली. गाणे ऐकणारे मात्र ते एक जाणकार श्रोते होते हे देखील, काही कमी नव्हते.

कऱ्हाडला १९४१ साली झालेल्या साहित्य संमेलनात शंकररावांनी गायिलेली त्यांचीच एक कविता माझ्या मनात आज देखील घर करून आहे. त्यावेळी गाण्याच्या मैफलीतून त्या कवितेचा सर्रास उपयोग करीत होतो मी. त्या कवितेचे व त्यामुळे माझेदेखील कौतुक होत होते. ती कविता त्यांच्या दृष्टीने त्यांनी वृत्तात म्हणून दाखविली असेल. पण संगीतकार या दृष्टीने मला ती एक चांगली संगीतातील रचना वाटली. मी कविता गाताना तिला स्वर, आलाप तानेचा थोडा मुलामा चढविला असला तरी त्या कवितेतून संगीतातल्या एका दर्दिल्या, रसिक अशा शंकररावांचे दर्शन घडत होते. शिक्षणाशिवाय काही गोष्टी संगीताच्या बाबतीत अभिजातच असाव्या लागतात त्या त्यांचे अंगी होत्या याचेच त्याची ती चाल हे प्रतीक होते. त्या कवितेच्या मला आठवणाऱ्या काही ओळी अशा...

झिम झिम झिम पाऊस पडे
रात्र भरी हा चोहिकडे

स्वर्गातील यमुनेचे पाणी
घेऊनी ज्या जातात गौळणी
कृष्ण मेघ परि हळुच येऊनी
घडे तयांचे करी उपडे...

विश्वामित्रासमान कोणी
सत्त्वपरीक्षेसाठी पाणी
भरावया जातसे रांजणी
ज्यासि बुडासि असंख्य तडे...

१९४२ च्या चळवळीतील भूमिगतांना सामान, कापड इ. रसद पोचविण्याच्या कामातही शंकररावांचा भाग मोठा होता. हे फारच थोड्या मंडळींना माहीत आहे. परंतु त्या संदर्भातील अनेक गोष्टी त्यावेळी माझ्या विद्यालयात ठरत–घडत असत याचे मला चांगले स्मरण आहे.

एक रसिक, उत्तम वक्ता, चिरतरूण, मनाचा उमदा शिक्षक आणि अनेक दृष्टींनी मोठा असणारा असा मित्र आपल्याला लाभला ही देखील माझ्या जीवनातील एक मोठी कमाई असे मला वाटते.

डॉ. व्ही. जी. देशपांडे

## शंकररावजी– एक प्रकृती !

सांगलीचे डॉ. बंडोपंत पटवर्धन यांनी माझी आणि शंकरराव करंबेळकर यांची प्रथम ओळख करून दिली, त्याला आता जवळ जवळ बत्तीस वर्षे होऊन गेली आहेत. एकोणीसशे आडतीसला मी कऱ्हाडला आलो. दवाखाना थाटला. माझ्या जीवनप्रवाहाने अनेक वळणे वळसे घेऊन अनुभवांची खोली साध्य केली होती. आता प्रवाहाला संथपणा येणे अवश्यक होते. अशावेळी शंकररावांची नि माझी ओळख झाली. परस्परांचा परिचय वाढत गेला आणि परिचयाचे गाढ मैत्रीत रूपांतर झाले. डॉक्टरी पेशामुळे पत्करलेली समाजस्वास्थ्याची जबाबदारी माझ्या कुवतीनुसार प्रामाणिक निष्ठेने पार पाडण्यात मी स्वतःला धन्य मानत आलो आहे. पण शंकररावजींच्या कौटुंबिक वातावरणाचा जसजसा मला जवळून परिचय होत गेला तस तसा त्यांच्यातील मला अपरिचित असणाऱ्या मौलिक गुणांचे निदान होत राहिले. त्यांची विनोदी वृत्ती, त्यांच्या निकोप, निरोगी व्यक्तिमत्वाचा गाभा आहे. त्यांच्या हृदयस्पंदनांत मानवतेची व्यथा नि गाथा माझ्या स्टेथॉस्कोपने टिपली गेली. त्यांच्या मनगटातून धडाडणाऱ्या नाडीत आकांक्षाना आकार देण्याची शक्ती झेपावत आहे याची जाणीव माझ्या हस्तक्रियेला होत गेली. त्यांची भावनाशील प्रकृती मी अनेक वेळा तपासून पाहिली आहे. दुःख, यातना, विरोध, हर्ष, गौरव, यांचा त्याच्या कार्यशक्तीवर कोणताही परिणाम होणार नाही. एवढी त्यांची प्रेरकता त्यांच्या रक्त–रसातून अभिसरीत होत आहे. हे या तीस वर्षात मी जेव्हा जेव्हा त्यांची प्रकृती तपासली तेव्हा तेव्हा अनुभवले आहे.

वृद्धावस्थेतील मातोश्रींच्या आजारपणात मातृप्रेमासाठी व्याकूळ झालेले शंकरराव मी तपासले आहेत, त्याच प्रमाणे दुर्दैवी घटनेने सागरेश्वराच्या कड्यातील कोसळून चैतन्यहीन झालेल्या कन्येच्या दर्शनाने, परिस्थितीचा वेध घेऊन कर्तव्यकठोर निर्णय घेणारी शासकीय निग्रही वृत्ती देखील मी अनुभवली आहे. शंकररावजींची "प्रकृती" मी जेवढी जाणतो तेवढी इतरांना जाणता येणार नाही असे मला अनेकवेळा वाटते.

गेल्या वर्षी त्यांच्या शरीराने कायाकल्पाचा संकल्प सोडला असावा ! शंकररावांचे मानसिक सामर्थ्य केवढे अलोट आहे हे कऱ्हाडच्या वैद्यकीय व्यवसायात वावरणाऱ्या अनेकांना संशोधनात्मक वाटावे असे ठरले आहे. संक्षेपाने त्यांच्या प्रकृतीचे निदान हे असे आहे.

शंकररावजींनी अनेकांना समाजाभिमुख बनवले आहे. " कऱ्हाड नर्सिंग होम " सहकारी क्षेत्रात आणण्याचा विक्रम हा शंकररावांचा पराक्रम आहे ! डॉक्टरी पेशातील व्यक्तिनिष्ठेला समाज निष्ठेत परावर्तित करणारे शंकरराव हे कराडचे समाज क्षितिजावरील " प्रभाकर " आहेत.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या प्रारंभापासून संस्थेचा एक घटक म्हणून मला काम करावे लागले आहे, शिक्षण क्षेत्रात शंकररावांचे कार्य दक्षिण महाराष्ट्रात अद्वितीय आहे. त्याचा परिचय इतरत्र असणारच. मी त्या " केस " मध्ये अनाहूत ढवळाढवळ करीत नाही. तरीपण शंकरराव ही एक प्रेरक शक्ती आहे ! या शक्तीला पूरक नि पौष्टिक, संतुलित आहार पोहोचवण्यात आम्ही कमी पडता कामा नये. आणि ते कार्य आम्हा मित्रमंडळींच्याकडून होत राहो. हीच भावना व्यक्त करून मी हे प्रिस्क्रिप्शन पुरे करतो.

अ र विं द द त्ता त्र य पु रा णि क

# मला माहीत असलेले शंकरराव

१२ वर्षांपूर्वी मी नोकरीनिमित्त कराडला आलो. निरनिराळ्या क्षेत्रांतील नामवंत व्यक्तींचा परिचय करून घेण्याचा माझा छंद आहे. त्याप्रमाणे त्यांचा मी परिचय करून घेतला. त्यांच्या सहवासात आलेल्या व्यक्तीला ते स्वतःचा विसर पडू देत नाहीत असे मला वाटते.

शंकररावांचे व्यक्तित्व आत्मविश्वासाच्या भरभक्कम पायावर उभे आहे. हाती घेतलेली प्रत्येक गोष्ट विलक्षण वेगाने पुरी करण्याची त्यांची हातोटी फारच थोडया मंडळींच्याजवळ आढळून येते. त्यांच्याभोवती निरनिराळ्या प्रकारच्या व प्रकृतीच्या माणसांचा सतत गराडा पडलेला असतो तेथे मनुष्यस्वभावाच्या अनेक सूक्ष्म छटांचे दर्शन झाल्याशिवाय रहाणार नाही. ते एकटे व स्वस्थ बसलेले मी कधीच बघितलेले नाही. विश्रांती नावाची गोष्ट त्यांच्या फारशा परिचयाची नसावी. विश्रांती म्हणजे नवीन माणसांशी गप्पा मारणे व त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे होय. शंकरराव म्हणजे आपल्या मनातील खळबळ, उत्साह व निराशा, आनंद व दुःख, राग व लोभ व्यक्त करण्याचे आदर्श ठिकाण आहे,

त्यांचा होकार, त्यांचा नकार, त्यांची इच्छा, त्यांची अनिच्छा, त्यांचा राग, त्यांचा लोभ सर्व काही ते आपल्या हसण्याद्वारा सुचवू शकतात. त्यांच्या व्यक्तित्वाच्या खजिन्याचे दर्शन आपणास त्यांच्या चेहेऱ्यावरील हास्यामुळेच होऊ शकेल. त्यांचे हसणे मोहक नाही. त्यांचे हसणे फसवे नाही. त्यांचे हसणे फारच अर्थपूर्ण असते. शब्दकोशात दिलेल्या शब्दांच्या अर्थांना त्यांच्या हास्याच्या कल्हईने वेगळेच तेज प्राप्त होते असे मला वाटते.

शंकररावांची बुद्धिमत्ता अत्यंत तीव्र असली तरी त्यांच्या मागे असलेल्या व्यापामुळे एखाद्या पंडिताला शोभेल असा त्यांचा व्यासंग झाला नसावा. पण

प्रसंगच आला तर कोणत्याही तऱ्हेचा आळस न करता ते आवश्यक तेवढा अभ्यास करून व स्वतःच्या अनुभवाचा उपयोग करून आपल्या बुद्धिमत्तेची चमक ते दाखवू शकतात हे सर्वांना माहीत आहे. १९६२ साली अहमदनगर येथे माध्यमिक शिक्षक परिषदेत त्यानी केलेले अध्यक्षीय भाषण अभ्यासावर आणि परिश्रमावर आधारलेले आहे यात शंकाच नाही.

नामदार यशवंतराव चव्हाण व शंकरराव यांची मैत्री ही शंकररावांच्या सार्वजनिक आयुष्याचे पाथेय आहे असा सूर अनेकजण काढतात. मी या मैत्रीवर खूप विचार केलेला आहे. शंकररावांच्यासारखी व्यक्ति केवळ मोठ्यांच्या ओळखीने मोठी होऊ शकत नाही. शैक्षणिक संस्थांच्या कारभाराचा एक घटक होणे व शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरेपासून दूर असलेल्या थरातील मुलामुलीना शिक्षण मिळाले पाहिजे म्हणून सर्व शैक्षणिक संस्था नावारुपाला आणण्याकरिता अहर्निश झटणे हे काही केवळ मोठ्यांच्या ओळखीने होण्यासारखे काम नव्हे, त्याकरिता शंकररावांच्यासारखा गुणी व प्रतिभाशाली माणूसच हाताशी धरावा लागतो याची जाण नामदार यशवंतरावांना आहे. नामदार यशवंतरावांच्या व शंकररावांच्या मैत्रीचा उगम या गोष्टीत आहे. म्हणून या दोघांची मैत्री समजावून घेतल्याशिवाय शंकररावांच्या व्यक्तिमत्वाची खरी ओळख आपणास होऊ शकणार नाही.

पांडुरंग दादासाहेब पाटील

## शारदोपासक शंकरराव

एकोणीसशे बावन्न साल. कऱ्हाड नगरपालिकेच्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाले होते.मी आणि शंकरराव करंबेळकर दोघेही नगरपिते झालो होतो. शंकररावांचे शहरातील शैक्षणिक व सामाजिक कार्य आधीपासूनच माझ्या परिचयाचे होते. त्यांच्या व्यासंगी साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा परिचय पुढे नगरपालिकेच्या आवारात ओघानेच झाला. त्यावर्षी शंकरराव नगराध्यक्ष झाले. नगरपालिकेच्या इतिहासात हा कालखंड अनेक घटनांनी स्मरणीय झाला आहे. पं. नेहरूंचे आगमन व त्यांना नगरपालिकेने सादर केलेले मानपत्र ही त्यापैकी एक चिरस्मरणीय घटना होय. शंकररावांचा पिंड अभिजात शिक्षकाचा आणि प्रतिभासंपन्न साहित्यिकाचा असल्याने सर्वांनाच त्यांच्या कल्पक, भावनाशील स्वभावाबद्दल आदर वाटत आला आहे. नगराध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य निश्चितपणे मोलाचे व पायाभूत ठरले आहे. विचार आणि त्यानुसार कार्यवाही यांच्यात सुसंगतता आली पाहिजे असा त्यांचा सतत आग्रह होता.

सार्वजनिक वाचनालयाचे 'नगरपालिका वाचनालय' मुख्यतः त्यांच्या प्रेरणेने झाले. तेव्हा नगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजात नवा आशय जमा होत राहिला. कराड शहराची वाङ्मयीन भूक संवर्धित करणे, आणि जुन्या नव्या ग्रंथांचे संगोपन करणे ह्याचा नवा प्रयोग सुरू झाला. शारदीय व्याख्यानमालेला महत्त्व येत राहिले. प्रत्येक उपक्रमाचे दर्जेदार नियोजन सांभाळण्यात नगरपालिका शंकररावजींच्यावर भिस्त ठेवून असे. शंकररावांचे या संदर्भातील परिश्रम मला व्यक्तिशः फार दूरदृष्टीचे वाटतात. कराड शहराच्या सार्वजनिक, वाङ्मयीन क्षेत्रात शंकररावांनी स्वतःचे असे एक स्थान निर्माण केले. आणि म्हणूनच त्यांना आजही सभासद म्हणून स्वीकृत करून घेण्याची नगरपालिकेला आवश्यकता भासली. त्यांच्या लोकसेवेचे हे बोधचिन्हच होय !

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण मंडळाच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी माझ्यावर पडलेली आहे. तथापि प्रमुख कार्यवाहपदाची धुरा गेली पंचवीस वर्षे अखंडपणे शंकररावांकडेच असल्यामुळे माझ्यावरील जबाबदारीचा भार मला कधीच जाणवत नाही. लोकशाहीवरील त्यांची निष्ठा, अनाग्रही वृत्ती आणि संस्थेच्या हिताच्या दृष्टीने परिस्थितीचे केलेले प्रभावी विश्लेषण यांची प्रचिती मला अनेकवेळा आली आहे संस्थेच्या कार्यविस्ताराला गुणवत्तेची जोड लाभावी यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम अनन्यसाधारण आहेत. त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो हीच ईशचरणी प्रार्थना !

वासुदेव पुरुषोत्तम कोल्हटकर

# ग्रंथालयप्रेमी शंकरराव

१९३९ च्या जूनअखेरीस बेळगावच्या सरकारी अध्यापन महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर समानशीलाचा शोध घेत असताना शंकररावांचा व माझा परिचय झाला. सभोवारच्या व्यक्तीतून- परिस्थितीतून– प्रसंगातून काही ना काही वैचित्र्याचा घडोघडी शोध लावून खसखस पिकविणारे, कोटचा चुटक्यांनी हास्यकल्लोळ उठविणारे, हातातल्या वही– पुस्तकाच्या पुठ्ठ्याचा डफ करून त्याच्या तालठेक्यात एखादी गाण्याची पंक्ती घोळघोळून म्हणत सभोवतालच्यांना हटकून जवळ ओढणाऱ्या शंकररावांकडे मी एकदम सहज वळलो. आणि वर्षभर काव्यानंदाचा ठेवा व त्याचा ठेकेदारच सापडल्याची कल्पना झाली. गायननैपुण्य, अभिनयपटुत्व, अभिरूचिरसिकत्व यामुळे शंकररावांची बैठक सदैव प्रफुल्लच असावयाची.

पहिल्या दुसऱ्या भेटीतच मी शंकररावांची दिनकर कामण्णाच्या जागी प्रस्थापना करून टाकली. पुढच्या काळात मी ऐकले की मनात त्याना दिलेले खरेखुरेच बिनचूक आहे. ते खरोखरीच कामण्णा बनून लोकात अपरंपार प्रिय झाले. त्यांच्याबरोबर सुप्रसिद्ध गीतगायक श्री. बबनराव नावडीकर हे लतिकेच्या रुपात रंगले होते. त्यानी या कामण्णाचा नखरा मला अनेकदा वर्णन करून सांगितला आहे.

बी. टी. च्या वर्गांत ‘ अजुनि वय लहान ’ हे गाणे सदोदित गाणारा व तसाच आहेसे भासावेसे म्हणणारा हा माझा मित्र कराडात परतल्यावर फार मोठा झाल्याचे मधून मधून कळत आले. एकदा कराडात त्यांच्याकडे जाण्याची संधी साधली. शिक्षणसंस्थांच्या रूपाने जाणवणारे त्यांचे कर्तृत्व पाहून आनंद पावलो. कराड नगरीच्या शैक्षणिक वाढविस्ताराची काही स्वप्ने त्यांच्यापुढे होती. त्यांची झलक, नीलचित्रेच जणू त्यांनी दाखविली. मा. बाबूरावजी गोखले यांचे परमादरणीय जीवन त्यांच्यापुढे आदर्श म्हणून वसत असल्याचे पटले. कारण शंकरराव

मोठ्या अभिमानाने म्हणाले होते " बाबूरावांचं जीवन म्हणजे यज्ञ आहे नाही! " आणि आज १९७१ त कराडातून मी नुकतेच बसमार्गक्रमण केले तेव्हा शंकररावांची स्वप्ने चिकाटी, ध्येयनिष्टा, निदिध्यास यामुळे प्रत्यक्षात आलेली दिसली.

ते कराड पालिकेचे नगराध्यक्ष झाल्याचे वाचल्यावर अभिनंदन करताना नगराप्रमाणेच नगरवाचनालयाकडे लक्ष देण्याची मी विनंती केली. त्या वाचनालयाचे भव्य स्वरूप आज दिसते आहे त्यामागे शंकररावांची सम्यक् दृष्टीच आहे. नाशिकला मुख्याध्यापक परिषदेतील अध्यक्षीय भाषणात 'ग्रंथालय' हा विषय त्यांनी आवर्जून आणला. मी त्यांचा एक जुना मित्र ग्रंथपाल होऊन त्यांच्याशी ग्रंथालय विषयात विशेष संधान ठेवणारा. त्यामुळे मला पुन्हा एकदा आंतरिक स्फुरणांची, सवेदनाची साद पटली. त्यांनी माझ्या स्नेहाप्रमाणेच ग्रंथालयाशीही यापुढेही सतत स्नेह राखावा.

शा म द त्ता त्र य घ ळ सा सी

## आमचे काका

' कऱ्हाडच्या वैचारिक चळवळीची प्रेरणा ' या गौरवास्पद दृष्टीने सर्व महाराष्ट्रात श्री. प्र. ल. उर्फ शंकरराव करंबेळकर ओळखले जातात. कऱ्हाडचे ' सार्वजनिक काका ' या अभिधानाने ते कऱ्हाडच्या सर्व क्षेत्रात वावरतात; आणि दक्षिण महाराष्ट्रातील एक व्यवहारी शिक्षणतज्ज्ञ म्हणून त्यांनी लौकिक संपादन केला आहे. शंकरराव यांच्या व्यक्तिमत्वाचा कऱ्हाडला अभिमान वाटतो व शंकररावांना कऱ्हाडचा अमर्याद अभिमान आहे.

शिक्षणक्षेत्र काकांच्या व्यक्तिमत्वाचा एक तेजःपुंज पैलू आहे. कऱ्हाडच्या पंचक्रोशीत ज्ञानगंगेचा स्रोत त्यांनी आपल्या प्रवाही व प्रभावी साधनेने अखंड वाहात ठेवला आहे.

माध्यमिक शिक्षकांच्यातील अगतिकता असह्य होताच, आणि उपमर्दकारी वृत्तीचा शिक्षणक्षेत्रातून उच्छेद करण्याच्या निर्धाराने, माध्य. शिक्षकांना सुसंघटित करून, काकांनी १९४५ साली ' श्री शिवाजी शिक्षण संस्था ' काढली ! आज कऱ्हाडच्या शिक्षणक्षेत्रात या संस्थेने केलेले काम अभिमानास्पद ठरले आहे. नामदार यशवंतरावजी चव्हाण हे त्यांचे निकट स्नेही. त्यांचा सर्वंकष आधार नि समाजभूषण बाबूरावजी गोखले यांचे पितृतुल्य शुभाशीर्वाद व मार्गदर्शन घेऊन नवी शिक्षण संस्था काढण्यात त्यांचा आत्मविश्वास जाणवतो. ब्रिटिश अमदानीत ना जागा, ना इमारत, ना विद्यार्थी अशा अस्थिर परिस्थितीत केवळ शिक्षकांचे नेतृत्व पत्करून एकदम ११ वी अखेर माध्यमिक विद्यालय सुरू करणे साहसाचेच होते !

आज या शिक्षण संस्थेची ७ माध्यमिक विद्यालये, ३ महाविद्यालये व २ प्राथमिक शाळा एवढा नेटका प्रपंच वाढला आहे. एक ध्येयवादी अध्यापक आपल्या क्षेत्रात केवढे काम करू शकतो याचे गौरवशाली मूर्तिमंत स्वरूप म्हणजे शंकरराव करंबेळकर होत !

आज शंकररावांचा महाराष्ट्राच्या प्रत्येक शैक्षणिक चळवळीशी निकट संबंध आहे. सातारा सैनिक शाळा, कऱ्हाडच्या पूर्व–प्राथमिक शाळा, विश्वविद्यालयांची बहिःशाल ज्ञान–सत्रे, कऱ्हाडचा प्रशंसनीय परंपरेचा शारदोत्सव, या सर्व क्षेत्रात वैचारिक भूमिकेवरून अप्रतिहत अशी भर टाकण्याचे कार्य काका करत आहेत.

नगरला १९६२ साली किंवा नाशिकला १९६५ साली अध्यक्षीय पदावरून शंकरराव करंबेळकर यांनी मांडलेले विचार महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्राशी संबंधितांना विचार करावयाला कारणीभूत ठरले होते.

उत्कट समयसूचक प्रज्ञा ( Strong Common Sense ) या ईश्वरी देणगी बरोबरच निश्चयी हजर जबाबीपणाही लाभला असल्याने प्र ल. करंबेळकरांचे व्यक्तिमत्व अधिक तेजस्वी वाटते. काकांचे शैक्षणिक सूत्र अनुस्यूत आहे. चिकाटी, सातत्य, गांभीर्य व युक्तिवाद या गुणाचा काका हे नमुनेदार वस्तुपाठच आहेत. शिक्षण प्रसार आणि गुणवत्ता यांचा प्रीतिसंगम घडवून आणण्यासाठी त्यांनी घेतलेल्या कष्टाचे परिमाण म्हणून सांगावयाचे झाल्यास काकांनी सुरू केलेल्या शिक्षणसंस्थांचे कार्य पहावे,

लेखन, वाचन, अध्यापन आणि संस्थेचे संवर्धन ही काकांच्या शैक्षणिक जीवनाची चतुःसुत्री आहे !

शंकरराव हे जीवन मार्गाचे अखंड प्रवासी आहेत. कल्पनांची व विचारांची देवाणघेवाण करणारे एक अभिजात अध्यापक आहेत. संस्थेच्या नि शैक्षणिक कार्यासाठी त्यांना अखंड प्रवास करावा लागला. अनेक लोक, व्यक्ति, संस्था, वृत्ती, प्रवृत्ती यांचा परिचय त्यांना घडला. संवेदनाग्रहण करण्याच्या जागरुक भावनेने त्यांनी आपले जीवन अनुभवसमृद्ध केले म्हणूनच शंकरकाकांचे जीवन एकांगी राहिलेले नाही. कऱ्हाडमधील सार्वजनिक व सामाजिक संस्थांचे ते प्रेरणादायी केंद्र बनून राहिले आहेत.

कऱ्हाड अर्बन को. बँकेचे नियामक म्हणून ते १९४३ पासून सतत काम पहात आहेत आणि आता तर ते म्हणजे एक अविभाज्य अंगच बनून राहिले आहेत. कऱ्हाडचे नगरपिते व नगराध्यक्ष म्हणून त्यांनी कऱ्हाडच्या स्थानिक स्वराज्याला नवनवोन्मेषी प्रतिभेने उजाळा दिला आहे. कऱ्हाडच्या जनता आरोग्य मंडळीपासून श्री कृष्णाबाई महोत्सव समिती पर्यंत काकांची स्वयंसेवी साधना ओसंडताना आढळते ! काकांच्या उपस्थितीविना निर्णय थांबावेत, विचार लुळे ठरावेत व कार्यवाही दुबळी वाटावी असे विलक्षण व्यक्तिमत्व अनेकांना काकांच्यात जाणवते !

लता मंगेशकर, पु. ल. देशपांडे यांच्या सारख्या थोर कलासम्राटापासून थेट महाराष्ट्राच्या शिक्षणमंत्रालयापर्यंत सर्वांनाच काकांचा सहवास व विचार

महत्वाचा वाटतो. या गतिमान व अध्यापकीय वृत्तीमुळे काकांच्यात एक प्रकारची व्यापक दृष्टी व निराग्रही बुद्धी स्वभावतःच बाणली आहे. अनेक व्यक्ति त्यांच्यापाशी आल्या, राहिल्या व त्यांना सोडूनही गेल्या. काकांची समाहित वृत्ती कोणाच्या आगमनानंदाने भंग पावली नाही किंवा कोणाच्या गमनदुःखाने विचलित झाली नाही.

हळवे व भावनाशील कवीचे अंतःकरण घेऊन काका जीवनाच्या सर्वच क्षेत्रात उतरले आहेत; पण आलेला पहिला उमाळा निग्रहाने दाबून त्यांनी आपले कार्य चालू ठेवले आहे. या कर्मयोगी जीवनासक्त साधकाने आपल्या कर्तृत्वाने कऱ्हाडच्या सार्वजनिक व शैक्षणिक प्रांगणात भव्य व उत्तुंग असा कमनीय " गोपूर " उभारला आहे !

संगीत, चित्रकला, नाटय, साहित्य नि वाङ्मय यांच्यात अवगाहन करण्याची त्यांच्या मनाला सदैव ओढ आहे; आणि त्यामुळेच कोठल्याही समस्येचे ते कलाभिज्ञ दृष्टीने अंतर्बाह्य निरीक्षण करतात. महाराष्ट्र वाङ्मय मंडळ असो, शांतता समिती असो किंवा सत्कार समिती असो, काका आपल्या प्रेरक सामर्थ्यानिशी सदैव सज्ज आहेत !

समुद्रावर तरंगणाऱ्या हिमखंडाचा ( Iceberg ) नऊ दशांश भाग पाण्याखाली गुप्त असतो व एक दशांश भाग पृष्ठभागाच्या वर प्रकट झालेला दिसतो. त्याप्रमाणे शंकररावाचे कार्य आहे ! नित्य उदयाने प्रकाशदान करणारा ' प्रभाकर ' दुसऱ्यांनी नमस्कार करावा म्हणून उदयाला येत नाही ! कर्तव्यपूर्तीसाठी त्याचा उदय ! काकांचे नाव ' प्रभाकर ' आहे. प्रेरणादान, विचारदान व स्फूर्ति निर्माण हे त्यांचे कार्य नित्य चालले आहे. त्याची नोंद कोठेतरी झालीच पाहिजे ह्यासाठी कधी त्यांचा हव्यास नाही. त्यांची " सरस्वती " या कृष्णातटाकी गुप्तरूपाने अखंड वाहात आहे !

काकांची जाहीर होणारी भाषणे, लेख, प्रचार या पेक्षाही त्यांचे शैक्षणिक–संथ नि सतत–चाललेले कार्य कितीतरी अधिक आहे ! महत्वाचे आहे ! ! लोकसंग्रहाचे, अनुभव–कल्पना–विचार संग्रहाचे गंगोदक या शुभंकर ' शंकराच्या ' कडून घेऊन यशस्वी ठरलेली कऱ्हाडची आमची नवी पिढी त्यांच्याशी सतत कृतज्ञ राहील; आणि ' आमचे काका ' एका महत्वाच्या अर्थाने महाराष्ट्राच्या शैक्षणिक आकांक्षेचे प्रतीक ठरतील, असा विश्वास वाटतो !

ग णे श भ ग वं त वै द्य

# विद्यार्थ्यांच्या सुप्त शक्तींचा वेध घेणारे शंकरराव

' भानगडीशिवाय गडी नाही ' ही म्हण चांगल्या अर्थाने श्री. शंकररावांना तंतोतंत लागू पडते. सामाजिक आणि सार्वजनिक क्षेत्रांतील त्यांच्या उलाढाली ' भानगडी ' अनंत आहेत. आमच्या दोघांच्या विनोदी आणि उलाढाली स्वभावा-मुळेच आम्ही कित्येक प्रसंगी एकत्र आलो.

१९४५ साली मी परदेशी युद्ध-नोकरीवर असताना माझे दोन मुलगे व दोन मुली शंकररावांच्या मागोमाग शिवाजी विद्यालयात दाखल झाल्या. त्यावेळी सुर-वातीला संख्या दरिद्री विद्यालयाला माझ्या एकाच कुटुंबातल्या चार मुलांची भर, कौतुकाची वाटली असल्यास नवल नाही. आणि ती मुलेही त्यावेळी हुशार आणि शाळेच्या विविध क्षेत्रात भाग घेणारी होती. झाले, तेवढ्याच भांडवलावर एक दिवस शंकरराव माझ्याकडे आले आणि मला म्हणाले. " आपण व्यक्तिशः कुटुंब-नियोजन - वादी असूनही चार मुलांचा विस्तार आमच्या शाळेच्या हवाली केलात याबद्दल धन्यवाद. आता आमच्या विद्यार्थ्यांसाठी एक व्याख्यान द्याल का ? हे विचारण्यासाठी यावेळी मी आलो आहे. " मी तत्काळ कबूल केले. " टांगा वाहन काही नको ; मी चालत येईन " मी खुलासा केला.

" ते काही नाही तुमच्या इभ्रतीस साजेलसे वाहन– टांगा– आम्ही पाठवू. त्यात तुम्हाला बसावेसे वाटलेच नाही तर घोड्याचा लगाम धरून चालत या पण टांग्यासह या " एवढ्या अल्पपरिचयातच त्यांनी मला आपलेसे करून टाकले.

एका सहलीच्या प्रसंगी शंकररावजींची मुलगी डोंगरावरून पाय घसरून निवर्तली. त्या वेळी त्यांचे सांत्वनासाठी मी त्यांच्या घरी गेलो. माझी कल्पना अशी की शंकरराव दुःखाने अगदी बेचैन झालेले दिसतील. पण समक्ष पाहातो तो

ते स्थित:प्रज्ञासारखे धीर-गंभीर झालेले दिसले. मी काही बोलणार त्याच्या अगोदर तेच मला म्हणाले " या डॉक्टर, बसा. माझ्या समाचारासाठी आलेल्या अनेक लोकांबरोबर त्याच त्या गोष्टी बोलून मी इतका वैतागलो आहे की मला तुमच्या सारख्या विनोदी व्यक्तीशी दुसऱ्याच विषयावर फार फार बोलावंस वाटू लागलं आहे. आता आपण आमच्या मुलीच्या मृत्यूचा विषय सोडून दुसऱ्या कोणत्याही विषयावर बोलूया."

वय आणि उंचीत कमी पडल्यामुळे माझा धाकटा मुलगा जयंत याला N. C. C. त कोणी घेईनात, पण तो परेड बाहेर राहूनही, तिथेच परेड करू लागला. बंदूक मिळत नाही म्हणून घरात मुसळ घेऊन परेड करू लागला. त्याची ती N. C. C. स्कीमवरील एकलव्यासारखी नितांत निष्ठा पाहून शंकररावजींनी या ठेंगू मिरगुटल्याला N. C. C. मध्ये प्रवेश दिला. आणि काय आश्चर्य ! त्याने N. C. C. मधील आदर्श सैनिक असे नाव मिळविले.

शिवाजी विद्यालयात त्या काळी भैय्या वैद्य म्हणून प्रसिद्ध असलेला माझा मुलगा M. Sc. झाल्यावर खाजगी क्लासेस काढून खूप पैसे मिळवू लागला. पण " आपण शिक्षणाचे पवित्र कार्य करीत आहोत " हे समाधान त्याला लाभेना. तेव्हा आपल्या मित्रांच्या सहाय्याने त्याने पुणे येथे आपटे रोडवर " विद्या महामंडळ प्रशाला " नावाची संस्था काढली. त्यावेळी माझ्या देखतच तो संस्था चालविण्यासंबंधी शंकररावजींना शंका विचारीत होता. त्यावेळी आपल्या अनुभवाचे सार म्हणून शंकरराव माझ्या मुलाला म्हणाले " सार्वजनिक संस्था नेहमी कर्ज बाजारी ठेवावी. म्हणजे त्या संस्थेत अकारण ढवळा-ढवळ करणारी मंडळी दहा हात दूर राहातात." " कर्ज म्हणजे डोकीवर टांगलेली तरवार " मानणारा माणूस मी; त्यांचा हा उपदेश ऐकून प्रथम सर्दच झालो. पण मागाहून त्यांच्या म्हणण्याची खात्री पटली.

शंकरराव म्हणजे विनोदमूर्ती तरी पण विनोदमूर्ती म्हणजे विदूषक नव्हे. त्यांचे आकर्णयुक्त हास्य; हजर-जबाबी विनोद, विनोदी किस्से, आणि विनोदी संभाषणाचा आनंद चाखायला त्यांचा निरंतर सहवासच हवा.

विद्याधर पुरुषोत्तम गोखले

## ‘मनुज न नियमासाठी’....

विमनस्कपणे मी समोर पहात होतो. पाहण्यासारखे होते ते कधीच नाहीसे झाले होते. भूकंपाच्या हादऱ्याने सारे कोयनानगरच उद्ध्वस्त झाले होते तेथे माझ्या विद्यालयाची काय कथा ! विद्यालयाच्या कोसळलेल्या इमारतीपुढे उभा राहिलो होतो. आदल्या दिवशीच कामानिमित्ताने परगावी गेलो होतो म्हणून मी ( नि माझे कुटुंबीयही ) या तडाख्यातून बचावलो होतो. दोघा शिक्षकांना गंभीर जखमा झाल्या होत्या. तिघांच्या हातापायांना जखमा झाल्या होत्या. शाळेच्या शिपायाचा मुलगा अत्यवस्थ होता... कऱ्हाडकडे या सर्वांना हलविण्यात आले होते. विद्यालयात शिकणाऱ्या तीन विद्यार्थ्यांचा निर्घृण काळाने बळी घेतला होता. कुंभार नावाचा एक हुशार विद्यार्थी जबर जखमी झाल्याचे नुकतेच कोणीतरी सांगितले होते. अंतःकरण कसे भरून आले होते. एवढ्यात विद्यालयासमोर काळ्या रंगाची गाडी येऊन उभी राहिली आणि त्यातून उतरले काका ! काकांची, माझी दृष्टभेट झाली मात्र ! त्यांच्या डोळ्यातून ओघळणाऱ्या अश्रूत माझ्याबद्दलच्या वात्सल्य भावना एकवटल्या होत्या. गोखले कुटुंबियांविषयीची काकांची भावभक्ती शब्दातीत आहे. माझ्या पाठीवरून हात फिरवताना त्यांच्या चित्तवृत्ती थरारल्या होत्या. माझ्या जीवनाची सुरक्षितता त्यांच्या मनाला कर्तव्यपूर्तीचे समाधान देत असावी असे तत्क्षणीच माझ्या मनाला जाणवले.

आणि मग पुढे कळले की पहाटे भूकंपाची बातमी येताच काका किती अस्वस्थ झाले होते. फोन लागेना तेव्हा गाडीची व्यवस्था करून ते कोयनेच्या वाटेला लागलेदेखील. कोणीतरी म्हणाले, “ काका, तुम्ही कशाला आता तिकडे जाताय ?” पण त्याचे उत्तर देण्यापूर्वीच काकांचे मन मोटारीपुढेही धावत जाऊन कोयनानगरला पोचले होते, चौकशी करीत होते– त्यांच्या लाडक्या विद्यालयाची. ( होय, आणि विद्याचीही ! ) कोयनेचे श्री शिवाजी विद्यालय हे संस्थेचे मोठे भूषण होते. कै. वैशंपायन सरांनी नि कु. देऊसकर बाईंनी संगोपन करून मोठे

केलेले हे संस्थेतले छोटे पण गुणी भावंड– काकांच्या मनात म्हणूनच या विद्यालया विषयी एक विशेष आत्मीयता होती.

मला समोर पाहिल्यावर काकांना आनंद झाला. म्हणाले, " तू इथे नव्हतास हे खाली कळले मला. पण ते कळेपर्यंत काही सुचतच नव्हते बघ."... त्यांना पाहिल्यावरच माझे डोळे भरून आले होते; पण माझ्यातला ' मुख्याध्यापक ' कोरडेपणाने काकांना इमारतीची, प्रयोगशाळेची, ग्रंथालयाची, दप्तराची धूळधाण कशी झाली आहे हे सांगू लागला होता. मला थांबवत काकांनी सांगितले, " आता काही काळजी करायची नाही. कऱ्हाडला गेल्यावर सारे काही ठरवू." सभोवताली सारे ढासळताना दिसत असूनहि काकांच्या या शब्दांमुळे माझ्या मनाने उभारी धरली.

आणि मग दप्तराचा पत्ता नाही, विद्यार्थ्यांची पांगापांग झालेली, काही शिक्षक इस्पितळात, तर काही घरी औषधोपचार घेत, एका अर्धवेळ शिक्षिकेने नोकरीचे यापुढे जमणार नाही म्हणून कळविलेले– अशा अवस्थेत काकांनी कोयनेची शाळा कऱ्हाडला भरवायचा निर्णय घेतला होता. रजा, सेवा-नियम, विद्यार्थ्यांचे दाखले, एस्. एस्. सी. फॉर्म्स, बी. सी., इ. बी. सी. सवलती या सर्वांच्या नियमावलींबरोबरच येथे येणाऱ्या १३० विद्यार्थ्यांची राहण्या–जेवण्याची सोय काय या सर्व समस्या भेडसावत होत्या. पण काकांनी बोट दाखविले नि मी कामाला लागलो. कोयनेचे शिवाजी विद्यालय कऱ्हाडात सुरू झाले.

' नियमन मनुजासाठी मनुज न नियमासाठी ' या पद्यपंक्ती मी फक्त शिकवत होतो; काकांचा तो आचारधर्म होता.

सौ. संजीवनी भडकमकर

# स्नेहसुधा :
# माझे मामा आणि मामी

माझे मामा म्हणजे शंकरराव करंबेळकर. माझे मामा म्हटले की माझ्या डोळ्यांपुढे हसतमुख, गोड व विनोदी चेहरा दिसू लागतो. कोणत्याही प्रकारच्या माणसाला आपलेसे करणे हा मामांचा माझ्या दृष्टीने अत्यंत मोठा गुण होय. नाती जगात पुष्कळ असतात. पण ती शेवटपर्यंत टिकवून धरण्याची कसोटी आमच्या मामांच्यामध्ये आहे. आमचे मामा कोणत्याही अडचणीला धावून येतात. पण ते कर्तव्य म्हणून नव्हे, तर त्या येण्यामागे एक प्रकारची आपुलकीची भावना असते. मामा सार्वजनिक कार्यकर्ते असले तरी घरात घरच्यासारखे होतात. तरुणांशी तरुण होतात. म्हाताऱ्या लोकांत प्रौढाप्रमाणे वागतात नि छोट्या मुलांत मूल होऊन रंगतात. ' पानी तेरा रंग कैसा ' अशीच आमच्या मामांच्या स्वभावाची घडण आहे. मामांच्या प्रत्येक वाक्यात इतकी जादू असते की एखादी अडचण पुढे असताना त्यांच्या वाक्यांनी मोठा धीर तर येतोच; पण आपल्यापुढे मोठा पेच-प्रसंग येऊन उभा राहिला आहे याची जाणीवही विरून जाते.

त्यांच्यापुढे कितीही कामाचे ढीग असले तरी रात्री १२ वाजता येऊन का होईना आपल्या बहिणीला भाऊबीज घालावयाची ते विसरत नसत. माझी आई बेशुद्ध पडल्यापासून शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी फार धावपळ केली, आम्हाला फार मोठा धीर दिला. आई इहलोक सोडून गेल्यानंतरही मामांनी संबंध कायम ठेवून आमची लग्ने पार पाडण्यातही पुढाकार घेतला.

माझ्या मामी ( सौ. सुधाताई ) याही अत्यंत शांत, विचारी, निश्चयी आणि सुस्वभावी आहेत. त्यांचा अत्यंत मोठा गुण म्हणजे मामांच्या प्रत्येक कामाला जोड देणे हा होय, त्यामुळे त्याही आम्हाला आवडत्या झाल्या आहेत. आमची आई असताना जितक्या आपुलकीने त्या वागत, तशाच अजूनही वागतात. त्यामुळे आम्हाला आईची उणीव भासत नाही.

माझ्या मामा-मामींच्या मायेची पाखर आम्हांस अखंड लाभावी हीच प्रार्थना !

सौ. प्र मि ला बा ई खं ड क र

# स्निग्ध तेजाचा नंदादीप : सौ. सुधाताई करंबेळकर

कऱ्हाडात मी खंडकरांची सून होऊन आले त्याच सुमारास सौ. सुधाताई पण ' करंबेळकर ' होऊन आल्या असाव्यात. ओळख मात्र झाली नव्हती त्यांची. बैठकीच्या खोलीतून चाललेल्या गप्पा विनोदाचे शब्द कानावर येत, त्यामुळे नि एरवी ' घरात ' काकांच्या विषयी पावलोपावली प्रेमादर व्यक्त केला जात असल्याने करंबेळकर कुटुंबाविषयी माझ्या मनात आपलेपणाची भावना मात्र सतत वाढत होती. आम्हा दोघींची पहिली ओळख झाली ती एका मंगळागौरीच्या निमित्ताने ! त्यावेळी आम्ही दोघीही आपापल्या घरातल्या ' कर्त्या बायका ' नव्हतो तर सासुबाईंच्या कौतुकाखाली ' कामाचा उरक असणाऱ्या मुली ' होतो. त्यामुळे त्यावेळी परस्परांशी फारसं काही बोलू शकलो नाही. पण त्या निमित्ताने सौ. सुधाताईंनी घेतलेला ' नावा ' चा उखाणा इतरांपेक्षा काही वेगळा होता हे मला चांगले आठवते. परमस्नेह्यांच्या जीवनातील अर्ध्या वाटचाची जबाबदारी आपल्यावर आहे या जाणीवेने आम्ही नकळत एकत्र आलो आणि आज तर दोन्ही घरांतील सुख– दुःखाचे क्षण सारख्याच भावनेने आम्ही अनुभवतो.

सौ. सुधाताईंचा स्वभाव अत्यंत शांत, नम्र असा आहे. म्हणूनच त्या काकांच्या अतिशय धाईगर्दीच्या जीवनाचा तोल सावरू शकल्या आहेत. काकांच्या सार्वजनिक कार्याच्या यशात सौ. सुधाताईंच्या कष्टाळू स्वभावाचा, शालीन सह-कार्याचा आणि अनाग्रही वृत्तीचा अर्धा वाटा खासच आहे. त्यामुळे त्यांच्या प्रपंचाकडे पाहिल्यावर शिवमंदिरातील मंगलमय वातावरणाचा अनुभव येतो. आपल्या सासुबाईंची त्यांच्या आजारपणात केलेली सेवासुश्रुषा, काकांच्या धाईगर्दीची जाणीव त्यांच्याकडे येणाऱ्या हरतऱ्हेच्या माणसांची सरबराई आणि मुलांच्या संगोपनाची जबाबदारी सौ. सुधाताई न चिडता, न संतापता कशी काय पार पडतात याचे मला अनेकदा कोडे पडले आहे !



सौ. सुधाताई मुळात एकमार्गी मनोवृत्तीच्या. अहंकार, आढ्यता किंवा प्रदर्शन त्यांच्याजवळ मुळीच नाही. त्यामुळे काकांनी सार्वजनिक कार्यात जे मोठेपण मिळविले त्याची प्रौढी त्यांनी कधी मिरविली नाही की त्या मोठेपणामागोमाग येणाऱ्या कटकटींबद्दल कधी कुरकूर केली नाही.

सौ. सुधाताई स्वत:ही सार्वजनिक कार्यात भाग घेतातच. पण पुढं पुढं करण्याची त्यांची वृत्ती नाही. प्रभाकराच्या तेजात सात्विक नि स्निग्ध तेजाने तेवणारा ह्या नंदादीप अनेकांना अपरिचित राहिला आहे. कराडच्या महिला मंडळाच्या अनेक उपक्रमांत सौ. सुधाताईंचा सक्रीय भाग असतो. प्रदर्शनांतून त्यांनी बक्षिसेही मिळविली आहेत. त्यांच्या अबोल पण अत्यंत प्रेमळ स्वभावामुळेच त्यांची महिला मंडळाच्या अध्यक्षपदी १९६० च्या सुमारास निवड झाली. आज चावडी चौकात उभी असणारी महिला मंडळाची इमारत सौ. सुधाताईंच्या कारकीर्दीची निशाणीच आहे.

काकांचे प्रापंचिक जीवन ‘ अ–शोक ’ करून ‘ लता–’ ‘ माधुरी ’ ने ते ‘ सुधा ’ मय बनविणाऱ्या सौ. सुधाताई काकांच्या उत्कर्षाला दीर्घकाळ साथ देत राहोत ही शुभेच्छा !

वि ना य क ना रा य ण फ ण स ळ क र

# ' भला रे भला बोलती ते करावे '

करंबेळकर यांचे पूर्वज कोकण भागातील राजापूर तालुक्यांतील. वेदविद्या-पारंगत, कर्मठ, ब्रह्मनिष्ठ, असे अनेक विद्वान पुरूष या घराण्यात होऊन गेले व आजही आहेत. शंकररावांच्या पूर्वजांनी सुमारे अडीचशे वर्षापूर्वी देशावर येऊन सातार्‍या जिल्ह्यातील कराड तालुक्यातील उंब्रज गांवचे वायव्येस तारळी नदीकाठी असलेल्या इंदोली गावाची निवड पुढील वास्तव्यासाठी केली. व तेंव्हापासून ते कुटुंब वास्तव्य करीत आहे. त्याकाळी सातारा जिल्ह्यात श्री छत्रपती शिवाजीमहाराज प्रस्थापित मराठेशाहीचा अंमल होता. श्री. शाहू छत्रपती यांचे कारकीर्दीत विद्वान-वेदविद्या जाणणार्‍या ब्राह्मणांचा योग्य परामर्श घेतला जाई व म्हणूनच तारळ खोर्‍यातील पाल ( खंडोबाची ), इंदोली, कोर्टी, उंब्रज याठिकाणी अनेक विद्वानांचे वास्तव्य असे व त्यांचा लौकिक श्री क्षेत्र काशीपर्यंत पसरून इकडील विद्वानांचा मानमरातब राखला जाई. श्री. शंकररावांचे जनक वडील कै. वे. शा. सं. हरी भिकाजी तथा भाऊ यांच्या अंगच्या विद्वत्तेमुळे, त्यांच्या कर्मठ आचारामुळे व कडक शिस्तीच्या वागणुकीमुळे गावात त्यांच्याबद्दल मोठा आदर दाखविला जाई व समाजावर त्यांचा वचक असे. खुद्द भाऊ वेद जाणणारे – म्हणणारे, श्री कुलस्वामिनीची नित्यपूजा यथाविधी यथासांग असे करणारे असे होते. अंदाजे साठ वर्षापूर्वी त्यांनी इंदोली येथे " ऋक्‌संहिता स्वाहाकार यज्ञ " केला होता व त्यासाठी त्याकाळचे दूरदूरचे अनेक विद्वान वैदिक आल्याचे मला अद्यापि स्मरण आहे.

श्री. शंकरकाका याना कराडात वास्तव्यासाठी येऊन सुमारे पस्तीस वर्षे झाली असावीत. चार भावात ते सर्वात धाकटे. त्यांचे बालपण इंदोली सारख्या खेड्यात गेल्यामुळे मोकळ्या हवेतील खेळणे बागडणे. नदी– विहीरीवर जाऊन पाण्यात डुंबणे, अंगमेहनत आखाड्यात जाऊन करणे, कुस्त्या करणे या सर्व प्रकारात त्यानी बालपणापासून आनंदाने भाग घेतला आहे. अनेक जत्रांतून या बुटक्या बामणाने कुस्त्या मारुन विजय मिळविले आहेत. वर सांगितलेल्या खेड्यांतील

व्यायामाने श्री शंकररावांनी आपले शरीर कमावले आहे. लहानपणी सुमारे त्यांच्या वयाच्या १४–१५ वर्षांस त्यांचे शरीर गोटीबंद व आकर्षक दिसत असे. अंगचा तरतरीतपणा, व्यायामाने आलेले अंगावरील व चेहऱ्यावरील तेज यामुळे शंकररावांबद्दल त्याचे बालपणापासून कौतुक वाटते यात शंका नाही. पहिल्या तीन भावाप्रमाणे यांचेही शिक्षण अपूर्ण राहते की काय अशी एक वेळ परिस्थिती आली होती परंतु शंकररावांनी आपल्या चिकाटीमुळे अत्यंत मेहनतीने शिक्षण पुरे केले व ते बी. ए. बी. टी. झाले. शिक्षक पेक्षा त्यांनी पत्करला. त्यांचे शिक्षण कराड, सांगली व बेळगाव येथे झाले. व व्यवसायासाठी कराडची निवड केली. त्यावेळी कराडला मॅट्रिकपर्यंत शिक्षण देणारी दोन हायस्कुले होती. शंकररावांनी त्यातील एकामध्ये नोकरी पत्करली. गतानुगतिक वृत्तीने तुंबलेल्या बंदिस्त तलावात कालक्रमणा व जीवन जगणाऱ्या त्या संस्थेतील मंडळींशी, उत्साही धडाडीचे मार्गाने नवीन क्षेत्रे निर्माण करून त्या क्षेत्रात मोकळेपणाने अधिक काही नवीन व चांगले कार्य करावे ही ईर्षा व जिद्द बाळगणाऱ्या शंकररावांच्या स्वभावामुळे त्यांचेबरोबर काम करणे अर्थातच जमेना व आपले विचार पूर्णतः अमलात यावेत व त्यासाठी कितीही अडचणी आल्यातरी त्यावर आपण मात करू या ईर्षेने त्यांनी शिवाजी हायस्कूल सुरू केले.

श्री. शंकरराव नुसतेच शिक्षक म्हणजे शाळामास्तर नाहीत. त्यांच्या अंगात अनेक सद्‌गुण ठाण मांडुन आहेत. लहान मुलांचे बरोबर ते अत्यंत खेळीमेळीने वागतात. त्याचे मनोरंजन करून त्यातून ते मुलाना नवीन काहीतरी शिक्षण देत असतात. स्वतःच्या तडफदार उत्साही उद्योग प्रियतेमुळे त्यांच्यापेक्षां तरूण असणाऱ्या मंडळीवर व विद्यार्थीवर्गावर ते प्रभावीपणे वचक निर्माण करू शकतात पण थोडयाच वेळात ते त्यांच्याशी समरस होऊन हास्य विनोदयुक्त चर्चा करताना आढळून येतील. अशा प्रकारची वृत्ती फारच थोडया व्यक्तींना साध्य करुन घेता येते.

वर लिहिल्याप्रमाणे शंकररावांचे अंगी अनेक गुण आहेत. "भलारे भला बोलती ते करावे" या श्री समर्थ रामदासांच्या उक्तीची ज्या ज्या वेळी आठवण येते त्या त्या वेळी शंकरराव ही व्यक्ती माझ्या डोळयापुढे वावरते. कराड हे कार्यक्षेत्र निवडल्यावर पूर्वीच्या उच्चभ्रू शिष्टमंडळींचा अनेकवेळा विरोध सहन करुन ही शंकररावांनी आपले असे एक स्वतंत्र स्थान कराडात निर्माण केले.

आता शंकर हरी असणारे 'प्रभाकर लक्ष्मण' कसे झाले हे ही थोडक्यात नमूद करतो. कै. भाऊंच्या हयातीत हे कुटुंब इंदोलीस वास्तव्य करीत असताना त्यांचे बंधू लक्ष्मणराव व त्यांच्या पत्नी सरस्वतीबाई हे दोघे या एकत्र कुटुंबातील घटक होते. लक्ष्मणरावानां मुलगा झाला नाही. निपुत्रीक असतानाच ते निधन झाले. जुन्या संस्कारात व आचार विचारात आयुष्य घालविणाऱ्या त्यांच्या पत्नीला ती अवस्था चैन पडू देईना. "पुत्राशिवाय गती नाही" या जुन्या विचारांच्या

पगडयामुळे त्यानी आपल्या पतीचे नात्र चालू ठेवण्यासाठी कोणीतरी दत्तक पुत्र मिळविण्याचे प्रयत्नास सुरूवात केली. या कुटुंबाच्या काही हितचितकांनी " बाहेरील कोणी दत्तक घेणेपेक्षा घरातील चार पुतण्यांपैकी कोणाही एकास पसंत करून दत्तक घे. तो तुझे पतीचे नाव पुढे चालवील " असे सांगून प्रयत्न केले. व त्यास यश येऊन श्रीमती सरस्वतीबाईनी शंकररावांची दत्तकपुत्र म्हणून निवड करुन त्यास विधिपूर्वक दत्तक घेतले. गेल्या चार पाच वर्षापर्यंत त्या हयात होत्या व त्यांचे वास्तव्य अखेरपर्यंत शंकररावाकडेच होते. श्री. शंकरराव व त्यांच्या सुशील पत्नी यांनी या दत्तक मातोश्रींचा सांभाळ चांगल्या प्रकारे केला. त्यांची व्रतवैकल्ये. तीर्थयात्रा वगैरे सर्व धार्मिक बावी शंकररावांनी त्यांच्या इच्छेप्रमाणें यथासांग पार पाडल्या. दत्तक गेलेनंतर शंकररावांचे नाव " प्रभाकर " असे त्यांच्या दत्तक मातोश्रींनी ठेवले व कै. लक्ष्मणरावांचे ते पुत्र म्हणून त्यांचे नाव चालवू लागले. कागदोपत्री प्रभाकर लक्ष्मण असे नाव चालू असले तरी रुढ नाव शंकरराव हे पहिलेच नाव व्यवहारात आहे.

शंकरराव व त्यांचे बंधू हे जरी विभक्त होऊन स्वतंत्र बिऱ्हाड करून राहात असले तरी त्यांचे कर्तबगारीने ते सर्वांचा परामर्श घेत असतात. आपण मोठेपणा मिळविल्यावर इतरांनाही मोठे होण्यासाठी ते मदत करीत असतात व ही त्यांची वृत्ती अन्यत्रही दिसून येते. शंकररावांनी आपल्या वागण्यामुळे फार मोठा लोक-संग्रह केला आहे. जीवनातील प्रत्येक क्षेत्रामध्ये त्यांची चहाती मंडळी आहेत.

शंकररावाचे खासगो सांसारिक जीवन सुखाचे व आनंदाचे आहे व त्यांस त्यांच्या सुशील पत्नीची जोड मिळाली आहे. गृहकृत्यदक्ष पत्नी, हुशार, तडफदार, विद्वान पुत्र, दोन सुलक्षणी कन्या असा त्यांचा सुटसुटीत संसार पसारा आहे.

शंकररावांना जो मोठेपणा मिळाला आहे, त्याचे कारण पूर्वसुकृत हे तर खरेच पण त्यातही परिश्रमाचा वाटा काही कमी नाही. वेदविद्या पारंगत खान-दानी व बुद्धिमान घराण्यात जन्माने मिळालेला वारसा, प्रयत्नाने मिळविलेली शरीर संपदा व त्यामुळे लाभलेले उठावदार व्यक्तिमत्व, संभाषण चातुर्य व हजरजबाबीपणा, स्वतः कष्ट घेऊन स्वीकृत कार्यास वाहून घेण्याची वृत्ती व तत्परता. दुसऱ्याच्या मदतीस धावून जाणेची कलकळीचो इच्छा, अशा अनेक विविधगुणामुळे शंकरराव हे समाजात अग्रेसरत्वाने नाव मिळवून वावरत आहेत. सर्वगुणसंपन्न अशा व्यक्ती विरळ, परंतु बहुगुण संपन्नता मिळविणे ही गोष्ट काही सोपी नाही. अशाप्रकारे बहुगुण असलेल्या शंकररावांचे कौतुक करावे तेवढे थोडेच व अपुरे पडणार आहे.. परमेश्वर त्यांना दीर्घायुरारोग्य देवो.

निशिकांत मिरजकर

# एक संस्था, एक माणूस आणि एक रौप्यमहोत्सव

श्री शिवाजी शिक्षण संस्था आणि ज्या एका भक्कम आधार स्तंभावर या संस्थेचा विस्तार तोललेला आहे ते श्री. प्र. ल. तथा शंकरराव करंबेळकर हे कऱ्हाडच्या सांस्कृतिक आलेखातील दोन ठळक बिंदू आहेत. शून्यातून मनोरा निर्माण करण्याची किमया म्हणजे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा पंचवीस वर्षांचा इतिहास आणि वादळी असून सौम्य, कणखर असून मृदु, विचारवंत असून रसिक अशा विरोधलयीतल्या व्यक्तिमत्वाचा वास्तव आविष्कार म्हणजे श्री. शंकरराव करंबेळकरांचे जीवन. ही एक संस्था आणि हा एक माणूस म्हणजे अत्यंत विलक्षण गतिमानतेचे एक ठसठशीत रेखाटन आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काळाच्या अपरिहार्य गरजेतून श्री शिवाजी शिक्षण संस्थेची निर्मिती झाली. शिक्षण ही लोकशाही राष्ट्राच्या अस्तित्वाचीच मूलभूत प्रेरणा असते. हे शिक्षण केवळ विशिष्ट व्यक्तींच्या आणि व्यक्तिसंघांच्या मक्तेदारीत बंदिस्त झाले तर लोकशाहीचा आणि पर्यायाने राष्ट्रीय संस्थांचा प्राणच धोक्यात आल्यावाचून राहणार नाही. शिक्षकाला काही प्रमाणात स्वायतत्ता संपूर्ण स्वास्थ्य आणि निर्भय सुरक्षितता लाभल्याशिवाय त्याच्या शिक्षणकार्याला आकारच येऊ शकणार नाही. श्रीशिवाजी शिक्षणसंस्थेच्या स्थापनेमागे याच विचारांची प्रेरणा होती. पारतंत्र्याच्या वातावरणात कऱ्हाडमध्ये केवळ काही व्यक्तींच्या हाती इथल्या शिक्षणाची सारी सूत्रे राहिलेली होती. त्यांच्या मर्जी आणि त्यांच्या कल्पना यावर शिक्षणाचा डोलारा हवा तसा डोलत होता. यातून निश्चित मार्ग आखण्यासाठी कुणीतरी स्वतःच पुढे होऊन या सगळ्याची धुरा मोठ्या विश्वासाने आपल्या खांद्यावर उचलून घेणे आवश्यक होते. चालणारा चालू लागला म्हणजे पावले आपोआप उमटत जातात. अनेकांची पाऊले त्याच्या पाठोपाठ गेली म्हणजे मळवाटा तयार होतात. सर्वांच्या प्रयत्नाने आणि सहकार्याने या साध्या सुध्या मळवाटांतूनच भविष्यकाळात राजरस्ते मिळत असतात. श्री शिवाजी शिक्षणसंस्थेची गेल्या पंचवीस वर्षांची वाटचाल पाहिली म्हणजे या सगळ्याचा प्रत्यय येतो.

ना. यशवंतरावजी चव्हाण यांची शोधक आणि बोधक विचारधारा, समाजभूषण पु. पां. तथा बाबूरावजी गोखले यांची समाजाभिमुख आणि अभ्यासू वृत्ती, शेठ रामविलास लाहोटी यांची उदारता आणि श्री. शंकरराव करंबेळकर यांची साक्षेपी कालवेधी प्रज्ञा असे चतुर्विध सामर्थ्य प्रारंभापासून लाभल्यामुळे पंचवीस वर्षात या संस्थेने अभिमानास्पद प्रगती केली आहे.

संस्थेचा हा सर्व विकास आणि विस्तार एका सर्वंकष आणि प्रयत्नशील अशा निष्ठावंत माणसाच्या जिद्दीतून आणि धडपडीतून उभा राहिला आहे. स्वप्ने सगळे जणच पाहतात. परंतु सामाजिक अधिष्ठान असलेली भव्य स्वप्ने थोडयांच्याच डोळयापुढे असतात; आणि आपली स्वप्ने साकार करण्याची जादू तर फारच थोडयांच्या जवळ असते. श्री. शंकरराव करंबेळकर हे अशी स्वप्ने साकार करणाऱ्यांपैकी एक आहेत. संस्थेच्या जीवनाशी या पंचवीस वर्षात त्यांचे जीवन पूर्णपणे संलग्न झालेले आहे. संस्थेची सुखदुःखे ही त्यांची आजवरची सुखदुःखे आहेत. आणि संस्थेच्या जडणघडणीत त्यांच्या इच्छा आकांक्षा केंद्रित झाल्या आहेत. श्वासोच्छ्वासाइतके आत्मीय अपरिहार्यतेचे स्थान श्री शिवाजी शिक्षण संस्थेला शंकररावांच्या अस्तित्वात लाभलेले आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेला एका आपुलकीच्या शिक्षणप्रेमी कुटुंबाचे स्वरुप येण्याचे कारण या माणसातील माणूसपण आहे. अजुनही प्रकृतीच्या अनंत तक्रारी मागे लागलेल्या असताना हसतमुखाने कार्य तत्पर असलेले, संस्थेसाठी जिवाचे रान करणारे, कला--साहित्य--तत्वचर्चा यांत रममाण होणारे काका पाहिले म्हणजे मन विस्मयानंदाने भरून येते.

ना. यशवंतराव चव्हाणांनीही या माणसाची जिद्द पुरेपूर जाणली. पंचवीस वर्षापूर्वीच अंधारांच्या भिंतीवर धडका देणारे त्याचे कर्तृत्व त्यांना उमगले. इथे कर्तृत्वाची लेणी खोदणारी प्रज्ञा आहे हे जाणून त्यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या प्रपंचाला सक्रीय प्रोत्साहन दिले. शून्यातून विश्व निर्माण करायला निघालेल्या या उन्मनस्काच्या मागे ते देहमनाने उभे राहिले. फुलापेक्षाही कोमल भावनेने त्यांनी या माणसाच्या स्वप्नांची पाठ पुरवणी केली आणि आपत्तीशी टकरा देताना वज्रापेक्षा कठोर व्हायला शिकविले. काकांची जिद्द आणि यशवंतरावांचा आधार यातून श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या मंदिराचा एकेक चिरा चढत राहिला.

अशा या शिक्षणसंस्थेचा रौप्य-महोत्सव या वर्षी साजरा होतो आहे. एक ध्येयवादी माणसाच्या ध्येयजीवी शिक्षणसंस्थेच्या रौप्य-महोत्सवाचा हा सुयोग्य सुमेळ आहे.

स. न. वि. वि.

आपण आठवणपूर्वक पाठविलेले " बिल्वदल– शंकरराव करंबेळकर व्यक्ती आणि विचार " या ग्रंथप्रकाशन समारंभाचे निमंत्रण मिळाले. धन्यवाद. शामराव, शंकरकाकांचे सानिध्यांत इतकी वर्षे काढल्यानंतरहि या ग्रंथाला– शंकरराव– एक संस्था– व्यक्ती अन् विचार असं नामाभिधान द्यावं असं तुम्हाला वाटलं नाहीं ? असो– शिक्षण संस्थेच्या रौप्यमहोत्सवाचे निमित्ताने शंकरकाकांच्या निरनिराळ्या पैलूंचे दर्शन घडविणाऱ्या लहान मोठ्यांच्या विचारांची ही वाङ्मयीन पूजा बांधून त्यांचा गौरव करण्याची संधी घेतल्याबद्दल ग्रंथप्रकाशन समिती खचितच अभिनंदनास पात्र आहे.

शिवाजी विद्यालय स्थापन केल्यानंतर निदान मी शाळेतून बाहेर पडेपर्यंतच्या काळात श्री. शंकरराव करंबेळकर हे केवळ नावालाच " करंबेळकरमास्तर " होते– त्या काळात घेतलाच असला त्यानी एकादा तास तर तो फक्त अपवाद म्हणूनच. परंतू या अभावानंच येणाऱ्या भाग्यासाठी त्यावेळचे विद्यार्थी हपापले असत हेहि तितकेच खरे... आणि करंबेळकर सर आज एकादा तास तरी घ्यायला यावेत असं विद्यार्थ्यांना वाटण्यातच शंकरकाका– अेक शिक्षक यातला मोठेपणा सामावलेला आहे असं मला वाटतं. माझ्या वाट्यालाहि ते फारसे आले असं नव्हे. पण जे दोन–चार तास मिळाले ते आठवण ठेऊन आहेत.

शंकरकाका माझ्या लहानपणी जाता जाता सहाजासहजी जमणाऱ्या अशा जादूचे खेळ करून दाखवायचे त्याचप्रमाणं जादू करून की काय त्यांनी हा सगळा पसारा मांडला अन् त्यासाठी जरूर असणारी माणसंहि जमविली– टिकविली... हाहि त्यांच्या अंगचा महत्त्वाचा पैलू आहे. ही शिक्षण संस्था स्थापन होण्यापूर्वी कराडलाच दोन संस्था होत्या तरीहि नवीन संस्था काढून ती वाढवून वाढत्या गरजेप्रमाणे काळाच्या गरजेप्रमाणें महाविद्यालयांचाहि विस्तार त्यांनी केला त्यासाठी योग्य त्या माणसांचा, त्यांच्या जरुरीप्रमाणे उपयोग त्यानी करून घेतला– त्यासाठीहि वेगळी हातोटी लागते. ते त्यांना चांगले जमले. मिळेल त्या माणसाला कामाला लावण्याची संधी त्यांना चांगलीच जमते. हे सगळ्यानाच जमत नाही. असो.

१९, विजयानगर, पुणे ३० आपला,

६.४.१९७१ भास्कर गोखले

## श्री. शंकररावजी करंबेळकर–

★

प्रभाकर तुम्ही प्रभा निजगुणेचि विस्तारिली
स्वकार्य रत राहुनी अतुल चातुरी दाविली
सहर्ष जन-मान्यता मग अमूप तुम्हावरी
असेच यश ते असो चढत वाढते यावरी

वाणी विनोद वचने स्रवते सदाची
संभाषणी उसळती सुख हास्यवीची
वाटे नितान्त सहवास घडो अशांचा
जाईल काल सुखसंगत जीवनाचा


ते घेतले व्रत पवित्रचि शिक्षणाचे
अन् वेचिले कणकणा निजजीवनाचे
लोकाग्रणी, बहुगुणी जन वश्य झाले
सद्भाग्य सत्कृतिसवे सहजी उदेले

रुची सुरस वाङ्मयी विपुल काव्यशास्त्री रती
कलाविषय आवडी नटविलीच नाट्याकृती
सखोल मति चिंतनी विविध कल्पना योजना
विशाल बल बुद्धिचे बहुगुणासि दे चालना

कौशल्ये बुद्धि चातुर्य, लोकसंग्रह साधुनी
लोकाग्रणि तुम्ही व्हावे, वाञ्छा एकचि ही मनी

**बाळकृष्ण,**

कराड.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा
मुख्याध्यापकांचे दुसरे अधिवेशन १९६१
मध्ये कऱ्हाड येथे श्री. आर्. आर्.
मेलमाने यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

मा. बाळासाहेब देसाई यांनी या
अधिवेशनाचे उद्घाटन केले.

अवघ्या एका आठवड्यात आयोजित
केलेले हे अधिवेशन महाराष्ट्राच्या
शैक्षणिक इतिहासात अपूर्व ठरले.

मा. शंकररावजी करंबेळकर यांच्या
संघटन कौशल्याची आणि शैक्षणिक
उपक्रमशीलतेची प्रचीती याचवेळी
महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राला आली.

त्या वेळचे हे स्वागतपर
प्रास्ताविक भाषण—

## ★ विद्यानगरच्या प्रवेशद्वारी–

माननीय ना. बाळासाहेब देसाई, शिक्षण मंत्री—महाराष्ट्र राज्य; श्रीमती निर्मलाराजे भोसले, उपशिक्षण—मंत्री महाराष्ट्र राज्य; श्री. आर्. आर्. मेलमाने, अधिवेशन—अध्यक्ष; उपस्थित मुख्याध्यापक नि निमंत्रित नागरिक बंधु—भगिनी—

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांच्या या दुसऱ्या अधिवेशनासाठी आपण सारे आवर्जून येथे आला आहात. या प्रसंगी आपणा सर्वांचे अंतःकरणपूर्वक स्वागत करताना मला होणारा आनंद शब्दांनी सांगून अगर लेखणीने लिहून व्यक्त करणे केवळ अशक्य आहे.

प्रस्तुतचे अधिवेशन वस्तुतः कोल्हापुरास होणार होते; पण काही अपरिहार्य कारणामुळे आज ते येथे साजरे होत आहे. हे स्थलांतर मात्र अत्यंत अनौपचारिक असेच आहे. कारण कोल्हापूर नि कऱ्हाड यामध्ये जरी भौगोलिक दूरता दिसत असली तरी या दोन नगरीमधील भावनिक एकता सूज्ञांच्या प्रत्ययास आल्यावाचून रहात नाही. या दोन्ही प्राचीन नगरींचे संबंधही तसेच प्राचीन आहेत.परस्परामध्ये सांस्कृतिक नि वैचारिक असा विनिमय सतत चालू आहे. ना. यशवंतराव चव्हाण नि आपल्या या अधिवेशनाचे उद्घाटक ना. बाळासाहेब देसाई, या दोघांच्याही मनाची मशागत, जरी कृष्णा नि कोयना या नद्यांच्या तीर्थप्रसादांनी झालेली असली तरी त्यांच्या ध्येयवादाला कोल्हापूरच्या अंबाबाईचे मंगल आशीर्वाद लाभलेले आहेत. कऱ्हाडच्या कृष्णानदीशी कोल्हापूरची पंचगंगा ज्या जिव्हाळ्याने एकरूप झाली आहे त्याच आत्मीयतेने कोल्हापूरच्या उदयोन्मुख शिवाजी विद्यापीठाशी आमची महाविद्यालये संलग्न होऊ इच्छित आहेत. अशा या भावनात्मक एकतेच्या अंतस्थ ओढीमुळेच अपुरा अवधी नि अनुकूलतेचा अभाव यांचा विचारही न करता कोल्हापूरचे हे अधिवेशन कऱ्हाड येथे घेण्यास आमच्याकडून अभावितपणे संमति दिली गेली.

तसे म्हटले तर आमचे कऱ्हाड म्हणजे अवघ्या चौतीस हजार लोकवस्तीची एक छोटी नगरी आहे. पण आकारमानावर कर्तृत्व अवलंबून नसते याचा प्रत्यय आणून देण्यास ही आमची नगरी समर्थ आहे हे मी नम्रपणे प्रगट करू इच्छितो.

सह्याद्रीच्या निळसर रांगांनी वेढलेल्या या नगरीला जसे ऐतिहासिक महत्त्व आहे तशीच सांस्कृतिक पार्श्वभूमीही आहे. आमच्या सातारा जिल्ह्यात सर्वात प्राचीन अवशेषआज पुराव्यासाठी ' दत्त ' म्हणून जर कोठे उभे असतील तर ते या कऱ्हाड नगरीतच ! धर्मराजाचा धाकटा भाऊ सहदेव हा या नगरीत काही काळ वास्तव्य करून राहिला असा महाभारतात उल्लेख आहे. या नगरीचे प्राचीनत्व सिद्ध करण्यास येथील शिल्प नि शिलालेख सदैव सज्ज आहेत.

इथल्या ' आगाशिवा ' च्या डोंगरात जी लेणी आहेत ती बौद्धसांप्रदायिकांनी इसवी सनाच्या पहिल्या शतकात खोदलेली आहेत. वैदिक, बौद्ध जैन नि त्याच-बरोबर इस्लाम इत्यादि संस्कृतींचे प्रत्ययकारी अवशेष " विविध संस्कृतींचा अमोल ठेवा " म्हणून या नगरीने अत्यंत जिव्हाळ्याने जतन करून ठेवले आहेत. अनेक पाकळ्यांच्या एकात्मकतेमुळेच कमल-पुष्पाचे सौंदर्य मनाला मोहित करते ही सुसंस्कृत रसज्ञता या जपणुकीच्या पाठीशी नव्हती असे कसे म्हणता येईल ?

भागवत सांप्रदायात आमची संत सखू जितक्या दिमाखाने मिरविते, तितक्याच तेजाने, प्रतिभासंपन्न संस्कृत पंडितांच्या मालिकेत आमचे कै. विठोबा आण्णा दप्तरदार उठून दिसतात. भारताच्या शैक्षणिक क्षेत्रातील उच्चतम

व्यासपीठावर कै. डॉ. अनंत सदाशिव अळतेकर यांची मूर्ती पाहिली की आम्हाला खचित कृतार्थता वाटते. महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनाला बुद्धीवादी वळण लावणारे एक थोर महाभाग म्हणून ज्यांना अवघा महाराष्ट्र अत्यंत आदराने अभिवादन करतो, ते कै. सुधारकाग्रणी गोपाळराव आगरकर हे आमच्या या कऱ्हाडचेच ! कै. डॉ. पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रेरक शक्तीने प्रभावित होण्याचे भाग्यही या आमच्या नगरीस लाभलेले आहे.

आजचा अपुरेपणा लपविण्यासाठी मी हे पूर्वजांचे पोवाडे गात आहे असे कृपा करून आपण मानू नये. तसे पोवाडे गाण्याची मुळात माझी इच्छा नाही नि त्यांचे प्रयोजन तर नाहीच नाही. कारण या नगरीचा वर्तमानसुद्धा तिच्या इतिहासाशी इमान राखणारा असाच आहे. या नगरीतील कितीतरी कर्तबगार कार्यकर्ते महाराष्ट्राचे सार्वजनिक जीवन सध्या संपन्न करीत आहेत. आमचे माननीय श्री. ग. स. ऊर्फ दादासाहेब आळतेकर म्हणजे शुचिता नि विद्वत्ता यांचे साक्षात् सगुणरूप आहे असे मी म्हटले तर त्यात मुळीच अतिशयोक्ती नाही. त्यागमय देशसेवा नि अखंड ज्ञानसाधना यांचे अनुकरणीय प्रात्यक्षिक, आमचे समाजभूषण श्री. पु. पां. ऊर्फ बाबुराव गोखले, यांच्या रूपाने या नगरीतील नागरिकांच्या नजरेपुढे प्रत्यही वावरत आहे. आजच्या नव्या महाराष्ट्राचे महान शिल्पकार, उद्याच्या विकसित महाराष्ट्राचे मूर्तिमंत प्रतीक, नि भावी भारताचे मंगलमय आशास्थान असलेले आपल्या महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्य मंत्री ना. यशवंतराव चव्हाण, हे आमच्या या नगरीचे अतिशय लाडके सुपुत्र आहेत. या कर्तबगार नेत्याचा नामोच्चार होताच आमच्या अंतःकरणातील अभिमान प्रस्फुरित झाला नि मनातल्या मनात आम्हाला मर्यादशील गर्व वाटला तर ते अस्वाभाविक आहे असे आपण मानणार नाही असा मला विश्वास वाटतो.

आजच्या आपल्या या अधिवेशनाचे उद्घाटक नि महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री ना. बाळासाहेब देसाई ही आमच्या कोयनेची दौलत आहे. अनंत काळच्या दारिद्र्याने काळवंडून गेलेले महाराष्ट्राचे मुख-मंडल तेजोमय करण्यासाठी आमची कोयना आज प्रतिज्ञाबद्ध झालेली आहे; आणि झोपडीतून अनिर्बंधपणे वावरणारा अज्ञानाचा अंधार, ज्ञानदीपाच्या प्रज्वलतेने उजळून काढण्यासाठी आमचे ना. बाळासाहेब देसाई चंग बांधून राहिले आहेत. अशी आहे आमच्या कोयनेची किमया !

पूर्व दिव्य, सांस्कृतिक परंपरा नि विद्यमान आदर्श इत्यादिकांचा मौलिक ठेवा लाभलेली ही नगरी आज विमानवेगाने आपल्या विकासाची वाटचाल न करील तरच नवल. मानवी कर्तृत्वाला आव्हान देण्याचे कार्य शिक्षणच करील या जबरदस्त आत्मविश्वासाने आज येथे शिक्षण मंडळ, महाराष्ट्र एज्यु. सोसायटी, श्री शिवाजी शिक्षण संस्था, रयत शिक्षण संस्था, राष्ट्रीय शिक्षण संस्था, श्रीस्वामी

विवेकानंद सोसायटी इत्यादि अनेक शैक्षणिक संस्था जोमाने कार्य करीत आहेत. इतकेच नव्हे तर ही नगरी आज अनेकविध शैक्षणिक चळवळीचे स्फूर्तीदायक केंद्र झाली आहे.

केवळ पांडित्य हे आजच्या काळाची भूक भागविण्यास असमर्थ आहे, या विचाराची जाग स्वातंत्र्य सूर्याने देताच येथे यंत्रज्ञ नि तंत्रज्ञ निर्माण करण्याची सोय उपलब्ध झाली. हिमालयाच्या पायथ्याशी गिर्यारोहणाच्या शाळा निघणे जितके उचित तितकेच कोयनेच्या परिसरात विज्ञानाची महाविद्यालये निर्माण होणे सुसंगत; या जाणिवेनेच येथे ' सायन्स–कॉलेज ' स्थापन करण्यात आले. आज विविध शैक्षणिक सोयींनी नि साध्य साधनांनी संपन्न झालेला हा परिसर " विद्यानगर " या सार्थ नामाभिधानाने शोभू लागला आहे.

या शैक्षणिक प्रगतीबरोबर जर औद्योगिक प्रगती नसेल तर जीवनाला स्थैर्य लाभणार नाही हा विचार, या विद्यानगरानजिक अस्तित्वात येत असलेल्या औद्योगिक वसाहतीच्या रुपाने आज येथे कार्यवाहीत येत आहे. मानवी बुद्धी नि मानवी श्रम यांच्या समन्वयाचा हा साक्षात्कार उद्याच्या विलोभनीय विश्वाची ग्वाही दिल्यावाचून रहात नाही.

एकाचे दोन करून सांगण्याचा या नगरीचा स्वभाव नाही. मात्र दोहोतील एकतेचा आविष्कार करण्याची तिची प्रवृत्ती आहे. म्हणूनच येथे नद्या दोन असल्या तरी संगम एकच नि नेते दोन असले तरी मते एकच.

शिक्षणातून भावनात्मक ऐक्य कसे साधता येईल, याचा विचार प्रामुख्याने या अधिवेशनात होणार आहे. या विषयाच्या विचारविनिमयाला लाभलेली येथल्या प्रीतिसंगमाची पार्श्वभूमी खचितच प्रेरक नि पोषक होईल, असा विश्वास व्यक्त करून कराडच्या कर्तृत्वाची ही ओझरती ओळख पुरी करतो.

जयहिंद ! जय महाराष्ट्र !

★

बाम्बे स्टेट फेडरेशन ऑफ् सेकंडरी टीचर्स असोसिएशन्सच्या विद्यमाने अहमदनगर येथे १९६२ मध्ये माध्यमिक-शिक्षक परिषद भरविण्यात आली.

या परिषदेच्या अध्यक्षपदावरून माननीय प्र. ल. करंबेळकर यांनी मांडलेले विचार माध्यमिक शिक्षकांमध्ये अनेक कारणांनी खळबळ माजविणारे ठरले.

माध्यमिक शिक्षकांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव देणारे आणि शासनाला माध्यमिक शिक्षकांच्या संघटित सामर्थ्याची दाद घ्यावयास लावणारे हे अध्यक्षीय भाषण त्यांच्या मूलभूत शिक्षणविषयक विचारांचे प्रतिबिंबच होय.

# ★ माध्यमिक-शिक्षक, शिक्षण आणि शासन.

बाम्बे स्टेट फेडरेशन ऑफ् सेकंडरी टीचर्स असोसिएशन्स नि अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ यांचे पदाधिकारी नि सदस्य, उपस्थित शिक्षक-बंधु-भगिनी नि निमंत्रित सभ्य स्त्री पुरुष—

अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाच्या निमंत्रणावरून बॉम्बे स्टेट फेडरेशन ऑफ् सेकंडरी टीचर्स असोसिएशन्सच्या वार्षिक परिषदेचे अधिवेशन आज येथे होत आहे. या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान आपण मला दिलेत नि माध्यमिक शिक्षकांच्या प्रातिनिधिक प्रश्नांचा जवळून परिचय करून घेण्याची मला संधी दिलीत याबद्दल मी आपले प्रथमच मनःपूर्वक आभार मानतो.

हे अध्यक्षपद मी स्वीकारावे असे जेव्हा मला कळविण्यात आले तेव्हा एक शंका मनाला स्पर्श करून गेली; ती ही की, 'माध्यमिक' शिक्षकांच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून माझ्या सारख्या एका मुख्याध्यापकाची का निवड करण्यात येत आहे? हे अधिवेशन 'एक एप्रिल' या सुप्रसिद्ध तारखेदिवशी भरत असल्याने ही शंका किंचित बळावली. तथापि, सध्या मी मुख्याध्यापक आहे हे खरे! पण 'मुख्यत्वा' चे हे टरफल टाकून दिले तर माझा मूळ गाभा अध्यापकाचाच आहे याची जाणीव होताच वरील शंका क्षणार्धात विरघळली. या अधिवेशनाचे अध्यक्षपद मला देऊन आपण शिक्षक नि मुख्याध्यापक यामधील औपचारिकतेचे अंतर छेदण्याचा जो यत्न केला आहे, त्याचे स्वागत करण्यासाठी मला हे अध्यक्षपद स्वीकारण्याची आवश्यकता वाटली.

## 'माध्यमिका' चा मूळारंभ-

आज 'माध्यमिक' शिक्षकांचे हे अधिवेशन भरत आहे. शिक्षकांच्या पाठीमागे 'माध्यमिक' ची उपाधी केव्हा लागली? प्राथमिक, माध्यमिक, उच्च असे शिक्षणाचे खंड आपल्या शिक्षण पद्धतीत आढळून येत नाहीत. गुरुगृही बारा वर्षे अध्ययन करण्याचा वैदिक–काळी दंडक होता. हा दंडक दूर होऊन शिक्षणाचे असे अलग अलग भाग केव्हा निर्माण झाले? नि ते का झाले?

या दृष्टीने विचार करता आजच्या माध्यमिक शिक्षणाची सुरुवात कशी झाली याचा शोध उद्‌बोधक नि उपयुक्त ठरेल. इ. स. १८१८ साली आपल्या येथे इंग्रजी राजवट सुरू झाली. त्यानंतर त्यांनी सध्यांच्या पाश्चात्य शिक्षणदानाला प्रारंभ केला. आपल्याकडील शिक्षण–व्यवस्थेचे एक वैशिष्टच होते. ते वैशिष्टच भले बुरे कसेही असो पण त्यात सलगपणा होता यात शंका नाही. १८१८ नंतरच्या पाश्चात्य शिक्षणाचा नि तत्पूर्वीच्या आपल्याकडील शेकडो वर्षाच्या परंपरागत शिक्षणाचा काहीही संबंध नाही. दोन्ही शिक्षण-व्यवस्था परस्पराहून जवळ जवळ सर्वस्वी भिन्न आहेत.

अवल इंग्रजीमध्ये यासंबंधी विचारवंतांत दोन विचार-प्रवाह आढळतात. एक विचार–प्रवाह असे आग्रहाने सांगत होता की नव्या शिक्षणाचा येथील परंपरागत शिक्षण व्यवस्थेशी जास्तीत जास्त सांधा जोडला पाहिजे. दुसरा विचार सांगत होता की, येथील परंपरेशी त्याचा संबंध राखणे शक्यही नाही नि इष्टही नाही. एल्फिन्स्टन हा पहिल्या विचाराचा प्रतिनिधी होता तर दुसऱ्या विचाराचा प्रतिनिधी होता लॉर्ड मेकॉले. या दोन विचार-प्रवाहांचा संघर्ष सुमारे १८५० पर्यंत कमीअधिक प्रमाणात चालू होता. अखेर दुसरा विचार–प्रवाह प्रभावी ठरला. आजच्या आपल्या 'माध्यमिक' शिक्षणाचा विचार करताना आपणास या शिक्षणाच्या मूळारंभाचा विचार पार्श्वभूमी म्हणून सतत दृष्टीसमोर ठेवणे अगत्याचे आहे.

इंग्रजांच्या ध्येय धोरणाला पोषक होईल असाच शिक्षणक्रम त्यांनी नियोजित केला. देशी भाषेतील शिक्षणास साहजिकच ‘ प्राथमिक ’ ही संज्ञा प्राप्त झाली. आपला राज्यकारभार सुकरतेने चालविण्यास इंग्रजी भाषा जाणणारांची गरज वाटताच त्यांनी इंग्रजी शिक्षण सुरू करून ‘ माध्यमिक ’ या सदरात या शिक्षणाचा अंतर्भाव केला नि विद्यापीठाचे शिक्षण घेणारे हे ‘ उच्च-विद्या-विभूषित ’ गणले जाऊ लागले. शिक्षणक्रमातील या तीन पायऱ्या इंग्रजांनी निर्माण केल्या.

आता इंग्रज गेले ! तरी आपण त्याच पायऱ्यावरून चालत आहोत. यामुळे आपल्या माध्यमिक शिक्षणाची आजची अवस्था “ अनाद्यन्तानि भूतानि व्यक्त मध्यानि भारत ” अशी झालेली आहे. पूर्वीचे ‘ प्राथमिक ’ दृष्टीआड असते नि पुढले ‘ उच्च ’ नजरेत येत नाही. मधले ‘ माध्यमिक ’ तेवढे व्यक्त झाले आहे.

आता हा अलगपणा गेला पाहिजे. संबंध शिक्षणक्रमात सलगपणा येणे आवश्यक आहे. पंधरा वर्षांच्या अध्ययनाने ‘ पूर्ण पुरुष ’ व्हावा असे वाटत असेल तर आपल्या सबंध शिक्षणक्रमात एकात्मकता येणे आवश्यक आहे.

या एकात्मकतेची जाणीव सरकारला झाली आहे असे वाटते. सध्या बी. टी. च्या विद्यार्थ्यांना प्राथमिक शाळेत पाठ घ्यावे लागतात. नि कॉलेजचे पहिले वर्ष माध्यमिक शाळेत अंतर्भूत करणार असल्याचे कानावर आहे. हे उपक्रम या एकात्मकतेच्या जाणिवेचेच आहेत असे वाटल्यावाचून रहात नाही.

## नवी दृष्टी–

स्वातंत्र्य आल्यानंतर आपल्या देशात एक नवीन तेज निर्माण झाले.माणसांच्या कर्तृत्वाला नवी पालवी फुटली. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात चैतन्य उफाळले. शिक्षण क्षेत्रातही नवी दृष्टी निर्माण झाली. शिक्षण हे केवळ उपजीविकेचे एक साधन नाही, याची जाणीव तीव्रतेने झाली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे ध्येय निश्चित झाले. शिक्षकाची भूमिका मूर्ती घडविणाऱ्या शिल्पकाराची नसून, मातेच्या मायेने बीजाचा अंकूर, अंकुराची कळी नि कळीचे फूल निर्माण करणाऱ्या वत्सल माळ्यासारखी आहे. म्हणून शिक्षकाने यापुढे विद्यार्थ्यांना ‘ घडविण्या ’चा यत्न न करता त्यांच्या सुप्तगुणांचा ‘ विकास ’ साधण्याचा यत्न करणे अवश्य होऊन बसले.

आज लोकशाही आपण मान्य केली आहे. ही लोकशाही दृढमूल करावयाची असेल तर लोकशाही संबंधी आपल्याला–शिक्षकाला–निश्चित कल्पना हवी. कारण लोकशाही ही काही केवळ राज्य करण्याची पद्धती नसून ती एक जीवननिष्ठा आहे. ही जीवननिष्ठा विद्यार्थ्यांच्या अंतःकरणात निर्माण करण्याची कामगिरी शिक्षकांना

करावी लागणार आहे. म्हणून शिक्षकांच्या रोजच्या जीवनातून–चालण्यातून बोलण्यातून वागण्यातून–लोकाभिमुखवृत्ती विद्यार्थ्यांना प्रतीत होणे अगत्याचे आहे.

लोकशाही मूल्यांची प्रतिष्ठापना करावयाची असेल तर शिक्षकाच्या मनोवृत्ती इतकेच शैक्षणिक दृष्टिकोन, शिक्षण–पद्धती, शैक्षणिक साधने यांनाही महत्त्व आहे. प्रत्येक व्यक्तीच्या बुद्धीची भावनांची जपणूक करणे लोकशाहीचे उद्दिष्ट आहे. कारण–

Democracy can survive not through legislation, not by wishful thinking but only if the integrity is preserved.

## शिक्षणाचा दर्जा–

शिक्षणक्षेत्रातील या नव्या वातावरणामुळे शिक्षणाचा दर्जा कमी झालेला आहे असा आक्षेप घेतला जातो. " आमच्या वेळचा मॅट्रिक नि आजचा पदवीधर सारखे आहेत. " असा जुन्या शिक्षितांचा दावा असतो. वयाच्या दृष्टीने हा दावा असेल तर तो बरोबर आहे असे म्हणावे लागेल. कारण जुन्या मॅट्रिकचे वय नि आजच्या पदवीधराचे वय सारखे असते हे खरे आहे. पण हा युक्तिवाद सोडून दिला नि ज्ञानातील अंतर हा आक्षेपातील अभिप्रेत अर्थ घेतला तरी त्यांचा हा आक्षेप वादातीत नाही.

गुणवत्ता–मापकयंत्र जोपर्यंत उपलब्ध नाही तोपर्यंत त्या बाबत मतभेद रहाणारच ! पूर्वीपेक्षा आज गुणवत्ता वाढलेली आहे. हेही म्हणणे सर्वस्वी चुकीचे ठरणार नाही. पूर्वी इंग्रजी चांगले होते आज हिंदी चांगले आहे. पूर्वी पाठांतर फार असे, आज सामान्य ज्ञान अधिक आहे. सारांश गुणवत्तेचे व्यवच्छेदक लक्षण नसल्याने या वादाचा निकाल लागणे कठीण आहे.

तथापि आजची ' गुणवत्ता ' संतोष देणारी आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर मात्र ' नकारात्मक ' द्यावे लागेल. मग संतोष देणारी गुणवत्ता कशी निर्माण करता येईल याचा विचार करणे भाग पडते.

## शिक्षक–

शिक्षणात ' गुणवत्ता ' निर्माण करणाऱ्या घटकांपैकी प्रमुख घटक शिक्षक हा आहे. जोपर्यंत बुद्धिमान माणसे या व्यवसायाकडे ओढ घेत नाहीत तोपर्यंत ही अपेक्षित ' गुणवत्ता ' हाती येणे कठीण आहे. आज समाजात शिक्षकाची अवस्था केविलवाणी झालेली आहे. त्याला ना मान ना शान ! दुर्दैव असे आहे की, आपल्या मुलाला चांगला शिक्षक मिळावा ही प्रत्येक पालकाची इच्छा असते.

पण, आपला मुलगा मात्र शिक्षक होऊ नये अशी प्रत्येक पालकाची परमेश्वराजवळ प्रार्थना असते. ही दुरवस्था नाहीशी होऊन, बुद्धिमान व्यक्तींना या व्यवसायाकडे आकृष्ट करावयाचे असेल तर तसेच विलोभनीय वेतन त्याला देण्याची सोय होणे अवश्य आहे. आजच्या अर्थप्रधानसमाज-व्यवस्थेत शिक्षकाची सांपत्तिक स्थिती सुधारली की त्यास समाजात आपोआप प्रतिष्ठा लाभेल. आपल्या सरकारला याची जाणीव आहे म्हणूनच सरकारने माध्यमिक शिक्षकांना नवीन वेतनश्रेणी चालू केली याबद्दल सरकारला योग्य ते धन्यवाद देणे अवश्य आहे. पण वाढविलेले हे वेतनमान बुद्धिमंतांना आकृष्ट करण्याइतपत समर्थ आहे का याचा निर्णय घेण्याइतका अनुभव आजवर सरकारच्या खाती जमा झाला असेलच ! शिक्षण क्षेत्रात बुद्धिमान नि गुणवान व्यक्तींची भरती होण्यासाठी या अनुभवाच्या प्रकाशात सरकार वाटचाल करील असा विश्वास व्यक्त करावासा वाटतो.

## शिक्षकाच्या कामाचा बोजा -

विद्यमान शिक्षकांना स्वतःची ' गुणवत्ता ' वाढविण्यास स्वास्थ्य नि संधी लाभली तरच विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढेल. आजच्या शिक्षकावरील कामाचा बोजा पहाता या गोष्टींना तो पारखा झालेला आहे असेच आढळून येईल. नियमाप्रमाणे त्याला करावे लागणारे काम, अभ्यासानुवर्ती नि अभ्यासेतर चळवळी इत्यादि त्याच्या कामाचा व्याप लक्षात घेता त्याला रोज कमीत कमी अकरा तास काम करावे लागते अशी आपल्याच येथील शिक्षा-सत्राने तपशीलवार माहिती दिलेली आहे नि ती बरोबर आहे.

वस्तुतः इतर कोणत्याही सरकारी खात्यातील नोकराच्या कामाचे स्वरुप नि शिक्षकाच्या कामाचे स्वरुप मूलतः भिन्न आहे. अर्थात या दोन्ही वर्गाची कामे एकाच मापाने मोजणे अन्यायाचे आहे. एवढया कामाच्या ओझ्याखाली शिक्षकाला घरगुती स्वास्थ्य कसे संपादन करता येणार ? नि आपली नि विद्यार्थ्यांची ' गुणवत्ता ' वाढविण्यास त्याला कशी उमेद वाटणार ? अशा अवस्थेत ' बांधलेल्या शिदोरी ' वर गुजराण करण्याखेरीज त्याला गत्यंतर उरत नाही. शिक्षकाची जीवनदृष्टी समृद्ध व्हावी, त्याच्या प्रयोगशीलतेला वाव मिळावा, ही जर अपेक्षा असेल तर त्याचे कामाचे ओझे खासच कमी केले पाहिजे. शैक्षणिक चर्चासत्रे, परिसंवाद, परिषदा, विविध विषयांचे उजळणी वर्ग इत्यादि ज्ञान-साधने त्याला उपलब्ध होणे अवश्य आहे.

वरील साधनांची पूर्तता झाली की, गुणवत्तेचा खजिना हस्तगत झाला असा या म्हणण्याचा अर्थ नाही. शिक्षकाने अत्यंत श्रद्धेने या साधनांचा लाभ करून घेतला पाहिजे. इतकेच नव्हे तर प्रतिकूलतेवर मात करण्याची जिद्द त्याच्या ठायी हवी. वेळी अवेळी परिस्थितीवर आग पाखडण्याने ' गुणवत्ता ' निर्माण

होणार नाही. शिक्षकाच्या अंतःकरणात ती निर्माण करण्याची दुर्दम्य इच्छा हवी नि त्यासाठी आवश्यक ते कष्ट करण्याची तयारी हवी.

शिक्षकाच्या कामाचे ओझे कमी करणे म्हणजे अध्यापनाचे काम कमी करणे असा माझ्या म्हणण्यातील मुळीच अर्थ नाही. सध्या अभ्यासेतर उपक्रम इतके वाढले आहेत की, " येथे शिक्षणही मिळेल " असा फलक शाळेवर लावण्याची वेळ आलेली आहे. खेरीज भरमसाट सुट्टयाही अध्यापनाचा अपहार करीत असतातच; म्हणून अनावश्यक उपक्रम नि गैरवाजवी सुट्या कमी करणे आवश्यक झाले आहे.

## इतर अडचणी–

वर्गातील विद्यार्थ्यांची अतिरेकी संख्या 'गुणवत्तेला' मारक ठरणारीच आहे. या खेरीज शिक्षण खात्याचे जाचक निर्बंध ढिले झाले तर गुणवत्तेची वाट मोकळी होण्यास साह्य होईल. त्यासाठी खात्याचा शाळा–प्रमुखावर विश्वास हवा ! नि शाळा प्रमुखांनी आपल्या शिक्षकांच्या प्रयोगशीलतेला नि कार्य क्षमतेला विश्वासाने वाव द्यायला पाहिजे. शिक्षणक्षेत्रात अशा तऱ्हेचे विश्वासाचे वातावरण गुणवत्तेची वाढ करण्यास खचितच पोषक होईल.

## विषयांची विभागणी–

याच संदर्भात आणखी एक विचार आपणापुढे व्यक्त करावासा वाटतो. लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीच्या गुणविकासाला संधी मिळण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमाची आखणी असणे आवश्यक आहे. या जाणिवेनेच सरकारने आजच्या अभ्यासक्रमात अनेक वैकल्पिक विषयांचा समावेश केलेला आहे. याबद्दल आपले सरकार अभिनंदनास पात्र आहे.

पण विद्यार्थ्यांच्या सुप्त शक्तीच्या विकासाला वाव देण्याची ही सरकारची इच्छा आजच्या शाळेच्या अभ्यास व्यवस्थेमधून सफल होत आहे का हे पहाणे जरूर आहे. शाळेच्या तासांच्या अवधीत समाजजीवनाच्या सर्व अंगोपांगांचे शिक्षण दिले जावे अशी आजची अपेक्षा आहे. ही व्यवहार्य आहे काय ? विविध वैकल्पिक विषयांची सोय आज शाळा करू शकत नाहीत. कारण आर्थिक दृष्टया शाळांना ही परवडणारी बाब नाही, त्यामुळे आज बौद्धिक शिक्षण पुरेसे मिळत नाही नि इतर शिक्षणाची भरपूर सोय नाही अशी अवस्था निर्माण झाली असून याबाबत फेर विचार करण्याची वेळ आलेली आहे.

म्हणून आजच्या शाळांनी केवळ बौद्धिक शिक्षणच दिले नि इतर विषयांच्या शिक्षणाची सोय गावांतील तद्‌विषयक संस्थांकडे केली तर या अडचणीचा परिहार

होण्याची शक्यता आहे. आजही काही विषयांची अशी सोय केली जाते. तांत्रिक शिक्षणासाठी, शाळा आपली मुले धंदेशिक्षण शाळेकडे पाठवितातच. अशीच इतर कलात्मक नि अन्य विषयांची सोय केली जावी. संगीतासाठी ' संगीत शाळा ', शारीरिक शिक्षणासाठी ' व्यायाम शाळा,' शिलाईसाठी ' टेलरिंग क्लास ' अशा संस्थामधून वैकल्पिक विषयांची सोय करणे उचित होईल, यामुळे सोयीच्या अभावी होणारी विद्यार्थ्यांची कुचंबणा टळेल नि बौद्धिक दर्जा वाढविण्यास शाळांना पुरेसा वाव मिळेल. खेरीज संस्था–संस्थामधून सहजीवनाचे प्रवाह वाहू लागण्यास या योजनेमुळे सुलभता येईल. मात्र या शाळाबाह्य संस्था सरकारमान्य असणे आवश्यक आहे. तसेच शाळांचा नि या संस्थांचा संबंधही निगडित असला पाहिजे. विद्यमान विषयांच्या अशा विभागणीप्रमाणेच दिवसें दिवस विस्तृत होत जाणाऱ्या या शिक्षणाबाबत नियोजन करण्याचा विचार वेळीच करणे आवश्यक आहे.

## शिक्षणाचे नियोजन–

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सार्वत्रिक शिक्षणाची मोहीम आपण हाती घेतली आहे. यामुळे जानपद जीवनात शिक्षणाविषयी नवचैतन्य निर्माण झाले आहे. १२०० रु. हून अधिक उत्पन्न नसलेल्यांना कोणत्याही थरातील शिक्षण मोफत देण्याची सोय सरकारने केल्यामुळे, शिक्षण क्षेत्रात कर्तृत्वाला उधाण आलेले दिसते. ग्रामीण भागात माध्यमिक शाळा, महाविद्यालये विलक्षण वेगाने स्थापन होत आहेत. या घटना खचितच स्वागतार्ह आहेत.

पण हे स्वागत करताना अनेक शंका मनात आल्यावाचून रहात नाहीत. या सर्व शैक्षणिक संस्थाच्या उभारणीमागे काही नियोजन आहे का ? या संस्थाचे वेगळेपण ( Individuality ) राखण्याची कोणती योजना सरकारजवळ आहे ? लोकजीवनाचा नि या संस्थांचा संबंध रहाण्याची काही रूपरेखा सरकारच्या मनात आहे का ? खेरीज येत्या तृतीय पंचवार्षिक योजनेनुसार प्राथमिक शिक्षणाचा प्रसार अधिक व्यापकतेने होणार आहे. या योजनेअखेर प्राथमिक शिक्षण घेतलेले विद्यार्थी प्रचंड प्रमाणावर असतील. या प्रचंड संख्येला माध्यमिक शिक्षण देण्याची काही संकल्पित योजना सरकारपाशी आहे का ? सध्याच शाळांच्या इमारती विद्यमान विद्यार्थ्यांच्या संख्येला अपुऱ्या आहेत. पुरेशा शिक्षकांची उणीव आजच सगळीकडे जाणवत आहे. अशा अवस्थेत तृतीय पंचवार्षिक योजनेनंतर विद्यार्थ्यांची वाढणारी भली मोठी संख्या बसणार कुठे नि त्यांना शिकविण्यासाठी तज्ञ शिक्षक मिळणार कोठे ? प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी आमच्यावर आहे; माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी आमच्यावर नाही असे सांगून या विद्यार्थ्यांना सोयीच्या अभावी वाऱ्यावर सोडणे सरकारला खासच भूषणावह होणार नाही.

" विद्यार्थी झाडाखाली शिकतील, 'शांती निकेतन' मध्ये डॉ. टागोर नव्हते का विद्यार्थ्यांना झाडाखाली शिकवित ! मग आपण तसे करण्यास काय हरकत आहे ? " अशी या प्रश्नाची कित्येकांकडून वासलात लावली जाते. पण हा काही प्रश्न सोडविण्याचा योग्य मार्ग नाही. ' शांती-निकेतन ' मध्ये इमारती नव्हत्या म्हणून झाडाखाली शिक्षण दिले जात होते हे खरे नाही. किंबहुना तशा इमारती होत्या म्हणून या निसर्ग–सानिध्यातील शिक्षणाचे कौतुक झाले. आम्ही इमारतीच्या अभावी या निसर्ग सानिध्याचा गौरव करू तर क्षुधिताने लंघन-चिकित्सेचे महत्त्व सांगण्यासारखे हास्यास्पद होईल, आजच्या काळात सरकारी सेवकांना चांगले बंगले, कारखान्यांतील कामगारांना चांगली घरे, अशी त्यांच्या वास्तव्याची सोय कटाक्षाने पाहिली जाते तर मग विद्यार्थ्यांना या निसर्ग सानिध्याची वाट का दाखवावी ? पूर्वी सर्व समाजच जेव्हा ऋषितुल्य जीवन जगत होता त्यावेळी त्या ऋषिकुमारांना असला उपदेश करणे शोभले असते. आता ते ऋषीचे जीवन केवळ विद्यार्थ्यांच्या वाट्याला देणे अन्यायाचे आहे.

शाळांच्या इमारती प्रासाद–तुल्य असाव्यात असा मात्र याचा अर्थ नाही. आज सर्व सामान्य थरांतून विद्यार्थी शाळेला येत आहेत. आपल्या रहात्या घरापेक्षा शाळेची इमारत त्याना अधिक आकर्षक वाटेल इतकी ती असावी. या इमारती–मध्ये भव्यता नसली तरी प्रसन्नता नि आरोग्य संपन्नता असणे आवश्यक आहे.

शाळांच्या इमारतीचा प्रश्न सोडविण्याची एखादी योजना सरकारने कार्यवाहीत आणणे जरूर आहे. Housing Corporation च्या धर्तीवर सरकारने School Building Corporation स्थापन करून संस्थाना इमारत बांधणी-साठी सढळ हाताने आर्थिक साहय केल्यावाचून हा प्रश्न सुटेल असे वाटत नाही.

इमारतीप्रमाणे पुरेसे तज्ञ शिक्षक उपलब्ध होण्याच्या दृष्टीने B. T. कॉलेजांची संख्या अधिक वाढविण्यास उत्तेजन देणे जरूर आहे.

## मध्यवर्ती माध्यमिक–शाळा–

शाळांच्या इमारती नि शिक्षकांची उपलब्धी या गोष्टींचा विचार करणे जसे आवश्यक तसेच या वाढत्या शाळांतील शैक्षणिक साधनांचाही विचार करणे भाग आहे. सर्वच शाळांना महत्वाची शैक्षणिक साधने घेणे परवडणार नाही. त्यासाठी काहीतरी योजना असणे जरूरीचे आहे.

याबाबत एक सूचना मांडावीशी वाटते. प्रत्येक तालुक्यात एक मध्यवर्ती माध्यमिक विद्यालय असावे; हे विद्यालय सर्व शैक्षणिक साधनांनी सुसज्ज ठेवावे; त्या त्या परिसरातील माध्यमिक शाळांना या साधनांचा वापर करण्यास मुभा असावी. इतकेच नव्हे तर सर्व शैक्षणिक प्रश्नाबाबत त्यांना मार्गदर्शन नि मदत

करण्याइतपत हे मध्यवर्ती माध्यमिक विद्यालय समर्थ असावे. या विद्यालयामुळे आवश्यक शिक्षकांचे साहचही गरजू शाळांना घेणे सोयीचे होईल.

शिक्षणाच्या नियोजनाची आवश्यकता प्रतिपादन केल्यानंतर शिक्षण-संस्थांच्या संचलनासंबंधी शिक्षकांच्या मनात घोळत असलेल्या विचाराकडे वळावेसे वाटते.

## शिक्षकांचे प्रतिनिधित्व-

शाळाच्या ' संचालक-मंडळा ' ( Governing Body ) मध्ये शिक्षकांना प्रतिनिधित्व असावे अशी तीव्र इच्छा नि तातडीची मागणी अनेक शिक्षकांकडून वारंवार व्यक्त केली जाते. या त्यांच्या मागणीला ' कसेल त्याची जमीन ' या तत्वाचा पाठिंबा आहे. म्हणून ' पिकवील त्याचा मळा नि शिकवील त्याची शाळा ' अशी शिक्षकांची याबाबत घोषणा आहे. खेरीज लो. टिळक, आगरकर प्रभृती थोर मंडळी शिक्षक असून संचालक होते नि आजही अनेक संस्थामधून आजीव-सेवक म्हणून काही शिक्षक संचालन मंडळामध्ये आढळतात. अशा तऱ्हेने परंपरेच्या नि विद्यमान वस्तुस्थितीच्या आधारामुळे त्यांच्या मागणीला बळकटी येते असा याबाबत शिक्षकांचा दावा आहे.

याबाबत मी माझे विचार स्पष्टपणे मांडू इच्छितो. हे माझे विचार कित्येकांना रुचणार नाहीत याची मला जाणीव आहे. पण आजच्या परिस्थितीचा विचार करून माझे जे मत बनले आहे ते स्पष्टपणे न मांडणे हेही इष्ट वाटत नाही. मात्र शिक्षकांच्या हिताच्या दृष्टीने मी हे विचार व्यक्त करीत आहे; त्यांचे हक्क हिरावले जावेत या बुद्धीने मी हे मांडीत नाही हे कृपा करून लक्षात घ्यावे. हेतू इतकाच की हे प्रतिनिधित्व मागताना माझ्याही विचारांची दखल घ्यावी नि आपण याबाबत अंतर्मुख होऊन विचार करावा.

लो. टिळक प्रभृती शिक्षक संचालक मंडळावर होते म्हणून आम्ही असावे हे म्हणणे आजच्या परिस्थितीत योग्य नाही. ते संचालक मंडळावर होते पण त्यांनी कधी सेवकवर्गाच्या मिळणाऱ्या फायद्याकडे लक्ष दिले नव्हते, त्यानी वेतन-श्रेणी मागितली नव्हती की नोकरीच्या नि रजांच्या नियमासाठी त्यानी आग्रह धरला नव्हता. आज आपण सर्व सेवक-वर्गाच्या सवलतींचा लाभ घेत आहोत असे असता सेवकांच्या सोयी नि संचालकांची सत्ता या दोहोंचाही लाभ घेण्याची इच्छा बाळगणे कितपत न्याय्य आहे ?

एक काळ असा होता की, त्यावेळी शिक्षकाच्या जीवनाला नि सेवेला स्थैर्य नव्हते. संचालकांच्या लहरीवर त्याचे जीवन हेलकावे खात असे; पण आता ती अवस्था राहिलेली नाही. शिक्षण खात्याच्या नियंत्रणाखाली शाळांचा कारभार चालत असल्याने शिक्षकाच्या सेवेला स्थैर्य नि संरक्षण लाभलेले आहे.

आज शाळेच्या अंतर्गत कारभारात संचालक ढवळाढवळ करू शकत नाहीत. अशा अवस्थेत संचालक-मंडळावर प्रतिनिधित्वाची मागणी कशासाठी करावी ? केवळ संस्थेचे दोष दाखविण्यासाठी, जर हे प्रतिनिधित्व उपयुक्त ठरणार असेल तर ही अकरणात्मक भूमिका शिक्षकांनी घ्यावी का ? प्रतिनिधित्व मिळाले तर शिक्षकांच्या मागण्यांची जी विल्हेवाट लावली जाईल त्याची जबाबदारी या प्रतिनिधी-शिक्षकानी घेणे हिताचे आहे काय ? आपल्या मागण्यांचा निकाल आपणच लावण्यासारखे हे होणार आहे; मग या संकटात शिक्षकाने का पडावे ?

संस्थेची जबाबदारी प्रतिनिधी शिक्षकांच्या डोक्यावर ठेवण्याची संधी मिळाली तर आजचा संचालक वर्ग (त्याला अपवाद असतील) त्याचा गैर फायदा घेण्याचा धोका अधिक आहे मग प्रतिष्ठेची भीक नको पण जिकिरीचे कुत्रे आवर म्हणण्याची पाळी येईल याचा विचार शिक्षकानी अवश्य करावा. कोणताही लाभ पदरात पडत नसता अकारण जोखीम स्वीकारण्यात काय प्रयोजन आहे ?

लोकशाहीचा आविष्कार व्यापक क्षेत्रात खचितच हितावह असतो. पण शाळेसारख्या संकुचित क्षेत्रात लोकशाहीच्या आंतर्विरोधाची झळ त्वरित लागते शाळेसारख्या आकुंचित क्षेत्रात लोकशाही सुरु झाली की शिक्षकांचे गट पडलेच म्हणून समजावे. मग अध्यापनापेक्षा राजकारण खेळू लागते. याचे परिणाम शिक्षणावर तर होतातच पण त्यापेक्षा या गटबाजीचे अनिष्ट परिणाम विद्यार्थ्यांच्या-पर्यंत पाझरत जातात.

'संचालक मंडळा' मधील शिक्षकांच्या प्रतिनिधीत्वामुळे मुख्याध्यापकाला आरोपी नि न्यायाधीश या दोन्ही भूमिका पार पाडाव्या लागतात. मुख्याध्यापक असताना न्यायाधीश नि संचालक मंडळात तो आरोपी ! शिक्षक प्रतिनिधींच्या उलट तपासणीला त्याला तोंड देणे भाग पडते ! या दोन्ही भूमिका यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी मुख्याध्यापकाला कुठल्या तरी एका गटाचा पाठिंबा मिळवावा लागतो; याचा परिणाम शाळेच्या कार्यात शिथिलता उत्पन्न होण्यात न होईल तरच नवल. आपले स्थान टिकविण्यासाठी, आपल्या कृपाछत्राचा गैर वापर करणे त्याला भाग पडते; आकुंचित क्षेत्रातील लोकशाहीचे हे दुष्परिणाम सोसण्याची आज तशी कोणती आवश्यकता आहे ?

प्रतिनिधित्वाच्या मागणीबाबत मी माझे विचार स्पष्टपणे मांडले आहेत. वांझ हक्काच्या नादी लागून आपल्या अंगीकृत कार्याला आपण आंचवले जाऊ नये हीच यातील इच्छा आहे. प्रतिनिधित्वामध्ये आपणास काही भरीवपणा भेटत असेल तर माझ्या विचारांचा आपण स्वीकार करावा अशी मी कधीच इच्छा बाळगणार नाही.

मात्र लोकशाहीच्या मूल्यावर आघात करणाऱ्या अनिष्ट गोष्टी अभ्यासक्रमात जर शिरू पहात असतील तर त्याबाबत शिक्षकांनी जागरूक रहाण्याची अधिक गरज आहे.

## सांस्कृतिकाचे केंद्रीकरण-

आपण लोकसत्ताक जीवनपद्धतीचा निष्ठापूर्वक स्वीकार केला आहे. या जीवनपद्धतीला पोषक होतील अशीच शैक्षणिक साधने आपण वापरली पाहिजेत. राष्ट्रीय एकात्मकतेच्या नावाखाली पुस्तकांचे जर राष्ट्रीयकरण झाले तर आजच्या आपल्या आशा–आकांक्षांशी ती एक अत्यंत विसंगत होणारी घटना ठरेल.

वस्तुत: लोकशाहीची मूल्ये स्वतंत्र वातावरणातच वर्धिष्णु होतात. आजच्या शाळांना हे स्वातंत्र्य नाही. शाळांचा सर्व कारभार शिक्षण-खात्याने नियंत्रित केला आहे. पन्नास टक्के मदत नि शंभर टक्के हुकमत अशी शिक्षण खात्याची आजची पद्धती आहे. शिक्षकांच्या नोकरीच्या अटी, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, पुस्तकांना मंजुरी, पुस्तकांची पृष्ठसंख्या कागदाचे वजन, पुस्तकांचा आकार, रंगीत चित्रांची संख्या, शाळांतील कामांचे दिवस, वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या इत्यादि शाळातील बारीक सारीक बाबीवर शिक्षण खात्याने अतिरेकी निर्बंध लादलेले आहेत.

तथापि यातूनही आमची काही वाङ्मयीन पुस्तके स्वातंत्र्य उपभोगीत आहेत, आणि मुलांच्या मनांची मशागत करीत आहेत. पण आता राष्ट्रीय एकात्मकतेच्या नावाखाली याही पुस्तकांच्या स्वातंत्र्यावर गदा येण्याचा धोका निर्माण झाला आहे. सारीच पुस्तके जर राज्यसरकार करू लागली तर शिक्षणाचे लष्करीकरण झालेच म्हणून समजावे. ही गोष्ट खचितच भयावह आहे. आजचे सरकार लोकशाहीची मूल्ये जतन करणारे आहे हे मान्य; पण उद्या जर का लोकशाहीवर निष्ठा नसलेले दुसरे सरकार अधिकारावर आले तर ते आपल्या विचारसरणीला पोषक अशीच पुस्तके विद्यार्थ्यांच्या हाती देतील, नि मग यातूनच हुकुमशहा निर्माण होण्याची धास्ती वाढेल. मुलांच्या मनाचा नि गुणाचा विकास करण्यास पुस्तकाचे राष्ट्रीयकरण हे अत्यंत विघातक होईल. विविध विचारांचे सिंचन व्यक्तिमत्व संपन्न करते; तर साचेबंद विचार व्यक्तिमत्त्वाचा कोंडमारा करते.

" Diversity rather than uniformity in teaching is what must invigorate the mental apitude and growth of the young and help them to be useful citizens for the Country. No amount of intellectual regimentation will bring about emotional integration of nationol unity. These concepts have to develop naturally. They can only develop unnaturally in an

atmosphere hide-bound by Governmental regulations and rules where children are reduced to robots.

' संडे स्टॅंडर्ड ' चे हे विचार या संदर्भात माननीय आहेत.

आजची पुस्तके महाग म्हणून जर ही योजना असेल तर 'आजारापेक्षा उपचार ' भयप्रद होत आहेत हे सांगणेही आवश्यक आहे.

आपल्याला हवा तसा नागरिक निर्माण करण्यासाठी कदाचित हे, राष्ट्रीयकरण उपयुक्त होईल. पण हे नागरिक लोकशाहीचे संरक्षण नि संवर्धन करू शकणार नाहीत. लोकशाही शिक्षण पद्धतीत नागरिक घडविला जात नाही; पण नागरिकांच्या मनाचा विकास साधला जातो. आपल्याला डोक्याच्या आकाराची टोपी करायची आहे; टोपीच्या आकाराचे डोके करावयाचे नाही. या योजनेने टोपीच्या आकारमानाप्रमाणे डोक्याची छाटाछाट करावी लागणार आहे. डोक्याची छाटाछाट करणाऱ्या योजनेतून विचारवंत नागरिक कसे निर्माण होणार ?

सत्तेचे विकेंद्रीकरण करणाऱ्या सरकारने सांस्कृतिक जीवनाच्या साधनांचे केंद्रीकरण करण्याचा विचार का करावा हे कळणे दुरापास्त आहे.

## सत्तेचे विकेंद्रीकरण–

येत्या मे महिन्यापासून महाराष्ट्र राज्यात लोकशाही विकेंद्रीकरणाचा नवा कायदा अमलात येत आहे. या कायद्यान्वये जिल्हा परिषदांची निर्मिती होणार आहे. जिल्हा पातळीवरील कारभार नि सरकारी यंत्रणा यामधील होऊ घातलेला हा बदल अत्यंत मूलभूत नि क्रांतिकारक स्वरूपाचा आहे. यामुळे जनतेच्या हातात राज्यकारभाराची सूत्रे मोठ्या प्रमाणावर येणार आहेत.

गतिमान समाजामध्ये माध्यमिक शिक्षकावर नव्या सामाजिक जबाबदाऱ्या येऊन पडत असतात; लोकशाही विकेंद्रीकरणाचा हा जो मोठा प्रयोग चालू होत आहे त्या प्रयोगाच्या संदर्भात माध्यमिक शिक्षकांनी आपला यथोचित वाटा उचलला पाहिजे. या नव्या प्रयोगाचे यश मुख्यत: आपल्या स्थानिक नेतृत्वाच्या कसावर आहे लोकशाही विकेंद्रीकरणाचा कायदा हे केवळ एक साधन आहे; केवळ कायदा पुरोगामी करून भागत नाही नि त्यामुळे समाजाची प्रगतीही होत नाही; आधुनिक इतिहासाने शिकविलेला हा धडा आहे. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीने एक राज्य घटना तयार केली. जगातील अतिशय लोकशाहीप्रवण पुरोगामी अशी ही घटना होती. परंतु केवळ घटना नि कायदा पुरोगामी असून चालत नाही. जर्मनीमध्ये या राज्य घटनेला अनुकूल नेतृत्व नव्हते. शेवटी या लोकशाहीप्रधान राज्यघटनेमधून हिटलरची हुकुमशाही जन्माला आली. याच इतिहासाचा प्रत्यय फरान्स मधील राज्यक्रांतिनंतर तयार झालेल्या १७९२-९३ च्या राज्यघटनेबाबत आला आहे.

म्हणून महाराष्ट्र राज्यातील जिल्हा परिषदांचा कायदा केवळ पुरोगामी असून पुरेसा नाही. तो यशस्वी करण्यासाठी त्याला अनुकूल, पोषक स्थानिक नेतृत्व निर्माण झाले पाहिजे. हे कार्य अंशतः तरी माध्यमिक शिक्षक करू शकतील. माध्यमिक शाळेमध्ये शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वाचे गुण कसे वाढीला लागतील याची दक्षता घेतली पाहिजे. आपल्या शाळेतील विद्यार्थी संस्कारक्षम असतात; त्यांची मने लवचिक असतात. त्यांच्यामध्ये नेतृत्वाचे गुण जोपासण्यास अनुकूल परिस्थिती नि मनःस्थिती असते; या दिशेने आपण विचार केला पाहिजे. नेतृत्वाचा प्राण म्हणजे व्यासंग, चिंतन नि प्रयोगशीलता ! हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्याचे पराकाष्ठेचे प्रयत्न केले पाहिजेत. खंबीर नेतृत्वाला विचाराचे अधिष्ठान हवे, हे अधिष्ठान वाचनाने निर्माण होते. ग्रंथालय हे नेतृत्व निर्मितीची शाळा आहे याची जाणीव शिक्षकाने करून घेतली पाहिजे.

आजच्या युगात या ग्रंथालयाप्रमाणेच प्रयोग–शाळेचेही असाधारण महत्व संबंधित शिक्षकाने जाणून घेणे अगत्याचे आहे.

## विज्ञान शिक्षक–

शिक्षण–क्षेत्रात आज विज्ञान-विषयक शिक्षणाला विशेष महत्व येत आहे. या पुढील काळातही विज्ञान–विषयक शिक्षणाचा झपाट्याने प्रसार होत जाईल. यांत शंका नाही. स्थूलमानाने असे दिसते की, स्वातंत्र्य-पूर्व काळात ६०–७० वर्षात विज्ञान–विषयक शिक्षणाचा जेवढा प्रसार झाला नाही तेवढा प्रसार गेल्या १०–१५ वर्षात झाला आहे. या शिक्षणाला वाढते महत्व प्राप्त होत जाणार आहे. याचे महत्वाचे कारण आपल्या अर्थ व्यवस्थेमध्ये होत चाललेला बदल हे आहे. पूर्वी आपली अर्थ व्यवस्था केवळ कृषिप्रधान होती. आता आपण आस्ते आस्ते परंतु निश्चितपणे उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेकडे चाललो आहोत. सध्याच्या काळात Agro Industrial pattern कृषि–उद्योगाकडे आपले लक्ष आहे. उद्योग धंद्यांना आपल्या अर्थ व्यवस्थेमध्ये ज्या प्रमाणात महत्व येत जाईल त्या प्रमाणात विज्ञान नि तंत्रविद्या यांना आपल्या शिक्षण व्यवस्थेमध्ये मानाचे स्थान मिळत जाईल हे स्वाभाविक आहे. म्हणून एका महत्वाच्या गोष्टीकडे मला आपले लक्ष वेधावेसे वाटते.

तंत्रज्ञान नि विज्ञान यांचा प्रसार म्हणजेच समाजाची प्रगती असे समीकरण आपण मनाशी जर केले असेल तर त्याचा आपण पुनर्विचार करणे जरूर आहे. जपान, जर्मनी रशिया या देशात विज्ञान व तंत्रज्ञान याचा खूप प्रसार झाला आहे पण तेथे लोकशाहीची जीवनमूल्ये पराभूत झाली आहेत. नि मानवी स्वातंत्र्य विकसित होऊ शकले नाही. त्यामुळे आपल्याकडे विज्ञान नि तंत्रज्ञान यांचा प्रसार होत असताना एक दक्षता अवश्य घेतली पाहिजे, ती ही की–विद्यार्थ्यांना

शास्त्रीय शिक्षण देत असताना शास्त्रीय दृष्टिकोनही दिला पाहिजे, न्यूटन आर्किमेडिज्, डार्विन यांच्या शोधांची केवळ शाब्दिक माहिती विद्यार्थ्यांना न देता या शोधामागील या शास्त्रज्ञांची जी दृष्टी होती, प्रस्थापित सिद्धांताना चिकित्सक बुद्धीने तपासण्याची जी वृत्ती होती ती वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये कशी रुजेल याची चिंता विज्ञान-शिक्षकाने आवर्जून केली पाहिजे.

आजच्या माध्यमिक शिक्षणाच्या परिस्थितीचे परिशीलन यापेक्षा अधिक विस्ताराने करून मी आपला अधिक वेळ घेणे इष्ट नाही. पण शिक्षक बंधु-भगिनींनो शेवटी एकच सांगावेसे वाटते की नवसमाजरचनेचे आज प्रचंड कार्य चालू आहे, या रचनाकारांच्या प्रभावळीत आपले प्रतिष्ठेचे स्थान आहे, याचा साक्षात्कार शिक्षकाला होणे अगत्याचे आहे. या साक्षात्काराचे सामर्थ्यच त्याचे सामाजिक जीवन उन्नत करण्यास समर्थ होईल. शिक्षकाच्या या उन्नत जीवनावर झळकणारे Sufference is the badge of all our tribes हे शेक्सपियरचे सार्थ उद्‌गार वाचून समाज नतमस्तक झाल्यावाचून रहाणार नाही.

मी माझे विचार मांडले. या विचारांतील न्यून आपण पुरते करून घ्याल असा विश्वास वाटतो. आपण माझे भाषण शांतपणे ऐकून घेतलेत याबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

जयहिंद ! जय महाराष्ट्र !

★

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा मुख्याध्यापक परिषदेचे ६ वे अधिवेशन नाशिक येथे १९६५ मध्ये मा. शंकररावजी करंबेळकर यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीपणे पार पडले.
शिक्षणक्षेत्रातील सामाजिक न्यायाच्या पुरस्कारावर मा. शंकररावांच्या अध्यक्षीय भाषणाचा एकंदर रोख होता.
जीवन आणि शिक्षण यांची सांगड घातली पाहिजे असेही त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादले.
' माध्यमिक शालागृह महामंडळा ' ची विधायक योजना त्यांनी याच भाषणात पुढे मांडली.
शिक्षणक्षेत्राशी संबंधितांना अंतर्मुख बनवून वस्तुनिष्ठ विचार करावयास लावणारे हे भाषण...

# ★ शिक्षणाचा जीवनाशी सुसंवाद.

महाराष्ट्रातील माननीय मुख्याध्यापक बंधु-भगिनींनो,

आज महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांचे सहावे वार्षिक अधिवेशन साजरे करण्यासाठी आपण सारे उपस्थित झालो आहोत. या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी माझी निवड करून आपण माझा सन्मान केला आहे; याबद्दल मी आपला अत्यंत कृतज्ञ आहे.

हा माझा वैयक्तिक सन्मान नसून ज्या कऱ्हाड नगरीने नि माझ्या श्री शिवाजी-शिक्षण-संस्थेने संपूर्ण विश्वासाने मला सेवा करण्याची संधी दिली आणि माझ्या शिक्षण संस्थेतील ज्या माझ्या सहकारी शिक्षकबंधूंनी त्याग-बुद्धीने माझे जीवन

संवर्धित करण्यात आनंद मानला त्या सर्वांचा हा सन्मान आहे, असे मी मनःपूर्वक मानतो. या कृतज्ञतेच्या जाणिवेनेच हा सन्मान स्वीकारताना मला खचित आनंद होत आहे.

वास्तविक माझ्या पाठीशी ना विद्वत्तेचे वलय ना प्रतिभेचे पाठबळ ! गेली २५ वर्षे शिक्षणक्षेत्रात वावरणारा मी एक कार्यकर्ता ! अतिपरिचयामुळे अवज्ञा होते असे म्हणतात; पण शिक्षण क्षेत्राच्या अतिपरिचयामुळे अवज्ञता तर होत नाहीच उलट अनभिज्ञताही तज्ञतेचा आविर्भाव आणू शकते; पण असल्या आवि-र्भावाचे अंतरंग सहज ओळखणारे आपण सूज्ञ नि तज्ञ आहात याची मला जाणीव आहे. अशा अवस्थेत या अध्यक्षपदावर आपण केलेली माझी निवड म्हणजे आपल्या केवळ आपुलकीचा आविष्कार आहे; असे मी मनोमन मानीत आहे.

## गाऊ त्यांना आरती–

स्वतंत्र भारतातील एका अपूर्व वातावरणात आपण सारे आज एकत्रित आलो आहोत. भारत–पाक संघर्ष तूर्त स्थिरावला असला तरी भारताच्या विजयी सेना, आततायी नि आक्रमक पाकिस्तानच्या प्रदेशात पाय रोवून उभ्या आहेत नि शत्रू-सैन्याला बजावीत आहेत की,

" खबरदार ! जर टाच मारुनी याल पुढे चिंधड्या
उडविन राइ राइ एवढ्या. "

राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करताना भीमपराक्रम गाजविणाऱ्या आपल्या भारतीय जवानांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करून, या रणकंदनात ज्या आपल्या समरधीर सैनिकांचे देह धारातीर्थी पडले त्यांच्या पावनस्मृतीला प्रथम आपणा सर्वांच्यातर्फे मी भक्तिभावाने श्रद्धांजली अर्पण करतो.

## इथे संकोच संपला-

भारतीय जवानांच्या शौर्यकथांनी नि पराक्रमाच्या गाथांनी प्रस्फुरित झालेले सध्याचे वातावरण आणि स्वातंत्र्य-शाहीर गोविंद, स्वातंत्र्यवीर सावरकर नि क्रांति-कवि कुसुमाग्रज यांच्या ज्वलंत देशभक्तीच्या प्रभावी गीतांनी रसरसलेला नाशिकचा परिसर, अशी ही प्रेरक पार्श्वभूमी आपल्या आजच्या या अधिवेशनास लाभली आहे; या अधिवेशनाचे हे आगळे औचित्य खचितच विलोभनीय वाटते.

मी कृष्णाकाठचा मुख्याध्यापक, गोदातटाकीच्या या अधिवेशनास अध्यक्ष म्हणून आलो आहे. कृष्णा नि गोदावरी दोघीही एकमेकांपासून दूर दिसतात. एकीचे माहेर महाबळेश्वर तर दुसरीचे त्र्यंबकेश्वर ! भौगोलिक दृष्ट्या भिन्न भागांतून

वहाणाऱ्या या दोन पर्वतकन्यका ! पण दोघींच्याही अंतर्यामीच्या एकात्मकतेचे स्पंदन केवळ मनोज्ञ असल्याचा प्रत्यय आल्यावाचून रहात नाही.

कृष्णेच्या कार्याचे कोड–कौतुक करायचे हा जणू गोदावरीचा स्वभावच आहे. श्री. यशवंतराव चव्हाण, या आपल्या सुपुत्रास कृष्णामातेने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री केले तर त्याच ना. यशवंतराव चव्हाण यांना गोदामातेने भारताचे संरक्षण-मंत्री केले. हे कशाचे निदर्शक आहे ?

प्रज्ञावत नि प्रतिभासंपन्न शिक्षण–तज्ञांनी आजवर विभूषित केलेल्या या अध्यक्षीय व्यासपीठावर स्थानापन्न होताना माझ्या मनातील संकोच गोदावरीच्या या विशेष वात्सल्याच्या जाणिवेने तिच्या प्रवाहातून नकळत वाहून गेला; हे मला व्यक्त करावेसे वाटते.

## माध्यमिकाचा मागोवा–

आजच्या आपल्या प्रचलित शिक्षण पद्धतीचे मूळ ब्रिटिश राज्यकर्त्यांनी प्रवर्तित केलेल्या शिक्षण पद्धतीत आहे. ही पद्धती इंग्रज राज्यकर्त्यांच्या ध्येय धोरणाला पोषक अशीच होती. ' रंगाने काळा पण संस्कृतीने गोरा ' माणूस निर्माण करावा नि राज्यकारभारासाठी ' लायक उमेदवार ' मिळावेत हा तिचा प्रधान हेतू होता यामुळे ' शिक्षण नि नोकरी ' यांची निरगाठ बसली नि सुखसंपत्ती, मानमरातब, प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्याचे शिक्षण हे एक मोठे साधन आहे; अशी लोकांची समजूत झाली.

आमची शिक्षण परंपरा कालौघात वाहून गेली होती. पिढ्यान्पिढ्या पारतंत्र्यात गेल्यामुळे आमच्या समाजात एक तऱ्हेची लाचारी निर्माण झाली होती. या लाचारीची इंग्रजांनी आपल्या स्वार्थासाठी जोपासना केली. नवीन नोकरपेशा निर्माण केला. लठ्ठ पगाराच्या आमिषाने आमचे ' सत्त्वहरण ' केले. यासाठी शिक्षकांचा सोयीस्कर उपयोग करून घेतला. शिवाजीला ' चोर, लुटारू ' ठरविताना किंवा १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामाला ' शिपायाचे बंड ' संबोधताना शिक्षकांना खंत वाटेनाशी झाली.

या उद्वेगजनक परिस्थितीची चीड येऊन कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो. टिळक, आगरकर, म. फुले प्रभृतींनी राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ सुरू केली. या शिक्षणात अभ्यासक्रम तोच ! पण शिकविणारे शिक्षक राष्ट्रीय मनोवृत्तीचे असत. पारतंत्र्याचे जू झुगारून द्यावे नि स्वातंत्र्याचा ' उदयोस्तु ' करावा हा या राष्ट्रीय शिक्षणाचा उद्देश होता. यावरून या शिक्षणाची प्रेरणा शैक्षणिक नसून राजकीयच होती हे कळून येईल.

समाजाचे सांस्कृतिक जीवन समृद्ध करणारा ' नवा मानव ' निर्माण करण्यासाठी डॉ. टागोर, अरविंदबाबू घोष, कृष्णमूर्ती प्रभृती प्रज्ञावंतानी नवीन

शिक्षणदानाचा यत्न केला. यासाठी नवे आदर्श निर्माण केले. पण हा यत्न मूठभर मातबरांनाच उपयुक्त होता. म. गांधी यांची शिक्षण–योजना मात्र सर्वस्पर्शी होती, पण आज तिची कशी वासलात लागत आहे; हे दिसतच आहे. तथापि या योजनेत दलिताविषयी दया होती; पण समृद्ध जीवनाचे चित्र त्यात दिसत नव्हते.

## स्वातंत्र्याच्या उषःकाली–

१९४७ साली आपण स्वतंत्र झालो; देशात एका नव्या पर्वाला प्रारंभ झाला. नव्या प्रकाशाचे आव्हान आपल्याला मिळाले. कर्तृत्वाला नवी पालवी फुटली. शिक्षणावरचे परकीय मतलबी नियंत्रण नाहीसे झाले. आता स्वराज्यांत सुराज्य बनविण्यासाठी शिक्षणाला नवा आकार कसा द्यायचा हे ठरविण्याचा अधिकार आम्हाला प्राप्त झाला. नेत्यांच्या मनात नव्या जाणिवा जाग्या झाल्या. प्राप्त परिस्थितीत शिक्षणाचे मूल्य मोठे आहे; हे त्यांच्या ध्यानी आले. परंपरेच्या पाणंदीतून अज्ञानाने फरफटत जाणारा बहुजनसमाज सुशिक्षित झाल्यावाचून नव्या राज्यव्यवस्थेला स्थैर्य येणार नाही; हे नेत्यानी हेरले. राष्ट्राचा तोल सावरायचा असेल तर देशाची आर्थिक घडी तांत्रिक शिक्षणाने बसविणे आवश्यक आहे; हे त्यांना कळून चुकले; म्हणूनच या खंडप्राय देशात शिक्षणाच्या पुनर्रचनेचा नि विकासाचा विचार स्वातंत्र्याच्या उषःकालातच सुरू झाला.

## प्रगतीची पाऊले-

आपल्या महाराष्ट्रापुरते बोलायचे तर गेल्या १८ वर्षात आम्ही शिक्षणक्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी केली आहे. विदर्भ–मराठवाडा नव्या महाराष्ट्रात आल्यावर शिक्षणव्यवस्थेत एकसूत्रीपणा येण्यासाठी महाराष्ट्र सरकारने माध्यमिक–शिक्षण–समिती स्थापन केली. त्या समितीच्या शिफारशीनुसार सरकारने काही योग्य निर्णयही घेतलेले आहेत. माध्यमिक शिक्षकांची वेतन–श्रेणी वाढविली नि सरकार शिक्षकांच्या आर्थिक स्थितीबाबत जागरूक असल्याचे निदर्शनास आणले; शैक्षणिक नि व्यावसायिक मार्गदर्शन, राष्ट्रीय शिस्त योजना, सैनिकी शिक्षण, हिंदीचा प्रचार असे अनेकविध उपक्रम सरकारने सुरू केले. रु. १२०० हून अधिक उत्पन्न नसलेल्या पालकांच्या मुलांच्या फीची जबाबदारी सरकारने स्वीकारली. शिक्षकांच्या सेवानिवृत्तीचे वय ५८ केले. त्यांच्या तासांची संख्या कमी केली. त्यामुळे शिक्षणाला वेगाने चालना नि चेतना मिळाली. खेडोपाडी माध्यमिक शाळा निघू लागल्या. शिक्षणाची भूक वाढू लागली. मुलांची संख्या वाढली, इमारती अपुऱ्या पडू लागल्या. शिक्षण देणाऱ्या नव्या नव्या संस्था हिरीरीने पुढे सरसावल्या आणि शिक्षणाचे एक आशादायक चित्र हळूहळू आकार घेऊ लागले.

## वाट उमजे पाऊली ?

अशी शैक्षणिक वाट–चाल चालू असता १९६४–६५ पासून शैक्षणिक धोरण हळूहळू पुरोगामी होत असल्याचा प्रत्यय येऊ लागला.

१) सालीना रु. १८०० पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या राज्यसरकारचे नोकर, स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी नि शिक्षक यांच्या मुलांना माध्यमिक शालान्त परीक्षेपर्यंतचे शिक्षण मोफत देण्याची सवलत चालू करण्यात आली.

२) विदर्भ नि मराठवाडा हे प्रदेश पश्चिम महाराष्ट्राच्या पातळीवर आणण्याठी त्या प्रदेशातून नुकतेच सक्तीचे प्राथमिक शिक्षण चालू केले.

६) महाराष्ट्र राज्यातील सर्व कला विभागामध्ये एकसूत्रता यावी नि शैक्षणिक समन्वय साधावा यासाठी चित्रकला संचलनालयाची स्थापना केली. असे स्वतंत्र चित्रकला संचलनालय स्थापन करणारे महाराष्ट्र राज्य हे एकमेंव राज्य ही अभिमानाची गोष्ट आहे.

४) माध्यमिक शाळासाठी जी ‘ अनुदान संहिता ’ होती तिच्या नावात अन्वर्थक बदल केला नि कमीअधिक सुधारणा करून ‘माध्यमिक-शाळा नियमावली’ निर्माण केली.

५) महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शिक्षणात एकसूत्रता येण्याच्या दृष्टीने सरकारने नुकतेच महाराष्ट्र राज्य ‘ माध्यमिक शिक्षण मंडळ ’ कायद्याने प्रस्थापित केले.

अशा मूलगामी सुधारणा करण्याचा यंदा यत्न झाला आहे. शिक्षणमंत्री ना. मधुकरराव चौधरी यांनी या सुधारणांच्याद्वारे जो आपला पुरोगामी शैक्षणिक दृष्टिकोन व्यक्त केला त्याबद्दल त्याना धन्यवाद द्यावेसे वाटतात. या प्रगतीपर धोरणाने ना. मधुकरराव चौधरी यांनी शिक्षणक्षेत्रात मोठा आशावाद निर्माण केला आहे यात शंका नाही.

## उतावीळ उपक्रम–

शिक्षणाचा असा विलक्षण विस्तार होत असताना माध्यमिक शिक्षणात सरकारने उतावीळपणाने अनेक उपक्रम केले. शैक्षणिक वर्षाचे तीन कालखंड केले; पण पुन: मूळचे दोनच कायम केले. स्वातंत्र्यात परकीय इंग्रजीला प्रतिष्ठा देणे इष्ट नाही या काहीशा कल्पनेतून इ. ५ वी पासूनचे इंग्रजी बंद करून इ. ८ वी पासून ते सुरु केले. पण आठ वर्षांनी हे इष्ट नसल्याची जाणीव होऊन पुन: इ. ५ वी पासून इंग्रजी आले, पण ते वैकल्पिक स्वरूपात सुरु केले. शारीरिक शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम निरुपयोगी वाटला नि त्याऐवजी राष्ट्रीय

अनुशासन योजना अमलात आली; आतां तीही अंतर्धान पावत असून राष्ट्रीय सुदृढ पथक पदार्पण करीत आहे. उच्च माध्यमिक, बहुउद्देशीय माध्यमिक अभ्यासक्रम, परीक्षा पद्धतीतील अंतर्गत मूल्यमापन, अभ्यासक्रमात सामाजिक शास्त्रासारख्या नव्या विषयांचा प्रवेश या सर्व उपक्रमांची नि प्रयोगांची आजची अवस्था काय आहे ?

उच्च माध्यमिकांचा अवतार फारसा दिसत नाही. बहुउद्देशीय शाळांची साधनाभावी उपासमार चालू आहे, अंतर्गत मूल्यमापन विश्वास गमावून बसत आहे, सामाजिक शास्त्रांतील इतिहास–भूगोल नि नागरिकशास्त्र मागविण्या-बद्दल तक्रार आहे.

हे सारे करताना शिक्षणाची वेगाने प्रगती व्हावी हीच सरकारची सदिच्छा होती. शैक्षणिक बदलाबाबत Marc–Antonie Jullien de Paris चा विचार लक्षात घेण्यासारखा आहे.

" Education should become a positive science instead of being ruled by narrow and limited opinions, by whims and arbitrary decisions of Administrators to be turned away from the direcline which it should follw either by prejudice of a blind routine or by the spirit of same system & innovation. "

शिक्षणातील कोणताही बदल हा विचारांती व्हावा या तत्वाचे भान प्रगतीच्या गतीत राहिले नसावे. शिक्षण हे माणसाच्या नि राष्ट्राच्या जीवनाचे महान मूल्य आहे; हे कधीही विसरता येण्यासारखे नाही. पण इथे त्याचीच विस्मृती झाली नि संस्कारापेक्षा प्रसार हीच शिक्षणाची दृष्टी राहिली.

## प्रसार नि संस्कार–

शिक्षणाचा प्रसार झाला खरा; पण त्यातून एक नवीन जाणीव निर्माण होऊ लागली. आतापर्यंत शिक्षण ही मूठभर माणसाचा जी मिरास होती; ती सर्वसामान्य माणसांच्या हाती आली. बंदिस्त पडलेली बुद्धी नि कोंडले गेलेले कर्तृत्व यांना मोकळेपणा मिळाला. सुख, संपत्ती नि प्रतिष्ठा मिळविण्याचे आजवर दुर्लभ असलेले हे शिक्षणाचे साधन आता आपल्या हाती आले आहे या जाणिवेने सर्वसामान्य माणूस प्रोत्साहित झाला. या साधनाचा लाभ घेण्याची त्याची इच्छा बळावली नि परिणामी शिक्षणप्रसाराच्या गतीला अधिकच चालना मिळाली.

प्रसाराचे पारडे डोळ्यात भरण्याइतपत चांगलेच जड झाले; पण गुणवत्तेचे पारडे गंभीरतेने विचार करण्याइतपत हलके झाले असा प्रवाद ऐकू येऊ लागला. विद्यार्थी चतुरस्त्र झाला पण पारंगत झाला नाही, असे आपण ऐकतो नि बोलतोही वास्तविक जेव्हा एकाद्या कार्याचा विकास होतो तेव्हा काही भाग व्यर्थ जातोच.

" Friction and wastage are necessary for progress "

हे तत्व लक्षात घेतले तर शिक्षणाच्या प्रसाराच्या मानाने गुणवत्ता न आली तर इतके अस्वस्थ होण्याचे कारण असू नये.

तसाच विचार करायचा म्हटले तर गुणवत्ता कमी झाली की नाही हा मुळातच वादग्रस्त प्रश्न आहे. ती कमी झाली म्हणावे तर विद्यापीठांच्या परीक्षातून पहिल्या श्रेणीत येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या इतकी वाढलेली आहे की, तिसऱ्या श्रेणीत उत्तीर्ण होणे कठीण होऊन बसलेले आहे. हे लक्षण कशाचे मानायचे ? दुसरी गोष्ट अशी की आज अभ्यासक्रमात काही नवीन विषय आलेले आहेत. तर जुन्या काही विषयाचा भाव घसरला आहे. हिंदी, हस्तव्यवसाय, चित्रकला संगीत, शारीरिक शिक्षण इत्यादि विषयांचा जसा आज अभ्यास करावा लागतो तसा तो पूर्वीच्या विद्यार्थ्यांना करावा लागत नसे; इंग्रजी, संस्कृत या विषयांना पूर्वी जो भाव होता तो आजच्या अभ्यासक्रमात टिकून राहिलेला नाही.जुन्या नव्या विषयांची अशी पिसणी झाल्यामुळे माध्यमिक शिक्षणांतील गुणवत्ता गमावली आहे असा निसंदिग्ध अभिप्राय व्यक्त करणे काहीसे धाडसाचे होईल. हे स्वरूपच संमिश्र असल्याने त्याचे अचूक उत्तर देणे कठीण आहे.

## समतेचा संभव–

गुणवत्तेचा हा विचार शैक्षणिक संस्कारापेक्षा प्रसाराच्या पार्श्वभूमीवर करणेच अधिक युक्त होईल. शिक्षणाने मिळणारा मान, पदवीने मिळणारी प्रतिष्ठा आम्हाला मिळाली पाहिजे ही सर्वसामान्य माणसाची आजची इच्छा आहे. या संदर्भात विषमता स्वीकारायला त्याची आता स्वातंत्र्यानंतर तयारी नाही. सर्वच क्षेत्रात त्याची समतेची भूक वाढलेली आहे. पदवी ही समतेची निशाणी आहे असे त्याचे मत बनले आहे. पण समता नि गुणवत्ता हातात हात घालून जाताना फारशा आढळत नाहीत; हे लक्षात घेणे अगत्याचे आहे.

संपूर्ण नि समाधानकारक गुणवत्ता शिक्षणांत साध्य होणे केवळ अशक्य असते. खेरीज गुणवत्तेचा प्रकाश जादूच्या दिव्यासारखा चटकन पडत नाही अवधीने साधत जाणारी ती गोष्ट आहे. त्यासाठी अविरत यत्न हवा; अभ्यासाचा अभिषेक हवा. याबाबत प्रयत्नशील असणे हा एक उपाय आहे.

आजच्या गुणवत्तेचे मूल्यमापन करताना जुनी मापे वापरणे इष्ट नाही. त्यासाठी आपला जुना दृष्टिकोन बदलून नवा शैक्षणिक दृष्टिकोन समाजाने अंगिकारण्याची गरज आहे. जुन्या मूल्यांच्या ऐवजी नव्या मूल्यांचे स्वागत करायला आपण शिकले पाहिजे.

## नवाकाळ : नवे आवाहन–

नवी मूल्ये स्वीकारली पाहिजेत असे ज्यावेळी मी म्हणतो त्यावेळी त्याला सरळ नि सोपा असा एकच अर्थ मला अभिप्रेत आहे. ज्या एका नव्या काळात आपण वावरत आहोत त्या काळाचे आवाहन कोणते आहे.; याचा आपण वेध घेणे आवश्यक आहे. व्यक्तीचा विकास हे शिक्षणाचे ध्येय असले तरी सामाजिक संदर्भात हा विकास होणे अवश्य आहे; हे विसरून चालणार नाही. त्या दृष्टीने नि जाणिवेने आपली वाटचाल होणे जरूर आहे. नव्या समाजाच्या गरजाही नव्याच असणार आहेत; त्यासाठी आपल्या प्रतिष्ठेच्या पारंपरिक कल्पना बदलल्या पाहिजेत-नव्हे तसे करणे अपरिहार्य आहे. कारण काही गोष्टी आता कालबाह्य झालेल्या आहेत याची जाणीव करून घेतली पाहिजे. तसे जर आपण केले नाही तर ते अज्ञान ठरेल. सबंध समाजच्यासमाज जेव्हा वर खेचून घेण्याचीं कामगिरी करायची असते त्यावेळी निवडक माणसाचे ते काम नसते. समाजाच्या या उभारणीसाठी सर्वांची सारखी गरज असते हे विसरून चालत नाही. आशावेळी तंत्रज्ञापेक्षा तत्वज्ञानी श्रेष्ठ असा तुलनात्मक विचार निरुपयोगी असतो. याबाबत डॉ. जॉन डब्ल्यू गार्डिनर आपल्या Excellence या पुस्तकात म्हणतो की–

" An excellent plumber is infinitely more admirable than an incompetent Philosopher. The society which scorns excellence in plumbing because plumbing is a humble activity and tolerates shoddiness in philosophy because it is an exalted activity will have neither good plumbing nor good philosophy. Neither its pipes nor its theories will hold water. "

शिक्षणप्रसाराच्या पाठीशी ही समतेची प्रेरणा आहे; असे कळून आल्यावर एक शंका साहजिकच मनात उभी रहाते. "सर्व व्यक्ती सारख्या" ही समतेसंबंधीची स्थूल कल्पना आज राजकारणातही सर्वस्वी उपयुक्त असल्याचे दिसत नाही. तसे असते तर निवडणुकांचा खटाटोप करण्याचे सरकारला काहीच कारण उरले नसते. अक्षर विल्हेवारीनें अगर चिठ्ठया टाकूनही लोक-प्रतिनिधींची निवड सहज करता आली असती. कारण सारी माणसे सारखीच ! मग कोणीही निवडून आला तर बिघडले कुठे ? पण तसे होत नाही. उभे राहिलेल्या उमेदवारांतूनच गुणवत्तेचा विचार करून प्रतिनिधींची आवश्यक संख्या निवडावी लागते.

राजकारणात जर समतेची ही अवस्था तर मग ती शिक्षणक्षेत्रात कशी पोषक होईल ? कारण इथे एकतेपेक्षा भिन्नतेला मोठा अवसर असतो. नागरजीवन नि ग्रामीण जीवन यामध्ये वातावरण, परिस्थिती, विकास, सोयी, संधी इत्यादि अनेकविध बाबतीत अजून तरी विषमता वावरत असते हे नाकबूल करण्यात अर्थ नाही.

## विषमता की विविधता-

शिक्षणात विषमता असावी असे कोणीच म्हणणार नाही; पण याचा अर्थ असा नव्हे की, शिक्षणात एकजिनसी सारखेपणा असावा. तसे मानणे नि करणे हे ईश्वरी इच्छेच्या विरुद्ध आहे. हाताच्या बोटांची लांबी कापून, सगळी बोटे सारख्या लांबीची करणे ही समता नव्हे. तर बोटे कमीअधिक उंचीची असली तरी सर्व बोटांना सारखा रक्त पुरवठा करणे ही खरी समता ! शिक्षणातील समतेच्या कल्पनेत हाच अर्थ अभिप्रेत आहे. प्रत्येकाला आपल्या सुप्त गुणांचा विकास करण्याची संधी मिळाली पाहिजे. ही संधी समानता हा लोकशाहीत प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. म्हणूनच लोकशाहीच्या तत्वांतील ती प्राणरुप आहे. यासाठी विद्यार्थ्यांची आवड–निवड, त्यांची प्रवृत्ती नि त्यांची बौद्धिक कुवत या गोष्टी लक्षात घेऊन त्यांच्या व्यक्तित्वाचा विकास होईल अशी व्यवस्था शिक्षणात असण अगत्याचे आहे. याचसाठी अभ्यासक्रमात विविधता हवी.

लोकशाही समाजवादासाठी आपणाला साऱ्या समाजाचे परिवर्तन करायचे आहे. त्या दृष्टीने आजच्या आपल्या शिक्षणाची मांडणी होणे अगत्याचे आहे. इंजिनियर्स, डॉक्टर्स, कायदेपंडित, संशोधक, शेतकीतज्ञ यांची जशी समाजाला गरज आहे तशीच मोल्डर, टर्नर, फिटर, मशीनिस्ट इत्यादि छोट्या तंत्रज्ञांचीही निकडीची गरज आहे. एका इंजिनियर्सच्या हाताखाली सुमारे २५ छोट्या तंत्रज्ञांना काम करावे लागते हे लक्षात घेऊन या तंत्रज्ञांची नि कुशल कारागिरांची अधिक निर्मिती कशी होईल या दृष्टीने शिक्षणात व्यवस्था असणे आवश्यक आहे.

आज औद्योगिक शिक्षणाच्या सोयी सरकारने उपलब्ध केल्या आहेत; ही गोष्ट जरी स्वागतार्ह असली तरी नवनिर्मितीच्या प्रचंड कार्याच्या मानाने त्या अत्यंत अपुऱ्या आहेत. ज्या आहेत त्यात योग्य नियोजनाचा प्रत्यय येत नाही. कारण या औद्योगिक संस्थांतून उत्तीर्ण झालेले तंत्रज्ञ कारखानदारांना उपयुक्त होत नाहीत; अशी तक्रार ऐकू येत असते.

## व्यावसायिक शिक्षण-

आजच्या शिक्षण व्यवस्थेत प्राथमिक, माध्यमिक नि उच्च असे तीन अलग अलग कप्पे केलेले आहेत. वास्तविक माध्यमिक शिक्षण हा कप्पा नसून शिक्षणाचा एक टप्पा आहे. ज्यांना उच्च शिक्षण घ्यायचे नाही ते माध्यमिक शिक्षण संपताच आपल्या उपजीविकेचे साधन मिळविण्यास समर्थ होतील; असे शिक्षण मिळणे जरूर आहे.

माध्यमिक शालान्त परीक्षेसाठी ऐच्छिक विषयाची विस्तृत यादी आहे. त्यात विविधता आहे. निवडीची सवलत आहे. पण ते विषय शिकविण्याची फारशी

सोय नाही. त्याबाबत योग्य ते मार्गदर्शनही होत नाही. नाइलाजाने विद्यार्थी वाङ्मय विषय घेतो, किंवा न आवडणारा विषय ऐच्छिक म्हणून निवडतो, विद्यार्थी ' संस्कृत ' सोडून ' संगीत ' घेऊ शकतो; पण संगीत हा आवडीचा विषय म्हणून तो घेत नाही; तर संस्कृत नको एवढीच त्याची इच्छा असते. यासाठीच ' बहु उद्देशीय ' ( Multi purpose ) शाळा स्थापित होणे आवश्यक वाटते.

त्याचबरोबर वाङ्मयीन अभ्यासक्रम नि व्यावसायिक अभ्यासक्रम एकाच शाळेत नि एकाच शाळा प्रमुखांच्या नियंत्रणाखाली असणे योग्य आहे. यामुळे वाङ्मयीन वातावरणातून व्यावसायिक वातावरणात जाताना विद्यार्थ्यांना अडचण भासणार नाही. खेरीज व्यावसायिक अभ्यासक्रम कमी प्रतीचा असतो; असाही त्यांचा समज होणार नाही. एकाच वातावरणांतील विविध अभ्यासक्रम सारख्याच तोलामोलाचे आहेत; असा विश्वास निर्माण होण्यास ही योजना उपयुक्त होईल.

याच संदर्भात सामाजिक दृष्टिकोनही बदलणे आवश्यक आहे. वाङ्मयीन अभ्यासक्रमाला जे बौद्धिक नि सांस्कृतिक महत्व आहे ते व्यावसायिक अभ्यास-क्रमाला नाही; हा समाजाचा समज खासच हिताचा नाही. व्यावसायिक शिक्षणा-नेही बौद्धिक नि सांस्कृतिक विकास होतो, इतकेच नव्हे तर व्यवसायाच्या प्रत्यक्ष आचरणांतून जे शिक्षण मिळते ते अधिक संस्कारी असून समाजपोषक असते; याची जाणीव समाजाला होणे अगत्याचे आहे. व्यावसायिक शिक्षणाला ज्या मानाने सरकार प्रतिष्ठा देईल त्या मानाने समाजात ही जाणीव निर्माण होण्यास साह्य होईल.

## जीवन नि शिक्षण–

आपले शिक्षण लोकजीवनाशी सुसंगत हवे; हा दृष्टिकोन अद्याप सरकारने आत्मसात केल्याचे दिसत नाही. आजच्या तांत्रिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमावरून या माझ्या म्हणण्याचा प्रत्यय येईल. तांत्रिक विषयाचा प्राथमिक परिचय करून देणे नि मूलभूत सामान्य तत्वांची ओळख करून देणे; एवढाच आजच्या तांत्रिक शिक्षणाचा उद्देश दिसतो. त्यामुळे व्यावहारिक उपयोगितेच्या दृष्टीने हे शिक्षण अपुरे वाटते नि म्हणूनच कारखानदारांना हवे असलेले तंत्रज्ञ मिळत नाहीत; नि हे औद्योगिक शिक्षण घेतलेल्या तंत्रज्ञांना कारखान्यात नोकरी मिळत नाही. अशी चमत्कारिक परिस्थिती निर्माण झालेली प्रत्ययास येते. यासाठी कारखानदारांना ज्या तंत्रज्ञांची गरज आहे, तसे तंत्रज्ञ निर्माण करणाऱ्या अभ्यासक्रमाची योजना हवी. तरच " शिक्षण नि उद्योग " यांची खऱ्या अर्थाने सांगड घातली असे होईल. शिक्षणातील अपव्यय नि समाजातील बेकारी कमी करण्यास हाच महत्त्वाचा मार्ग आहे.

व्यावसायिक नि तांत्रिक विषय घेण्याचे आकर्षण मुलांच्या मनात निर्माण होणे अवश्य आहे. त्यासाठी हे विषय घेणाऱ्यांना भरीव सवलतीच्या योजना

शिक्षणात हव्यात. आज तशा योजना नाहीत. तांत्रिक विषय घेऊन एस्. एस्. सी. उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला आज कोणतेच उत्तेजन नाही. त्याला नोकरीची शाश्वती नाही किंवा डिप्लोमा कोर्सलाही इतराहून विशेष अशी सवलत नाही. एस्. एस्. सी. ला शे. ५०% गुण मिळाले असतील तर प्रवेशाबाबत अग्रक्रम मिळण्यास तो पात्र होतो. हीच काय ती सवलत ! वास्तविक तांत्रिक विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास डिप्लोमाच्या दुसऱ्या वर्षाला प्रवेश देण्यास का हरकत असावी ? मात्र एस्. एस्. सी. चा तांत्रिक अभ्यासक्रम या विचाराने आखलेला असणे अवश्य आहे.

१९६१ च्या उमेदवारांच्या कायद्याने ( Apprentice Act ) कारखानदारांना कुशल कामगार मिळावेत म्हणून त्यांच्या शिक्षणाचा विचार केला आहे. मोठ्या कारखानदारांनी ( ५०० हून अधिक कामगार असलेल्या ) या उमेदवारांच्या शिक्षणाची सोय स्वतः करायची असून छोट्या कारखानदारांसाठी ही सोय सरकारने करायची आहे. पण व्यवहारतः हे मोठ्या कारखानदारांना इष्ट वाटत नाही. केवळ ३.४ उमेदवारासाठी एक शिक्षक नेमणे आर्थिकदृष्ट्या कसे योग्य आहे ! म्हणून हे घडत नाही. यासाठी या उमेदवारांच्या शिक्षणांची सोय एस्. एस. सी. च्या अभ्यासक्रमात केली तर ही समस्या सुटणारी आहे. यामुळे एस. एस. सी. पास होताच विद्यार्थ्यांस उद्योग मिळेल नि कारखानदारांना तंत्रज्ञ उपलब्ध होतील.

अशा तऱ्हेने विविध व्यवसायांच्या अभ्यासक्रमाची सोय शाळांतून उपलब्ध होणे अवश्य आहे. रशिया, अमेरिका या देशांतून अशा कितीतरी छोट्या छोट्या अभ्यासक्रमांच्या सोयी केलेल्या आहेत.

मात्र अशा विविध व्यावसायिक विषयांची सोय करतांना नियोजनाची नितांत गरज असते. भोवतालच्या परिसरातील गरजा लक्षात घेऊन ही नियोजित शिक्षण व्यवस्था कार्यवाहीत येणे अवश्य आहे. ज्या विभागात कारखाने त्या विभागात तांत्रिक शिक्षण; नि ज्या भागात शेती असेल तिथे शेतकी शिक्षण अशी सोय उपलब्ध हवी. हेच नियोजन ! केवळ ' मागणी तसा पुरवठा ' हे तत्व न स्वीकारता गरजेप्रमाणे पुरवठा हे तत्व स्वीकारणेच हिताचे आहे.

## शेती शिक्षण–

' खेड्यांचा उद्धार झाला पाहिजे. ' अशी आपली नेहमीची घोषणा असते; पण प्रत्यक्ष कृती मात्र " जैसे थे " अशीच आहे. भारतात शेती हा प्रधान व्यवसाय आहे. विशेषतः आजच्या अन्नधान्य टंचाईच्या काळात शेतीकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. आजवर शेती शिक्षणाकडे आवश्यक लक्ष सरकारने दिलेले

नाही. त्यामुळे शेतीचा विकास नि खेड्यांचा उद्धार या नुसत्या घोषणाच ठरल्या आहेत.

आज खेड्यांची परिस्थिती पालटली आहे, असे म्हणवत नाही. खेड्यांतील प्रत्येक चांगली गोष्ट शहराकडे आज धावत असलेली दिसते. चांगला भाजीपाला, चांगले दूध, इतकेच नव्हे; तर चांगला शिकलेला मुलगा या साऱ्यांची धाव शहराकडे ! वडिलांचे लक्ष शेतीकडे तर मुलाचे लक्ष नोकरीकडे ! असा ' आग–बंब ' न्याय खेड्यात निर्माण झाला आहे. याचाच अर्थ आजचे शिक्षण मुलांना खेड्याबाहेर ढकलणारे आहे. खेड्यातील काही मुले आज बी. एस्सी. ( ॲग्री. ) झालेली आहेत. पण त्यापैकी खेड्यात जाऊन कितीजण आपली शेती करतात ? त्यांना ऑफिसर होण्याचे आकर्षण आहे. त्यासाठी ते शहरात जाऊ इच्छितात. त्यांना खेड्यांत थांबवील–नव्हे, तसा थांबण्याचा त्यांना मोह होईल अशा शिक्षण व्यवस्थेची खेड्यांना आज गरज आहे.

आमचा शेतकरी परंपरेचा भोक्ता आहे. जीवनाचा एक मार्ग म्हणून तो शेती करतो. श्रमाचा बुद्धीपूर्वक उपयोग करण्याचे त्याला अद्याप ठाऊक नाही आधुनिक यंत्रे शास्त्रीय ज्ञान यांनी श्रमाची उत्पादकता वाढते; हे अजून त्याला कळायचे आहे. शेती हा एक श्रेष्ठ व्यवसाय आहे याचे ज्ञान त्याला अद्याप नाही. नि गेल्या १८ वर्षांत हे ज्ञान त्याला देण्याचे सर्वकष प्रयत्नही झालेले नाहीत. शेती हा एक भारतातील मूलभूत उद्योग (Basic Industry) आहे या जाणिवेने सरकारने या कामी लक्ष दिलेले दिसत नाही. म्हणून शेती विकासासाठी विविध शिक्षणक्रमांची व्यवस्था होण्याची गरज आहे. खेड्यांतून शेती शाळा काढण्यास उत्तेजन मिळाले पाहिजे; त्यासाठी या शाळांना विविध सवलती देणे जरुर असून अनुदानाचे मापही त्यांना जरा झुकते ठेवले पाहिजे. शेतीची शास्त्रीय तत्त्वे, ती कार्यवाहीत आणण्याचे मार्ग, रासायनिक खताचा उपयोग, जमिनीची मशागत, बी–बियाणाची माहिती, शेती किफायतशीर होण्याचे उपाय, पशुसंवर्धन, कुक्कुटपालन, दुग्ध-व्यवसाय इत्यादि शेती संलग्न अनेक विषयांचा अभ्यासक्रमात समावेश होणे अगत्याचे आहे.

शेतीविषय घेऊन एस्. एस्. सी. पास होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, तांत्रिक शिक्षणाच्या डिप्लोमासारखा शेतीचा डिप्लोमा काढण्यास कोणता प्रत्यवाय आहे ? इ. ९ वी पास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी शेती प्रशिक्षण संस्था ( Agricultural Training Instiute) काढून छोटे छोटे अभ्यासक्रम आखणे कठीण आहे काय ? घरची शेती, स्टेटफार्मिंग, को–ऑपरेटिव्ह फार्मिंग, पीक संवर्धक योजना, जिल्हा परिषद नि तालुका पंचायतीच्या वतीने होणारा शेती–विकास–कार्यक्रम इत्यादि विविध शेती विभागात या प्रशिक्षित विद्यार्थ्यांचा खासच उपयोग होईल. अशी काही शिक्षण व्यवस्था होऊ शकली तर विद्यार्थ्यांच्या शेती विषयक विचारसरणीत नि कार्यपद्धतीत निश्चित प्रगतीपर बदल होईल. राज्यसरकारने शेती–प्रशिक्षणाला प्राधान्य देण्याचा विचार त्वरित करावा ही इच्छा !

हे सर्व करीत असताना असाही समज होता कामा नये की, सर्वच ग्रामीण भागांतील मुलाना खेड्यात गुंतवावयाचे आहे. जे विद्यार्थी हुशार, बुद्धिमान असतील त्यांना शहरी शाळात शिक्षणासाठी जरूर आणावे. याबाबत त्यांच्या शिक्षणासाठी लागणारा सर्व खर्च सरकारने सोसावा.

## खरी संपत्ती–

शिक्षण हे संपत्ती निर्माण करण्याचे अमोघ साधन आहे; असे नेहमी म्हटले जाते पण 'आधी शिक्षण की आधी उत्पादन ?' असा एक मूलभूत प्रश्न या संदर्भात निर्माण होतो. शिक्षणाने माणसाच्या अंतःकरणांत विकासाची इच्छा स्फुरण पावते; नि मग आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात माणूस स्वेच्छेने भाग घेतो. म्हणूनच शिक्षण नि उत्पादन यांचा घनिष्ठ संबंध आहे. देशांचा विकास हा त्या देशांतील निसर्ग संपत्ती, जमीन, पैसा, श्रम नि मनुष्यबळ यावर अवलंबून असतो. नि विकासाचे हे सारे घटक मनुष्यबळाशीच संबंधित आहेत. मनुष्यबळ ही देशाची सर्वांत मोठी आर्थिक संपत्ति आहे. या संपत्तीचा योग्य लाभ करून घेण्याचे सामर्थ्य केवळ शिक्षणाच्याच ठायी आहे.

## माणूस फुलला पाहिजे–

आमच्या सरकारने भौतिक जीवन समृद्ध करण्याच्या दृष्टीने जेवढा पैसा ओतला तेवढा पैसा मानवाच्या विकासासाठी वेचला नाही. अवाढव्य धरणे, मोठमोठे कारखाने, प्रचंड विद्युत योजना यावर कोटयावधीचा खर्च करण्यास सरकार तयार असते. पण या कार्यमग्नतेमुळे आपण आज माणसालाच विसरलो आहोत.या प्रकल्पांचा पुरेपूर लाभ घेण्याची पात्रता निर्माण करण्याकडे आपले आज लक्ष नाही. धरणाचे पाणी अगर गोमटी वीज यांचा उपयोग विकासासाठी कसा करून घ्यावचा, हे आम्हाला कळत नाही. यामुळे समाजात वैफल्य निर्माण झाले आहे. बेचिराख झालेली राष्ट्रे पुन्हा नव्या जोमाने उभी राहिलेली आपण पहातो; याचे कारण तिथला मनुष्य विकसित झाला आहे. उदयोन्मुख राष्ट्रात जर शिक्षणाचा पाया बळकट नसेल तर सारे भौतिक बडिवार व्यर्थ आहेत. शिक्षणाभावी तांत्रिक सुधारणांचा वापरही होऊ शकणार नाही. म्हणून आर्थिक–विकासाचा प्रश्न आतां 'तंत्रविद्येचा' नसून तो 'समाजशास्त्राचा' आहे हेही या काळात लक्षात घेणे आवश्यक आहे. श्रम, जमीन, भांडवल यांचे महत्व आहेच; पण मानवी कुशलतेवाचून हे व्यर्थ आहे. म्हणून देशाची मूळ गरज नजरेसमोर ठेवूनच अभ्यासाच्या योजनेची आखणी व्हायला हवी. केवळ चांगला दिसतो नि वाटतो म्हणून पाश्चात्यांचा अभ्यासक्रम स्वीकारण्यात किंवा त्याची नक्कल करण्यात काहीही लाभ नाही. अमेरिकेचे शिक्षणशास्त्रज्ञ जे. बी. कोनंट ( James Bryant Conant ) सांगतात की, 'Education is not an exportable Commodity.' हे

या संदर्भात लक्षात घेणे अवश्य आहे. आमच्यासारख्या उदयोन्मुख राष्ट्राला सामान्य माणसांच्या कौशल्याची, कारागिरीची नि विकासाची तीव्रतेने गरज आहे.

## लोकानुरंजनास रजा ?

यासाठी माध्यमिक शिक्षणांत विज्ञान विषयक अभ्यासावर अधिक भर द्यावा लागेल; लायक शिक्षकासाठी सरकारला मोठा खर्च करावा लागेल. शिक्षणावरील खर्च हा अनुत्पादक असतो; ही ऱ्हस्व दृष्टीची व्यवहारवादी भूमिका आता बाजूला ठेवावी लागेल. शिक्षणासाठी होणारा खर्च हा मानवी विकासाच्या साधनासाठी होणारा खर्च आहे; याची नुसती जाणीव ठेवून चालायचे नाही तर ही जाणीव कार्यवाहीत आणण्याचा यत्न झाला पाहिजे. प्रगत राष्ट्रांनी आपल्या राष्ट्राच्या आव्हानानुरूप आपले शिक्षणविषयक धोरण बदललेले आहे. त्यासाठी अफाट पैसा खर्च केला जात आहे. रशियाने स्पुटनिक सोडताच अमेरिकेने तातडीने आपल्या शिक्षणात बदल केला. आपल्या सरकारनेही तशी व्यवस्था केली पाहिजे. राष्ट्रातील सर्वोच्च बुद्धिमत्ता विज्ञान विषयक कार्याकडे वळावी असा प्रगत–राष्ट्रांचा प्रयत्न आहे.

उत्पादनापुरताच विज्ञानाचा उपयोग आहे असे नाही. समाजातील अंधरूढी, भाबड्या भावना, दुबळा दैववाद यांच्यावर आघात करण्याचे सामर्थ्यही विज्ञानात आहे. विज्ञानाचे हे महत्त्व जाणून सरकारने राज्यकारभारात वास्तववादी दृष्टिकोन स्वीकारला तर शिक्षणासाठी असा पैसा उपलब्ध करणे अशक्य होणार नाही. पण त्यासाठी फाजील लोकानुरंजनास रजा द्यावी लागेल. आपल्या उद्दिष्टांच्या संदर्भात शिक्षणाचे महत्त्व क्रियाशीलतेने जाणले पाहिजे. कोणत्याही स्थितीत शिक्षणाची उपासमार होणार नाही; याची दक्षता घेतली पाहिजे. महायुद्धाच्या कठीण काळा-तही ग्रेटब्रिटनने शिक्षणासाठी उदारहस्ते अनुदान देण्याचे टाळले नव्हते; हे आपण विसरणे इष्ट नाही.

आपल्या येथे सारीच परिस्थिती उलटी आहे. आर्थिक–आपत्तीचा पहिला बळी शिक्षण असते. परवा ना. छगला म्हणाले "चौथ्या योजनेच्या काळात शिक्षकासाठी काहीही तरतूद केलेली नाही." या निवेदनात केवळ सरकारची असहाय्यता आहे की शिक्षणाविषयी अनास्था आहे; हे समजणे कठीण आहे.

शिक्षणाच्या पुनर्रचनेचा विचार करताना आणखी काही गोष्टीचा वस्तुनिष्ठ विचार होणे अगत्याचे आहे असे वाटते.

## पायावाचुनची भिंत–

आजचा आपला अभ्यासक्रम भाषांनी भारावला आहे. हा अभ्यासाचा बोजा कमी करण्याचा विचार होणे अवश्य आहे असे वाटते. यासाठी अभ्यासक्रमात

प्रत्येक भाषेचे स्थान कोणते असावे या संबंधी वस्तुनिष्ठ विचार होणे अगत्याचे आहे.

माध्यमिक शाळातील अभ्यासक्रमात इंग्रजी भाषेचे स्थान कोणते असावे हा प्रश्न अजूनही वादग्रस्त स्वरुपातच आहे. आमचे राज्यकर्ते, मान्यवर पुढारी नि शिक्षणतज्ज्ञ हे या इंग्रजी भाषेचा अद्यापही अवास्तव गौरव करीत असतात. इंग्रजी भाषेची सुयोग्यता, सुसंपन्नता, विस्तृत क्षेत्रातील तिचा वापर, तिची जागतिक प्रतिष्ठा, विविध भाषांतील शब्द सामावून घेण्याची तिची धारणा नि उदारता इत्यादि तिचे गुण मान्य करण्यास काहीच प्रत्यवाय नाही; किंबहुना इंग्रजी ही पाश्चात्य ज्ञानाचे भांडार आहे, विज्ञानाची खिडकी आहे, विचारधनाचा खजिना आहे याची संपूर्ण जाणीव असल्यामुळे आपल्या शाळांतून इंग्रजीचे अध्ययन नि अध्यापन प्रभावी व्हावे, अशीच कोणीही इच्छा बाळगील.

इंग्रजीच्या गुणगौरवातील हा विधायक भाग घेतल्यानंतर मात्र स्पष्टपणे म्हणावेसे वाटते की, आजच्या आमच्या लोकशाही राजवटीमध्ये माध्यमिक शाळेत ती परकी भाषा असल्याचे हरघडी प्रत्ययास येत आहे. तिने आमच्या मनात कधीही आपुलकी निर्माण केली नाही. आमच्या सांस्कृतिक जीवनाचे पोषण करण्यास ती कधीही उपयोगी पडलेली नाही. स्वातंत्र्याच्या चळवळीत सारा भारत पेटविण्याच्या कामी आमच्या लोक–भाषाच समर्थ ठरल्या. त्यावेळी इंग्रजीचे दौर्बल्य पुरेपूर प्रत्ययास आले. स्वातंत्र्यपूर्वकाळात तिने आपल्या प्रभावाने राज्यकर्त्यांना साहाय्यभूत होणारे हुकुमी कारकून निर्माण केले असतील नि त्याच्या निर्वाहाचा प्रश्न सोडविलाही असेल; मूठभर मातबरांना मानाच्या जागा तिने मिळून दिल्याही असतील; पण या सर्वापेक्षाही तिने केलेली आमची सांस्कृतिक नि वैचारिक हानी फार मोठी आहे, हेही विसरून चालणार नाही. राधाकृष्णन कमिशनचा या संदर्भातील अहवाल चिंतनीय आहे. " इंग्रजीतून शिक्षण घेतल्यामुळे आम्ही विचारशक्तिऐवजी स्मरणशक्तीवर भर दिला; मातृभाषेत साहित्य निर्माण करण्यास आम्ही पारखे झालो; सांस्कृतिक चालना देणे नि मनात सौहार्द निर्माण करणे ही साहित्याची प्रतिज्ञा आहे. " यातले इंग्रजीने काय केले ? कितीजणावर कोणते नि काय संस्कार केले ? कोणता सांस्कृतिक लाभ आम्हाला मिळाला ? किती जणांनी तिच्यावर प्रभुत्व गाजविले ? इंग्रजीत कितीजणांनी मोलाची ग्रंथनिर्मिती केली ? तिच्या प्रभावामुळे किती लोकांनी पांडित्य गाजवून सभा जिंकल्या ? ' आमच्या पिढीतील इंग्रजी वृत्तपत्रांची उणीव आज तुम्ही भरून काढली, असे अलिकडेच एका इंग्रजी वृत्तपत्राच्या प्रकाशनाच्या वेळी म. म. द. वा. पोतदार यानी उद्गार काढले हेही लक्षात घ्यावे.

असे असता इंग्रजीची सक्ती का करावी ? आज प्रचंड संख्येने शाळात येत असलेल्या मुलांच्या माथ्यावर हे इंग्रजी का लादायचे ? यामुळे इंग्रजी भाषा

पुरेशी अवगत होण्याची शक्यता आहे का ? इंग्रजी परकी असल्याने एवढ्या व्यापक प्रमाणात तिचे अध्यापन करणे अशक्य आहे. ती भाषा आत्मसात करायला आजची परिस्थिती प्रतिकूल आहे. जी भाषा परकी आहे ; तिचे ज्ञान आता केवळ छापील शब्दांतूनच घ्यावे लागते ; नि ते सुद्धा शाळेच्या रोजच्या ३५ मिनिटांच्या कालावधीत ! हे शक्य होईल काय ? रोजच्या जीवनात जी भाषा उपयोगी पडत नाही ; ती शिकविण्याची सक्ती एवढ्या प्रचंड विद्यार्थी–संख्येला करणे खासच हितावह नाही नि आवश्यकही नाही. शिक्षणाच्या वाढत्या विस्ताराला पुरे पडतील इतके इंग्रजी–अध्यापक आपण ऑक्सफोर्ड अगर केंब्रिजहून का आयात करणार आहोत ?

माध्यमिक शाळेत जर इंग्रजीची ही शोचनीय अवस्था तर महाविद्यालयातून इंग्रजी माध्यमाचा आग्रह धरणे कितपत इष्ट आहे ? ' पायावाचून भिंत तातडीची ' का बांधावी ? अगदी भिन्न जमिनीत इंग्रजीचे बी पेरण्याचा आपण अट्टाहास करीत आहोत नि म्हणूनच तिच्या विकासाला मर्यादा येणे क्रमप्राप्तच आहे.

## कणासाठी मणाची गैरसोय–

विज्ञान, यंत्रज्ञान, आंतराष्ट्रीय विचार–विनिमय, भारतीय–शासन–विभाग इत्यादि विशिष्ट क्षेत्रांचा विचार करतांना ती क्षेत्रे विशिष्ट विद्यार्थ्यांसाठीच असतात याचा विसर पडतो. मग वेचक विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी असंख्य विद्यार्थ्यांवर इंग्रजीची सक्ती करणे लोकशाहीच्या काळात मुळीच समर्थन नाही; नि अशा सक्तीची गरजही नाही.

एस. टी. चे कंडक्टर्स, ग्रामसेवक, कचेरीतील कारकून इत्यादि कर्मचाऱ्यांना शेक्सपियर–मिल्टन यांच्या साहित्याचा काही उपयोग आहे का ? रोजच्या जीवनात आई–वडिल, भाऊ–बहीण, पाहुणे, शेजारी यांच्याशी बोलताना, वागतांना इंग्रजीवाचून काही अडते का ? कलेक्टर, विभागीय कमिशनर, सचिव इत्यादिकांच्या नेमणुका करताना त्यांच्या इंग्रजीच्या प्रभुत्वाचा विचार करणे सयुक्तिक होईल.

या बाबतीत असा निश्चित निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. इंग्रजीची शाळांतून सोय हवी पण सक्ती असता कामा नये. इंग्रजीचे स्थान वैकल्पिक असणेच इष्ट ! ज्या भाषेतून आपले जीवन वहात आहे ती भाषा इंग्रजी नाही; ती आपली मातृभाषा आहे; हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

## परीक्षा मंडळ नि इंग्रजी–

या संदर्भात माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाने गेल्या वर्षी काढलेल्या एका परिपत्रकाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. १९६७ पासून इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेत मंडळाने बदल करण्याचे नियोजित केले आहे. इंग्रजीचा दर्जा वाढावा, हा बदलाचा

हेतू आहे. पण हा बदल ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा होणार आहे; ही गोष्ट आपण विचारात घेणे अवश्य आहे. इ. ५ ते ७ पर्यंत इंग्रजी हा विषय ऐच्छिक आहे. इ. ७ वीला या विषयाची परीक्षा नाही. ग्रामीण भागात या विषयाच्या अध्यापनाची काय परवड चालू आहे हे सांगण्याची गरज नाही. सरकारने नेमलेली इंग्रजीची जड नि रुक्ष पुस्तके ती शिकविणाऱ्या शिक्षकांचा अभाव नि अशा तऱ्हेने होणारी या विषयाची हेळसांड! यामुळे या काळात विद्यार्थी इंग्रजीबाबत जवळजवळ कोराच असतो. यानंतर या विद्यार्थ्यास एस्. एस्. सी. चा इंग्रजीचा अभ्यास इ. ८ ते ११ या चार वर्षातच पुरा करावा लागतो.

या उलट शहरी शाळांतून हा अभ्यासक्रम पुरा करायला ७ वर्षे मिळालेली असतात. अशा या दोन प्रकारच्या विद्यार्थ्यासाठी एकाच प्रकारची प्रश्नपत्रिका काढणे हे खचित अन्यायकारक आहे. अशा या पक्षपाती योजनेमुळे इंग्रजीचा दर्जा कसा सुधारणार ? हे ते ' मंडळ ' च जाणे ! मंडळाच्या या उपक्रमात न्याय तर नाहीच पण शैक्षणिक दृष्टीही नाही. अध्ययनाचा समानकाल असूनही ' मंडळाने ' सध्या प्राथमिक गणित नि उच्च गणित अशा दोन प्रश्नपत्रिका ठेवलेल्या आहेत. मग अध्ययनाच्या कालात तफावत असताना इंग्रजीच्या दोन प्रश्नपत्रिका ठेवल्या तर काय हानी होईल ? तसे केल्यास बुद्धिमान मुलांची कुचंबणा होण्याचाही प्रश्न येणार नाही.

## केंद्रांकरिता हिंदी–

हिंदी आमची राष्ट्रभाषा आहे. ' ती आम छात्रांना आलीच पाहिजे ' या एकाच सोच–विचारातून हिंदी माध्यमिक शाळांतून सक्तीची केली आहे. या सक्तीविषयी यत्किंचित कुणी नाराजी दाखविली तर त्याच्या राष्ट्रप्रेमाबद्दल शंका घेतली जाण्याची धास्ती वाटते. पण याबाबत भावनावश न होता वस्तुस्थिती ध्यानात घेऊन ' हिंदी ' च्या सक्तीसंबंधी विचार होणे अगत्याचे वाटते.

इंग्लंड, जर्मनी, जपान यांच्या इंग्लिश, जर्मन नि जपानी या राष्ट्रभाषा आहेत. त्यांची जी मातृभाषा तीच राष्ट्रभाषा झालेली आहे. हिंदीबाबत तसे म्हणणे धाडसाचे होईल. भारतातल्या आमजनतेची मातृभाषा हिंदी नाही नि ती कधी होईल याची शक्यता नाही. आमच्या देशात मातृभाषा नि राष्ट्रभाषा वेगवेगळ्या आहेत. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन लोकजीवनात तिचे स्थान कोणते आहे याचा विचार होणे जरूर आहे.

केंद्र सरकारचे कामकाज, केंद्र सरकार नि राज्य सरकार यामधील व्यवहार दोन राज्यांमधील परस्पर व्यवहार हे हिंदीतून चालावेत अशी राज्यघटनेत तरतूद आहे. यावरून भारत सरकारच्या कामासाठी या राष्ट्रभाषेचा उपयोग व्हायचा आहे. राज्य सरकारचा सर्व कारभार मातृभाषेतूनच रहाणार ! बहुसंख्य लोकांचा

संबंध या राज्य सरकारच्या कारभाराशीच येतो अशा अवस्थेत बहुसंख्य लोकावर हिंदीची सक्ती करण्याची आवश्यकता आहे का ? जर तिचा उपयोग मध्यवर्ती सरकारच्या शासनापुरताच मर्यादित रहाणार असेल तर ती सर्वांना सक्तीने शिकविण्याचा आग्रह धरण्यात काय अर्थ आहे ? ज्यांचा मध्यवर्ती सरकारशी संबंध येणार असेल त्याना ती सक्तीची केल्यास काही औचित्य राहील. हिंदी आंतरप्रांतीय व्यवहारासाठी शिकायची ! नि बहुसंख्य लोकाना असा आंतरप्रांतीय व्यवहार करण्याची पाळीच येत नाही. ब्रिटिश अमदानीत तालुका–कचेरीपर्यंत इंग्रजी पत्रव्यवहार असायचा. तरी सुद्धा सामान्य माणसाचे इंग्रजीमुळे काही अडत नव्हते आता प्रांतिक भाषेतून सर्व राज्यकारभार चालणार ! मग सर्वसामान्य माणसाना हिंदीची गरज कुठे नि कशी लागणार ? ज्ञानासाठी हिंदी कुणी शिकत नाही नि तशी ती शिकायची असेल त्यासाठी सक्तीचे कारण नाही. म्हणून इंग्रजीची सक्ती करणे जसे इष्ट नाही, तसे हिंदीची सक्ती करणेही इष्ट नि आवश्यक नाही मात्र शाळातून हिंदी वैकल्पिक घेण्याची सोय असावी.

## लोकशाहीसाठी मराठी–

लोकशाही शासनपद्धतीत मातृभाषेवर प्रभुत्व असण्याची अत्यंत आवश्यकता आहे. अविवेकाची काजळी दूर करून ज्ञानाची दिवाळी करायला तीच एक समर्थ आहे. महाराष्ट्रात आज शासनाची भाषा मराठी आहे. न्यायदान, विधानसभा, वृत्तपत्रे, ग्रंथ, व्याख्याने, सारे इथे मराठीतच चालते. इतकेच नव्हे तर आज ना उद्या महाविद्यालयीन शिक्षणही मराठीतूनच झाल्याचे प्रत्ययास येईल. मराठी साहित्य आता केवळ यशासाठी, अर्थप्राप्तीसाठी, व्यवहारासाठी वा उपदेशासाठी नाही; तर त्याला आता समाजाचे सारथ्य करायचे आहे. हे सारथ्याचे साहित्य निर्माण करण्याचे सामर्थ्य मराठीत आहे. ज्या मराठीने अध्यात्मविद्या प्रभावीपणे सांगितली, ती मराठी विज्ञानाची क्षितीजे कवटाळू शकणार नाही, हे म्हणणे युक्त वाटत नाही. 'जे समुद्राहून सखोल नि अर्थभरित मराठे बोल ऐका' असा ज्ञानेशाचा सल्ला आहे. बिंब लहान असते पण प्रकाशाने त्रैलोक्याला थोकडे करते अशी मराठी शब्दांची व्याप्ती आहे. अनुभवाला अवतार घेण्यासाठी मराठी शब्दाइतके यथार्थ साधन नाही. असे असता आधुनिक युगाला आवश्यक लागणारी क्षमता तिच्यात नाही नि ती विज्ञानकरणाची भाषा होऊ शकत नाही हे म्हणणे केवळ न्यूनगंडाचे वाटते. ज्या मराठीने गीतार्थाला प्रौढपणा आणला, संस्कृतीला मान्यता मिळविली त्या भाषेचा सखोल अभ्यास होण्याची नितांत गरज आहे. राष्ट्राच्या उभारणीसाठी मातृभाषेचाच व्यापकतेने अभ्यास नि वापर झाला पाहिजे.

## संस्कृत–सांस्कृतिक वारसा–

व्यासांचा मागोवा घेत नि भाष्यकाराते वाट पुसत आमची मराठी निघाली आहे. पण ती जिथून निघाली त्या संस्कृत भाषेचा आम्हाला विसर पडत चालला

आहे. ज्या काळात आपण एक नवी संस्कृती उभारीत आहोत त्या काळात तरी हे लक्षण बरे नाही. संस्कृत भाषा ही आधुनिक भाषांची जननी आहे. आमचे जुने मौलिक ग्रंथ याच भाषेने पुष्ट केले आहेत. संस्कृत भाषा, साहित्य नि विद्या यांनीच या देशांत सांस्कृतिक ऐक्य टिकवून ठेवले आहे. आमची जीवनमूल्ये नि जीवनादर्श तिने जतन करून ठेवले आहेत.

युरोपियनांना संस्कृतचे महत्त्व वाटते. शोपेनहॉवर उपनिषदांवर लुब्ध होतो. पाश्चात्य राष्ट्रांतील काही देशांनी संस्कृत अध्ययनाची खास सोय केली आहे. पण इथे मात्र संस्कृतची उपेक्षा ! संस्कृतच्या अभ्यासासाठी परदेशी जावे लागावे ही लाज आणणारी गोष्ट आहे. संस्कृत भाषेच्या अध्ययनाने अत्यंत संपन्न स्वरुपाचा सांस्कृतिक वारसा आपणांस उपलब्ध होतो म्हणून या भाषेचा अभ्यास ही सांस्कृतिक गरज आहे.

आज मराठी समृद्ध करण्यास संस्कृतच धावून येत आहे. संस्कृत भाषांतील शब्दानीच मराठी वृत्तपत्रे, साहित्य, व्याख्याने यांना प्रौढपणा येत आहे. मराठीचा ताल आणि डौल संस्कृत शब्दांनीच साधलेला आहे. अशी ही मराठी सर्वांच्या हाती जाणार ! तिचा संपूर्ण अर्थ कळण्यासाठी संस्कृत भाषेचा परिचय असणे अगत्याचे वाटते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ' संस्कृत ' पेलत नाही असे म्हणणे आणि मानणे हे त्या मुलांच्या बुद्धीवर विश्वास नसल्याचे लक्षण आहे. ही भाषा अवघड आहे, ही उच्चवर्णीय लोकांची भाषा आहे असा बुद्धिभेद करून मुलांच्या मनात विनाकारण संस्कृतबद्दल अप्रीती निर्माण केली जात असते. अध्यापनाची सोय नसेल तर तसे सांगावे पण त्यासाठी ' संस्कृत ' बद्दलचा असत्य प्रचार कशाला ?

संस्कृत भाषेला पूर्वीचा दर्जा मिळावा असा आग्रह आता कुणी धरणार नाही. भाषेवर प्रभुत्व हा इथे प्रधानहेतू नाहीच. जो आमचा सांस्कृतिक वारसा संस्कृतने जतन करून ठेवला आहे त्याचा परिचय करून देण्याइतके सामर्थ्य संस्कृतने द्यावे इतकीच इच्छा ! व्याकरणाच्या क्लिष्टतेमुळे जी भीती मुलांना वाटते ती दूर करण्याच्या दृष्टीने संस्कृत साहित्यातील सौंदर्याचे दर्शन घडविणारी सोपी पुस्तके उपलब्ध होणे अवश्य आहे.

संस्कृतचे हे सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन अभ्यासक्रमात तिला मानाचे स्थान दिले पाहिजे. तरीही संस्कृत–अध्यायनाची सक्ती करावी असे म्हणणे मात्र इष्ट वाटत नाही. सक्ती न करता संस्कृतचे आकर्षण वाटण्यासाठी शिष्यवृत्त्या नि अन्य सवलती देण्याची योजना कार्यवाहीत आल्यास बरीच अपेक्षा पुरी होईल.

## भाषिक–विवेक–

आज मराठी, हिंदी, इंग्रजी नि संस्कृत या सर्वच भाषांचा अभ्यास मुलाच्यावर लादला आहे. प्रगल्भ म्हणून इंग्रजी, शासन संस्थेची म्हणून हिंदी, मातृभाषा

म्हणून मराठी नि तिला पोषण करणारी म्हणून संस्कृत. अशा चार भाषांचा अभ्यास मुलांच्या माथ्यावर लादलेला आहे; त्यामुळे कोणत्याही भाषेचा नीट अभ्यास होत नसल्याचे प्रत्ययास येते. इंग्रजी येत ताही, संस्कृत कळत नाही, हिंदी कुछकुछ समजते नि मराठी जेमतेम येते; अशी मुलांची अवस्था आहे. भाषाभ्यासाचा हा अवजडपणा कमी करणे अवश्य आहे. त्यासाठी केवळ मातृभाषा सक्तीची असावी नि उरलेल्या तीन पैकी कोणत्याही दोन भाषा घ्याव्यात. मात्र संस्कृतला उत्तेजन देण्याची योजना असावी. एकावेळी तीन पेक्षा अधिक भाषा शिकविणे इष्ट नाही. विज्ञानासारखे विषय मराठीतून शिकविण्यासाठी पाठ्य–पुस्तके नसतात ही अडचण महाविद्यालयांतून नेहमीच पुढे येते; पण याबाबत

" केल्याने होत आहे रे। आधी केलेच पाहिजे "

हा समर्थांचा उपदेश ध्यानी घेतल्यावाचून मार्ग नाही.

## सांस्कृतिकाचे केंद्रीकरण–

गेल्या वर्षी इ. ४ नि ५ वी साठी आपल्या सरकारने भूगोलाची पुस्तके काढली नि शिक्षणक्षेत्रात एक वादळ उठले. त्याची उडालेली धूळ जरी आता खाली बसली असली तरी त्या आवर्तातून अद्यापही एक प्रश्न डोकावत आहे. ' पाठ्य पुस्तकांचे राष्ट्रीयकरण इष्ट काय ' ? याचे निर्णायक उत्तर अद्याप उपलब्ध झालेले नाही. राष्ट्रीयीकरण करण्याबाबत महाराष्ट्र सरकार नुसतेच आग्रही आहे असे नसून या कामी त्याने आपली प्रतिष्ठा पणाला लावल्यासारखे दिसते.

शिक्षणाचे ध्येय नि कार्य या बाबत आपले राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् म्हणतात की, " राजकीय अगर धार्मिक मूल्यापासून सर्वस्वी वेगळी अशी मूल्ये उच्चतर वास्तवतेत आहेत. त्या वास्तवतेचा नि या भूतलावरील मानवीजीवनाचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. त्या संबंधाची जाणीव करून देऊन आपण सारे एक आहोत अशी शिकवण देणे ही आपल्या भव्य भारताची प्राचीन काळापासून चालत आलेली शिक्षणाच्या हेतूविषयी नि कार्याविषयीची कल्पना आहे. "

या थोर विचाराचा थोडक्यात आशय एवढाच की, माणसाच्या मनातील सांस्कृतिक भावनांचा परिपोष नि मानवी मूल्यांचा विकास ज्या साधनांच्यावतीने साधता येतो; त्याला शिक्षण म्हणजे सार्थ होईल. पाठ्य-पुस्तके ही सांस्कृतिक साधने आहेत. या सांस्कृतिक साधनांचे सरकार राष्ट्रीयीकरण करू इच्छिते.

विचार स्वातंत्र्य हा लोकशाहीचा पाया आहे, राष्ट्रीयीकरणाने या विचारस्वातंत्र्याचीच गळचेपी होणार आहे. यासाठी राष्ट्रीयीकरण म्हणजे काय ? नि ते का करायचे याची जाणीव करून घेणे आवश्यक आहे.

राष्ट्रीयीकरण म्हणजे प्रस्थापित सरकारची मालकी! समाजातील शोषणास आळा बसावा, धंद्यात एकसूत्रीपणा यावा नि होणारा नफा देशाच्या कारणी लावावा हाच राष्ट्रीयीकरणाचा हेतू असतो.

पाठ्य–पुस्तकांच्या राष्ट्रीयीकरणाने यांतील कोणता हेतू साधू शकेल? मोठ्या प्रमाणात पुस्तकाचा प्रसार होईल; शिक्षणात सुसूत्रता नि समानता आल्याचे दिसेल; पण ही समानता म्हणजे बाह्यात्कारी सारखेपणा असतो. अंतर्यामीचा नाही. बाह्य परिस्थितीचा सारखेपणा हा मानसिक बदलाचा निदर्शक असतो असे मानता येत नाहीं. पुस्तकांच्या राष्ट्रीयीकरणाने त्यांचे यांत्रीकीकरण होईल. पण मूल्य परिवर्तन होणार नाही.

माणूस हाच सर्व गोष्टीचा मानदंड आहे. ( Man is a measure of all things. ) हे लोकशाहीचे तत्त्व आहे. राष्ट्रीयीकरण व्यक्तीचा विचार करीत नाही. उलट राष्ट्रीयीकरणाखाली व्यक्तित्व भरडले जाते. रशियातील नामवंत शिक्षणतज्ञ कॉमरेड एम्. आय्. कॉलिनिन शिक्षणाच्या कार्याबद्दल म्हणतो की,

The fundamental and chief task of Communist Education is to render maximum help in the class struggle. It ( Communist, Education ) has to be sub-ordinated to the task facing the party and Soviet–State.

राष्ट्रीयीकरणाच्या रणगाड्याखाली व्यक्तिविकास कसा मातीमोल होतो याचे हे चित्र सरकारने नीट पहावे.

वास्तविक राष्ट्रीयीकरण हा एक आर्थिक सिद्धांत आहे. कोणत्या गोष्टीचे राष्ट्रीयीकरण करावे याचे काही शास्त्रीय संकेत असतात. या संकेतात सांस्कृतिक साधनांचा समावेश करणे मुळीच संयुक्तिक नाही. मुलाच्या मनावर मालकी चालविण्याचे हे साधन मात्र होईल. सत्तेच्या साधनाने मुलांची मने घडविता येतात; त्यांचा विकास साधता येत नाही. कारण साचेबंद विचार व्यक्तित्वाचा कोंडमाराच करतात.

आजची पुस्तके महाग म्हणून राष्ट्रीयीकरण असेल तर आजारापेक्षा उपचार भयावह होणार आहेत. प्रकाशकांची नफेबाजी डोळ्यांवर येत असेल तर नियंत्रणानी त्यांच्या नफेबाजीला आळा घालणे शक्य आहे. लोकशाहीत डोक्याच्या आकाराची टोपी करतात; तर राष्ट्रीयीकरणाने टोपीच्या आकाराचे डोके करावे लागते. साहजिकच मग डोक्याची काटछाट करणे भाग पडते. डोक्याची वासलात लावणाऱ्या योजनेतून विचारवंत नागरिक कसा निर्माण होईल?

समाजात मानवी मूल्य हे अंतिम आहे; हे लक्षात घेऊन राष्ट्रीयीकरणाचा विचार सोडून देणे इष्ट आहे. नाहीतर व्यक्तिस्वातंत्र्य नि समाजहित यातील

समतोल ढळण्याची भीती आहे. सरकारने शिक्षणाचे संरक्षण करावे पण शिक्षणावर सत्ता गाजवू नये.

## वीरवृत्तीची पूजा–

व्यक्ति विकासाला विघातक होणारी पाठ्य–पुस्तके न काढता, स्थूल वाचनासाठी उत्कृष्ट पुस्तकांची माला प्रकाशित करण्याचे काम सरकारने हाती घेतल्यास खचितच हितकारक होईल. क्रमिक पुस्तकांचे प्रकाशन खाजगी प्रकाशकाकडे सोपविण्यास प्रत्यवाय असण्याचे कारण नाही. स्थूल वाचनाच्या पुस्तकाकडे खाजगी प्रकाशक वळणार नाहीत; म्हणून हे काम सरकारने हाती घ्यावे.

इतकेच नव्हे, तर इंग्रजी, हिंदी, मराठी नि संस्कृत अशी भाषा विषयांची जी क्रमिक पुस्तके मंजूर होतात, त्या मंजुरीच्या निकषामध्ये 'वीरवृत्तीची पूजा' हा एक निकष समाविष्ट करणे अगत्याचे वाटते. राष्ट्रीय भावना उद्दीपित करणारे नि समाज परिवर्तनाची इच्छा प्रस्फुरित करणारे पाठ क्रमिक पुस्तकात आहेत की नाहीत याचा आवर्जून विचार होणे अवश्य आहे. इतर वाङ्मयीन गुणांबरोबर 'वीरवृत्तीची पूजा' हा गुण महत्वाचा मानावा.

अशी क्रमिक–पुस्तके असतील तरच मंजुरी मिळावी. पण एवढ्याने पुरेसे होणार नाही.

गेल्या १०० वर्षात जगात भौतिक, वैज्ञानिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात अनेक परिवर्तने झाली. ही परिवर्तने घडवून आणणाऱ्या वीरांची चरित्रे मुलांच्या वाचनात येणे आवश्यक आहे. रणांगणावर शत्रूशी लढताना जवानांची जी 'उन्मनी' अवस्था असते तशीच अवस्था ध्येयाने धुंद झालेल्यांचीही असते. हे ध्येयवादीही वीरच असतात. या वीरांच्या पराक्रमांचा परिचय मुलांना होण्याची नितांत गरज आहे.

अशी चरित्रे श्री. खांडेकर, अत्रे, पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर प्रभृती सिद्धहस्त लेखकांकडून सरकारने मुद्दाम लिहून घ्यावीत. ही लेखक मंडळी हे काम आनंदाने करतील. ती उत्कृष्ट छपाईत प्रकाशित करावीत, नि अत्यंत कमी किंमतीत शाळांना उपलब्ध करून द्यावीत.

सरकार शाळांना वाचनालयासाठी कधी कधी अनुदान देते; हे अनुदान या पुस्तकांच्या स्वरूपात दिल्यास अधिक सोयीचे नि इष्ट होईल. तेव्हा अशा तऱ्हेचे लोकोपयोगी कार्य सरकारने त्वरेने हाती घ्यावे.

## शिक्षणाचा कणा–

शिक्षणाची पद्धती कितीही निर्दोष असली तरी ती यशस्वी नि कार्यक्षम होण्यासाठी चारित्र्य-संपन्न, तज्ञ नि कार्यक्षम शिक्षकांची आत्यंतिक आवश्यकता

असते. म्हणूनच ‘ शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा कणा आहे ’ म्हणणे युक्त वाटते.

शिक्षकाला पुरातनकाळी प्रतिष्ठा होती. राजपुत्रांनाही गुरूची सेवा करावी लागे. राजदरबारी नि जनतेत गुरूला मोठा मान मिळे नि शिक्षणात शासनसंस्थेचा हस्तक्षेप अभावाने असे.

पुरातन काळची शिक्षकांची ही प्रतिष्ठा कधीच इतिहासजमा झालेली आहे. आजचा शिक्षक हा एखाद्या खाजगी संस्थेचा, नगरपालिकेचा, जिल्हापरिषदेचा अगर राज्ययंत्रणेचा नोकर आहे. तो एक बुद्धीजीवी कर्मचारी आहे. हे त्याचे आजचे वास्तव स्वरूप आहे.

म्हणून प्राचीन काळच्या मानदंडाने आजच्या शिक्षकाची उंची मोजणे अप्रस्तुत आहे. शिक्षकांनीही अशी आपली परंपरा सांगण्यात स्वारस्य नाही. नि इतरांनीही शिक्षकांना या परंपरेची जाणीव करून देण्यात मतलब नाही. कारण आजचा शिक्षक पगार घेतो त्याला गुरुदक्षिणा मिळत नाही; हे लक्षात असणे इष्ट!

मात्र हा मिळणारा पगार त्याला हक्काने मिळाला पाहिजे नि तो सुखा-समाधानाने जगता येईल इतका मिळाला पाहिजे; एवढीच त्याची अपेक्षा आहे. ज्या समाजात पैशाला परमेश्वर मानण्याची प्रवृत्ती प्रकर्षाने वावरत आहे त्या समाजात अकिंचनाला प्रतिष्ठा कशी मिळेल ? ‘ सार्वजनिक समारंभात शिक्षकांना मान द्या. ’ असल्या सरकारी आदेशांनी मान मिळत नसतो; याची जाणीव शिक्षकाला आहे. शिक्षक कोणाकडूनही मानाची वा दानाची याचना करीत नाही; पण केलेल्या श्रमाचा मोबदला हक्काने मिळावा ही त्याची रास्त अपेक्षा असते. दानाने जगण्यापेक्षा मानाने जगण्याची त्याची इच्छा आहे.

ज्यांच्याकडे मते त्यांच्याकडे नेते ! शिक्षकाजवळ मते कुठून असणार ? ती नाहीत म्हणून तर त्यांच्या उपोषणाचा उपहास करण्याचे धैर्य नेत्यांच्या ठायी निर्माण होते. सरकारी नोकरांच्या वेतनश्रेणीचा परिणाम शिक्षकांच्या वेतनश्रेणीवर काय होईल; याचा विचार करून मग शिक्षकांची वेतनश्रेणी सुचवावी असा आदेश ‘ बडकस ’ मंडळाला दिला असल्याचे कळते. सरकारी नोकरांच्या वेतनश्रेणीच्या वळचणीखाली शिक्षकांची वेतनश्रेणी ठेवणाऱ्या सरकारला शिक्षकाविषयी किती सहानुभूती आहे याची कल्पना येईल.

ज्या जीवनात मान नाही किंवा शान नाही अशा दुर्दैवी जीवनाचा स्वीकार करण्यास बुद्धिमान तरुण कसे तयार होणार ? निरुत्साही, अन्यत्र बेकार नि अगतिक झालेले तरुण नाइलाजाने या व्यवसायात पडतात हा आजचा अनुभव आहे.

आपल्या मुलाला उत्कृष्ट शिक्षक मिळावा ही प्रत्येक पालकाची इच्छा असते; पण आपल्या मुलाने शिक्षक होऊ नये अशी प्रत्येक पालक परमेश्वराजवळ प्रार्थना करीत कसतो; अशी आहे शिक्षकाच्या जीवनाची शोकांतिका !

या व्यवसायाकडे समाजातील बुद्धिमत्ता वळावी असे वाटत असेल तर तिच्या प्रतिष्ठेला शोभेल अशी वेतनश्रेणी तिला मिळाली पाहिजे. तरच मी शिक्षक आहे, हे सांगताना शिक्षकाला अभिमान वाटेल, नि या स्वतंत्र राष्ट्रात माझे काही तरी मोठे स्थान आहे ही प्रबळ भावना त्याच्या मनात तेवत राहील !

ही वेतनश्रेणी वाढविली की, शिक्षण प्रगतीपथावर धावू लागेल असा समज होणेही इष्ट नाही. समाजवादी समाजरचना करण्याच्या प्रयत्नात शिक्षकांचे स्वातंत्र्य आज पायदळी तुडविले जात आहे. शिक्षकाला, आज ना विचार–स्वातंत्र्य ना कृति–स्वातंत्र्य ! त्याची बुद्धि बंदिस्त असून कर्तृत्व कोंडलेले आहे. म्हणून वेतनवाढीबरोबर शिक्षकाच्या प्रयोगशीलतेला वाव मिळणेही आवश्यक आहे.

## मधुकरीवर अन्नछत्र–

५ सप्टेंबर हा ' शिक्षक दिन ' पाळण्याबाबत सरकारचा आदेश असतो. हा दिन कसा पाळावा याच्याही सूचना खात्याकडून आलेल्या असतात. शिक्षकांनी विद्यार्थ्यांची फेरी काढावी नि समाजातून विद्यार्थ्यांमार्फत आर्थिक–सहाय्य मिळवावे, अशी एक महत्त्वाची सूचना त्यात असते. हे कशासाठी ? तर शिक्षकांची समाजातील प्रतिष्ठा वाढविण्यासाठी ! यापेक्षा अधिक चांगला विनोद कोणता असेल ? मुलांनी मागितलेली मधुकरी शिक्षकांनी गोळा करायची, ती त्यांनी सरकारकडे द्यायची नि मग सरकारने शिक्षकांसाठी अन्नछत्र उघडायचे; हा खासा मामला आहे की नाही ? जोगवा मागून वा भिक्षांदेही करून जर प्रतिष्ठा मिळती तर उमेदवारांनी निवडणुका लढविल्या नसत्या की सभेत विद्वानांना पांडित्याचा आकान्त करावा लागला नसता ! म्हणून सरकारने ही उपहासाची पद्धती बंद करावी.

' शिक्षक दिन ' साजरा करण्यापाठीमागील हेतू जरी शुद्ध नि पवित्र असला तरी नोकरशाही त्याला कसे विकृत स्वरुप देते याचे हे उत्तम उदाहरण आहे. शिक्षक दिन साजरा करायचा तर तो समाजाने करावा. शिक्षक सहकार्य देतील. या कार्यक्रमात शिक्षक, शिक्षण–संस्था, किंबहुना शिक्षण–खातेही या सर्वांची भूमिका पुढारीपणाची असू नये पण सहकाराची असावी; याने शिक्षकांची प्रतिष्ठा वाढेल.

## गंगोत्रीत गढूळपणा–

पिढ्यान् पिढ्या परिस्थितीच्या नि परंपरेच्या दडपणाखाली कित्येक वर्षे बहुजनसमाज दडपला होता. स्वातंत्र्यानंतर त्याच्या मनाला नवी उमेद आली.

विद्यालालसेने उफाळलेल्या या समाजाला सर्व प्रकारची संधी उपलब्ध करून देणे हे आपले कर्तव्य आहे; असे सरकार, पुढारी, समाजधुरीण यांना वाटले तर ते स्वाभाविक आहे. पण शिक्षण क्षेत्रात अशी संधी देताना विशेष विवेकाची गरज असते हे विसरणे इष्ट नाही.

शिक्षण–क्षेत्रात सर्रास संधी देण्याने भूतदयेचे पालन होईल; पण समाजवाद कळत न कळत पायदळी तुडविला जाईल. हे ध्यानी घेतले पाहिजे. वंचित समाजाचा उद्धार दयेने करण्याची कल्पना हितकारक नाही. अशा दलित नि उपेक्षित समाजाला स्वाभिमानाने उभे रहाता येईल असे सामर्थ्य निर्माण करणे महत्वाचे आहे. त्यासाठी जी साधने नि ज्या सवलती देता येतील त्या सर्व जास्तीत जास्त उपलब्ध करून देणे हे समाजाचे कर्तव्य आहे. केवळ मागासलेला म्हणून त्याला शाळेत शिक्षक नेमल्यास त्याची आर्थिक उन्नती केल्याचे श्रेय मिळेल पण त्यामुळे शैक्षणिक प्रगतीला प्रतिबंध निर्माण होतो हे लक्षात घेतले पाहिजे. शिक्षकांच्या नेमणुका गुणवत्तेच्या निकषावरच व्हाव्यात; सामाजिक, राजकीय वा अन्य उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी या नेमणुका झाल्या तर शैक्षणिक मूल्यांच्या दृष्टीने ही गोष्ट अनिष्ट होईल. शिक्षण क्षेत्रात शैक्षणिक मूल्यांनाच प्राधान्य हवे; आगांतुक मूल्यांना प्राधान्य दिल्यास शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य होणार नाही.

राजकारणी लोकांनीही आपल्या राजकीय उद्दिष्टांना या क्षेत्रात हस्तक्षेप करण्यास वाव देता कामा नये. सवंग लोकप्रियतेसाठी शिक्षण संस्थांचा वापर करण्याचा मोह त्यांनी टाळला पाहिजे. शिक्षणक्षेत्र हे आपल्या राजकीय विचाराचे पृष्टिवर्धक क्षेत्र आहे; हा विचार त्यांनी सोडला पाहिजे. सेवा करण्यास उत्सुक असलेला माणूस कोणत्याही जातीचा, धर्माचा, पंथाचा असो त्याच्या सेवेची कदर करण्याची संवय पुढाऱ्यानी लावून घेतली तरच शाळांतून शैक्षणिक मूल्याचेच संगोपन नि संरक्षण होईल. शिक्षण क्षेत्रांतील अन्य उद्दिष्टांच्या प्रभावामुळे नवी विषमता येत असून लोकशाहीच्या गंगोत्रीतच गढूळपणा निर्माण होत आहे. याकडे लक्ष वेधावेसे वाटते.

## नवी विषमता–

संपत्तीमान, सत्ताधीश, पुढारी अशा समाजातील मातबर मंडळींची मुले ‘ पब्लिक स्कूल ’ मध्ये शिकत असलेली दिसतात. सुसंस्कृत घरांतील या मुलांना आपल्या शैक्षणिक प्रगतीसाठी सर्व सुखसोयी नि साधने उपलब्ध असतात; त्यांना उत्कृष्ट शिक्षक लाभतात. पण मोलमजुरी करणारा, शेतात राबणारा, पोटासाठी हाडाची काडे करणारा असा जो दलित नि श्रमिक वर्ग आहे त्यांची मुले आमच्या देशी शाळांतून असतात. या मुलांच्या नशिबी जे शिक्षक येतात ते राजकीय हेतूने वा भूतदयेने नेमलेले. मग या मुलांची प्रगती कशी होणार ? उच्च अधिकारपदे

मिळविण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठायी कसे निर्माण होणार ? सारांश जिथे ज्याची आवश्यकता नाही तिथे ते अट्टाहासाने दिले जाते नि जिथे ज्याची अत्यंत गरज आहे तिथून ते निग्रहाने काढून घेतले जाते; असे हे विलक्षण चित्र आज शिक्षण-क्षेत्रात दिसत आहे. त्यामुळे गरीब नि श्रीमंत, आहेरे नि नाहीरे यातील अंतर कमी होण्याऐवजी अधिकाधिक वाढतच आहे. हे सरकारने नि समाजसुधारकांनी ध्यानी घेतले पाहिजे. 'पब्लिक स्कूल' ही धनिकांच्या मुलांची मिरास असण्या-ऐवजी समाजातील सर्व थरांतील बुद्धिमान मुलांच्या शाळा झाल्या तरच त्यांना 'पब्लिक स्कूल' हे नाव सार्थ होईल. अशी 'पब्लिक स्कूल्स्' काढण्याचा सर्व-तोपरी प्रयत्न झाला पाहिजे. अशा 'पब्लिक स्कूल्स्' मध्ये आपल्या भारतीय संस्कृतीला प्रवेश बंदी न होईल याची कटाक्षाने दखल घेतली जाईलच.

## 'विशेष' विरहित विद्यार्थी–

अशा 'पब्लिक–स्कूल'ची गरज आज तातडीने जाणवू लागली आहे. माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळ कुशाग्र बुद्धीच्या मुलासाठी 'विशेष' (Special) प्रश्नपत्रिका काढण्याचे योजित आहे आजच्या अभ्यासक्रमावर आधारलेल्या प्रश्न-पत्रिकांचा समावेश 'सामान्य' ( Ordinary ) सदरात होणार असून, उच्चतर अभ्यासक्रमावरील प्रश्नपत्रिका 'विशेष' म्हणून मानल्या जातील. इंग्रजी, गणित, शास्त्र नि अभिजात भाषा ( Classical Language ) या विषयासाठी हा 'विशेष' निर्माण होणार आहे. या 'विशेष' अभ्यासक्रमामुळे कुशाग्रबुद्धीच्या मुलांना आपले बुद्धिप्राविण्य प्रगट करण्यास संधी मिळेल; असा या संबंधात मंड-ळाने आपला हेतू व्यक्त केला आहे.

सर्व साधनांनी सुसज्ज अशा शहरी शाळातील कुशाग्र बुद्धीच्या मुलांना एस. एस. सी. परीक्षेतील हा 'विशेष' योग्य नि लाभदायक असला तरी तो ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा आहे असे वाटल्यावाचून रहात नाही. समानतेच्या स्थूल कल्पनांचा आग्रह धरून, केवळ शहरी शाळांतील विद्या-र्थ्यांना मिळणाऱ्या या संधीला विरोध करणे इष्ट नाही; याची जाणीव आहे सामाजिक न्यायासाठी प्रगतीचा बळी द्यावा असे कोणी म्हणणार नाही. तरीही ग्रामीण भागातील कुशाग्रबुद्धीच्या मुलांना ही 'विशेष' संधी उपलब्ध नसल्याची उणीव मनाला वेदना दिल्यावाचून रहात नाही.

ग्रामीण भागात या 'विशेष' विषयांच्या शिक्षकांचा अभाव असतो. सर्व-सामान्य शैक्षणिक साधनांचाही तिथे दुर्मिळता असते. अशा प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाची वाटचाल करणारे प्रखर बुद्धीचे विद्यार्थी या 'विशेष' योजनेचा लाभ घेण्यास कसे समर्थ होणार ?

प्रत्येक मुलास नि मुलीस आपला शैक्षणिक विकास साधण्यासाठी आवश्यक संधी मिळणे हे लोकशाहीत अभिप्रेत असते. म्हणून अशा ग्रामीण भागांतील कुशाग्र बुद्धीच्या मुलांना वेचून घेऊन त्यांच्या शिक्षणाची सोय ' पब्लिक स्कूल्स ' काढून सरकारने विनामूल्य करावी, असे झाले तर ' परीक्षा मंडळा ' च्या या योजनेशी निगडित असलेला सामाजिक अन्याय दूर होण्याची शक्यता आहे.

## परीक्षा नि नियंत्रणे–

आजच्या परीक्षा पद्धतीविषयी कोणीही फारसे चांगले बोललेले ऐकू येत नाही. पण जोपर्यंत परीक्षा अपरिहार्य आहेत तोपर्यंत वेळी अवेळी त्यांच्या अनुदार उद्‌गार काढण्याने काय साधणार आहे ? अशा उद्‌गारांनी विद्यार्थ्यांची निष्ठा मात्र विचलित होते नि अकारण त्यांचा बुद्धिभेद होत असतो. या परीक्षा पद्धतीवर अशी विघातक टीका करण्यापेक्षा त्यात सुधारणा कशा करता येतील याचा विचार प्रामुख्याने होणे अगत्याचे आहे.

अभ्यासक्रम नि परीक्षा यावर अधिकाधिक नियंत्रणे ठेवली म्हणजे शिक्षणात सुधारणा होईल असा सरकारचा समज असावासा वाटतो. नियंत्रणे कमी की गुणवत्ता कमी अशी सरकारची धारणा आहे नि म्हणूनच या नियंत्रणांचा संबंध अनुदानाशी जोडण्यात सरकारने दक्षता घेतलेली दिसते. पण सरकारचा हा दृष्टिकोन शुद्ध व्यावहारिक आहे; शैक्षणिक दृष्टिकोन हा नव्हेच हे सहज उमगणार आहे.

मुळीच नियंत्रणे नसावीत असे नाही. ती विचाराधिष्ठित असावीत इतकाच आग्रह ! केंद्रीय शिक्षणमंत्री–म्हणतात, " शिक्षणावर केंद्राचे नियंत्रण हवे " हे ऐकून थोडी गमंत वाटते. नियंत्रण राज्यसरकारचे असावे की केंद्रसरकारचे असावे हा विचार महत्त्वाचा नसून नियंत्रणे कमी कशी होतील हा विचार महत्त्वाचा आहे. भावनात्मक ऐक्य साधण्यासाठी केंद्रनियंत्रित शिक्षण असले पाहिजे ही घोषणा गोंडस वाटत असली तरी प्रत्यक्षात तिचा अनुभव अनकूल नाही. केंद्रसरकारच्या नियंत्रणाखालील बनारस, अलिगड, विद्यापीठे यांचा कारभार काय दर्शवितो ? राज्यसरकारची नियंत्रणे चांगली असतात असे नाही पण केंद्रीय नियंत्रणांनी सारे सुरळीत होईल याला काय आधार ? भावनात्मक ऐक्यासाठी केंद्रीय नियंत्रणांची मुळीच गरज नाही. राज्यसरकारे हे भावनात्मक ऐक्य निर्माण करण्यास असमर्थ असण्याचे कारण नाही.

## भावनात्मक ऐक्य–

विद्यार्थ्यांच्या मनाची मशागत शाळांत होते, म्हणून भावनात्मक ऐक्याचे संगोपन नि संवर्धन करण्याची जबाबदारी शाळांची आहे ही जाणीव शाळांना सदैव दिली जात असते. याबाबत योग्य ती जबाबदारी पार पाडणे शाळांचे कर्तव्य आहे यासंबंधी काहीही शंका नाही.

शाळांना ही जाणीव विशेषत्वाने देण्यात अशी अभिप्रेत भावना असते की, आजच्या शाळा हे आपले कर्तव्य योग्य रीतीने पार पाडत नाहीत. वादाचा मुद्दा निर्माण होतो तो इथेच !

आमचा असा दावा आहे की, समाजातील इतर कोणत्याही संस्थापेक्षा जास्तीत जास्त भावनात्मक ऐक्याचे दर्शन जर कुठे होत असेल तर ते आमच्या शाळांतूनच ! शाळांतील एकाच गणवेषधारी मुलांतून श्रीमंत नि गरीब अशी मुले वेचून काढता येणार नाहीत. ब्राम्हण, मराठा, जैन, लिंगायत, हरिजन, गिरिजन अशा विविध जाती जमातीची मुले एकाच वर्गात, एका बाकावर वा शेजारी शेजारी बसून आपले अध्ययन करीत असतात. ही सारी मुले क्रीडांगणावर निर्व्याजपणाने एकत्र खेळत असतात. संमेलनासारख्या प्रसंगी एकाच पंक्तीला बसून भोजन करतात. भेदाची कोणतीही भावना शालेय जीवनात मुलांच्या मनाला स्पर्श करीत नाही.

शिक्षकही साऱ्या मुलांना सारखे शिक्षण देतात; शिक्षणदानात पंक्तिप्रपंच होत नाही. थोरामोठ्यांची चरित्रे सांगून सद्‌गुणांची जोपासना करण्याचा यथाशक्ती यत्न करीत असतात.

या साऱ्या वातावरणाचा परिणाम शाळेत मुलांच्या वर्तनातून प्रतीत होतो; मुले विनयाने वागतात; शिस्तीने रहातात. शाळेचे काम ते आपले काम या आपुलकीने उत्सव–समारंभात कष्ट उपसतात. शाळेतील सात वर्षे विद्यार्थी अशा रीतीने भावनात्मक ऐक्याचे जीवन जगत असतो.

पण हा मुलगा समाजात उतरला की, त्याच्या मनावर उमटलेले सच्छीलतेचे चित्र झपाट्याने नाहीसे होऊ लागते. शाळेत संपादित केलेल्या आचारविचारांना समाजात मान नसल्याचे त्याच्या प्रत्ययास येऊ लागते. शाळेत चारित्र्यसंपन्नतेची आरती ऐकलेली पण समाजात काळाबाजारवाल्याचा ' उदो उदो ' दृष्टीस दिसत असलेला, शाळेतील गुणवत्तेच्या प्रतिष्ठेचे बोल कानांत घुमत असलेले पण जीवनांत वशिल्यावाचून सारे व्यर्थ असलेले असे अनुभव त्याला येऊ लागतात. सामाजिक प्रतिष्ठेची स्थाने भ्रष्ट जीवन जगणाऱ्या लोकांना मिळत आहेत हे त्याला प्रत्यक्ष प्रत्ययास येते; हे सारे पाहून त्याच्या आचारविचारांत स्थित्यंतर न होईल तरच नवल. अशा अवस्थेत शाळातील संस्कार कसे अबाधित राहणार ? कारण शाळेतील संस्कार समाजातील अनुभवाने दृढ होत असतात. साहजिकच समाजातील प्रतिष्ठा मिळविण्यासाठी तो ' जवळचे मार्ग ' ( Short-cuts ) चोखाळू लागतो.

यासाठी शाळा नि समाज यात संवादित्व हवे, दोहोतील वातावरण परस्परांना पोषक पाहिजे. तसे ते पूर्वी होते. " देशासाठी जिवाचे बलिदान करण्याची तयारी हवी " असा विचार शाळेत कानी आला की समाजातील सभेत क्रांतिवीर भगतसिंगाच्या पराक्रमाची गाथा ऐकायला मिळायची ! खेरीज उपदेशकाच्या विचाराला क्रियाशीलतेचे अधिष्ठान असल्याचा प्रत्ययही येत असे. हल्ली यातील काय होते ?

समाजात मूल्ये निर्माण करणे नि असलेली अबाधित राखणे हे कार्य समाज-सेवक, राजकीय पुढारी यांनी आवर्जून केले तर शाळांना जबाबदार धरण्यास मुळीच प्रत्यवाय नाही. पण हे जोवर होत नाही तोवर या जबाबदारीसाठी केवळ शाळांचा निर्देश करणे म्हणजे ' कात्रजचा घाट ' दाखविण्यासारखे होणार आहे.

## आजचा अभ्यासक्रम–

शिक्षणाचा प्रसार वेगाने होत आहे; पण शाळातून दाखल होणारी मुले मागासलेल्या नि संस्कारशून्य वातावरणातून येत आहेत ही वस्तुस्थिती सध्याचा अभ्यासक्रम आखताना लक्षात घेतलेली दिसत नाही. विषयांची संख्या नि अपेक्षित अभ्यासाचे प्रमाण दोन्ही वाढलेली आहेत. इ. ५ ते ७ चे इंग्रजी नि इ. ८ नि ९ चे सामाजिक शास्त्र यांचा विचार केला तर माझ्या विधानाचा प्रत्यय येईल.

अभ्यासक्रम आखताना मुलांचे वय, त्यांची परिस्थिती नि अभ्यास पूर्ततेची कालमर्यादा या गोष्टी विचारात घेणे अवश्य असते. अभ्यासक्रम लवचिक असावा. एकदा अभ्यासक्रमाची अपेक्षा व्यक्त झाली म्हणजे मग ती कार्यवाहीत आणण्याचे स्वातंत्र्य शिक्षकास असावे; त्याच्या कार्यक्षमतेवर विश्वास हवा. बाह्य नियंत्रणा-खाली शिक्षण रुजतही नि वाढतही नाही.

आजचा शिक्षक या अर्थाने गुलाम आहे. त्याच्यावर शासनाचे स्वामित्व आहे; अभ्यासक्रमही त्यातून मुक्त नाही. याचा परिणाम शाळेचे जीवन यांत्रिक होण्यात झाला आहे. अभ्यासांत कर्मठपणा आला असून तो अवजडही झाला आहे. जितका अभ्यास अवजड तितकी गुणवत्ता अधिक असा समज या बुडाशी असावासे दिसते.

आजचा अभ्यासक्रम परीक्षार्थी आहे, त्यामुळे मर्यादित मुदतीत तो संप-विण्याची शिक्षकाला घाई असते. शालान्त परीक्षेत विद्यार्थी पास कसा होईल एवढीच शिक्षकाची विवंचना ! उत्तीर्णता नि कार्यक्षमता यांचे समीकरण मांड-ण्यात आले आहे.

अभ्यास अवजड असू नये याचा अर्थ तो मुळीच अवघड असू नये असा नाही. बुद्धिमान विद्यार्थ्यांच्या बुद्धीला झुंज देईल असा काही कठीण भाग अभ्यासात असणे अवश्य आहे परंतु अभ्यासक्रम अधिकाधिक सोपा करण्याकडे प्रवृत्ती होत चालली आहे. ही प्रवृत्ती विद्यार्थ्यांच्या बुद्धीवरील अविश्वासाची निदर्शक आहे सारा अभ्यास सोपा केला तर या सोप्यातून ज्ञानाच्या देवघरात विद्यार्थी कधीही जाणार नाही हे लक्षात ठेवणे अवश्य आहे.

## माध्यमिक शाळा नियमावली ( Secondary School Code )–

१९६३ पासून अमलात असलेल्या ' अनुदान संहिते ' मध्ये Grant in-aid Code काही नियम कमी अधिक करून सरकारने ' माध्यमिक शाळा नियमावली '

नुकतीच प्रगट केली आहे. या नियमावलीच्या नावात अनुदानाचा अनुल्लेख हा सरकारने अंगिकारलेल्या शैक्षणिक दृष्टिकोनाचा निदर्शक असावा असे वाटते. तीच गोष्ट ' विद्या–समिती ' ची ( Academic Council ) ! ही समिती म्हणजे अनुदान संहितेतील शिक्षक–समिती. नावातील हा बदलही अन्वर्थक असून बदललेल्या दृष्टीचा सूचक वाटतो.

अनुदान संहितेच्या शाळा–समिती ( School Committee ) मधील मूक शिक्षक–प्रतिनिधी या नियमावलीत बोलका झाला आहे. मात्र आता हा प्रतिनिधी निवडून येणार नसून ज्येष्ठतेने नियुक्त होणार आहे. संस्थेच्या अनेक शाखांतील मुख्याध्यापकांनी शाळा समितीवर निवडून दिलेला मुख्याध्यापक प्रतिनिधी रद्दबातल होऊन नवीन सुसूत्रीकरणसमिती (Co-ordination Committee) निर्माण करण्यात आली आहे.

' विद्या–समिती ' मधील शिक्षक प्रतिनिधी कायम शिक्षकांनी निवडून दिलेले असणार आहेत.

' शाळा-समिती ' त शिक्षक प्रतिनिधी नियुक्तीने नि ' विद्या–समिती ' त ते निवडणुकीने येणार आहेत. प्रतिनिधित्वाच्या पद्धतीत असा फरक करण्यातील हेतू कळणे कठीण.

या नियमावलीत सहा महिन्याच्या सूचनेने शिक्षकास कमी करण्यापूर्वी खात्याची परवानगी घेण्याची अट आहे नि प्रशिक्षणाच्या काळात शिक्षकास भर-पगारी रजा देण्याचा दंडक आहे; मुख्याध्यापकाच्या नेमणुकीच्या वेळी ज्येष्ठतेचा विचार करण्याचे संस्थेवर बंधन आले असून; कायम जागा हंगामी स्वरूपाने भरता कामा नयेत असा आदेश आहे. इ. ५ ते ७ च्या समान गुणवत्तेच्या शिक्षकांच्या वेतनातील तफावत रद्द केली असून सेवा मुक्तीचा दाखला मर्यादित मुदतीत मिळण्याची व्यवस्था केली आहे.

वर्गातील विद्यार्थ्यांच्या संस्थेवर ४० चा निर्बंध शैक्षणिकदृष्टचा योग्य ! पण तो आजच्या अवस्थेत कार्यवाहीत येण्यास जवळजवळ अशक्य वाटतो. ग्रंथपाल, दृक्प्रत्यय साधने, व्यावसायिक मार्गदर्शन इत्यादि शाळांना समृद्ध करणाऱ्या सामुग्रीवरील खर्च अद्यापही अनुदानास ग्राहच मानलेला नाही.

शिक्षणखात्याने स्वतःच्या खिशाला यत्किंचितही झळ लागू न देण्याची पुरेपूर दक्षता या नियमावलीत घेतलेली आहे.

ॲंग्लोइंडियन स्कूलसना हीच नियमावली लागू केली आहे. पण असे करण्यात त्यांचा ' सवता सुभा ' मान्य केला आहे. या शाळांना सवलतीचे झुकते माप दिल्यामुळे शिक्षणात द्विदल व्यवस्था निर्माण होऊन लोकशाही मूल्यांची प्रतारणा झाली आहे. समारंभ, सुट्टचा, वार्षिक तपासणी याबाबत या शाळांची वेगळी

व्यवस्था कशासाठी ? आम्हाला कामाचे दिवस २६५ तर या शाळांना १८५ नि आम्हाला अध्ययनाचे दिवस १९५ तर यांना १६० असे का ? त्यांच्या शाळातील विद्यार्थी गणपती नि बृहस्पती असतात नि आमच्या शाळेत शंख नि गोटे असतात अशी आमच्या शिक्षण खात्याची समजूत आहे काय ? शिक्षणात तरी असली द्विदल व्यवस्था असणे इष्ट नाही.

## माध्यमिक शिक्षण मंडळ- ( Board for Secondary Education )

आजवर आपले माध्यमिक शिक्षण अनुदान-विषयक नियमावलीच्या आधाराने चालत आले आहे. १८५८ साली नोकरशाहीने ही 'अनुदान संहिता' ( Grant-in-Aid Code ) शाळावर स्वामीत्व गाजविण्यासाठी निर्माण केली; या संहितेला कायद्याचे अधिष्ठान नव्हते.

प्राथमिक शिक्षणाचा कायदा आहे; विद्यापीठाचा कायदा आहे. पण मधले माध्यमिक मात्र 'संहिते' च्या आधारावर अवलंबून असे ! तत्कालीन नोकरशाहीने निर्मिलेल्या या 'संहिते' त लोकाभिमुखतेचे प्रतिबिंब कसे उमटणार ?

शिक्षण खाते प्रशासनात व्यग्र; शिक्षणातील नवे प्रयोग, नवे विचार, नव्या कल्पना यांचा परिचय करून घेण्याइतका वेळ मिळणे त्याला अशक्य असते. यामुळे साहजिकच खात्यात स्थितिशीलता निर्माण न होईल तरच नवल ! म्हणून शिक्षण–व्यवस्थेत शैक्षणिक दृष्टिकोन यावा, लोकाभिमुखता नि गतिमानता निर्माण व्हावी नि अवघ्या महाराष्ट्रातील शिक्षणात एकसूत्रता साधावी, या हेतूने कायद्याने प्रस्थापित केलेले 'माध्यमिक शिक्षण मंडळ' निर्माण करावे अशी आपल्या 'महामंडळा' ची ( Federation ) मागणी होती. सरकारने असे 'माध्यमिक-शिक्षण मंडळ' स्थापन केल्याचा कायदा नुकताच मान्य झाल्याचे आपल्या वाचनात आलेच आहे. या मंडळात सात पदसिद्ध सरकारी अधिकारी, प्रत्येक विठापीठाचा एक, विधीमंडळाचे दोन, विधान परिषदेचे दोन, असे दहा निवडून आलेले, नि नियुक्त तेवीस असे एकूण सुमारे चाळीस सभासद आहेत. यामध्ये शिक्षकांचे चार नि मुख्याध्यापकांचे चार असे फक्त आठ नियुक्त सभासद आहेत. याच पद्धतीने विभागीय मंडळाची रचना आहे.

या रचनेवरून एक गोष्ट स्पष्ट आहे. ती ही की, सरकारी विचाराच्याच अधिपत्याखाली काम करणारे हे मंडळ आहे. शिक्षक–मतहार–संघ रद्द करण्याचा विचार दुर्दैवाने जर कार्यवाहीत येणार असेल तर निदान या शिक्षण मंडळात शिक्षक-मुख्याध्यापकांना बहुसंख्येने प्रतिनिधित्व देणे न्यायाचे नि आवश्यक होते. म्हणून आपल्या महामंडळाच्या मागणीप्रमाणे हे मंडळ नसले तरी सरकारने असे माध्यमिक शिक्षणासाठी एक खास मंडळ निर्माण केले 'हे ही नसे थोडके;' म्हणून या मंडळाचे स्वागत करावेसे वाटते.

## शालागृह-महामंडळ-

विद्यार्थ्यांची संख्या विमानवेगाने वाढत आहे नि शाळांच्या इमारती अत्यंत अपूऱ्या पडत आहेत. शाळांच्या इमारत-बांधणीसाठी आर्थिक साह्य देण्याची सरकारजवळ कोणतीही योजना नाही. अनुदान संहितेतील ठेव-योजना ( Deposit Scheme ) अमान्य झाल्यामुळे रद्द करण्यात आली आहे. पण नवीन योजना पुढे करण्यात आलेली नाही किंवा त्यासंबंधी सरकारची काही हालचाल दिसत नाही.

अशा अवस्थेत मला सुचवावीशी वाटणारी या संबंधातील योजना मी आपल्या विचारासाठी स्थूलरूपाने ठेवीत आहे. ( परिशिष्ट पहा. )

## रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग-

बंधू-भगिनींनो, इतिहासाच्या एका वेगळ्या कालखंडातून आपण जात आहोत हे मी प्रथमच आपणास सांगितले. भारताच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे, आणि भारत समृद्ध, समर्थ नि सुखी करणे हे काम पिढ्यान्‌पिढ्या चालत रहाणारे आहे. एका बाजूला रणांगणावर लढणारा सैनिक नि दुसऱ्या बाजूला चार भिंतीच्या आड मुलांना शिकविणारा शिक्षक यांचे कार्य एकच आहे. मुलांच्या मनावर आक्रमण करणाऱ्या अपप्रवृत्ती, बुद्धीला बधिरता आणणारी विपरीत वस्तुस्थिती नि भावनांना भडकविणारी भोवतालची परिस्थिती या साऱ्या प्रच्छन्न शत्रूंशी लढा देऊन मुलांच्या व्यक्तिमत्वाचे संरक्षण, संगोपन नि संवर्धन करण्याचे महान उत्तरदायित्व आपणावर आहे. हा लढा निरंतरचा असून रक्तविरहित क्रांतीचा आहे. आपण सारे या क्रांतियुद्धातील सेनापती आहोत. या युद्धात यशस्वी होण्यासाठी आपल्या सैनिकांनी शौर्याची शर्थ नि पराक्रमाची पराकाष्ठा करावी म्हणून त्यांच्या अंतःकरणातील वीरवृत्तीचा वन्ही चेतविण्याची कामगिरी नियतीने आपणावर सोपविली आहे. या ध्येयाची वेदना आपल्या अंतःकरणात सदैव जागृत असेल तर ज्ञानदेवांनी म्हटल्याप्रमाणे—

तयाचिये देशींचां झाडी । कल्पतरुतें होडी
तयाचिया गांवीचिया । नदी अमृते वाहाविया
ते पाषाणही आघवे । चिंतारत्नें का नोहावे
तिये भूमिके का न यावे । चैतन्यत्व

जयहिंद ! जय महाराष्ट्र !

★

परिशिष्ट

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळागृह महामंडळ.

१) महामंडळाचे भांडवल–

अ) या महामंडळाचे भाग भांडवल खालीलप्रमाणे एकूण सहा कोटी राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | केंद्र सरकारचे भाग भांडवल | $2\frac{1}{2}$ | कोट रुपये |
| २) | राज्यसरकारचे भाग भांडवल | $2\frac{1}{2}$ | ,, ,, |
| ३) | माध्यमिक शाळांचे भाग भांडवल | १ | ,, ,, |
| | | रु. ६ | कोट |

आ) शाळेसाठी खालीलप्रमाणे भाग विकत घ्यावे लागतील.

| | | |
|---|---|---|
| १) | मोठ्या शहरातील शाळा ... ... | रु. १०,०००/– |
| २) | नगरातील (Urban) शाळा ... | रु. ५,०००/– |
| ३) | ग्रामीण भागातील शाळा ... ... | रु. २,०००/– |

इ) माध्यमिक शिक्षकांचा राज्य सरकारकडे असलेला निर्वाह निधी सरकारने ४% व्याजाच्या दराने महामंडळाकडे द्यावा. — रु. ३ कोट

रु. ९ कोट

असे एकूण रुपये नऊ कोट महामंडळाकडे खेळते भांडवल राहील.

ई) भाग भांडवलावर ५% लाभांश नि ठेवीवर ४% व्याज दिले जाईल.

२) या नऊ कोट रकमेची कर्जे खालील प्रमाणात मिळतील.

१) गेल्या तीन वर्षात मिळालेल्या Maintainance Grant च्या सरासरी अनुदानाच्या

अ) ६ पट– मोठ्या शहरातील शाळेसाठी

ब) ८ पट– नगरातील ,,

क) १० पट– ग्रामीण भागातील ,,

अशी कर्जे द. द. ७ टक्के व्याजाने दिली जातील.

२) शाळा स्थापन होऊन ५ वर्षे झाल्यानंतर ती शाळा सदर कर्ज मिळण्यास पात्र होईल.

३) अ) सदर कर्ज १५ वर्षाच्या मुदतीने दिले जाईल.

आ) कर्जाचे व्याज नि मुद्दल यांच्या एकूण रकमेच्या समान हप्त्यांनी कर्जफेड करता येईल.

इ) कोणत्याही शाळेला दोन लाखाहून अधिक कर्ज दिले जाणार नाही.

४) कर्जदार शाळेला पंधरा वर्षे सरकारने इमारतीच्या भाड्यावर संपूर्ण अनुदान द्यावे.

५) महामंडळाला, जरूर तर, भागभांडवल, निर्वाह निधी नि इतर भांडवल यांच्या एकूण रकमेइतके कर्ज काढण्याचा रिझर्व बँकेकडून–अधिकार राहील.

***टीप***– मर्यादित मुदतीत आवश्यक आकडेवारी उपलब्ध होऊ न शकल्यामुळे ही अगदी स्थूलरुपाने योजना मांडली आहे.

★

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा
रौप्य महोत्सव
शनिवार दि. १०.४.१९७१ रोजी
साजरा झाला.
‘ इवलेसे रोप लावियेले दारी
त्याचा वेलु गेला गगनावरी ’
त्याचा आनंद,
त्याबद्दलची कृतार्थता
मा. शंकररावांनी
आपल्या निवेदनात
व्यक्त केली.

# ★ स्मृति – सुवर्ण.

सन्माननीय डॉ. प्र. बा. गजेंद्रगडकर, सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश आणि मुंबई विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू; ना. यशवंतरावजी चव्हाण, नगराध्यक्ष पी. डी. पाटील, निमंत्रित पाहुणे नि उपस्थित बंधुभगिनी—

आमच्या संस्थेला नुकतीच पंचवीस वर्षे पूर्ण झाली. तिचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यासाठी आपण सारे अगत्याने उपस्थित झाला आहात त्यामुळे आम्हाला होणारा आनंद व्यक्त करणे खरोखर अशक्य आहे.

आज विविध भावनांनी आमचं मन भरून आलं आहे. पंचवीस वर्षांपूर्वी मोठ्या जिद्दीनं, आशेनं लावलेलं हे रोप जगलं– नव्हे फोफावलं, शाखोपशाखांतून

हिरव्या चैतन्याच्या पालवीनं बहरलेला आणि कर्तृत्वाच्या फळाफुलांनी लगडलेला असा त्याचा विलोभनीय वृक्ष बनला. महाराष्ट्राला सुजल, सुफल करणाऱ्या कृष्णेच्या नि कोयनेच्या प्रीतिसंगमानं संपन्न बनलेल्या या मातीत संस्थेचा हा 'यशवंत' वृक्ष घट्टपणे मुळे रोवून उभा आहे. या परिसरातील आपुलकीचा, जिव्हाळ्याचा ओलावा त्याला जीवनरस देतो आहे. शाखोपशाखांच्या पानाफुलांची नक्षी वाढवतो आहे. गेल्या पंचवीस वर्षांतील आमच्या संस्थेच्या सेवाविस्ताराचे हे यशोदर्शन मनाला खचितच नवी चालना नि चेतना देत आहे. करंगळीच्या धारेनं पहाडाच्या कठोर कवचातून पाझर फोडणारी गंगोत्री वळणावळणानं अनेक अडथळे पार करीत खळाळत, फेसाळत, धावणाऱ्या अंबुदाचं रूप धारण करते; गवयाच्या गळ्यातून प्रारंभी अडखळत, दबकत साथीचा अंदाज घेत बाहेर पडणारे स्वर कालांतरानं चांदण्याच्या बरसातीची धुंद मैफल उभी करतात; केवळ प्रकाशछायेची कल्पना असणाऱ्या नि मुठी चोखत हातपाय हलवीत भविष्याची वाट पहाणाऱ्या चिमुकल्या अर्भकाचे पंचवीस वर्षांनंतर एका सुदृढ, कणखर नि उत्साहपूर्ण तरुणात रुपांतर होते. गेल्या पंचवीस वर्षांत आमच्या संस्थेची अशीच प्रगती झाली आहे. ती आता बाल्यावस्थेतून तारुण्यांत झेपावली आहे. उज्ज्वल भविष्याची स्वप्नं आता तिच्या डोळ्यापुढं तरळत आहेत. कर्तृत्वाच्या आकृती घडविण्यासाठी देह प्रस्फुरत आहे. सर्वांगीण समृद्धीची तहान लागली आहे. संस्थेच्या आजवरच्या वाटचालीतील प्रत्येक वळणाची नोंद आमच्या हृदयाच्या स्पंदनानं करून ठेवली आहे. हर्षामर्षांचा प्रत्येक क्षण आमच्या रक्ताच्या बिंदूबिंदूत कोरला आहे. हे सारं आज या क्षणी दाटून आलं आहे.

आज आठवते, पंचवीस वर्षांपूर्वीची आमची विलक्षण स्थिती; आणि ऐकू येतात, मनाच्या एका शून्य पोकळीत घुमणाऱ्या आवेगांचे प्रतिध्वनी. कऱ्हाड हे गाव तसं फार वेगळ्या स्तरावरचं. आजूबाजूच्या भाबड्या खेड्यांना कुशीत घेऊन भीत भीत मोठं होणारं चिमुकलं शहर. इथल्या शहरीपणाला यंत्राचा झपाटा मानवला नाही. आणि इथल्या ग्रामीणतेला अज्ञानाचं आडंबर कधी सहन झालं नाही.

त्यावेळी कऱ्हाडमध्ये राष्ट्रप्रेमानं धुंद झालेल्या कर्तबगार लोकसेवकांची एक तरुण पिढी नव्यानं वर येत होती. इतिहासानं एक नवं वळण घेतलं होतं. स्वातंत्र्ययुगाच्या पहाटेची चाहूल सर्वांना लागली होती. १९४२ च्या लढ्यात कऱ्हाडनं नि या परिसरानं देदीप्यमान कामगिरी करून साऱ्या भारतात नाव कमावलं होतं. अशावेळीं दुर्दैवानं कऱ्हाडात माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रात एक पोकळी निर्माण झाली. ही पोकळी म्हणजे आम्हा कार्यकर्त्यांना एक आव्हान वाटलं. आव्हान स्वीकारण्याचा आम्ही निर्धार केला. हे सतीचं वाण आहे हे आम्ही जाणून होतो. एका दिलाची आम्ही काही शिक्षक मंडळी एकत्र आलो. त्याच सुमारास श्री. यशवंतरावजी १९४२ च्या क्रांतीतून तावून सुलाखून बाहेर आले होते. त्यांच्या भोवती कर्तृत्वाचं वलय निर्माण झालं होतं. कऱ्हाडच्या शिक्षणक्षेत्रांत निर्माण

झालेल्या नव्या पोकळीची आम्ही त्यांना जाणीव करून दिली. त्यांनी लगेच पुढे पाऊल उचलण्याचं ठरवलं. आम्ही श्री. यशवंतरावजींच्या आधारानं संस्था स्थापनेचा संकल्प सोडला. या संकल्पाला समाजभूषण बाबूरावजी गोखले यांचा आशीर्वाद लाभला नि श्रीमानशेठ रामबिलास लाहोटी यांनी पाठिंबा दिला ! एवढ्या बळा-वर आम्ही काळोखात निर्धारानं पावलं टाकू लागलो आणि पावलागणिक प्रका-शाच्या वाटा निर्माण होऊ लागल्या.

इथल्या लोकगंगेनंही आमच्या संस्थेला सतत जीवन दिलं; तारून नेलं; संस्थेची वास्तववादी, प्रामाणिक नि कालविविक्षित ध्येयधोरणं पटल्यामुळंच की काय जन-तेनं आम्हाला नेहमीच आपुलकीचा आश्रय दिला. अगदी सुरवातीची म्हणजे संस्थेनं 'श्री शिवाजी विद्यालय कराड ' सुरू केलं त्यावेळची गोष्ट ! या विद्यालयात इयत्ता पहिली ते सहावी [ आजची ५ ते १० ] अशा एकदम सहा यत्ता सुरू करून संस्थेनं अपवादात्मक प्रारंभ केला. ब्रिटिशांचं शिक्षणाबाबतचं कंजूष नि काटेकोर धोरण; त्यामुळं संस्थेच्या या उपक्रमाला मान्यता मिळण्याची जबरदस्त शंका ! या शंकेला खतपाणी घालणाऱ्या हितशत्रूंच्या अफवा ! अशी सारी प्रतिकूल परिस्थिती असतानाही जनतेनं आपल्या पाल्यांची नावं आमच्या विद्या-लयांत नोंदविली. यापेक्षा जनतेनं कोणती अधिक आपुलकी दाखवावी ? काट्या-कुट्यातून, खाचखळग्यातून वाटचाल करताना ही शिदोरी सदैव आमच्याबरोबर होती.

संस्थेच्या सुरुवातीच्या काळात खूप तीव्र गरजा होत्या. किंबहुना लहानसहान गरजाही तीव्र भासत होत्या, अशा वेळी कितीतरी मदतीचे हात पुढे आले आणि त्यांनी संस्थेची वाट सुकर केली. स्वामी विवेकानंद एकदा म्हणाले होते की– " दोन मनं एकत्र येतील तर पहाड फोडता येतील ! " या आमच्या संस्थेत कितीतरी मनं एकत्र आली; एकवटली. म्हणूनच प्रतिकूल परिस्थितीचे पहाड फोडून आम्ही प्रयत्नांची दहा लेणी उभारू शकलो.

समुद्राच्या काठी उभं राहिलं म्हणजे एक विलक्षण अनुभव येतो. त्या अथांग जलाशयावर लाटा उसळून येत असतात. आकाशाकडे झेपावणाऱ्या एका लाटेतूनच दुसरीचा जन्म होत असतो. आणि त्या सगळ्या मिळून एकत्रपणानं हिंदोळत असतात. गेल्या पंचवीस वर्षांच्या काठावरून आज कालसागराकडे पहाताना माझ्या मनात अशाच स्मृतींच्या लाटा हिंदकळत आहेत. ' श्री शिवाजी विद्यालय कऱ्हाड ' च्या स्थापनेच्यावेळी आम्ही विलक्षण नाट्यमयतेनं भारलो होतो. एक आव्हान स्वीकारलं होतं. आणि सर्व शक्ती पणाला लावून काळोखाशी झगडा चालविला होता. या विद्यालयाची गाडी जेव्हा सुरळीत चालू लागली तेव्हा मग पाटणच्या ' माने देशमुख विद्यालया ' चा श्रीगणेशा घातला. महात्मा गांधी वधानंतरच्या दंगलीत हौतात्म्य पत्करलेले कर्तव्यतत्पर फौजदार माने-देशमुख यांचे एक सजीव स्मारक आम्ही विद्यालयाच्या रूपानं उभं केलं. मसूरच्या श्री विष्णूमास्तरांच्या

(श्री. विष्णूपंत कुलकर्णी निगडीकर) खाजगी वर्गाचं रूपांतर एका परिपूर्ण विद्यालयात करून आम्ही त्या ज्योतीचा दीप बनवला. या तिन्ही उपक्रमांनी आमचा आत्मविश्वास बळावला. दृष्टी व्यापक झाली. जबाबदाऱ्या स्वीकारण्यास हात सिद्ध झाले. हिमालयाच्या कुशीत गिर्यारोहणाच्या शाळा निघणं जितकं स्वाभाविक तितकंच कोयना प्रकल्पामुळं निर्माण होणाऱ्या नव्या परिसरात विज्ञानाची आराधना सुरू होणं अत्यंत आवश्यक! या जाणिवेनं आम्ही ' सायन्स कॉलेज कराड ' ची स्थापना केली. माध्यमिकातून उच्च शिक्षणाकडे ही झेप होती. सर्व दृष्टींनी ही जबाबदारी मोठी होती. पण श्रद्धेच्या बळावर ती पूर्ण केली. मग सगळीकडंच लक्ष जाऊ लागलं. शिक्षणाच्या दृष्टीनं कुठं काही कमतरता आहे, उणीव आहे; सहानुभूतीला आव्हान आहे असं दिसलं की आपणच ती जबाबदारी उचलावी असं वाटू लागलं. शिक्षणाच्या दृष्टीनं भुकेलेल्या नजरा संस्थेकडे आशेनं पहात असल्याचं आढळू लागलं. पायात नव बळ आलं. मार्गाच्या सुकरतेची पर्वा न करता पावलं धावू लागली. दिवसभर कष्ट करणाऱ्या गरीब कामगारांच्या ज्ञानाची भूक भागविण्यासाठी ' रात्रीची शाळा ' ( नाईट हायस्कूल ) काढली. या भागातील मुलींची माध्यमिक शाळेची गरज भागावी आणि माननीय नामदार यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या कर्तबगार सुपुत्राची भारताला देणगी देणाऱ्या श्रीमती विठामाता यांचे स्मारक व्हावे या दुहेरी दृष्टीनं " विठामाता विद्यालया " ची स्थापना केली. कऱ्हाडच्या नजिक असल्यामुळंच की काय, पण माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत काहीसं उपेक्षिलं गेलेलं कार्वे इथंही आम्ही विद्यालय काढलं. कालौघाच्या भोवऱ्यात गुरफटलेल्या येथील महाराष्ट्र हायस्कूलला संस्थेनं आपलसं करून प्रगतीच्या प्रवाहात ओढून आणलं. रंजल्या-गांजलेल्या विद्यार्थ्यांसाठी मोफत वसतिगृहाची सोय करून लहान मुलांच्या मनावर प्रथमपासूनच चांगले संस्कार करण्याच्या हेतूनं संस्थेने दोन प्राथमिक शाळा चालवल्या आहेत आणि या रौप्यमहोत्सवाच्या निमित्तानं येत्या जून १९७१ पासून कऱ्हाड कला वाणिज्य महाविद्यालय या नावाचं स्वतंत्र महाविद्यालय आमच्या संस्थेच्या वतीनं सुरू होत आहे.

अशा प्रकारे प्राथमिक शिक्षणापासून पदवीअखेरच्या शिक्षणाची संस्थेनं सोय केली आहे. जीवनातील एकूण पंधरा वर्षे एकाच आमच्या संस्थेच्या सहवासात शिक्षण घेऊन समाजात सुप्रतिष्ठित झालेले अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी पहाताना संस्थेला समाधान वाटत असतं.

पंचवीस वर्षांपूर्वी जेव्हा या संस्थेची स्थापना करण्यात आली त्यावेळी देशातील वातावरण स्वातंत्र्ययुगाच्या उत्सुकतेनं भारावलेलं होतं. स्वातंत्र्य फलदायी होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला जास्तीत जास्त शिक्षण घेण्याची संधी मिळाली पाहिजे हा तात्विक विचार आमच्याही संस्थेच्या संकल्पाचे अधिष्ठान होता. शिक्षणाचा दरवाजा कोणालाही बंद असता कामा नये हा आमचा निर्धार होता.

हा निर्धार कार्यवाहीत आणण्याची आजवर आम्ही पराकाष्ठा केली आहे हे नम्रपणे नमूद करावंस वाटतं.

पंचवीस वर्षानंतर आज आपलं राष्ट्र एका नव्या युगाची सुरूवात करीत आहे. 'समाजवाद' ही या युगाची स्फूर्तिदेवता आहे. यापुढं भारताच्या सर्वांगीण आकांक्षांचा महामंत्र म्हणजे समाजवाद ! 'समाजवादाचा पाळणा भारतामध्ये सर्वं प्रथम महाराष्ट्रात हलेल' असे उद्गार माननीय श्री. यशवंतरावजींनी १९६० मध्ये काढले होते हे आपणास आठवत असेल. 'समाजवादाच्या अनुरोधानं जीवनातील सर्व कार्यक्रमांना योग्य वळण दिलं पाहिजे,' असं मार्गदर्शन श्री. यशवंतरावजींनी अनेकदा केलं आहे. राष्ट्रीय आकांक्षा आणि शिक्षण यांचा घनिष्ट संबंध असतो हे आपण जाणताच. म्हणून नवसमाज रचनेसाठी शिक्षणाचा आशय आणि कार्यक्रम यात जो बदल करण्याची गरज असेल त्या कामात ही संस्था प्रायोगिक काम करण्यात आघाडीवर राहील इतकेच या प्रसंगी आश्वासन द्यावेसे वाटते. आमच्या संस्थेतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग ग्रामविकास, आर्थिक विकास नि लोकसेवा यासाठी केला आहे. अनेक विद्यार्थी कला, शिक्षण, साहित्य, संशोधन, आदि क्षेत्रात चमकत आहेत. यापुढील दशकात एका नव्या तऱ्हेचं मन बनविण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न करू. मानवतेच्या करुणेनं ओथंबलेली, सामुदायिक पुरुषार्थाच्या प्रेरणेनं हपापलेली युयुत्सु आणि खंबीर मनं तयार करण्यातच या संस्थेतील कार्यकर्ते धन्यता मानतील.

संस्थेच्या पंचवीस वर्षाच्या प्रवासात अनेक आपत्ती आल्या. त्यापैकी दोन तीन आपत्तींचा उल्लेख केल्यावाचून रहावत नाही. संस्थेचे एक संस्थापक नि पहिले अध्यक्ष श्री. रामबिलास किसनलाल लाहोटी यांच्या अकाली दुःखद निधनामुळं संस्थेची फार मोठी हानी झाली आहे. त्याचप्रमाणे माझे एक जिवलग सहकारी आणि संस्थेचे निष्ठावंत सेवक श्री. रा. पां. वैशंपायन यांच्या नुकत्याच झालेल्या निधनामुळं आजच्या प्रसंगी मनाला तीव्रतर वेदना होत आहेत. याखेरीज १९६० साली झालेल्या भूकंपाच्या उद्रेकानं संस्थेवर फार मोठं गंडांतर आलं. अवघ्या सातारा जिल्ह्याला भूषणभूत झालेलं आमचं कोयनानगरचं विद्यालय जमीनदोस्त झालं. संस्थेला आर्थिक आणि मानसिक धक्का बसला. पण या प्रचंड हानीच्या प्रसंगी संस्थेनं केवळ जनतेच्या सहकार्यानं दऱ्याखोऱ्यातील या विद्यालयातील १३० गरीब विद्यार्थ्यांची सतत सात महिने जेवणाखाणाची विनामूल्य व्यवस्था करून त्यांच्या शिक्षणाची देखभाल केली. संस्थेच्या या कार्याबद्दल त्यावेळचे जिल्हाधिकारी श्री. पद्मनाभन ( व्यक्तीशः ), पुणे महापालिकेचे त्यावेळचे महापौर श्री. ना. ग. गोरे, श्रीमान उद्योगपती श्री. शंकररावजी ओगले प्रभृती महाराष्ट्रातील अनेक उदारधींनी संतोष व्यक्त करून यथाशक्ती आर्थिक सहाय्यही केले, हे कृतज्ञतेने व्यक्त करावेसे वाटते.

पंचवीस वर्षाच्या या टप्प्यावर थोडं थांबून मागं पहाताना संस्थेचा कार्यवाह या नात्यानं माझं मन विविध संमिश्र भावनांनी भरून येत आहे, लाटावर लाटा उचंबळत आहेत. कल्लोळ माजला आहे. केलेल्या कार्याबद्दल मनात योग्य अभिमान तर आहेच पण एक शिक्षणविषयक जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडल्याची थोडी कृतार्थताही वाटत आहे. सुखदुःखाचे, यशापयशाचे नानाविध प्रसंग आज इतक्या अंतरावरून पहाताना मनाला मोठी गंमत वाटत आहे. ज्यांनी ज्यांनी या प्रदीर्घ वाटचालीत दिलासा, सहकार्य, सहानुभूती दिली त्यांच्या विषयी मन कृतज्ञ आहे. अशीच साथ यापुढेही मिळत राहो अशी जनताजनार्दनास नम्र प्रार्थना आहे.

अजून कितीतरी योजना मनात आहेत. क्षितिजाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. पंखात सामर्थ्य असो नसो तिथपर्यंत झेप घ्यायचा मनाचा निर्धार आहे. ज्या सदिच्छेनं आजवर मार्गक्रमण झालं तीच पुढेही घेऊन जाईल असा विश्वास वाटतो. पंचवीस वर्षाच्या यशपूर्तीचा हा समारंभ मोठा आनंदाचा आहे. केलेल्या कार्यांची ही झगमगती मुद्रा आहे. एका परिकथेतल्या लहान मुलाची इथं आठवण होते. रोज त्या मुलाच्या बागेत एक पक्षी यायचा आणि आपलं एक सोन्याचे पीस ठेवून जायचा. तो पक्षी कधी त्या मुलाला दिसायचा नाही. पण अशी सोन्याची पिसं मात्र तो मुलगा साठवून ठेवायचा. तुम्हा आम्हां सर्वांच्या जीवनातला आनंद असाच असतो. तो कायमचा रहात नाही. क्षणात उडून जातो. पण आठवणींची सोनेरी पिसं मात्र आयुष्यभर शिल्लक रहातात. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या रौप्यमहोत्सवाच्या आठवणींचं हे झगमगणारं सोनेरी पीस माझ्या हृदयाच्या मखमली पेटीत मी आयुष्यभर जपून ठेवणार आहे. भाषण लांबलं. क्षमस्व.

जय–हिंद ! जय महाराष्ट्र !!

★

## या ग्रंथातील लेखक.

### म. वि. खंडकर

चेअरमन, दि बँक ऑफ कराड लि., 'बिल्वदल' ग्रंथ समितीचे अध्यक्ष, कऱ्हाड

### वि. स. खांडेकर

ख्यातनाम साहित्यिक; मराठी साहित्य संमेलनाचे ( सोलापूर ) अध्यक्ष; 'पद्मभूषण', साहित्य अकादमीचे सन्माननीय सदस्य. कोल्हापूर.

### पु. पां. ( बाबूराव ) गोखले

पद्मश्री समाजसेवक व विचारवंत साहित्यिक; श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे प्रवर्तक व विश्वस्त. कऱ्हाड.

### श्रीनिवास विनायक कुलकर्णी

कवी आणि ललितलेखक; यांच्या 'डोह' या ग्रंथास महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक मिळाले आहे.

### मु. म. कोटस्थाने

मुख्याध्यापक, दादा चौधरी विद्यालय, अहमदनगर. माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे अध्यक्ष.

### द. धों. नगरकर

मुख्याध्यापक, अहमदनगर ए. सो. चे हायस्कूल, अहमदनगर. प्राथमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे कार्यवाह.

गो. वि. कुलकर्णी

इंग्रजीचे प्राध्यापक, वारणानगर महाविद्यालय, वारणानगर.

वामन मोरेश्वर कोळेकर

उपप्राचार्य, मुधोजी हायस्कूल, फलटण. शिक्षण क्षेत्रात आपल्या प्रयोगशीलतेने प्रसिद्ध.

दि. रा. घोरपडे

पत्रकार व मुख्याध्यापक, जनता विद्यालय, मिरज.

नारायण वासुदेव जोशी

मुख्याध्यापक, आत्माराम विद्यामंदिर, ओगलेवाडी. महाराष्ट्र राज्य पारितोषिक विजेते शिक्षक.

चंद्रकुमार डांगे

प्राचार्य, कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी. शिक्षण शास्त्रावरील ग्रंथांचे लेखक.

राजाराम मोतीराम रावेरकर

प्राचार्य, सायन्स कॉलेज, कऱ्हाड.

कृष्णाजी गोपाळ सरडे

कराड अर्बन को. ऑपरेटिव्ह बँकेचे एक नियामक, कऱ्हाड.

श्री. रा. ( आप्पासाहेब ) देशपांडे

मुख्याधिकारी, कराड नगर परिषद, कऱ्हाड.

विष्णुमास्तर निगडीकर

जुन्या पिढीतील काँग्रेस कार्यकर्ते, मसूर.

शांताराम आठवले

नामवंत कवी, पुणे.

बाळकृष्ण वासुदेव घाटे

कवी, माजी शिक्षक, कन्याशाळा, कऱ्हाड.

आप्पासाहेब इनामदार

संगीत प्रवीण, ( डॉक्टर ऑफ म्युझिक ) ' कलासंगम ' या संस्थेचे प्रवर्तक, पुणे.

व्ही. जी. देशपांडे

कऱ्हाडातील नामवंत डॉक्टर. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे प्रवर्तक.

अरविंद दत्तात्रय पुराणिक

अर्थशास्त्राचे प्राध्यापक, वैकुंठलाल मेहता को-ऑप. इन्स्टिटयूट, पुणे.

पांडुरंग दादासाहेब पाटील

कऱ्हाडचे नगराध्यक्ष; श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष, कऱ्हाड.

वासुदेव पुरुषोत्तम कोल्हटकर

निवृत्त ग्रंथपाल, महाराष्ट्र प्रादेशिक ग्रंथालय, पुणे.

शाम दत्तात्रय घळसासी

मुख्याध्यापक, सायं–प्रशाला, कऱ्हाड;
' बिल्वदल ' चे संपादक.

गणेश भगवंत वैद्य

निवृत्त मेडिकल ऑफीसर; लोणावळे.

विद्याधर पुरुषोत्तम गोखले

मराठीचे प्राध्यापक, सायन्स कॉलेज, कऱ्हाड.

सौ. संजीवनी भडकमकर

कऱ्हाड.

## सौ. प्रमिलाबाई खंडकर

महिला मंडळाच्या कार्यकर्त्या, कऱ्हाड.

## विनायक नारायण फणसळकर

कऱ्हाडतील जुन्या पिढीतील नामवंत वकील कऱ्हाड.

## निशिकांत मिरजकर

मराठीचे, प्राध्यापक, सायन्स कॉलेज, कऱ्हाड कवी, ' नामदेव– दर्शन ग्रंथाचे संपादक कऱ्हाड.

## भास्कर पुरुषोत्तम गोखले

श्री शिवाजी विद्यालय, कऱ्हाडचे माजी विद्यार्थी ! चीफ अकौंटट, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे.